म. ग्रं. मं. ठाणें
विषय
सं. नं.

॥ श्री ॥

# ॥ सद्बोधचिंतामणी ॥

हें पुस्तक

वे.शा.वि.व्यासोपनामकल

यांणी

म. ग्रं. सं.
विषय
संग्रहालय क्रमांक
लेखक मठकर
पुस्तकाचें नांव सद्बोधचिंतामणी

आवृत्ति १

शके १७९७. सन १८७०

किंमत रु० २. ८० प०.

॥ श्री ॥

# सद्बोधचिंतामणी ॥

हें पुस्तक

वे० शा० वि० व्यासोप नामक लालजी वैजनाथ शास्त्री

यांणीं

सर्वमान्य अशा अनेक संस्कृतादि ग्रंथांच्या आधारानें तयार केलें तें

श्रीधर बाबाजी मठकर

यांणीं

वे० शा० लक्ष्मण नारायण केणी शास्त्री कोटकर

यांच्या सहाय्यानें शुद्ध करवून

मुंबई मध्यें,

"आर्य प्रकाश" छापखान्यांत रघुनाथ कृष्णाजी यांनीं
मालकाकरितां छापून प्रसिद्ध केलें.

आवृत्ति १

शके १७९७. सन १८७५.

किंमत रु० २. ट० ५०

(सदरहू पुस्तक सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें
रजिष्टर करून हक्क ठेविला आहे.)

सं-ले
१३

# प्रस्तावना.

——000——

अलीकडे या भरतखंडांत इंग्लिश लोकांचें राज्य झाल्यापासून भरतखंडस्थ लोकांस विद्या, कला, कौशल्येत्यादिक अनेकप्रकारचे फायदे झाले आहेत. परंतु त्यांत वर्तमानपत्र प्रसिद्धहोणें हातर एक-मोठाच फायदा समजला पाहिजे. कारण, पूर्वीं कोणतेहि गोष्टीचा सम्यक् विचार करणें झाल्यास सभा वगैरे करून भवति नभवति वगैरे करण्याची चाल पूर्वपासून यादेशांत चालूं आहे; परंतु तादृश वादविवादापासून कोणतेहि विषयाचा पक्केपणीं विचार होत होता, असें ह्मणवत् नाहीं. कारण, पूर्वपक्षाकडील दुराग्रही लोक फार असून, उत्तरपक्षाकडील लोक अल्प असले ह्मणजे, त्यांचें बोलणें वस्तुत: जरी खरें आहे, तरी तें सिद्धीस न जातां, दुराग्रहि लोकांचाच पक्ष सिद्ध होतो. याचें कारण, बहुधा, त्या सभेंत लेखी वाद नसल्याकारणानें, मीं अमुक तऱ्हेनें बोललों नाहीं, असें नाकारण्यास सबळ कारण साधत असे. परंतु, सांप्रत या वर्तमानपत्रावरून नाकारण्यास सबब न सांपडतां, ज्यांचा पक्ष नबळा असेल, त्यांस आपली लेखणी आटोपावीच लागते. असो

प्रस्तुत "विश्वकर्मकुलोत्पन्न दैवज्ञादिक पांचाल ब्राह्मणां-विषयीं कितिएक लोक बहुकालापासून वाटाघाट करीत होते. परंतु, पेशवाई झाल्यापासून "यत्रराजास्वयंचौरस्सामात्यस्सपुरोहितः ॥ तत्राहंकिंकरिष्यामियथाराजातथाप्रजा" या म्हणीप्रमाणें उत्तरोत्तर द्वेषाची वृद्धी होऊं लागली, इतकेंच नाहीं; तर या पांचालब्राह्मणांचें महत्व छपवून, लोकांत नीचत्व दाखविण्याकरितां ग्रामदामादिक नानातऱ्हेचे यत्न चालऊन, ते सिद्धीस न्हेण्याकरितां अनेक ग्रंथांतील महात्म्यें देखिल गाळलीं; कित्येकांत स्वकपोलकल्पितही ढकळून दिलीं. हें पाहून परमाश्चर्य वाटल्याकारणानें द्वेष्टेलोकांची अप्रशस्थ वर्तणूक सर्व आमच्या प्रीयवाचकांस निवेदन करण्याकरितां उपलब्ध मान्यग्रंथांतील वेचे घेऊन, त्यांच्या आधारानें "सद्बोधचिंतामणी" नामक लहानसें एक पुस्तक रचून सर्व वाचकांसमोर सादर केलें आहें. तर यांत हस्तदोषानें अगर नजरचुकीनें राहिलेल्या न्यूनाधिकदोषांवर लक्ष्य नदेतां, केवळ खऱ्या मनकुरावर मात्र लक्ष्य पुरऊन अथेतिपर्यंत हें पुस्तक वाचण्याचे परिश्रम सर्व वाचकांकडून निःपक्षपातानें झाल्यास, स्वर्णकारेंसादिकपांचाल हे ब्राह्मण आहेत किंवा नाहीं, हें सहजच लक्ष्यांत येऊन कृतश्रम सफल झाले, असें ह्मणण्यास मोठेंच एक कारण होईल.

# श्री

# सद्बोधचिंतामणी ॥

---

## अध्याय १

---

श्रीगणेशायनमः ॥

सच्चिदानंदनिर्दोषम्भूतानामादिकारणम् ॥
सर्वविघ्ननिरासार्थंवंदेहंगिरिजापतिं ॥ १ ॥

अ० जगाला आदिकारण असून, दोषरहित व सच्चिदानंदस्वरूप असा जो गिरिजापति (महादेव) त्याप्रत सर्व विघ्न निरासार्थ मीं नमस्कार करितों.

तथासद्गुरुपादाब्जंजननीजनकन्तथा ॥

व्यासादिकमुनींश्चापिनत्वाभक्तिपुरस्सरम् ॥ २ ॥
स्मृतिसूत्रपुराणानांवार्तिकानांचसंग्रहः ॥
सद्बोधचिंतामण्याख्यग्रंथोयंक्रियतेमया ॥ ३ ॥

अ० तसेंच सर्व अज्ञानांधकाररूप तमातें दूरकरण्याविषयीं समर्थ असे जे कुल गुरू, त्यांच्या चरणारविंदांप्रत व मातापितरांप्रत व व्यासादिक ऋषिसमुदायांप्रतही भक्तिपूर्वक नमस्कार करून, स्मृति सूत्र, पुराण व वार्तिकेत्यादिक प्रमाणांच्या आधारानें "सद्बोधचिंतामणी" नामक हा ग्रंथ मीं करितों.

आतां येवढे परिश्रम घेऊन, हा ग्रंथ रचण्याचें कारण हेंच कीं, या महाराष्ट्र देशांत चित्पावनीं राज्य झाल्यापासून, सत्य वस्तूंचे ठिकाणीं मिथ्यात्वप्रतिपादन व मिथ्यांचेठायीं सत्यत्व प्रतिपादन करून मतलब साधण्याचा, जिकडे तिकडे सपाटा चालला आहे. परंतु वास्तविक जर सत्यत्वाचे ठिकाणीं मिथ्यात्व प्रतिपादून श्रेष्ठत्व संपादण्याचें मूळ कारण पाहिलें असतां, स्वतांचे ठिकाणीं नीचत्व हेंच प्राधान्य दिसून येतें.

पहा या भरतखंडांत स्वर्णकारेत्यादिक अनेक सदोष

निर्दोषादिक जाति असून, त्यांत पांचाल ह्मणून जी एक ब्राह्मणांची जात आहे, ती केवळ ऋग्यजुःसामाथर्वण-सुषुम्नादिक वेदांची मुख्याधिकारी असून, विराट विश्वकर्म्याच्या पांच मुखांपासून उत्पन्न झाली आहे. येतद्विषयीं स्कांदेत्यादिक पुराणांवरून सम्यक् विवेचन होत असून याचें ब्राह्मण्य निर्विवाद आहे, येतद्विषयीं, सरकार मारफतीनें व शास्त्रीयवचनांनींही शतशः वेळा झालेले ठराव, सांप्रतकालपर्यंत दृष्टोत्पत्तीस येतात. असें असून, चित्पावनादिक हे स्वतां कैवर्तक ( कोळी ) असतां त्यावर लक्ष्य न देतां स्वोत्तेजन दाखविण्यास्तव निरर्थक या, स्वर्णकारेत्यादिक पांचालांची हेळणा करितात कीं, "पांचाल हे ब्राह्मण नव्हेत, ते शूद्राहीपेक्षां नीच आहेत." "कांहीं" ते धनगर आहेत; "कांहीं" त्यांस यज्ञोपवीतादिक धारण करण्याचा व वेदोक्त कर्मांचा व वेद मंत्रोच्चार करण्याचा मूळींच अधिकार नाहीं, असेंही ह्मणतात. "कांहीं लोक" स्वर्णकारेत्यादिक पांचालांस वेदोक्त कर्मांचा अधिकार नसून ते जर तें कर्म संपादतील अगर मंत्रोच्चार करतील; तर लागलीच त्यांची जिव्हा छेदावि, असें ही ह्मणतात्. व "कांहीं चित्पावन" स्वर्णकारेत्यादिक पांचालांनीं निऱ्या काढून नेसूं नये, इत्यादिक नानाप्रकारचे अनिर्वाच्य शब्दशर सोडितात

हे पाहून परमाश्चर्यही वाटतें. कारण, प्रालब्ध कर्म चालूं असतां "विनाशकाले विपरीतबुद्धिः" यानीति सारखा भासणारा जो अनय ( दुष्टस्वभाव ) तो या खलांच्या अंतःकरणापासून दूरच जात नाहीं. हा एक त्यांचा महान् दुर्गूण समजला पाहिजे. कारण, पहा, जेवढे प्राचीन ग्रंथकार झाले; त्या प्रत्येकानें रथकारेत्यादिक पांचालांस वेदोक्त कर्माचा अधिकार निर्विवाद लिहिला असून, सांप्रतचे विद्वान लोक त्या ग्रंथांचें अवलोकन ही न करितां केवळ " मेमातात्वंध्या" ह्या न्याया प्रमाणें स्वर्ण कारेत्यादिक पांचाल हे ब्राह्मणच नव्हे असें ह्मणतात; परंतु त्यांचें हें ह्मणणें केवळ द्वेषास्पद समजलें पाहिजे. कारण, कोणतेहि संशयाचा छेद करणें हें शास्त्रज्ञाचें कृत्य असून, तोच जर आपला गूण आच्छादूं लागला; तर तोही मतलबीच समजला जातो. कारण, स्वर्णकारेत्यादिक पांचालांनीं निऱ्याकादून न्हेसूं नये, येतद्विषयीं शास्त्रानुरोधें निर्णय करूं लागलों असतां, शास्त्रांत फक्त येवढेंच आढळतें कीं,

"यदिवासांसिवसीरन्रक्तानिवसीरन्कापासं

ब्राह्मणो मांजिष्ठंक्षत्रियो हारिद्रंवैश्यइति"
आश्वलायनसूत्र अ० १ खंड १९.

अ० ब्राह्मणांनीं रक्तवस्त्र अथवा काषाय (भगवें) क्षत्रियांनीं मंजिष्ठरंगाचें वस्त्र वैश्यांनीं पीत (पिवळें) वस्त्र प्रावणार्थ घ्यावें, असें अश्वलायन सूत्राचें वचन आहे.

"ब्राह्मणस्यसितंवस्त्रंमांजिष्ठंनृपतेःस्मृतं ॥
पीतंवैश्यस्यशूद्रस्यनीलंमलवदिष्यतेति-
आचारार्कमनुः प० ११ पं० ८.

अ० तसेच ब्राह्मणांस सफेत, क्षत्रियांस मंजिष्ठरंगाचें, वैश्यांस, पिवळें, आणि शूद्रांस नीळें वस्त्र, परिधानार्थ सांगितलें आहे. या प्रमाणें आचारार्क ग्रंथांतील मनु वचनाचा भावार्थ दिसतो.

तर या उभय वचनाधारांवरून पहातां वर्णपरत्वें वस्त्रभेद मात्र सांगितल्याचे दृष्टीस पडतात. शिवाय निऱ्या काढाव्या अगर न काढाव्या येतद्विषयीं तर मूळींच आधार नाहीं. असें असतां स्वर्णकारेत्यादिक पांचालांनीं निऱ्याकाढून न्हेसूं नये, असें ह्मणणें हें केवळ श्रुति स्मृति

विरोध असून द्वेषाचें आहे किंवा नाहीं, हें सर्व वाचकांनीं आपापल्या मनदेवतेसच विचारून पहावें.

आतां येथें कांहीं लोक अशी शंका घेतात कीं, "निऱ्या काढूं नये, याचा अर्थ काष्टे मारल्यावांचून न्हेसावें, कारण काष्टे घालण्याचा अधिकार ब्राम्हणलोकांचा असून याविषयीं वचनही आहे,"

"वामकुक्षौचनाभौचपृष्ठेचैवयथाक्रमम् ॥
त्रिकच्छेनसमायुक्तोद्विजोसौमुनिरुच्यतेति
आचारार्कियाज्ञवल्कः ॥ प० ११ पं० ११.

अ० तें असें कीं, दावे कुशीस, नाभि प्रदेशीं, आणि पाठी मागें मिळून या तीन काष्ट्यानीं युक्त जो द्विज, त्यास मुनी असें म्हणतात. या प्रमाणें आचारार्कग्रंथांत याज्ञवल्क्याचें वचन आहे. तर या वचनावरून पहातां सोनारादिकांस द्विज ही संज्ञा नसल्या कारणानें, या तीन काष्ट्यांचा अधिकार त्यांस नाहीं. सबब ब्राम्हणांप्रमाणें सोनारादिकांनीं न्हेसूं नये. तर त्यांनीं आडवें वस्त्र गुंडाळावें हा तात्पर्यार्थ निऱ्या न काढण्याचा आहे." असें म्हणतात. परंतु जरी ही शंका स्वीकारण्यार्ह नाहीं; तरी पक्षांतरानें स्वीकारितां, तथापि स्वर्णकारे-

त्यादिक पांचालांवर शूद्रत्व येत नाहीं. कारण मलबार, केरळ, पांड्य, तौळ, गोकर्ण, वगैरे देशांतील ब्राह्मण ह्मणविणारे हजारो लोक निऱ्याकाढल्या वांचून वस्त्रें धारण करीत असतात. जर स्वर्णकारित्यादिक पांचालांनीं निऱ्यानकाढल्या असतां, ते शूद्रांत गणले जातात, असीजर चित्पावनादिकांची समजूतअसेल, तर स्वर्णकारित्यादिक पांचालास लागूंकेलेल्या कायद्याप्रमाणें पूर्वोक्तदेशांतील लोक कोणत्या वर्गांत गणले जातात? व त्यां सह संपर्क ठेवणारे ते कोण समजावे व कितीकर्मांचे अधिकारी!

आतां पूर्वोक्त देशांतील लोकांनीं निऱ्यानकाढल्या तरी ते ब्राह्मणच आहेत, असी जर दुराग्रही लोकांची समजूत असेल; तर त्यांस आमचें ही तेंच उत्तर आहे. कारण—

“ यत्रोभयसमोदोषोपरिहारोपिवासमः ॥
नैकःपर्यनुयोक्तव्यस्तादगर्थविचारगे ॥ तर्कभाषा ॥

अ० असें आहेकीं, दोष आला असतां उभयठिकाणीं सारखाच येऊन निवारण झाला असतांही सारिखाच होणार. शिवाय येक लक्षण दोन ठिकाणीं व्याप्त असून त्यायोगानें एक ब्राह्मण आणि एक शूद्र असें कधींच होणें नाहीं, तस्मात्

"आत्मौपम्येनसर्वत्रःसमंपश्यतियोऽर्जुन ॥
सुखंवायदिवादुःखंसयोगीपरमोमतः ॥
भगवद्गीता अ० ६ श्लो० ३२.

कायदा किंवा दोष लागूं करणें तो आत्मवत् लागूं करावा. आणि असें करणारासच नीतिमान्, असें ह्मणतात्. याविषयीं भगवान् अर्जुनाप्रत सांगतात कीं, हे अर्जुना भूतांचे ठिकाणीं सुख अथवा दुःख पाहणें तें आत्मवत् पाहवें; त्यालाच पहणारा व योगी असें ह्मणतात्. तर या वचनाप्रमाणें वर्तननकरितां आपले दोष आच्छादून दुसऱ्यांच्या गूणांवर दोषारोप करणें हा एक त्या पुरूषांचा महान् दुर्गूण समजला पाहिजे, असो.

आतां स्वर्णकारित्यादिक पांचालांनीं वेदोक्तकर्म अथवा वेद मंत्रोचार करूं नये; कदाचित् ते करतील; तर त्यांची जिव्हा छेदावी. असें कांहीं लोकांचें ह्मणणें आहे; परंतु जर करितां ते आपला अभिमान टाकून वेदावर जर लक्ष्य देतील तर स्वर्णकारित्यादिक पांचालांस वेदाधिकार आहे किंवा नाहीं ; येतद्विषयींचा विचार सहजच करितां येईल. कारण यजुर्वेदाच्या २६ आध्यायांतील २ मंत्रांत—

" यथेमांव्वाचंकल्याणीमावदानिजनेभ्यः

ब्रह्मराजन्याभ्यां शूद्रायचार्यायचस्वायचारणायच ॥

भा० अहं परमेश्वरः "जनेभ्यः" नाम सर्व मनुष्यहितार्थं "इमाम्" ऋग्वेदादि स्वरूपान् "कल्याणी" कल्याणकर्त्रीं "वाचं" यथा येनप्रकारेण "आवदानि" आसमन्तादुपदिशानि. तथैव सर्वैर्मनुष्यैः ब्राह्मण क्षत्रियवैश्यशूद्रेभ्यस्तथान्येभ्यच्छूद्रविलक्षणेभ्योपी ऋग्वेदादिलक्षणावाग्-र्थात्सर्ववेदाउपदेष्टव्या. अत एव वेदादिनाम्पठनपाठनश्रवणेषु ब्राह्मण क्षत्रियवैश्यशूद्रातिशूद्रस्त्रीणामप्यधिकारोस्त्येवेतिसिद्धं ॥

अ० "अहंपरमेश्वरः॥ मी जो कांहीं परमेश्वर, "जनेभ्यः" म्हणजे सर्व मनुष्यांच्या हिताकारणें "इमाम्" ही जी कांहीं ऋग्यजुस्सामाथर्वणस्वरूप "कल्याणी" कल्याणकारक ऐशी "वाचं" वाणी जी तीतें "यथा" या प्रकारेंकरून "आवदानि" उपदेश करितों. कोण कोणत्या वर्णां प्रत? ब्राम्हण क्षत्रि, वैश्य, शूद्रातिशूद्र, व स्त्रीजनादिक यांप्रत. अर्थात् सर्व मनुष्यां करितां ही वेद विद्या प्रकट केली आहे. या वचनावरून सर्व मनुष्यांस वेदादिक पठन करण्याचा अधिकार आहे हें सिद्ध.

एवंच या वचनाचा सारांश इतकाच कीं, निष्कपट असून सर्वोप कारक अशी जी कांहीं ईश्वराज्ञा ती पालथं वेद पढावे व ऐकावे, हाच सर्व मनु-

ण्यांचा अधिकार. परंतु वेदपढविण्याचा व लोकांकडून श्रवण करवि-ण्याचा (म्ह.) यथार्थ रीत्या वेदार्थ सांगून लोकांस तल्लीन करण्याचा अधिकार मात्र विद्वानाचा आहे.

या शिवाय "छांदोग्योपनिषदांत" जनश्रुती[1] नामक शूद्राकरवीं रक्व्य नावांच्या ब्राम्हणानें, अध्ययन करविलें, अशी कथा आहे. यावरून आरंभीं वेद व विद्या, कोणीं व कोणांकडूनहि शिकावी असें होतें. कारण, "ऐलुशम्हणून एक दासीपुत्र होता, त्यास जे कांहीं वेद मंत्र येत होते. ते ऋषी आदि करून ब्राम्हण त्या पासून सिकले. आणि त्यास ब्राम्हण केलें," अशी कथा वेदांत आहे. याचप्रमाणें "जनक राजापासून होम व हवन विद्या याज्ञवल्क्य ऋषीनें शिकून त्यास राजर्षि केला आणि याच राजापासून गौतमऋ-

१. जनश्रुतिः पौत्रायणः सहस्त्रंगवांनिष्कमश्वतुरीरथं दुहि-तरंतदादायप्रतिचक्रमे वायुर्वावसंवर्गोदावाअग्निरित्यादिच्छांदोग्योपनि-षद्वचनं खं० १ प्रपाठक ४.

धींही ज्ञान शिकला. आणि गौतमानें जाबालनामक वेश्यापुत्रास उपनयनकरून वेदविद्या सांगितली, अशी कथा छांदोग्य उपनिषदांत आहे.

या शिवाय मनुस्मृतीच्या २ अध्यायांत हीं

" श्रद्दधानःशुभांविद्यामाददीतावरादपि ॥
अंत्यादपिपरंधर्मंस्त्रीरत्नंदुष्कुलादपि ॥
विषादप्यमृतंग्राह्यंबालादपिसुभाषितं ।

---

१. सत्यकामोजाबालो जाबालांमातरमामंत्रयांचक्रे ब्रह्मचर्यं भवति विवत्स्यामिकिंगोत्रोन्वहमस्मीति सह हारिद्रुमतं गौतमेत्योवाच ब्रह्मचर्यंभगवतिवत्स्याम्युपेयांभगवंतमिति तंहोवाच किं गोत्रोनुसोम्यासीति सहोवाचनाहमेतद्वेदभोयद्गोत्रहमस्म्य पृच्छं मातरंसामाप्रत्य ब्रवीबह्वहंचरंतीपरिचारिणींयौवनेत्वामलभेसाहमेतं नवेदयद्गोत्रस्त्वमसिजबालातुनामाहमस्मिसत्यकामोनामत्वमसीतिसोहंसत्यकामोजाबालोस्मीभोइति तंहोवाच नैतदब्राह्मणोविवक्तुमर्हतिसमिधंसौम्याहरोपत्वानेष्येनसत्यादगाइति तमुपनीयेत्यादि. छांदोग्योपनिषद अ० ९ खं० १ प्र० ४.

अमित्रादपिसद्वृत्तममेध्यादपिकांचनम् ॥
स्त्रियोरत्नान्यथोविद्याधर्मःशौचंसुभाषितं ॥
विविधानिचशिल्पानिसमादेयानिसर्वतः ॥
अब्राह्मणादध्ययनमापत्कालेविधीयते ॥
अनुव्रज्याचशुश्रूषायावदध्ययनंगुरोः" ॥
श्लो० २३८, २३९, २४०, २४१.

इत्यादिक वचनें असून, यासर्व वचनांचा भावार्थ पहातां एखादा अब्राम्हण (ब्राम्हणनव्हे) असला, तथापि त्याकडून विद्या ग्रहणकरावी, असें या मनुमतावरून स्पष्ट दिसतें. तस्मात् यांवरूंन विचार करितां अब्राम्हणादिकांलाही वेदादिकांचा अधिकार होता व आहे असें सिद्ध होतें.

या शिवाय याविषयीं व्यासाज्ञाही आहे कीं,

" मंत्रदःक्षत्रियोविप्रैःशुश्रूषानुगमादिना ॥
प्राप्तविद्योब्राह्मणस्तुपुनस्तस्यगुरुःस्मृतइति" ॥

एकादा क्षत्रिय मंत्रोपदेष्टाहे असून ब्राम्हण जर अनधीत आहे

तर ब्राम्हणानें त्याक्षत्रियापासून शुश्रूषापूर्वक विद्या ग्रहणकरावी. तावत्कालपर्यंत क्षत्रिय ब्राम्हणाचा गुरू होतो. आणि त्याक्षत्रियापासून संपूर्ण विद्या ब्राम्हणानें हरण केल्यावर ब्राम्हण क्षत्रियाचा गुरू, असें सांगितलें आहे. यावरूनहीं वेदाधिकार सर्वत्र आहे, असें सिद्ध होतें.

या शिवाय भारत तात्पर्याच्या २९ तीसाव्या अध्यायांत,

तत्वविज्ञापनंधर्मोविप्रस्यतुविशेषतः ॥
ज्ञापनंक्षत्रियाणांचधर्मोविप्राभ्यनुज्ञया ॥
तदभावेतुवैश्यानांशूद्रस्यपरमापदि" ॥

अ० असें सांगितलें आहे कीं, तत्वोपदेश करणें हा विशेषें करून ब्राम्हणाचा धर्म आहे. परंतु ब्राम्हण नसेल अगर अविद्वान असेल; तर तदाज्ञेवरून क्षत्रियानें उपदेश करावा. त्याचेही अभावीं वैश्यानें, त्याचेही अभावीं शूद्रानें करावा. असें सांगितलें आहे; यावरून वेदादिक विद्या पढण्याचा अधिकार व विद्वान असल्यास उपदेश करण्याचा अधिकार शूद्रासही आहे, असें सिद्धहोतें. तर या प्रदर्शित सर्व आधारांवरून वेदादिक विद्या ब्रम्ह, क्षत्रि, वैश्य, शूद्रातिशूद्रांलाही शिकण्याचा अधिकार आहे, असें सिद्ध होत असून सोनारेंत्यादिक

पांचालांनीं मात्र वेदोक्त कर्म करूंनये, वेद पढूंनये, पढत असल्यास त्यांची जिव्हा छेदावी; इत्यादिक बकवाद हे केवळ द्वेषाचेच, आहेत किंवा नाहीं, हें सर्वत्रांनीं विचारपूर्वक पाहावें.

अतां कांहींलोक पूर्व प्रदर्शित प्रमाणाचा, उच्छेद करण्याकरितां या सदराखालील कांहीं प्रमाणें दाखवितात कीं,

"यथैवान्यायविज्ञाताद्वेदाल्लेख्यादिपूर्वकात् ॥
शूद्रेणाधिगताद्वापिधर्मज्ञानंनसंमतं ॥"

अ० जर वेद यथार्थ लिहिलानाहीं किंवा तो ग्रंथावरून पठण केला अथवा तो शूद्रापासून शिकला, तर तें ज्ञान निर्फळ असें सांगितलें आहे. तरया वचनावरून पहातां हीनवर्णस्थांकडून वेदादिक शिकणें योग्य नाहीं, असें सिद्ध होत असून याविषयीं दुसरें प्रमाण,

"नशूद्रायमतिंदद्यान्नोच्छिष्टंनहविष्कृतं ॥
नचास्योपदिशेत्धर्मंनचास्यव्रतमादिशेत्" ॥

अ० असें आहे कीं, शूद्रास ज्ञान शिकवूं नये. ब्राम्हणाचें उष्टें होमाचाशेष, धर्म संबंधीं उपदेश आणि व्रत, हीं चार शूद्रास देऊं नयेत.

इतकेंच नाहीं; परंतु शूद्रानें वेदघोष होत असेल तर तो ऐकूं नये, व स्वतः कोणती विद्या शिकण्याचे परिश्रम घेऊं नये, इत्यादिक प्रतिबंध शूद्राविषयीं असतां, शूद्रालाहि वेदाधिकार आहे, असें म्हणणें हें केवळ निर्मूल समजलें पाहिजे." असें म्हणतात, आणि या म्हणण्यावरून पूर्वोक्त सर्व वचनें व्यर्थ जातात, असें म्हटलें तरी चालेल; परंतु येथें चालत नाहीं. कारण,

अध्येष्यतेचयइमंधर्म्यंसंवादमावयोः ॥
ज्ञानयज्ञेनतेनाहमिष्टःस्यामितिमेमतिः ॥
श्रद्धावाननसूयश्चशृणुयादपियोनरः ॥
सोऽपिमुक्तःशुभाँल्लोकान्प्राप्नुयात्पुण्यकर्मणां ॥
भगवद्गीता अ० १८ श्लो० ७०, ७१.

अ० जो धर्मरूप ऐसा आम्हीं कृष्णार्जुन अमचा संवाद जो त्यातें जपरूप पठण करील, तरी त्या पुरुषानें पुर्वोक्त ज्ञान यज्ञजो तेणें करून मीं सर्वात्माजोतो यजिलों ऐसा होतें ऐशी माझी बुद्धि. आणि भक्ति युक्त असून द्वेष रहित ऐसा जो मनुष्य श्रवण करील, तोही

पाप रहित होत्साता, अश्वमेधादि पुण्यकर्ते, त्यांच्या शुभलोकजे ता प्रत पावेल. असें गतिचें वचन आहे.

या खेरीज महा भारताच्या अनुशासनपर्वांत व शांतिपर्वाच्या मोक्षधर्मांत व भक्तिमीमांसेंतहि शूद्रास श्रवण पठणादिक करण्याचा अधिकार निर्विवाद लिहिल्याविषयीं अनेक प्रमाणें मिळतात. तीं अशीं कीं,

"यइदंशृणुयानित्यंयश्चापिपरिकीर्तयेत् ॥
नाशुभंप्राप्नुयात्किंचित्सोमुत्रेहचमानवः ॥
वेदांतगोब्राह्मणस्यात्क्षत्रियोविजयीभवेत् ॥
वैश्योधनसमृद्धःस्याच्छूद्रःसुखमवाप्नुयात्" ॥
इमंस्तवमधीयानःश्रद्धाभक्तिसमन्वितः ॥
युज्येतात्मासुखक्षांतिश्रीधृतिस्मृतिकीर्तिभिः ॥
इमंस्तवंभगवतोविष्णोर्व्यासेनकीर्तितम् ॥
पठेद्यइच्छेत्पुरुषःश्रेयःप्राप्तुंसुखानिचेतिअनुशासनिके ॥ तथामोक्षधर्मेपि. ॥ यइदंपठते

स्तोत्रशृणुयाद्ब्राह्मणैःसदा ॥ ब्राह्मणोलभते विद्यांक्षत्रियोराज्यमाप्नुयात् ॥ वैश्योधनसमृद्धः स्याच्छूद्रःसुखमवाप्नुयादिति ॥

अ० जो कोणीं भक्तियुक्त होत्साता नित्य या स्तोत्रातें श्रवण अथवा पठण करितो, तो मानव ( मनुष्य ) किंचिन्मात्रहि अशुभ पावत नाहीं. आणि ब्राह्मण जर वेदादिक विद्येछेनें हें स्तवन भक्तिपूर्वक, पठण करील, तर तो वेदवेत्ता होऊन उत्तम गतीतें पावेल. त्याचप्रमाणें क्षत्रिय जर युद्धार्थ या स्तोत्राचें पठण करील, तर तोहि संग्रामांत जय पावेल. आणि याचप्रमाणें वैश्य धनाढ्य होईल; व शूद्र जर हें स्तोत्र भक्ति पूर्वक श्रवण अथवा पठण करील, तर तोहि कांतियुक्त होत्साता सुखातें पावेल. या प्रमाणें महाभारतांतील वचनें असून शिष्टांनीं "भारतःपंचमोवेदः" भारत हें पांचवा वेद असें म्हटलें आहे. या शिवाय भक्तिमीमांसेंत

"आनिंद्ययोन्यधिक्रियते पारंपर्यात्सामान्यवत्

भक्तिमीमांसा अ० २ पा० २ सू० ७८

अ० असें सांगितलें आहे कीं, चांडाल योनिस्थ जरी आहे,

तरी त्यास भगवद्भक्तीचा अधिकार आहे. कारण परंपरागत धर्म-करून भक्तांची समानता केली असून ( ज्ञानमपिश्रुनिमूल मेवभतीति) ज्ञान हें श्रुतीला (वेद जाणण्याला) मूल कारण आहे. असें भक्तिमीमांसेंत सांगि‌तलें असून याविषयीं, गीतावचनहि आहे तें असें कीं,

" ओमित्येकाक्षरंब्रह्मव्याहरन्मामनुस्मरन् ॥
यःप्रयातित्यजन्देहंसयातिपरमांगतिमितिगीता
अ० ८ श्लो० १३

अ० जो कोणीं, ओम् म्हणोन एकाक्षरानें युक्त असें जें परब्रम्ह त्याप्रत, भक्तियुक्त स्मरतो तो ह्या नाशवंत देहाचा त्याग करून मूर्ध्नि नाडीनें 'परमां' उत्कृष्ट ऐशी गति जी तीतें 'याति' पावतो. याप्रमाणें गीता वचन आहे. या शिवाय,

" अंत्यजाअपियेभक्तानामज्ञानाधिकारिणेति
ब्रह्मसूत्रभाष्ये "

अ० ब्रम्हसूत्रभाष्यांत, जात्या जरी अंत्यज आहे, तरी तो

सद्भक असून नाम ज्ञानास अधिकारी आहे, असें सांगितलें असून वास्तविक पाहिलें असतां नाममात्रेंकरूनच मोक्ष कथन केला आहे. म्हणून शुक्राचार्य म्हणतात, कीं, "आलोड्य सर्वशास्त्रा ।।विचार्यैवंपुनःपुनः इदमेकंसुनिष्पन्नंध्येयोन्नाराणयस्सदेति" सर्व शास्त्रें उलथापालथ करून वारंवार जरी विचार केला; तथापि त्यापासून परमेश्वरालाच शरण जावें, हेंच कायतें निष्पन्न. म्हणून "यतोनारायगप्रसादमृतेनमोक्षः" असें म्हटलें आहे. तस्मात् इत्यादिक प्रमाणें शूद्रास श्रवण-पठणादिक करण्याविषयीं लागूं असून, ज्ञानावांचून भक्तिमार्ग किंवा कर्ममार्ग साधत नाहीं; आणि ज्ञान हें मुख्य श्रुतिमूल असें शिष्टानीं कथन केल्या कारणानें जरी पूर्वपक्षकारांकडून "यथै-वान्यायविज्ञाता"दिक प्रमाणें दर्शविण्यांत आलीं; तरी तीं एक देशीय असून सावकाश असल्याकारणानें पूर्वोक्त निरवकाश अशा श्रुति प्रमाण.वरून "श्रुतिस्मृतिविरोधेतुश्रुतिरेवगरीयसी" या वाक्यानुरोधें "यथैवान्यायविज्ञाता" दिक सर्व प्रमाणें अग्राह्य असून अप्रमाण समजलीं जावून शूद्रालाही वेदादिक विद्या पठण करण्याचा अधिकार निर्विवाद आहे हें सिद्ध होतें, तर स्वर्णकारे-

त्यादिक पांचाल ब्राम्हणांस वेदादिक पढण्याचा व वेदोक्तकर्म करण्याचा अधिकार असेल यांत नवल काय ?

आतां कितिएक लोक अमरकोशाच्या आधारानें स्वर्णकारि-त्यादिक पांचालहे, धनगराहिपेंक्षां नीच, असें ह्मणतात; परंतु तेंहि संभवदुक्तिक नाहीं. कारण, अमरकोशांत,

"नाडिंधमःस्वर्णकारःकलादोरुक्मकारकः ॥
शाच्छांकिकःकांबवीकःसौल्विकःस्ताम्रकुट्टकः" ॥

अमरकोश कां० २ शूद्रवर्ग.

अ० नाडिंधम, स्वर्णकार, कलाद, रुक्मकार, शांकिक, कांब-वीक, सौल्विक, आणि ताम्रकुट्टकेत्यादिक जीं नामें सांगितलीं, तीं वास्तविक असून अक्षरशः खरीं आहेत; परंतु या नामभेदांवरून स्वर्णकारेत्यादिक पांचालहे धनगराहिपेक्षां नीच आहेत असें ह्मणवत् नाहीं. कारण स्वर्णकारेत्यादिक पां-चालांची केवळ एकच जाति आहे, असें नाहीं. तर यापांचल ज्ञातीं-मध्यें स्वर्णकार, लोहकार, कांश्यकार, सुतार, कातरवट, वैश्य, क्षत्रिय,

... रथकार, व्रात्यवैश्य, अहेरे, लाडे, खादेशी, आंकसाळी, देवाम.

---

१ हे मूळचे सोनार ज्ञाति पैकी असून दुकानदारीनें निर्वाह करूं लागले सबब लोक यांस वैश्य असें म्हणत. यांचें विधि प्रमाणें उनयन होत नसल्यामुळें लोक यानां व्रात्यहि म्हणतात. आणि ही जात अमुकच देशांत राहति असा निश्चय नाहीं. बहुतकरून सर्व देशांत ह्या जातीचा पसारा आहे. २ ही पंढरपूर, सातारा वगैरे देशांत आढळत असून अत्यल्प प्रतीची मानली आहे. ३ ह्या जातीचा पताच लागत नाहीं; परंतु सोनारांपासून ह्यांची उत्पत्ति आहे असें कांहीं शिष्टांचें मत दिसतें. ४ हा स्वर्णकारांतील भेद असून देशभेद भिन्नत्वामुळें परस्परांत अन्नोदक व्यवहार होत नाहीं. ५ हे कर्नाटक प्रांत (म्ह०) उडपी सुब्रम्हण्यादिक देशांत प्रसिद्ध असून यांचें येथें विवाह वगैरे विधि प्रमाणें होत असतो; यांचा मुख्य देव वीरभद्र आहे. ६ देवाम हा भेद ब्रह्म पांचालांपैकी असून यांची वस्ती जुन्नर वगैरे प्रांतीं आहे. यांची उत्पत्ति अशी सांगितली आहे कीं,

अग्निभ्यइदमुत्पन्नंमिथुनंकार्यसाधकं ॥ नाडिहस्तःपुमान्यो-

ष्टिर्कुंडहस्ताप्रदृश्यते ॥ तस्मादिदंस्वर्णरौप्यधातुकार्यप्रसाधकं ॥ वन्हिरेतःसुवर्णचत्विदंवन्हिसमुद्भवं ॥ तत्कार्यसाधनंश्रेष्ठंभविष्यं-तिनसंशयः ॥ अग्निदेवात्समुत्पन्नंतस्माद्देवाग्निसंज्ञकं ॥ सुवर्णस्यकृतौ-दक्षंस्वर्णकारमतःस्मृतं ॥ नामद्वयंतुशांडिल्यंगोत्रमेतस्यकीर्तितं ॥ भविष्यंतिप्रजाःह्यस्माद्गोत्रानेकप्रवर्तिनी ॥ प्रसिद्धास्सर्वदेशेषुस्वर्णकारे-तिसंज्ञयेति आग्नेयपुराणस्थवचनं रथकारकल्पद्रुमे, तथा देवज्ञार्का-भिधग्रंथेस्थितं. प० ९७ पं० २ जगताचें कार्य साधण्यास्तव अग्नीपासून एक मिथुन ( स्त्री आणि पुरुष ) उत्पन्न झालें. त्यांत पुरुष नाडी हस्तानें ( फुकणी हातांत घेतलेला ) युक्त आणि स्त्री कुंडिहस्ता म्हणजे हातांत कुंड घेतलेली. ह्यांनीं स्वर्ण रौप्यादिकांचें कार्य साधावें, कारण स्वर्ण हें अग्नीचें रेत असून मिथुनहि अग्नी पासून उत्पन्न, झालें अर्थात् तदर्थ झालें यांत संशय नाहीं. अग्नी देवापासून झालें म्हणून देवाग्नि नामातें पावलें. सुवर्णाकृतीविषयीं दक्ष असल्यानें स्वर्णकार, अशीं हीं दोन नामें, त्यांस प्राप्त झालीं. आणि अग्नीचें गोत्र शांडिल्य

गुजरातेंतील[12] श्रेमानियां, रजपूत[13], कानडीपांचाळ[14], तेलगुपांचाळ[15], दैवज्ञ[16],

---

असून हेंहि अग्नीपासून झाल्याकारणानें यांचेंहि गोत्र शांडिल्य सांगितलें आहे. आणि यांपासून अनेक प्रजा उत्पन्न होईल तीहि स्वर्णकार नामें प्रसिद्ध असून शांडिल्य व दुसऱ्या अनेक गोत्रांनीं युक्त अशी होईल. या प्रमाणें अग्निपुराणाचें वचन रथकारकल्पद्रुम-ग्रंथांत व दैवज्ञार्क नामक ग्रंथांत आहे.

सांप्रत ह्या लोकांची अनेक संतती स्वर्णकार नामानें प्रसिद्ध या पृथ्वीचेठायीं असून दैवज्ञ असी म्हणविली जाती. ७ ही जात कोणत्या ज्ञातिपासून उत्पन्न झाली, याचा कांहीं थांग लागत नसून बहुधा यांचि वस्ती, गुजरात व मारवाड प्रांतीं आढळती. ८ ही जात आबू पर्वताचा आसमंतात् जो देश त्या देशांत असून त्या देशाला श्रीमाळ हें नांव असल्यानें यांनाहि लोक शिरमाळी असें म्हणतात; परंतु श्रीमाळ शब्दानें हे कांहीं ब्राम्हणांत गणले जात नाहींत. हे केवळ मराठ्यांपेक्षां अल्प प्रतीचे असून यांचे येथें कर्म सर्व तांत्रिक रीतिनें होत असतें. बहुत करून श्रीमाळी ब्राह्मण यांचे उपाध्ये असतात.

९ ही जात बहुतकरून पंजाब त्या प्रांतीं आढळती; यांचें

अथवा कोंकणस्थ, गुलमें, विदूर, कार, कायीत, लिंगाय, शिम्नूर,

---

आचरण वगैरे अत्यंत भिन्न दिसत असून कोणतोहि जातीचे लोक याचें हातचें पाणीं शेवीत नाहींत. १० ह्या जातीचा लोपच आहे असें म्हटलें तरी चालेल. ११ हे सर्व देशांत साधारण असून यांची उत्पत्ति सोनार, सुतारां पासून आहे असें कांहीं लोक सांगतात. १२ यांना गुर्जर देशांत वमनियां असें म्हणण्याचा प्रचात असून यांचा आणि संकर रथकारांचा अन्नोदक संबंध होत असतो, असें म्हणतात, परंतु याचे येथें विधिप्रमाणें उपनयन संस्कार वगैरे होतात. आणि यांची उत्पत्ति श्रीमाळ पुराणांत आहे असेंहि म्हणतात. १३ हे लोक मूळचे माळ्यांपासून झाले असून सांप्रत हे आपणास रजपूत असें म्हणवितात; परंतु यांचें आचरण शूद्राप्रमाणें असून यांचें मुख्य कुल दैवत, इंग्लादेवी आहे. १४ हें म्हायसूर त्या प्रांतीं असून यांचे आचरण वगैरे देवाग्नासारखेंच आहे यांचा मुख्य देव विरुपाक्ष अथवा वीरभद्र आहे. १५ हे आपणास तेलगू पांचाल म्हणवीत असतात; परंतु हे मूळचे कान-डी पांचालांपैकीच आहेत कारण यांचा त्यांचा देव एक मिळतो. १६ हे मालवण, राजापूर, रत्नागिरी; गोमांतक वगैरे देशांत

कच्छिहिंदू, पाके, कलोरी, विटनी, जळगे, मारवाडी, हेमोड, पारखे, वेद्री, इत्यादिक भेदअसून यासर्वांत मूळभेद १५ आहेत. आणि जरी हे मुळचे १५ भेद खरे आहेत, तरी त्यांतही, ब्रह्म, क्षत्रिय, वैश्य, संकर, व्रातवैश्य, असुर, शूद्र, असे ७ भेद असून उत्तरोत्तर श्रेष्ठ जाणले जातात.

आतां यासर्व भेदांचा कर्ता जरी एक आहे, तरी उत्पत्ति मर्यादेत स्थानादिक भेद, भिन्नत्व दिसून येत आसल्याकारणानें वरील नाडिंधमेत्यादिक शब्द ब्रह्म, क्षत्र, वैश्य, संकर, याचार जातींस लागू होत नाहींत, असें म्हणण्यास कांहींएक संशय वाटत नाहीं. कारण ब्रम्ह, क्षत्रिय, वैश्य, संकर, याचार जाति रहित करून बाकीचे ११ भेद यद्यपि, स्वर्णकार, काष्ठकार, कांशकार, लोहकार, शिल्पकार, इत्यादिक नामानीं युक्त आहेत, तथापि त्यांच्या उत्पत्ति क्रमाविषयीं पुराणांतरीं असें वर्णन लिहिल्याचें अढळतें कीं,

---

राहत असून आचारशील व मोठे अभिमानीं आहेत; यांचा देव विश्वकर्मा असून स्वर्णादिक अलंकार करण्यांत हे फार प्रवीण असतात. याच प्रमाणें अवशेष भेदांचा वृत्तांत असून बरोबर शोध लागत नसल्यामुळें कथन केला नाहीं.

"कोणीं एकेसमयीं अत्युत्तम पुष्पलतादिकानीं युक्त निर्जन (जनरहित) व रम्य अश्या मलयाचल (हिमाचल) पर्वताचे ठायीं विश्वकर्मा यानें एका शूद्र जातीच्या स्त्रीसीं संभोग करून बारा महिन्यांत शिल्पविद्येविषयीं कुशल असें आठ पुत्र उत्पन्न केले." याविषयीं प्रमाणें,

विश्वकर्माचशूद्रायांवीर्य्याधानंचकारह ॥
ततःशिल्पेषुकुशलान्पूत्रानष्टौमनोहरान् ॥
मसृजत्साचशूद्रिण्यांपूर्णसंवत्सरांतरे ॥
तेषांनामानिवक्षेहंशृणुष्वाद्विजसत्तम ॥
मालाकारःकर्मकारःशांकोकश्चकुविंदकान् ॥
कुंभकारःसूत्रधारःस्वर्णचित्रकरांस्तथा ॥
तेषांबहुवरंदत्वातान्संस्थाप्यमहीतले ॥
मानवींजन्मनासृज्यजग्मुतुर्निजमंदिरं ॥

रथकार कल्पद्रुम पत्र ५१ व ५२.

अ० सोतिर शौनकाप्रत ह्मणतो कीं, हे द्विजश्रेष्ठा विश्व-

कर्म्यानें शूद्रीचे ठीकाणीं शिल्प विद्येविषयीं अती कुशल असे आठ पुत्र उत्पन्न केले म्हणून जी कथा म्या तुजकारणें सांगितली त्यांचीं नामें सांगतों तीं श्रवण कर. १ मालाकार, (माळी) २ लोहार ३ कांसार, ४ कोष्टी, ५ कुंभार, ६ सुतार, ७ स्वर्णकार, आणि ८ चित्र-कार (चितारी) मिळून हे आठ पुत्र उत्पादनकरून त्या आठांस हि शिल्पकर्माविषयीं यथेच्छ वरदान देऊन या पृथ्वीमध्यें स्थापिता झाला. आणि तुह्मीं मानवी जन्मातें उत्पन्न करा, असें सांगून विश्वकर्मा आपल्या निजस्थानास गेला. अशी कथा ब्रह्माण्ड व ब्रह्मवैवर्त पुराणांत आहे, असें रथकारकल्पद्रुम ग्रंथाचा परिस्फोट दिसत असून पुढें त्यांस हेतुपूर्वक पातित्य कथन केल्याचें हि वर्णन आढळतें. तें असें कीं,

"स्वर्णकारःस्वर्णचौर्य्यात्‌ब्राह्मणानांद्विजोत्तम् ॥
बभूवःपतितःसद्योब्रह्मशापेनकर्मणा ॥
सूत्रधारोद्विजानांतुशापेनपतितोभवेत् ॥
शीघ्रंचयज्ञकाष्ठानिनददौतेनहेतुना ॥

ऽपतिक्रमेणचित्राणांसद्यश्चित्रकरस्तथा ॥
पतितोभूद्ब्राह्मणानांशापेनाद्विजसत्तम ॥"

अ० सोति( ह्मणतो हे द्विजसत्तमा मागें जे भेद सांगितले ते कारण परत्वें करून पतितहि झाले आहेत, ते असे कीं, "स्वर्णकार ब्राह्मणादिकांचें स्वर्णापहार करूं लागला सबब तो ब्रह्मशापेंकरून पतित झाला. त्याच प्रमाणें सुतार यज्ञाकरितां काष्टें वगैरे शीघ्र देत नाहींसा झाला ह्मणून तोहि ब्रह्मशापानें पातित्यातें पावता झाला. त्याच प्रमाणें यज्ञ मंटपादिकांत चित्रादिक काढण्याविषयीं चित्रकार फार अवकाश करूं लागला सबब त्या क्रोधानें त्यालाहि ब्राह्मण शापिते झाले.

याचप्रमाणेंबाकीच्या८भेदांचेंहि वर्णन सम्यग् लिहिलें आहे; परंतु ग्रंथ विस्तार भयास्तव सर्व येथें घेतलें नाहीं. अस्तु. आतां सांगण्याचें तात्पर्य इतकेंचकीं, या प्रदर्शित सर्व आधारांवरून विचार करितां पूर्वोक्त नाडिंधमेत्यादिक शब्दांचे अधिकारस्थ लोक हेच असून यांपासून झालेले दुसरे ४९ भेद असून उत्तरोत्तर कनिष्ट धरले आहेत. या मानानें पांचाल जातींत एकंदरीनें ७४ भेद असून उत्तरोत्तर कनिष्ट असल्या कारणानें पूर्वोक्त नाडिंधमेत्यादिक शब्द

ब्रह्म, क्षात्रि, वैश्य आणि संकर, या ४ जाति खेरीज करून बाकीच्या ७० भेदांसच ते शब्द लागूं होतात, असें ह्मणण्यास किमपि संदेश भासत नसून पूर्वोक्त वचनाधारहि आहे.

या शिवाय स्मृत्यादिक ग्रंथांत पूर्वोक्त भेदांची उत्पत्ति अशी आढळती कीं,

"अवीरास्त्रीस्वर्णकारस्त्रीजितग्रामयाजिनां ॥
शस्त्रविक्रयकर्मारतंतुवायश्ववित्तिना" ॥
याज्ञवल्क्यस्मृ० अ० १ श्लो० ३५

अ० अवीरास्त्री (गवळण) चे ठायीं व्यभिचार धर्मानें उत्पादित जो पुत्र तो स्वर्णकार याणें ग्रामांत याचना करून त्यावर उपजीविका करावी. लोहारानें नानाप्रकारचीं शस्त्रें तयार करून त्यावर जीवन करावें. असें याज्ञवल्क्याचें वचन आहे.

शूद्रायांवैश्यसंसर्गाद्विधिनासूचकःस्मृतः ॥
सूचकाद्विप्रकन्यायांजातस्तक्षकउच्यते ॥

शिल्पकर्माणिचान्यानिप्रासादलक्षणंतथेति ॥
उशनस्मृ० श्लो० ४३

आतां तक्षा (सुतार) विषयीं उशनस्मृतींत असें विदित आहेकीं, शूद्रीचे ठिकाणीं वैश्यापासून उत्पन्नजोपुत्र तो सूचक आणि त्यासूचका पासून विप्रकन्येचे ठीकाणीं उत्पन्नजो तो तक्ष ( सुतार ) याणें शिल्पविद्येकरून घरें वगैरे बांधून त्यावर उपजीविका करावी.

“ब्राह्मण्यांशूद्रजनितश्चांडालत्रिविधःस्मृतः ॥
कर्द्धकीनापितोगोपआशायःकुंभकारकः ॥
इतिव्यासःस्मृ० अ० १ श्लो० १०

अ० दुसरें असें आहे कीं, ब्राह्मणींचे ठायीं शूद्रानें उत्पादित असे तीन प्रकारचे चांडाल कथन केले आहेत. ते हे कीं, १ वर्द्धकी, (सुतार) २ नापित, (हजाम) ३ गोप, आणि कुंभार. या प्रमाणें व्यासस्मृतीचें वचन आहे.

नृपायंवैश्यसंसर्गादायोगवइतिस्मृतः ॥

तंतुवायाभवंत्येववसुकांस्योपजीविनः ॥

उशनस्मृ० श्लो० १३.

अ० त्याचप्रमाणें क्षत्रियस्त्रीचे ठीकाणीं वैश्य रेतानें उत्पन्न जो पुत्र तो आयोगवी (कासार) याणें कांस्येत्यादिक धातूंच्या विकृतीनें जीवन करावें, असें उशनस्मृतिस्थ वचन आहे.

"अंबष्ठायांद्विजाज्जातःपुत्रःकांसस्यकर्मकृत् ॥

कांस्यपात्राणिचित्राणिरचयेज्जीवनायसः ॥

शूद्रधर्मेणसर्वत्रस्थितिरस्यविधीयते ॥

शूद्रकमलाकर प० ८८ पं० ८.

अ० या कांसारलोकांविषयीं दुसरें असें एक प्रमाण आहे कीं, अंबष्ठा[१] (ब्राम्हणापासून वैश्येचेठायीं झालेली कन्या) स्त्रीचेठायीं

१ ब्राम्हणेनवैश्यायामुत्पन्नाअंबष्ठेतिकुल्लकभट्टः । शूद्रकमलाकरेतु ब्राम्हणेनोग्रकन्यायामंबष्ठोनामजायते सकरोतिमनुष्याणांचिकित्सांरोगिणामपीति । वैश्यकन्यायांविप्रायामंबष्ठोनामभवतीतिविज्ञानेश्वरोपि । तथा उशनस्मृतावपि वैश्यायांविधिनाविप्राज्जातोह्यंबष्ठउच्यतेति । अयमनुलोमः ॥

ब्राम्हणापासून झालेला पुत्र तो कांस धातूचें विकारांतर करणारा कांसार संज्ञक होत. याणें आपल्या जीवनोपायार्थ कांसाँचीं भांडीं नाना तऱ्हेचीं चित्रें वगैरे करून सर्वत्र शूद्र धर्मानें वर्तत असावें. असें शूद्रकमलाकरग्रंथाचें वचन आहे. यावरून कांसार किति श्रेष्ठ आहेत ते पहा.

" आयोगवेन[१]विप्रायांजातस्ताम्रोपजीविनः ॥
उशनस्मृ० श्लो० १४.

अ० आतां ताम्रकाराची उत्पत्ति सांगतों, ती अशी कीं, आयोगवः ( शूद्रापासून वैश्येचे ठिकाणीं झालेला पुत्र ) जातीच्या पुरुषानें विप्रकन्येचेठायीं उत्पादित जो पुत्र तो ताम्रकार याणें तांब्याचीं भांडीं वगैरे करून उपजीविका करावी. असें उशनस्मृतीचें वचन आहे. आतां लोहकाराची ( लोहाराची ) उत्पत्ति सांगतों.

---

१ शूद्रादायोगवंवैश्याजनयामासवैसुतमितियाज्ञवल्क्यः । शूद्रेणवैश्यायामुत्पन्नाआयोगवीतिकुल्लभट्टः ॥ वैश्यायांशूद्राज्जातोआयोगवीतिकमलाकरेपि.

योमागधीक्षात्रिययोर्जातउल्मुकसंज्ञकः
सलोहकर्मणाजीवेदुत्तमश्चांत्यजातितः
लोहकारइतिख्यातोलोहकर्मास्यजीवनं ॥
इतिलोहकारस्मृतिस्थवचनंशूद्रकमलाकरग्रंथे
स्थितं पृ० ९१ पं० ९

ती अशी कीं, मागधी ( म्ह० ) वैश्यापासून क्षत्रियीचेठायीं झालेला पुत्र तो उल्मुक ( लोहार ) नामा होय. हा अंत्यजांपेक्षां[2] उत्तम आहे. याणें लोखंडी काम करून उपजीविका करावी; व लोहकर्मानेंच हा जीवन करितो म्हणून याला लोहकार ( लोहार ) असें म्हणतात. या प्रमाणें लोहकार स्मृतींत कर्माराची उत्पत्ति सांगितली आहे. असें शूद्रकमलाकर ग्रंथाचें मत दिसतें.

आतां प्रागुक्त आठ पुत्रांपैकीं, मालाकार, चित्रकार,

---

१ ब्राम्हण्यांवैश्यसंसर्गाज्जातोमागधउच्यतेतिउशनः ॥ अयमनुलोमः ॥ २ रजकःश्चर्मकारश्चनटोवुरुडएवच ॥ कैवर्तमेद्रभिल्लाश्चसप्तैतेचांत्यजाःस्मृतेतिअंगिर : ।

सुतार, आणि फातरवट, मिळून या ४ जाति राहिल्या, त्याची उत्पत्ति सांगतो.

"पारसंव्यांचमाहिष्यान्मालाकारःसउच्यते ॥
कुसुमानिसशाकानिवर्द्धयेद्धनवृद्धये ॥
सहीनःशूद्रधर्मेभ्यःसमूहेपद्मकेप्रभुः ॥
शूद्रक० पृ० ८९ पं० ७

अ० पारसवी (शूद्रीचेठायीं ब्राह्मणापासून झालेली कन्या) चे ठीकाणीं माहिष्य (क्षत्रियापासून वैश्येचे ठायीं झालेला पुत्र) जातीच्या पुरुषापासून झालेला पुत्र तो मालाकार, (माळी) यानें धनसंचयार्थ फुलें, शाकभाजी वगैरे लावण्याचा उद्योग करावा. आणि हा शूद्रांत हीन मानला आहे, असें शूद्रकमलाकर ग्रंथाचें वचन आहे. याचप्रमाणें,

---

१ शूद्रायांविधिनाविप्राज्जातःपारसवोमतेतिउशनः । अंबष्ठः शूद्र्यांनिषादोजातःपारसवोपिवेतियाज्ञवल्क्यः ।

"उग्रायांयोद्विजाज्जातः कुंभकारस्स-
उच्यते ॥ सशूद्राद्धीयतेधर्मैघटयेन्मृन्म-
यान्घटान् ॥ शूद्रक० प० ८८पं० ९
वैश्यायांविप्रतःश्चौर्य्यात्कुंभकारःसउ-
च्यतेतिउशनः श्लो ३ ३

अ० शूद्रीचेठायीं क्षत्रियापासून झालेला जो पुत्र, तो कुंभकार (कुंभार) संज्ञक होय. हा शूद्रधर्मापासून भ्रष्ट झाला असून, याणें स्वोपजीविकार्थ मृत्तिकेचे घटेत्यादिक रचावे, असें शूद्रकमलाकर ग्रंथांत व उशनस्मृतींत सांगितलें आहे. तर या सर्व आधारांवरून पूर्वोक्त ११ भेद किति नीच आहेत, ते पाहा, म्हणजे खातरी होईल.

याचप्रमाणें अवशेष भेदांचेंहि वर्णन प्रत्येक निबंधांत आढळतें; परंतु विस्तार भयास्तव सर्व येथें न दाखवितां उदाहरणार्थ कांहीं ग्रंथांतील वर्णनरूप आधार प्रदर्शित केले आहेत. तर या प्रदर्शित सर्व आधारांवरून पूर्वोक्त ११ भेदांची व त्यांपासून झालेले ९४ भेद यांची मूळ उत्पत्ति पाहतां अत्यंत नीच दिसत असून त्यांनांहि

स्वर्णकार लोहकार काष्ठकार शिलाकार कांस्यकारेत्यादिक नामाभिधानें असल्याकारणानें, पूर्वोक्त नाडिंधमेत्यादिक शब्द प्रागुक्त भेदांवांचून ब्रह्मपांचालांचे ठीकाणीं संभवत् नाहींत, असें ह्मणण्यास कांहीं येक संशय वाटत नाहीं.

आतां नाडिंधमेत्यादिक शब्द ब्रम्हपांचालांस लागूं होत नाहींत, असें जें म्हटलें तें खरें; परंतु वास्तविक म्हटलें असतां नाडिंधमेत्यादिक शब्द ब्रम्हपांचालांसच लागूं असावेत्. कारण, ब्रम्हपांचालांतहि, स्वर्णकार(सोनार)सुतार लोहकार(लोहार) फातरवट, इत्यादिक भेदअसून, हेहि पूर्वोक्त वृत्तीनें निर्वाह करीत असतात. आणि खरोखर म्हटलें असतां या सोनार लोकांविषयीं शूद्रकमलाकर ग्रंथाच्या ८३ व्या पृष्ठांत, व याज्ञवल्क्यस्मृतींत,

" सर्वंशूद्रस्यधर्मेणवर्तनंतस्यजीविका "

असें म्हटलें आहे. तर या वचनार्थावरून नाडिंधमेत्यादिक नामें सांप्रत जे सोनार लोक आहेत; त्यांकडेच लाऊन तदनुसार त्यांचे घरीं कर्में चालवित असतों. याचें कारण,

" शूद्रांशयनमारोप्यब्राह्मणश्चेत्कथंचन ॥
जनयेत्ग्राम्यधर्मेणतस्यांपारसवंसुतं ॥
महाशूद्रःसविख्यातःशूद्रेभ्यःकिंचिदुत्तमः ॥
स्वर्णकारस्यंतस्येहस्नानंधौत्रंपवित्रकम् ॥

हें असून, पहिल्या श्लोकाचा अर्थ असा आहे कीं, पारसवाचें कर्म शूद्र धर्माप्रमाणें करावें. दुसऱ्या श्लोकाचा अर्थ असा आहे कीं, शूद्रीस शयनाचे ठायीं घेऊन कोणी ब्राम्हण मैथून करून पुत्र उत्पन्न करील, त्याला पारसव म्हणावें. व महाशूद्रहि म्हणावें. पारात्सुतेशापरसुरपत्यंपुमान्पारसवः हा पारसव शब्दाचा वित्पत्यर्थ आहे. याचा अर्थ असा कीं, पर म्हणजे ब्राम्हणापासून प्रसवते जी शूद्री, तीचा अपत्य (पुत्र) पुरुष त्याला पारसव म्हणावे महाशूद्र याचा अर्थ शूद्राधम असा आहे. कारण, तेथें महा शब्दाचा अर्थ अधमपर लक्षणार्थ केला पाहिजे. शूद्रापेक्षां किंचित् उत्तम म्हणजे शूद्राधम असें समजावें. तो सुवर्णकार. त्याणें स्नान करावें, धोतर नेसावें, हीच पवित्रता. या प्रमाणें स्कंदपुराण

व लिंगपुराण, या ग्रंथांवरून मीं सदरील आधार व अर्थ सांगितले आहेत, ते मिताक्षरा आचाराध्याय पान १८ व अमरकोश द्वितीय कांड वर्ग १० पत्र १३४ यांत आहेत, व ज्ञाति विवेक पत्र २ यांत हि हे आधार आहेत. यां वरून नाडिंधमेत्यादिक शब्द सांप्रतच्या सोनारांस निर्विवाद लागूं होतात, शिवाय पूर्वोक्त भेदांस लागूं नाहींत, असें म्हणण्यास किमपि संशय नाहीं. असें असून या सोनारादिकांविषयीं पुराणांतरीं दुसरें असें एक वर्णन लिहिल्याचें नजरेस पडतें कीं,

" परशुराम म्हणून जो सहावा अवतारी पुरुष झाला त्यानें पूर्वस्मरून पृथ्वी निःक्षत्रिय करण्याच्या उद्देशानें २१ वेळा क्षत्रिय मारिले; आणि कोठे थोडे बहुत क्षत्रिय राहिले होते; त्यांवर स्वारी करण्यास निघाला, तेव्हां हें वर्त्तमान त्या अवशेष राहिलेल्या क्षत्रियांनीं श्रवण करून भयाभित होत्साते आपलीं घरेंदारें सोडून विश्वकर्म्याच्या आश्रमाप्रत पळून गेले; आणि त्याज पासीं आश्रय मागितला. तेव्हां " परशुराम " विश्वकर्म्याच्या आश्रमास येण्यास निघाला. ही वातमी विश्वकर्म्यानें ऐकून तोहि भयाभित होत्साता त्या क्षत्रियांस आपल्या आश्रमांतून निघून जाण्यास सांगितलें.

तेकाळीं, ते फार काकुळतीस येऊन म्हणाले कीं, तुला पाहिजे असल्यास आम्हांस परशुरामाचे स्वाधीन कर किंवा तुला वाटेल त्या रीतीनें आमचें त्याच्या हातापासून संरक्षण कर. त्यांचें हें आर्त सांगणें विश्वकर्म्यानें श्रवण करून त्यांस आपलीं तरवारींसहित सर्व हत्यारें माझ्या स्वाधीन करा, असें सांगितलें. तेव्हां त्यांनीं तीं सर्व हत्यारें सांगणींप्रमाणें विश्वकर्म्याच्या स्वाधीन केलीं; नंतर विश्वकर्म्यानें, तीं सर्व हत्यारें घेऊन त्यांस आपल्या कारखान्यांत नेलें आणि तीं शस्त्रें मोडून त्यांचीं तासणी, हातोडा, घन, वस्त्रा, इत्यादिक हत्यारें करून, त्यांस दिलीं आणि त्यांस काम करण्यास बसविलें. इकडे दारीं परशुराम आला, त्यानें हें नवल पाहून आतां कोणी क्षत्रिय राहिला नाहीं, असें समजून परशूराम माघारा गेला. याप्रमाणें सुतार, सोनार, लोहार, कांसार, फातरवटे इत्यादिक जाति क्षत्रियांपासून झाल्या अशी कथा पुराणांतरीं आहे. तेव्हां अर्थात तेच हे असें म्हणण्यास कांहींच संशय वाटत नसून, पूर्वोक्त नाडिंधमेत्यादिक शब्द निःसंशय या लोकांकडे लागू होतात, असें म्हणण्यास बाधक काय ?" असें कांहीं शास्त्री नामा-

भिदायक पुरुष म्हणतात, इतकेंच नाहीं; तर खोटीशपत घेऊन सरकारांत लिहून देखील देतात. आणि कांहीं अर्थी त्यांचें म्हणणें वास्तविक आहे, असें म्हटलें तरी चालेल; परंतु पुर्वोक्त शूद्रकमलाकरग्रंथांतील प्रमाणाच्या स्थितीवरून व अनंतरील पौराण नामाभिदायक भांजगड कथेवरून त्यांचें म्हणणें सर्वथा निर्मूल व अप्रमाण समजलें जात असून शंका घेणाराची अविद्वत्तानुरूप मूर्खता मात्र दिसून येती. कारण, शूद्रकमलाकर ग्रंथांतील ८२ व्या पृष्ठाच्या २ ओळींत,

" शूद्रांशयनमारोप्यब्राह्मणश्चेत्कथंचन ॥
जनयेत्ग्राम्यधर्मेणतस्यांपारसवंसुतं ॥
महाशूद्रःसविख्यातःशूद्रेभ्यःकिंचिदुत्तमः ॥

---

१ पृथक् पृथक् दंडनीयाः कुटकृत्साक्षीणस्तथा ॥ विवादाद्विगुणंदडं विवास्योब्राह्मणःस्मृतइतियाज्ञवल्क्यस्मृ० अ० २ श्लो० १४

स्वर्णकारस्यतस्येहस्नानंधौत्रंपवित्रकम् ॥
सर्वंशूद्रस्यधर्मेणवर्तनंतस्यजीविका" ॥

अ० ब्राह्मण शूद्रीचे ठायीं मैथुनोपायानें पुत्र उत्पादन करील. तो पारसव संज्ञक होय. त्यास महा शूद्रही ह्मणत असून शूद्रापेक्षां किंचित् उत्तम होय. तोच स्वर्णकार सोनार जाणावा. याणें स्नान, धौत्र, पवित्रक राखून शूद्रधर्म करून जीवन करित असावें. असा जो हा श्लोक दाखविला, तो सर्वथा खोटा असून ग्रंथाप्रतिष्टेस्तव अलीकडच्या शीघ्रकवीनीं रचून ग्रंथांत घुसळून दिला असावा, असें ह्मणण्यास किंचिन्मात्रहि संशय वाटत नसून याज्ञवल्क्याचें नांव शास्त्री ह्मणविणारानीं निरर्थक घेतलें आहे असें ह्मणण्यास सबळ कारण सांपडतें. तें असें कीं हे शास्त्रार्थ लिहून देणारानें याज्ञवल्क्यस्मृतीच्या १८ वे पानाचें नांव जें घेतलें; तर त्या १८ व्या पानांत पाट पोट जे श्लोक आहेत ते संक्षिप्त रूपानें येथें दर्शवितों त्यांत "शूद्रांशयन" हा शब्द आहे कीं काय याचा विचार सर्व वाचकानीं करावा. याज्ञवल्क्यस्मृति- आचाराध्याय. पृ० १८ "उपास्यपश्चिमांसंध्यां० भृत्यैःपरिवृतोमुक्का ० ब्राह्मे-

मुहूर्तेउत्थाय० धर्मार्थकामानूस्वेकाले० विद्याकर्म-वयोबंधु० एतैःप्रभूतैःशूद्रोपि० वृद्धभारिनृपस्नात० पंथादेयोनृपस्तेषां० २१ प०१८ इज्याध्ययनदानानि० प्रतिग्रहोधिकोविप्रे० प्रधानंक्षत्रियेकर्म० कुसीदंकृषिवाणिज्यं० शूद्रस्यद्विजशुश्रूषा० शिल्पैर्वाविविधैर्जीवेति० २४ यांत इत्यादिक श्लोक असून यावर विज्ञानेश्वराची टीका आहे. त्यांत देखील "शूद्राशयन" आणि "धैत्रं" हे शब्द लिहिल्याचे आढळत नाहींत. दुसरें, हे शब्द अठराव्या पानांत तर काय; परंतु समग्रयाज्ञवल्क्य स्मृतींत देखील नाहींत. फक्त याज्ञवल्क्य स्मृतींत १४ व्या पृष्ठाच्या २ श्लोकांत पारसव शब्द मात्र आढळतो. परंतु, तोहि शास्त्रीबुवांविरुद्ध आहे. कारण शास्त्रीबुवा ह्मणतात कीं, "शूद्राप्रमाणें पारसवाचीं कर्मे करावी" यावरून शूद्रास जेवढ्या कर्मांचा अधिकार आहे, तेवढ्याच कर्मांचा अधिकार पारसवांला आहे; शिवाय जास्त नाहीं, असें सिद्ध होतें. या वरून शास्त्रीबुवांची आणि याज्ञवल्क्याची मोठीच तवायी होणार. कारण, याज्ञवल्क्यस्मृ० अध्या०१ पृ० १४ श्लोक० २ यांत,

विप्रान्मूर्द्धावसिक्तोहिक्षत्रियायांविशःस्त्रियाम् ॥
अंबष्ठःशूद्र्यांनिषादोजातःपारसवोपिवा" ॥ २ ॥

विज्ञानेश्वरी टीका.—"इदानीमनुलोमानाह । विप्रादिति । ब्राह्मणात्क्षत्रियायांविन्नायामुत्पन्नो मूर्द्धावसिक्तोनामपुत्रोभवति १ वैश्यकन्यायांविन्नायामंबष्ठोनामभवति २ शूद्रायांविन्नायांनिषादो नाम पुत्रो भवति ३ निषादो नाम कश्चित् मत्स्यघातोपजीवि प्रतिलोमजः समाभूदितिपारसवोनिषादइतिसंज्ञाविकल्पः * * * . अतश्चमूर्द्धावसिकादीनांक्षत्रियादेरकैरेवदंडाजिनोपवीतादिभिरुपनयनादिकार्यं । प्रागुपनयनात्कामचारः कामवादः कामभक्षाइतिपूर्वे-

---

१ निषादोमार्गवंसूतेदासंनौकर्मजीविनं ॥ कैवर्त्तमितियंप्राहुरार्यावर्त्तनिवासिनइतिमनुः अध्या० १० श्लो० ३४ याचेंच नांव कैवर्त्तक, आणि परशूरामापासीं कबूल झाले तेच हे कीं, ज्ञातिंपृच्छसिहेरामज्ञातिःकैर्तकीतिच । सिंधुतीरेकृतोवासोव्याधधर्मेविशारदाः ॥ तेषांषष्टिकुलंश्रुत्वापवित्रमकरोत्तदा ॥ ब्राह्मण्यंचततोदत्वासर्वविद्यासुलक्षणम् ॥ चितास्थानेपवित्रत्वाच्चित्पावनउदाहृतइति स्कांदे-सह्याद्रिखंडे ८२ अ०

ब्रह्मोदितव्यइति " इत्यादिक विषय असून या पारसवांविषयीं मनुस्मृतीच्या १० व्या अध्यायांतील ६४ व्या श्लोकांत

" शूद्रायांब्राह्मणाज्जातःश्रेयसाचेत्प्रजायते ॥
अश्रेयान्श्रेयसींजातिंगच्छत्यासप्तमाद्युगात् ॥
शूद्रोब्राह्मणतामेतिब्राह्मणश्चैतिशूद्रताम् ॥
क्षत्रियाज्जातमेवंतुविद्याद्वैश्यात्तथैवच ॥ "

इत्यादिक प्रमाणें असून जन्मांतरानें ब्राह्मणत्वहि कथन केलें आहे, तर यावरून पारसव शूद्रसम आहेत किंवा शूद्रापेक्षां उंच आहे याचा विचार सर्व वाचकांकडूनच व्हावा.

आतां दुसरें असें ह्मटलें आहे कीं, " पर ह्मणजे ब्राह्मणापासून " पर शब्दाचा अर्थ ब्राह्मण असा होणार नाहीं, तर पर ह्मणजे दुसरा. अगर शत्रु तसेच महाशूद्र (ह्म.) शूद्रापेक्षां हीन जातीचा असा अर्थ होत असून " शूद्रापेक्षां किंचित् उत्तम ह्मणजे शूद्राधम असें समजावें " ह्मणून जो अर्थ केला. तो कोणत्या तर्कावरून केला असेल तो असो. एवंच सारांश पहातां हा श्लोक बनावट आहे

असें ह्मणण्यास त्या श्लोकावरूनच दुसरी एक सवड सांपडते, ती अशी कीं " शूद्रांशयन " या श्लोकाच्या चतुर्थ चरणांत स्नानं धोत्रं, पवित्रकम् "असें ह्मटलें आहे; तरयावरून श्लोक वनविणारा अल्पाभ्यासी होतासा वाटतो. कारण धोत्र शब्द हा शुद्धमराठी भाषेंत असून हजारो ग्रंथकार झाले, तथापि त्यानीं केलेल्या संस्कृत ग्रंथांत धोत्रं असा शब्द मुळींच नसून या शब्दास संस्कृत कोशांचाही आधार मिळत नाहीं. संस्कृत भाषेंत धुलेल्या वस्त्रास " धौतवस्त्रं " कोण्यास "नूतनवस्त्रं" असें ह्मणतात. शिवाय धोत्रं असें म्हणत नाहींत. आतां ही चूक छापणाराची असेल असें जर म्हणावें; तर जेवढे शास्त्रीय म्हणविणारे लोक, सोनारां विषयीं हें प्रमाण दाखवितात, त्या प्रत्येकाच्या मुखीं व लिहिण्यांत ही " धोत्रं " असा उच्चार निघतो; वस्त्रं असा निघत नाहीं यावरून ही चूक छापणाराची नाहीं हें सिद्ध.

आतां " धोत्र " शब्दाची योजना ग्रंथकाराकडूनच झाली असावी असें जर कदाचित् म्हणावें, तर तेंहि संभवत् नाहीं, कारण ग्रंथकार जरी ७०–८० वर्षांअलीकडचा आहे; तरी तो विद्वान असून विचारशील होता, असें त्या पुरुषानें केलेल्या निर्णय सिंध्वा-

दिक निबंधांवरूनच सिद्ध होतें. कारण निर्णय सिंधू आदिकरून मोठमोठाले जे ग्रंथ त्या कमलाकर भट्टानें केले, त्या पैकी कोण तेही ग्रंथांत पौत्र शब्द उपयोग केल्याचा दृष्टीस पडत नाहीं इतकेंच नव्हे; तर अशी कविता कमलाकरकृत ग्रंथांपैकी एकाद्या ग्रंथांत देखील आढळत नाहीं. दुसरें जर हा श्लोक कमलाकराचा असता, तर तो त्याणें केलेल्या कमलाकर नामक जातिविवेकांत घेतला असता. ज्याअर्थी कमलाकर जातिविवेकांत हा श्लोक नाहीं, त्या अर्थी हा बनावट आहे हें सिद्ध. कारण कमलाकरानें तर या श्लोकाची योजना केली नसून उलट पारसवांची महत्वी मात्र दाखविल्याची दिसण्यांत येती. ती अशी कीं,

" विप्रान्मूर्द्धावसिक्तोहिक्षत्रियायांविशःस्त्रियां ॥
अंबष्ठःशूद्र्यांनिषादोजातःपारसवोपिवा ॥

अ० ब्राम्हणापासून क्षत्रयीचे ठायीं विचार पूर्वक जो पुत्र उत्पन्न झाला तो मूर्द्धावशिक्त नामा होय. आणि वैश्य कन्येचेठायीं ब्राम्हणापासून जो झाला तो अंबष्ठ नामा होत. ब्राम्हणापासून शूद्र कन्येचे

ठिकाणीं उत्पन्न तो निषाद संज्ञक होय. हा प्रतिलोमासमान असून पारसव निषाद या संज्ञेनें जाणला जातो.

माहिष्येणकरण्यांतुरथकारःप्रजायते ॥
असत्संतस्तुविज्ञेयाःप्रतिलोमानुलोमजाः ॥
कमलाकरजातिविवेकस्थवचनंरथकारक
ल्पद्रुमग्रथेस्थितं० पृ० २२ पं ८

" अ० त्याचप्रमाणें. माहिष्यापासून[1] करणीचेठायीं[2] झाला तो रथकार[3]. हा वाईट संततिपासून झाला सबब प्रति लोमानु

---

१ क्षत्रियेणवैश्येनशूद्रायामुत्पादितोमाहिष्यो

२ वैश्येनशूद्रायामुत्पादिताकरणी, तस्यांमाहिष्येणउत्पादितो रथकारोनामज्याख्याभवति ॥ तस्येचापनयनादिसर्वंकार्यंवचनात् ॥

३ रथकार हे सर्व देशांत साधारण असून यांची आणि गुजरातेंतील वमनियांची एक पंगत होत असती, असें अनेक लोकांचें सांगणें आहे.

लोमेंकरून जाणावा. असें कमलाकर जातिविवेकाचें वचन रथकार-कल्पद्रुम नामक ग्रंथीं असून, यास उपनयनादिक संस्कारहि सांगितले आहेत. याविषयीं प्रमाण याज्ञवल्क्यस्मृति. प०१४ पं०१२ व गोविंदार्णव परशुरामप्रताप, आणि स्मृतिकौमुदि इत्यादिक ग्रंथांत शंखाचें वचन आहे, तें असें कीं,

"क्षत्रियवैश्यानुलोमानंतरोत्पन्नजोरथकारस्तस्येज्यादानोपनयनसंस्कारक्रियाअश्वप्रतिष्ठारथसूत्रवास्तुविद्याध्ययनवृत्तिताचेति" ॥

"एवंब्राह्मणक्षत्रियोत्पन्नमूर्द्धावसिकमाहिष्याद्यनुलोम संकरजात्यंतरताउपनयनादिप्राप्तिश्चवेदितव्या, तयोर्द्विजत्वात् । संज्ञास्तु स्मृत्यंतरोक्ताद्रष्टव्याः इतिविज्ञानेश्वरी टीका" तथा परशुरामप्रतापे ७० आंक पत्रे ९ पंक्त्यायामप्येवमेव ।

"माहिष्येणकरण्यांतुरथकारःप्रजायते ॥
वैश्यायांक्षत्रियाज्जातोमाहिष्योमुनिभिःस्मृतः ॥

जातोवैश्येनशूद्रयां करणीत्यभिधीयते ॥
वेदाध्ययनसंपन्नाः प्रयोगेणश्रुतेनचेति" ॥

अ० क्षत्रियवैश्यानुलोमेंकरून उत्पन्न जो रथकार त्यास अध्ययनाध्यापन दानोपनयन, अश्वप्रतिष्ठारसूत्रवास्तुविद्यादिक वृत्त्या उक्त आहेत्. या प्रमाणें, कमलाकरजातिविवेकाचें मत या प्रदर्शित सर्व ग्रंथांत आहे. संस्कारसार, नृसिंहप्रसाद, व[illegible]दिंदार्णव, ग्रंथांचींहि याच प्रमाणें मतें जाणावीं. कारण त्यांहीं ग्रंथांत,

माहिष्येणकरण्यांतु रथकारःप्रजायते ॥
तस्यपर्यायनामानि तक्षाशिल्पीचवर्द्धकी ॥
लोहकारःस्वर्णकारो विद्यतेयजनंतथा ॥
उपनीतविधानेन कुर्यादाधानमप्यसौ ॥
वास्तुशास्त्रमधीयानः प्रासादप्रतिमादिकान् ॥

यज्ञपात्रंद्विजातीनां हेमान्याभरणानिच ॥

कृष्युपस्करणंलेख्यं कर्माण्यस्योदितानिचेति" ॥

इत्यादिक प्रमाणें असून अर्थ पूर्वोक्तार्थप्रमाणेच आहे. या शिवाय बृहज्जाति, लघुज्जाति, दलपतजातिविवेकादिक ग्रंथांतहि याप्रतीचीं अनेक प्रमाणें रथकार व पारसव यांविषयीं लिहिल्याचीं दृष्टीस पडतात; परंतु भावार्थ एक असून ग्रंथविस्तारभयास्तव सर्व येथें प्रकट केलीं नाहींत.

सांगण्याचा सारांश, "धीत्र" शब्द जर कमलाकराचा असता; तर तो त्याणें केलेल्या जातिविकांत आलाच असता. ज्याअर्थी जातिविवेकांत हा श्लोक त्याणें घेतला नाहीं, त्याअर्थी तो कमलाकरानें संगृहीत नव्हे, असें ह्मणण्यास कांहींच बाधक दिसत नाहीं. अस्तु, कमलाकरजातिविवेकांत नाहीं, हें ठीक, परंतु अन्यानीं केलेल्या जातिविवेकांत तरी तो श्लोक असावा किंवा नाहीं, तर त्यांतहि नसून केवळ शूद्रकमलाकर ग्रंथाच्या जातिविवेकांत मात्र आढळतो. असें असून श्लोकार्थ सर्व भविष्यकालवाचक दिसतो, तर अशा या भविष्यवचनाधारावरून तेच हे, ह्मणण्यास प्रमाण तरी काय व कोठच्या ग्रंथांत आहे ? वास्तविक म्हटलें असतां, हा श्लोक एकाद्या

दुराग्रही शास्त्रीबुवाकडूनच झाला असावा, कारण असें शीघ्र कवित्व करून प्राचीन स्मृत्यादि ग्रंथांत ढकलण्याविषयीं हिम्मत बहाद्दूर लोक एक चित्पावन जातिवांचून अन्य कोणतेहि जातींत व कोठेंच मिळणार नाहींत. व आजपर्यंत प्राचीन ग्रंथांचा जो नाश झाला[१] तो केवळ या चित्पावन लोकांस राज्याधिकार प्राप्त झाल्यापासूनच झाला. एतद्विषयीं जेवढे आधार माझ्या ऐकण्यांत व पाहण्यांत आले ते सर्व यथानुक्रमानें या सदराखालीं दाखवितों. तेणें करून सर्व वांचकांच्या मनाची

---

१ ह्याविषयीं एसियाटिक् रिसर्चिस पुस्तकाच्या ९ भागांतील २३४ व्या पृष्ठांत " उयल्फोर्ट " साहेब असें लिहितो कीं, सह्याद्रिखंडाचा दुसरा भाग ( उत्तरार्ध ) ज्यांत त्यांची ( चित्पावनांची ) उत्पत्ति सांगितली आहे, तो त्यांनीं अगदीं नाहींसा केला ( म्ह० ) सह्याद्रिखंडाच्या क्वचित् प्रती राहिल्या असतील.

याच प्रमाणें या ग्रंथ नाशाविषयींची हकीकत गोमांतकाच्या इंग्लिश इतिहासांत लिहिलीअसून बनावट श्लोकहि दाखविले आहेत; परंतु ग्रंथ विस्तारास्तव घेतले नाहींत.

खातरी होईल. बृहत्पाराशरस्मृती. अ० १२ पृष्ठ ८-९ ब्रह्मनिरूपण विषय.

" इत्येतत्ध्यानमार्गंतुवदंतिकवयोद्विजाः ॥
कोंकणाश्रितपूर्णास्तेचित्तपावनसंज्ञकाः ॥ ४२ ॥
ब्राह्मणेषुचसर्वेषुयतस्तेउत्तमामताः ॥

---

१ हे श्लोक पाहून मूल प्रतीचा शोध लावितां बाबा फाटक यांचे जवळ मिळाली. याच्या दर पृष्ठास ११ ओव्या असून १४७ पृष्ठांत १ बाजूस १३ व २ रे बाजूस १२ ओव्या आहेत. हें कृत्य लोकांस न समजण्याकरितां समग्र अध्यायाचे अंक देखील फिरविले आहेत. शाई व लिहिणारा दुसरा दिसतो. याची खातरी ज्यांस करून घेणें असेल त्यांनीं बाबा फाटक यांस भेटावें.

२ खरोखर यांच्या ब्राम्हण्याविषयीं मुंबईतील रायल् एसि-टिक सोसैटीचा सन १८९३ सालांत छापलेला १७ नंबरचा ४

एतेषांवंशजाःसर्वेविज्ञेयाब्राह्मणाःखलु(?) ॥४३॥

---

रपोर्ट पुस्तकांतील २७४ वे पत्रांत व ग्र्यांट डफ् कृत मराठ्यांचा इतिहास, पुस्तक १ पृ० ८ यांत असें लिहिलें आहे कीं,

"THE PIESHWA, who attained sovereign authority in the Mahratta nation, were of this class. CONCANISTS from this circumstance, and the power which it naturally threw into their hands, pretend to some Superiority in caste; but these pretensions are not well founded. They are termed *Chitpawun*, which amongst other significations means "*A dead body raised.*" Their origin, according to what is mentioned in a Sanscrit work, entitled The *Syhadree Khund,* was fourteen dead bodies of different castes that had been drowned in the sea; whence they were transported by *Vishnoo* in his *Outar* of *Purshuram*, after he had forced the sea to give up the *Concun*. or *Pursuram Kshetra*, and re-animated to people his new-

माध्यंदिनाश्चदेशस्थागौडद्राविडगुर्जराः ॥

---

country From these fourteen families sprang the *Concanee* Bramins, who are now distinguished by *Sixty surnames.*

The *Concanist* Bramins, before the elevation, of Ballajee Vishwanath, commonly called the first, though in fact the fifth *Peishwa,* were not employed as clerks and men of business, but as hurkarus and spies. They carefully suppress or destroy all copies of the Syhadree Khund, were their origin is mentioned, and a respectable Brahmin of Waee was, a few years ago, disgraced by Bajeerao for having a copy of it."

भाषांतर.

"पेशवे महाराष्ट्र ब्राम्हणवर्गांतील कोंकणस्थ(चित्पावन) जातीचे होते. त्यांनीं मराठे लोकांत राज्याधिकार मिळविला.

कार्णाटातैलंगाद्यापिचित्तपूर्णस्यवंशजाः ॥ ४४ ॥

---

ह्या गोष्टीवरून व जो अधिकार त्यांस साहजिक प्राप्त झाला, तेणेंकरून कोंकणस्थ (चित्पावन) जातिमध्यें कांहीं वर्चस्वाचा (श्रेष्ठत्वाचा) बाणा ( डौल ) वाळगतात; परंतु ह्या बाण्यास चांगला (शास्त्रोक्त) आधार नाहीं. त्यांस चित्पावन असें म्हणतात. त्याचा अर्थ असा आहे कीं, "प्रेत उठाविलेला." त्यांची उत्पत्ति सह्याद्रि खंड म्हणून जो संस्कृत ग्रंथ आहे, त्यांत सांगितल्या प्रमाणें, विष्णुनें परशुरामावतारीं बलात्कारानें समुद्रांपासून कोंकण घेतल्यावर, आपला नवीन देश वसाहत करण्याकरितां, समुद्रांत बुडून मेलेलीं भिन्न जातींचीं चौदा प्रेतें जिवंत केलीं. ह्या चौदा कुटुंबांपासून कोंकणस्थ ( चित्पावन ) ब्राम्हण उत्पन्न झाले. सांप्रत ते ६० उपनामेंकरून जाणिले जातात.

अतःश्चित्तस्यपूर्णेयोनिंद्यातस्यक्षयोभवेत् ॥

अ० यांत असें लिहिलें आहे कीं, द्विज श्रेष्ठ जे आहेत ते

---

बाळाजी विश्वनाथ जरि पांचवा पेशवा होता; तथापि त्यास, साधारणपणें पहिला पेशवा म्हणत. तो मोठ्या पदवीस चढण्याचे पूर्वीं कोंकणस्थांस ( चित्पावनांस ) कोणी कारकून किंवा कार-भारी, ठेवीत नसत; परंतु त्यांस हरकारू ( गुप्तबातमीदार दूत किंवा हेर, ( जासूद ) ह्यांच्या कामावर ठेवीत असत. त्यांची उत्पत्ति सह्याद्रिखंडांत सांगितली आहे म्हणून, ते सर्व सह्या-द्रिखंडाच्याप्रती, सावध गिरीनें नष्ट ( नाहींशा ) करितात. कांहीं वर्षीं मागें, वाई येथील एका नामांकित ब्राम्हणानें सह्या-द्रिखंडाचीप्रत ठेविली, म्हणून बाजीरावानें त्याचा अनादर ( अपमान ) केला."

या ध्यान मार्गातें सांगते झाले. कोंकणांत राहाणारे चित्तपावन (चित्पावन) संज्ञक ते मनाचे संतुष्ट जे ते होत. सर्व ब्राम्हणांत हे उत्तम कथिजेले; आणि सर्व ब्राम्हण निश्चयानें याचे वंशज आहेत असें जाणावें (?) माध्यंदिन, देशस्थ गौड, द्राविड, गुर्जर, तसेच कर्नाटकी, आणि तैलंग हे अद्यापि चित्पावनांचे वंशज. तस्मात् चित्पावनांची जो निंदा करील त्याचा कुलक्षय होईल. याप्रमाणें वृहत्पाराशर स्मृतीच्या बाराव्या अध्यायांत शके १७८६ व्या सालीं कांहीं शास्त्रीबुवांनीं हे श्लोक घुसडून दिल्याचे दृष्टीस पडतात. याशिवाय सन १८६९ सालांत वृद्धारण्य[१] ग्रंथाचें नांव घेऊन पळशां विषयीं एक श्लोक दिल्याचा दृष्टीस पडतो. तो असा कीं,

---

१ हा ग्रंथ "देवप्रयाग येथें गोविंदराम पंचभैय्या राजोपाध्ये" यांजपासीं असून याचे अध्याय ३२ आहेत. यांत शिवगौरी, व सूतशौनकादिकांचा संवाद असून प्रदर्शित श्लोक मुळींच नाहीं. ज्यांस याची खातरी करून घेणें असेल त्यांनीं, वालुकेश्वर येथें लक्ष्मण नारायण केणी यांस भेटावें.

" कैवर्तकस्यभिल्लस्यपिताभवतियोनरः ॥
मातायागोलकीनारीपाल्लाशज्ञातिरुच्यते " ॥

अ० गोलक जातीची स्त्री व भिल्ल ज्ञातीचा पुरुष, यांपासून पळशांची उत्पत्ति सांगितली आहे.

त्याचप्रमाणें स० १८६९त सारस्वतां विषयीं धर्मारण्य[1] ग्रंथाचें नांव घेऊन जातिभेदविवेकसार पुस्तकाच्या ४४ पृष्ठांत एक श्लोक लिहून त्यांत,

---

१ हा ग्रंथ कैलासवासी शेट रामदास हिराचंद यांची विधवा देवकूंवरबाई इजपासीं, असून स्कंदपुराणांतर्गत आहे. याचे अध्याय ८५ आहेत. यांत तर हा श्लोक अनुपलब्ध आहे ज्यांस याचा खरेखोटेपणा पाहणें असेल त्यांनीं कालिकादेवीचे दावेबाजूस जें घर आहे, त्या घराच्या २ तीयांतस्थावर सदरहू बाईची भेट घ्यावी. ह्मणजे ती तो ग्रंथ दाखवील

" सूर्यवंशीयक्षत्रश्चपिताभवतियोनरः ॥
मातायाब्राह्मणीनारीसेगवैज्ञातिरुच्यते ॥ "

अ० सूर्य वंशी क्षत्रिय व ब्राम्हणी यांच्या पासून शेणव्यांची उत्पत्ति सांगितली आहे, असें म्हटलें आहे. परंतु या श्लोकांत प्रथमता जो आणि जी असे जे संबंधी शब्द आले आहेत, त्याचे दर्शक शब्द कोणते? तसेच दुसऱ्या चरणांत कर्ता कोण? याचा कांहींच विचार तो श्लोक बनविणारास सूचला नाहींसा वाटतो. असो. हा विचार सूचला नाहीं हें ठीक; परंतु ज्या पत्रांत "सूर्यवंशीय" हा श्लोक धर्मारण्य ग्रंथाचें नांव घेऊन लिहिला, त्याच पत्रीं शेणव्यांचा खरा आगमनोद्देशहि लिहिला आहे. त्यावरून त्यांच्या उत्पत्तिचा विचार होण्यासारखाअसून तो मजकूर लिहिणारास त्या ग्रंथाचें नामाभिधान देखील ठाऊक आहे असें त्या प्रदर्शित मजकूरावरून सिद्ध होतें. तर त्या मान्य ग्रंथाचा विचार मात्र केला असतां धर्मारण्य ग्रंथाचें नाम देऊन खोटा श्लोक करण्याचे परिश्रम लागलेच नसते; कारण त्या लिहिणारानें जातिविवेकसार पुस्तकाच्या ४४ व्या पृष्ठांतील ८ व्या ओळींत असें लिहिलें आहे कीं, " शेणवी हे आपणास गौड ब्राम्हण म्हणवितात. हे लोक कोक-

णपट्टींत गोमांतक व मालवण प्रांतांतील राहणारे आहेत. कित्येक ग्रंथांत अशी कथा आढळते कीं, जे समयीं परशूरामानें कोंकण वसाविलें त्यावेळीं त्यानें या ब्राम्हणांस गौड (बंगाल) प्रांतांतून आपल्या संगतीं आणिलें. शेणवी हे सारस्वत आहेत म्हणून ते लोक उत्तरेकडचे राहणारे आहेत असें ठरतें. आणि हे लोक बोलतात त्या, व बंगाली लोकांच्या भाषें मध्यें फार साम्यदिसून येतें. त्यांवरून हे खरोखर बंगाल्यांतील गौडांचे वंशज असावे, असें सिद्ध होतें " इत्यादिक मजकूर सिद्धांत रीतीनें शेणव्यांविषयीं लिहित

---

१ नवीनंनिर्मित्तंक्षेत्रंशूर्पाकारंतदुत्तमं ॥ वैतरिण्यादाक्षिणेतुसु ब्रम्हण्यास्तथोत्तरे ॥ सह्यात्सागरपर्यंतंशुर्पारकव्यवस्थितं ॥ शतयोजन दीर्घंचविस्तृतंत्रीणीयोजनं ॥ भार्गवंमीलितापृथ्वीसमुद्रात्सुखेहतुना ॥ क्षेत्रंजवाधिकंचासीत्सर्वतीर्थान्वितंतदेति ॥

२ पश्चात्परशुरामेणह्यानीतामुनयोदश ॥ त्रिहोत्रवासिनश्चैवपंचगौडांतरस्तथा ॥ गोमांचलेस्थापितास्तेपंचक्रोशिकिशस्थलीति " स्कांदेसह्याद्रिखंडे ८२ ध्या०

असून पढत मूर्खा प्रमाणें खोटा श्लोक देणें त्यास किति गोड वाटलें असेल तें असो. एवंच तो श्लोक जात्या धर्मारण्यांतील नसून अक्षरश: खोटा आहे, असें त्या विवेकसार कर्त्याच्या बोलण्या वरूनच सिद्ध होतें.

याखेरीज सन १८७३त छापलेल्या सिंव्हस्तमहात्मेंत देखील नवीन बनविलेले ४ श्लोक असून हे सर्वत्र समजण्याकरितां इंदुप्रकाश पत्रांत छापून प्रसिद्ध झाले होते. त्यांच प्रमाणें गणपत कृष्णाजीचे छापखान्यांत छापलेल्या कार्तिकमास महात्मेंत २ अध्याय नवीन बनविले होते परंतु; गणपत कृष्णाजी हे विचारशील असल्याकारणानें शास्त्रीय लोकांचें कृत्य समजतांच युक्तियुक्तीनें लोकांस दिलेलीं सर्व पुस्तकें परत मागऊन तीं व अशेष राहिलेलीं मिळून सर्व पुस्तकें लागलींच अग्नीचे आधीन करून दुसऱ्या प्रत्या आणवून त्याबरहुकूम छापून लोकांस प्रत्या दिल्या गेल्या. त्याचप्रमाणें गरुड पुराणप्रेतमंजरींतहि जाणावें. याप्रमाणें शोध केला असतां आणखी श्लोक मिळण्यासारखे असून या योगानें अनेक ग्रंथ अप्रामाण्यतेस आले असें म्हण्यास कांहींच संशय वाटत नाहीं.

असो आतां ही सर्व भांजगडकथा येथें दाखविण्याचें कारण

हेंच कीं, प्रदर्शित सर्व श्लोकांची शैली आणि "शूद्रांशयनमारोप्य" या श्लोकाची शैली एक जमती किंवा नाहीं तीं पहा. आणि विचार करा कीं, याप्रमाणें किति ग्रंथाचा नाश झाला असेल तो.

सारांश इतकाच कीं, याप्रकारचे स्वकपोलकल्पित श्लोक पूर्वापर संबंध न पहातां मान्य ग्रंथांत घुसडून त्यांच्या आधारानें लोकांवर दोषारोप आणल्यानें लोक त्या दोषरोपास पात्र होतात असें नाहीं. तर त्या योगानें उलट मान्य ग्रंथाची व तत्कर्त्यांची अप्रतिष्टा मात्र होते. इतकेंच विनः या पासून दुसरें निष्पन्न कांहीं येक नाहीं. असो,

आतां पळून गेलेल्या क्षत्रियांपासून सोनारेत्यादिक जाति झाल्या, ह्मणून जें सांगितलें तेंहि पूर्वोक्त श्लोकांप्रमाणें मिथ्या जाणावें. कारण, त्या कथेस कोणतेंहि पुराणाचा आधार नसून पलायन केलेल्या क्षत्रियांची "स्कंदपुराणांतर्गत रेणुकामहात्म्यंत" अशी कथा आढळते कीं,

"एवंहत्वार्जुनंरामः संधायनिशितान्शरान् ॥
अन्वधावत्सतान्हंतुं सर्वानेवातुरान्नृपान् ॥

केचिद्गहनमाश्रित्य केचित्पातालमाविशन् ॥
सगर्भाचंद्रसेनस्य भार्यादाल्भ्याश्रमंययौ ॥
ततोरामःसमायातो दाल्भ्याश्रममनुत्तमं ॥
पूजितोमुनिनारामो ह्यर्ग्यपाद्यासनादिभिः ॥
ददौमध्यान्हसमये तस्मैभोजनमादरात् ॥
रामस्तुयाचयामास व्हदिस्थंस्वमनोरथं ॥
याचयामासरामाच्च कामंदाल्भ्योमहामुनिः ॥
ततौद्वौपरमप्रीतौ भोजनंचक्रतुर्मुदा ॥
भोजनानंतरंदाल्भ्यः पप्रच्छभार्गवंप्रति ॥
यत्त्वयाप्रार्थितंदेव तत्त्वंशंसितुमर्हसि ॥

रामउवाच ।

तवाश्रमेमहाभाग सगर्भास्त्रीसमागता ॥
चंद्रसेनस्यराजर्षे क्षत्रियस्यमहात्मनः ॥

तन्मेत्वंप्रार्थितंदेहि हिंसेयंतांमहामुने ॥
ततोदाल्भ्यःप्रत्युवाच ददामितववांच्छितं ॥
यन्मयाप्रार्थितंदेव तन्मेदातुंत्वमर्हसि ॥
ततःस्त्रियंसमाहूय चंद्रसेनस्यवैमुनिः ॥
रामायप्रददौभीतां रामःप्रीतमनाअभूत् ॥

रामउवाच ।

यत्त्वयाप्रार्थितंविप्र भोजनावसरेपुरा ॥
तन्मेशंसमहाभाग ददामितववांच्छितं ॥

दाल्भ्यउवाच ।

स्त्रियंगर्भममुंवालं तन्मेत्वंदातुमर्हसि ॥
ततोरामोब्रवीद्दाल्भ्यं यदर्थमहमागतः ॥
क्षत्रियांतकरश्चायं तत्त्वंयाचितवानसि ॥

प्रार्थितश्चत्वयाविप्र कायस्थोगर्भउत्तमः ॥
तस्मात्कायस्थइत्याख्या भविष्यतिशिशोःशुभा ॥
एवंरामोमहाबाहु र्हित्वातंगर्भमुत्तमं ॥
निर्जगामाश्रमात्तस्मात् क्षत्रियांतकरःप्रभुः ॥
कायस्थएषउत्पन्नः क्षत्रिण्यांक्षत्रियात्ततः ॥
रामाज्ञयासदाल्भ्येन क्षात्रधर्मात्बहिःष्कृतः ॥
दत्तःकायस्थधर्मोस्मै चित्रगुप्तस्ययःस्मृतः ॥
तद्गोत्रजाश्चकायस्था दाल्भ्यगोत्रास्ततोभवन् ॥
शूद्रकमलाकर पृ० ९० प० २.

अ० या प्रकारें करून परशुरामानें सहस्त्रार्जुनाचा संहार केल्यावर अवशेष राहिलेल्या क्षत्रियांचा वध करण्यास्तव तीक्ष्ण शस्त्रांसह निघाला, तेव्हां हें वर्तमान अवशेष राहिलेल्या क्षत्रियांनीं ऐकून भयाभित होत्साते घरेंदारें सोडून, कांहीं गुहे मध्यें गेले, कांहीं पातालास जाऊं लागले. ते वेळीं

चंद्रसेन राजाची स्त्री गर्भिणी होत्साती आपला गर्भ संभाळण्यास्तव दालभ्यऋषीच्या आश्रमाप्रत येती झाली. नंतर तीच्या पाटी- मागून परशुरामहि त्या स्थानाप्रत जाऊन पोहोंचला असतां, त्या महर्षीनें अर्घ्यपाद्यादिकोपचारें करून त्याचा मोठा आदर केला. तेणेंकरून परशुराम प्रसन्न होत्साता, त्या ऋषीस ह्मणा- ला कीं, हे ऋषे ! ती पळून आलेली चंद्रसेन राज्याची गर्भिणी स्त्री वध करण्यास्तव माझे स्वाधिन कर. ह्मणजे मीं तुला इ- च्छित अर्थ देईन, तेंव्हां दालभ्य ऋषी रामाकारणें प्रत्युत्तर देता झाला कीं, हे रामा ! त्वां इच्छित फल मीं तुला देतों; परंतु हे देवोत्तमा ! मीं जें तुजकारणें मागितलें तें तूं मला दे ह्मणजे झालें. असें सांगून त्या चंद्रसेन राजाच्या स्त्रीयेस त्या ऋषीनें बोलाऊन भयाभित होत्साता रामाचे स्वाधिन केली. याप्रकारें त्या ऋषीनें त्या स्त्रीस रामाचे आधिन केल्यावर प्रसन्न मुख होत्साता राम त्या ऋषीप्रत ह्मणतो कीं, हे ऋषे ! भोजनावसरीं जें त्वां मजकारणें मागितलें तें तुला मीं देऊन तुझें मनोरथ पूर्ण करितों. तेंव्हां दालभ्य ऋषी ह्मणतो कीं, हे रामा ! माझ्या इच्छित देगणीबद्दल हें गर्भरूप बालक मजकारणें दे. त्या ऋषीचेंतें वचन ऐकून राम ह्मणतो, हे ऋषिवर्या ज्याकारणास्तव मीं तुझ्या आश्रमाप्रत आलों

आणि मीं तर क्षत्रियांचा शत्रू असून हा क्षत्रिय पिंड असतां अशा तत्वासच त्वां मजकारणें मागिलें. याप्रमाणें त्या ऋषीचें मागणें जरी परशुरामाचे पथ्यावर पडत नव्हतें तरी त्यास त्याच्या प्रागुक्त वचनाप्रमाणें देणें भाग पडलें. याप्रकारें त्या ऋषीनें त्या गर्भाविषयीं रामाजवळ प्रार्थना केल्यावर, परशुरामानें त्याच्या मागणी प्रमाणें तो उत्तम असा कायस्थ गर्भ त्यास दिला आणि सांगितलें कीं, हा गर्भ कायस्थअसतां त्वां मजकारणें मागितला सबब या कुमराचें नाम कायस्थ असें होईल; याप्रमाणें सांगून परशुराम त्या गर्भाच्या निराशेंनें आपल्या आश्रमास जाता झाला. याप्रकारें क्षत्रियापासून क्षत्रिणीस्त्रीचे ठिकाणीं कायस्थ जात उत्पन्न झाली, नंतर दालभ्य ऋषीनें त्या बालकास रामाज्ञेप्रमाणें क्षात्रधर्मापासून बहिष्कृतकरून चित्रगुप्ताचा जो कायस्थ धर्म ( लेखन वृत्ति ) तो त्यास लाऊन दिला. दालभ्य ऋषीनें त्या बालकाचें यथासांग पोषण केलें ह्मणून त्याचें मूल गोत्र दालभ्य झालें. याप्रमाणें पलायन केलेल्या क्षत्रिय कुलाचें वर्णन रेणुकामहात्मेंत आहे; तर यावरून पलायन केलेल्या क्षत्रियांचें सम्यक् विवेचन या पौराणीक वचनांवरून होत असल्याकारणानें क्षत्रियापासून सुतार सोनार

कांसारे त्यादिक जाति उत्पन्न झाल्या असें ह्मणणें हें केवळ शास्त्र बाह्यअसून पिष्ट पेषणवत् दिसतें.

अस्तु, पक्षांतरानें तेंहि कबूल केलें तथापि सोनार सुतारे-त्यादिक जाति पलायन केलेल्या क्षत्रियांपेक्षां पूर्वींचे ठरत असून विचारांतीं हें शहाणपण आलीकडच्या अरण्य पंडितांनीं, स्वर्णकारेत्यादिक पांचाल ज्ञातीची निब्भर्त्सना करण्याकरितां व विशेषेंकरून जगन्नियंत्यावर दोषारोप आणण्याकरितांच केलें आहे, असें ह्मणण्यास किंचिन्मात्रहि संशय दिसत नाहीं; कारण त्या श्लोकाची रचनाच पहातां अती विलक्षण दिसतअसून "धोत्र" या मराठी शब्दाचा आधार कोणत्या कोशांतून त्या कवि राजानें घेतला असेल तो असो. एवंच

यस्यकस्यतरोर्मूलंयेतकेनापिह्यानितं
यस्मैकस्मैप्रदातव्यंअद्वातद्वाभविष्यति

या ह्मणी प्रमाणेच त्या श्लोकाची व्यवस्था दिसून येती. सारांश, असे हे शीघ्रकवी आपलें कवित्व महान् निबंधांत घुसडून

स्वर्णकारेंयादिक पांचाल हे नीच असें सिद्ध करण्यास पाहत होते परंतु बुद्धिचातुर्य फार झाल्याकारणानें फसले; आणि या सृष्टींत हा येक विषय फार चांगला आहे कीं, मोठा धूर्त आणि लबाड लोक महत् विभू रचूं पाहतात; परंतु काक ताल न्याय होऊन त्यामध्यें त्यांचें खरें रूप दृष्टोत्पत्तीस येण्या विषयीं कांहीं ना कांहीं तरी छिद्र राहतेंच राहतें. असो,

वाचकहो ! पहा या दुष्टांचीं अनुचित कर्म कसीं आहेत तीं, आतां वास्तविक जर क्षत्रिय पांचाल ह्मणण्याचें कारण पाहिलें असतां मत्स्यपुराणाच्या ५० व्या आध्यायांतील ३ न्या श्लोकांत असें सांगितलें आहे कीं,

"मुद्गलश्चजयश्चैव राजाबृहदिषुस्तथा ॥
जवीनरश्चविक्रांतः कपिलःश्चैवपंचमः ॥
पंचानांचैवपांचाला नेतान्जनपदान्विदुः ॥
पंचालंरक्षिणोह्येते देशानामितिनःश्रुतं ॥

अ० पृथुराजाचा पुत्र भद्राश्व, याचे पुत्र मुद्गल जय,

बृहदिषु, जवीनर, व पराक्रमी कपील असे भद्राश्वास पांच पुत्र होते. आणि ह्या भद्राश्व पुत्रांचेच देशाला, लोक पंचाल असें ह्मणत होते. कारण त्या देशास रक्षण करणारे हेच पांच राजे होते; ह्मणून या देशाला पांचाल हें नांव प्राप्त झालें. या प्रमाणें मत्स्य पुराणांत सांगितलें आहे. यावरून क्षत्रिय पांचाल ह्मणण्याचें कारण काय तें सर्वत्रांचें लक्ष्यांत येईलच. याशिवाय स्वारोचिषमनु पासून जी संतती झाली ती आपल्या पित्याच्या नामें करून क्षत्रियपांचाल असें ह्मणऊं लागली. असें रथकार कल्पद्रुम ग्रंथाचें अनुमत आहे. तसेच रैवत मनु पासून जी प्रजा झाली ती वैश्य पांचालांत योजिली आहे. त्याच प्रमाणें तामस मनुपासून झालेल्या पुत्रांस शूद्रपांचाल अशी संज्ञा आहे. तस्मात् या प्रदर्शित सर्व आधारांवरून पूर्वोक्तभेदांच्या उत्पत्ति क्रमांत आणि या ब्रह्मपांचालांचे क्रमांत जमीन अस्मानाचें अंतर दिसून येत असल्या कारणानें पूर्वोक्त नाडिधमेत्यादिक शब्द, प्रागुक्त ७० भेदांवांचून ब्रम्ह क्षत्र, वैश्य, संकररथकारेत्यादिकांस लागूं होत नाहींत.

आतां कोशांत केवळ तेवढींच नामें आहेत असें नाहीं,

तर त्याच कांडांत प्रागुक्त लोकांचीं आणखी नामें लिहिलीं आहेत तीं हीं कीं,

“ पादुकश्चर्मकारस्या द्व्योकारोलोहकारकः ॥
नाडिंधमःस्वर्णकारः कलादोरुक्मकारकः ॥
शाङ्खिकिकःकांबवीकः सौल्बिकस्ताम्रकुट्टकः ॥
तक्षातुवर्धकीत्वष्टा रथकारस्तुकाष्टतट् ॥
ग्रामाधीनोग्रामतक्षः कोटतक्षःधीनानकेतिअमर-
कां० २ शूद्रवर्ग.

या प्रमाणें कोशांत पूर्वोक्त भेदांचीं नामें असून यांस सूतसंहितें मध्यें नीच हि म्हटलें आहे, तें असें कीं,

“ साधुसाधुमहाभाग साधूनांचपरंतप ॥
कथयामियथातथ्यं मध्यमाधमनिर्णयं ॥
रथकारःस्वर्णकारः कांस्यकारःस्तथैवच ॥

लोहकारःश्मकारश्च पंचैतेमध्यमाःस्मृताः ॥

अ० सूत, साधुजनां मध्यें श्रेष्ठ तपोशाली अशा शौनकाप्रत म्हणतो कीं, मीं तुम्हांस यथार्थ रीतीनें मध्यमाधम या भेदेंकरून वर्ण जाति निर्णय सांगतों तो श्रवण करा. कीं, रथकार, (सुतार) स्वर्णकार (सोनार) कांसार, लोहार आणि फातरवट मिळून या पांच जाति अधमांत धरल्या आहेत. या प्रमाणें सूत संहितेचें वचन आहे. याशिवाय पूर्वोक्त ७० भेदांची उत्पत्ति अत्यंत नीच्यांत कथन केल्या कारणानें मन्वादिक स्मृति कारांनीं त्यांकडील अन्नादिक स्वीकारणारांवर महद्दोषारोप कथन केल्याचाहि दृष्टीस पडतो. याविषयीं प्रमाण,

"कर्मारस्यनिषादस्य रंगावतारकस्यच ॥
सुवर्णकर्तुर्वैणस्य शस्त्रविक्रयिणस्तथा ॥
भुक्त्वातान्यतमस्यान्न ममत्याक्षपणंत्र्यहं ॥

अ० यांत असें सांगिलें आहे कीं, लोहाराचें, निषादाचें

(कोल्याकडील) रंगाऱ्याकडील, सोनाराकडील, वैणाकडील, आणि शस्त्रादिक विक्रय करणाऱ्याकडील अन्न[1] ब्राह्मणानें स्वीकारिलें असतां तीन दिवस उपोषण करावें, ह्मणजे तदन्न भक्षण जन्य दोषापासून मुक्त होतो.

"राजान्नंतेजआदत्ते शूद्रान्नंब्रह्मवर्चसं ॥
आयुःसुवर्णकारान्नं यशःश्चर्मावकर्तिनः ॥
इति मनुः अ० ४ श्लो० २१५,२१८,२२१.

---

१ येथें अन्नशब्दानें अमान्न असून तेंहि पराशरस्मृतींत निषेध मानिलें आहे कीं, "आमंशूद्रस्यशूद्रान्नंपक्कमुच्छिष्टमुच्यते ॥ तस्मादामंचपक्कंचशूद्रस्यपरिवर्जयेत" तथा, "योसहत्प्रतिग्रहग्राहि नित्यंयश्चप्रतिग्रहि ॥ ग्रहसूचकदूतौचपितृकार्येषुवर्जयेत् ॥" रजकश्चर्मकारश्चनटोबुरूडएवच ॥ कैवर्तमेदभिलाश्चसप्तैतेअंत्यजाःस्मृताः भुक्त्वाचैषांस्त्रीयोगत्वापीत्वायःप्रतिगृह्यच। कृच्छ्राब्दमाचरेत्ज्ञानादज्ञानादेवतद्वयमितियमस्मृ० अ १श्लो०३३–३४

" राजान्नंतेजआदत्ते शूद्रान्नंब्रह्मवर्चसं ॥
आयुःसुवर्णकारान्न मर्वारायाश्चयोषितेतिभारते
राजधर्मे अ० ३६.

अ० याशिवाय यांकडील अन्नग्रहणानें तत्वाची हानी सांगितली आहे, ती अशी कीं, राजान्नंग्रहणानें तेजाचा ( कांतीचा) नाश होतो. शूद्रान्नानें ब्रम्हचर्य व्रताचा, स्वर्णकारा कडील अन्नानें आयुष्याचा, चांभारा कडील अन्न स्वीकारिल्यानेंयशाचा गौवळ्याकडलि अन्नानें प्राजेचा नाश होतो. याप्रमाण मनुस्मृतींत व भारत राजधर्मांत सांगितलें आहे. यांवरून पूर्वोक्त ७० भेद किति दोषी आहेत ते पहा. यशिवाय या पतितें

---

१ दशसूनासमश्चक्रीदशचक्रिसमोध्वजी ॥ दशध्वजसिमोवेश्यादशवेश्यासमोनृपः॥ तेनतुल्योभवेद्राजाघोरस्तस्यप्रतिग्रहइतिमनुरपि

२ पतितान्नंयदाभुक्तेभुक्तेचांडालवेश्मनि ॥ समासार्द्धंचरेद्वारीमासंक्रामकृतेनतुरितिलिखित स्मृ० अ० १– श्लो० ७०

झालेल्या सोनार लोकां विषयीं मत्स्यपुराणांत व मनु स्मृतींत असें लिहिलें आहे कीं,

"सर्वसंकरपापिष्ठं हेमकारंनराधिप ॥
अन्यायेवर्त्तमानंच च्छेदयेल्लवशःक्षुरैः" ॥
म० पु० अ० २२७ श्लो० ८२.

सर्वकंटकपापिष्ठं हेमकारंतुपार्थिवः ॥
प्रवर्त्तमानमन्याये च्छेदयेल्लवशःक्षुरैः ॥
मनुस्मृ० अ० ९ श्लो० २९२.

अ० सोनार जात ही सर्व संकर जातींत अधिक पापी असून, तो जर देव ब्राम्हण राजादिक यांचे स्वर्ण अपहार करील; तर राजानें त्याचे अंगाचे बारीक तुकडे वस्तऱ्यानें करावे. असें आहे.

तस्मात् या सर्व आधारांवरून जरी पूर्वोक्त सत्तर भेद सुतार, सोनार, कांसार, ताम्रकार, शिल्पि, फातरवटेत्यादिक

नामभेदानें प्रवृत्तींत जाणले जातात; तरी त्यांच्या उत्पत्ति क्रमावलोकनेंकरून ब्रम्हपांचालांचा व पूर्वोक्त ७० भेदांचा अर्थी अर्थी संबंध लागूं होत नसल्यामुळें प्रागुक्त नाडिंधमेत्यादिक शब्द त्यां वांचून ब्रम्हपांचालांचे ठिकाणीं संभवत् नाहींत, हा सिद्धांत.

अस्तु आतां पूर्व प्रदर्शित शंकेंत ब्रम्हपांचाल म्हणविणारांतहि सोनार, कांसार, सुतार, लोहारेत्यादिक नामाभिधानेंअसून हेहि पूर्वोक्त सत्तर भेदांच्या वृत्तिनें निर्वाह करितात असें जें म्हटलें; तें खरें असून, त्या म्हणण्यानें तेच हे असें म्हणण्यास एक सबल कारण हि साधतें खरें; परंतु याकारणावरून जाति मात्रस्थलोकांवर व्यभिचारत्व येतें. कारण प्रत्येक जातिस्थ लोक उक्तवृत्तित्यजून नानाप्रकारच्या वृत्या अंगीकारितात. म्हणून त्या वृत्ति योगानें तेच हे असें म्हणतां ज्याप्रमाणें एत नाहीं कीं, त्याचप्रमाणें स्वर्णकारेत्यादिक वृत्ति विशेषणानींतेच हे ब्रम्हपांचाल असें सिद्ध करवत नाहीं. कारण, ब्राम्हण होत्सातां समयानुसार उदरनिर्वाहार्थ नानाप्रकारचे उद्योग करितात; आणि त्या कृतोद्योगांवरून दुष्ट नामाभिधानेंहि प्राप्त होत असतात; म्हणून त्या कृतोद्योगपरत्व प्राप्त नामाभिधानानें तेच हे,

इत्यादिक अनिर्वाच्य शंकाघेऊन हट वैर संपादणें हें कांहीं समजूतदाराचें कृत्य नव्हे. कारण,

"कस्यदोषःकुलेनास्तिः व्याधिनाकेनपीडिता ॥
व्यसनंकेननप्राप्तं कस्यसौख्यंनिरंतरम् ॥
चाणक्य अ० ३ श्लो० १.

अ० या लोकीं, दोषरहित असें कोणत्या मानवाचें कुल आहे ? रोगानें पीडित नाहींत असे कोण आहेत, तसेंच संकटावांचून असा कोण आहे, आणि निरंतर सुखी असा कोण आहे, कोणींच नाहींत. तस्मात् सांगण्याचा तात्पर्यार्थ, उद्योगपरत्वें नामाभिधानें प्राप्त नाहींत अशा कोणत्या जाति आहेत. प्रत्येक जाति मात्रीय पुरुषांस उद्योगानुसार नामाभिधानेंअसून ते त्या नामाभिधानाच्या योगानें ब्राम्हणपदापासून पृथक् झाले असें कोठेंच नाहीं. तस्मात् प्रत्येकास नाम भेद आहेच आहेत. उदाहरण जसे,

"कुळकर्णी, आंग्रे, देशमुख, देसाई, देशपंढे, गांवडे, माळी. महार, खांठकी, ब्रॅम्हहत्ये, चांभार, आगलावे, बोबमारे, रेडे, साहेब, मत्स्ये, राव, काळे, गोखले, ओक, पाटील, मुजूमदार, दप्तरदार, सेनापति, फडणवीस, मिगुंडेस्यादिक अनेक नामें सांप्रत ब्राह्मण ह्मणविणारांत असून लोक त्या नामभेदानें महार मराठयादिकांत त्यांची योजना न करितां उलट त्यांस "वर्णानां

---

१ हें नांव वास्तविक म्हठलें असतां मराठ्यांचें असून सांप्रत तें ब्राम्हण म्हणविणारांत आहे, तर तो त्या नामावरून मराठी जातिस्थ जाणला जातो कीं काय ?

२ सातार्‍यांत एका देशस्थ ब्राम्हणाचें आडनांव महार असें आहे,

३ हें नांव पशूमारणाराचें आहे,

४ नंबुरी लोकांतअसून ते ब्राम्हण म्हणवित असतात.

ब्राह्मणोगुरु: " असें ह्मणतात. आणि वास्तविक ह्मटलें असतां महार, मराठे, इत्यादिक प्राप्तनाम भेदानें तेहि ब्राह्मण मराठ्यांत व महारांत गणले जावे, तर ते न जातां जसे आपल्या मूल पदांस उक्त आहेत कीं, तद्वत् ब्रह्मपांचालांचे ठिकाणीं सोनार, सुतार कांसारेत्यादिकोदाहरणें जाणावीं, कारण बैल हा गायीचा पाडा असून लोक त्यास बैल असें ह्मणतात, तसेच गीताही महाभारतांतील असून. प्रस्तुत लोक त्या ग्रंथास गीता असें विशेषण देतात. त्याच प्रमाणें पांडव हे कुरुकुलांतील असून लोक त्यांस पांडव असें म्हणतात, तद्वत् निर्विशेष सूत्राला ब्रम्हसूत्र असेंहि ह्मणतात् ह्मणून त्या लोकवच विशेषणानें, बैल गायीचा पाडा नव्हे, गीता भारतांतील नव्हे, पांडव कुरुकुलस्थ नाहींत असें म्हणतां येईल काय ? कधींच येणार नाहीं, त्यांत वृत्ति वाचक नामें केवळ ब्रम्हपांचालांतच आहेत असें नाहीं; तर तीं प्रत्येक जातिमात्रांत असून त्या योगानें जसें त्यांचें ब्राम्हण्य नष्ट होत नाहीं कीं, त्याच प्रमाणें लोक जरी आम्हांस सोनार कांसारेत्यादिक विशषणें देतात्, तरी त्या योगानें आम्हीं ब्राम्हण नव्हे असें म्हणतां येत नाहीं, हें पक्केपणीं समजा.

आतां ब्रह्मपांचालांस सोनार कांसारेयादिक वृत्तिवाचक नामाभिधानेंकरून ब्राह्मण म्हणवत् आहीं; असें जर कोणाचें मत असेल; तर त्याच न्यायानें प्रागुक्त सर्व उदाहरणांवरून ते सर्व कोण जाणले जातात? याचा विचार करा. आणि उद्योग परत्वनामानें ब्राम्हणत्वास हानीच येते असा जर सर्वांचा निश्चय असेल तर या सदरा खालील प्रमाणावरून कोणत्यापुरूषाचे ठिकाणीं ब्राम्हण्य सिद्ध होतें तें पहा.

"नवदेद्यावनींभाषांप्राणैःकंठगतैरपि"

अ० कारण, कंठीं प्राण आला, तरी यवन संबंधी भाषा शिकूं नये. याप्रमाणें शास्त्रांत ब्राम्हणांचा प्रतिबंध आहे. आणि या प्रतिबंधावरून पहातां यवन संबंधी भाषा शिकल्यानें ब्राम्हण किती अयोग्य जाणला जातो, याविषयीं अनुमान करून या महाराष्ट्रादिक देशांत "येस" "नो" "सर" "व्हेरिवेल्" 'हैं' 'नहींहैं' इत्यादिक शब्दोच्चार न करणारा येकादा प्राणी तरि मिळेल कीं, काय तो पहा. याशिवाय स्मृत्यादिकांत ब्राम्हणांविषयीं अनेक प्रतिबंध लिहिल्याचे आढळतात.

"प्रतिग्रहसमर्थोपि प्रसंगंतत्रवर्जयेत् ॥
प्रतिग्रहेणह्यस्याशु ब्राह्मंतेजःप्रशाम्यति ॥
यावतःसस्पृशेदंगैर्ब्राह्मणान्शूद्रयाजकः ॥
तावतांनभवेद्दातुः फलंदानस्यपौर्तिकं ॥
वेदविद्यापिविप्रोऽस्य लोभात्कृत्वाप्रतिग्रहं ॥
विनाशंव्रजतिक्षिप्र मामपात्रमिवांभसि ॥
मनुस्मृ० अ० ४ श्लो० १८६

अ० तेअसे कीं, प्रतिग्रह घेण्याचा अधिकार जरी ब्राह्मणास आहे, तरी प्रसंगाची योजनाकरून प्रतिग्रह घ्यावा. कारण अयोग्यप्रतिग्रहानें वक्ष्यमाण प्रकार होतो. तस्मात् प्रसंग वर्ज करावा ह्मणजे ब्राम्हतेज शांत होईल. आणि शूद्रयाजक( शूद्राचाउपाध्याय[1])

---

१ शूद्रांचे उपाध्याय बहुतकरून देशस्थ कऱ्हाडे चित्पावनादिकच दिसतात तेव्हां शूद्र याजकानें त्यांस काय ह्मणावें याचा विचार सर्व सुज्ञानींच करावा.

जितक्या ब्राह्मणांस आपल्या अंगानें स्पर्श करितो, त्या ब्राह्मणांस दान दिलें असतां, दात्यास त्या दानापासून फल प्राप्ति होत नाहीं. आणि मोठा वेदवेत्ता पुरुषअसून तो जर अर्थ लोभास्तव असत् प्रतिग्रह घेईल; तर सुरेख मातीचें भांडें भाजल्यावांचून पाण्यांत टाकिलें असतां ज्याप्रमाणें नाश पावतें कीं, त्याचप्रमाणें असत्प्रतिग्रहाच्यायोगानें वेदवेत्याची विद्या नष्ट होती, असें मनुस्मृतीचें मत आहे.

"योऽसत्प्रतिग्रहग्राही नित्यंयश्चप्रतिग्रही ॥
ग्रहसूचकदूतौच पितृकार्येषुवर्जयेत्" ॥
पराशरस्मृ० अ० ४ प ३१ श्लो० ३०४.

अ० जो वाईट प्रतिग्रह घेतो अथवा नित्यच प्रतिग्रहानें कालक्षेप करितो, किंवा पंचांगपाहून ग्रहादिक सांगतो, अथवा दूत कर्मांत प्रवीण अशा पुरुषांस ( ब्राह्मणांस ) पितृकार्यांत वर्ज्यकरावे असें वृहत्पराशरस्मृतीचें वचन आहे.

अवाह्यकादेवलका नाक्षत्राग्रामयाजकाः ॥

एतेब्राह्मणचांडाला महापथिकपंचमः ॥
भारतराजधर्म अ० ७६ श्लो० ५

अ० याशिवाय, अवाह्यक, देवलक, ( वेतन घेऊन देवपूजा करणारा ) नाक्षत्र ( ग्रहणादिकसांगून उपजीविका करणारा ) ग्रामोपाध्य, हे चार व महापथिक मिळून हे पांचहि ब्राम्हण असून निंद्य वृत्तिस्तव यांस चांडाल तुल्य म्हटलें आहे. याप्रमाणें भारत राजधर्माचें वचन आहे.

तिलधेनुर्गजोवाजी प्रेतान्नमजिनंमणिः ॥
सुरभिःसूयमानाच घोराःसप्तप्रतिग्रहाः ॥
अध्यात्मरामायण कांड १ पत्र ३ टीका.

अ० त्याचप्रमाणें अध्यात्म रामायणांत तीळ, धेनु, हत्ती घोडा, प्रेतान्न ( बाराव्याचें अन्न ) अजिन ( हरिणाचें कातडें ) मणी (रत्न अथवा शालिग्राम) आणि सुरभि: (उभयतोमुखी गाय) इत्यादिक हे सात प्रतिग्रह अघोर ( भयंकर असून नरक देणारे ) आहेत. सबब ब्राम्हणांनीं ग्रहण करूं नयेत, असें रामायणांत सांगितलें आहे.

सद्यःपततिमांसेन लाक्षायालवणेनच ॥
त्र्यहेणशूद्रीभवति ब्रह्मणःक्षीरविक्रयात् ॥
मनुः अ० १० श्लो० ९२.

अ० जो ब्राम्हण मांस विक्रय करितो तो तत्क्षणीं ब्राम्हणत्वापासून मुकतो, आणि लाख, मीठ किंवा दूध दहीं जो विकतो तो तीन दिवसांत शूद्र होतो असें मनुवचन आहे.

भीष्मउवाच ।

सुरालवणमित्येव तिलान्केसारिणःपशून् ॥
वृषभान्मधुमांसंच कृतान्नंचयुधिष्ठिर ॥
सर्वास्ववस्थास्वेतानि ब्राह्मणःपरिवर्जयेत् ॥
एतेषांविक्रयात्तात ब्राह्मणोनरकंव्रजेत् ॥
भारतराजधर्म अ० ३५ श्लो० ३,४,५.

अ० भीष्म धर्मराजाप्रत म्हणतो कीं, हे युधिष्ठिरा ब्राम्हणानें

वैश्य वृत्तीकरून उपजीविका करणें असेल, तर दारू, मीठ, तीळ, केशर, पशू, बैल, मध, मांस, केलेलें अन्न (खाणावळी सारखें) इत्यादिक पदार्थ वर्ज्य करावे; कारण या पदार्थांच्या विक्रयानें ब्राम्हण अघोर नरकास जातो. याप्रमाणें भारतराजधर्माचें वचन आहे. याशिवाय

"हलांतंब्रह्मवर्जसमितिश्रुतेः" ॥

सर्वेषामपिपापानां पापमेकंमहत्तरं ॥

लांगलाकर्षणंराजन् महापापंप्रकीर्तितं ॥

यःसदाकर्षतेमूर्खोब्राह्मणोभ्रूणहाहिसः ॥

देवाःपितृगणाविप्रा स्तथागंधर्वचारणः ॥

हलकर्मप्रकूर्वाणं तथालक्ष्मीपतिःप्रभुः ॥

शेपुस्तेतुसमुद्दिक्ष्य निर्भाग्योभवनारकी ॥

युष्मत्कुलप्रसूताये सर्वकर्मबहिःष्कृताः ॥

दरिद्राअंगहीनाश्च सदासंतानवर्जिताः ॥

वंधुभिःसंपरित्यक्ता गंतारोनरकंध्रुवं ॥
हरिवंशशेषधर्म अ० २८ श्लो० १२,१३,
१४, १५, १६, १७.

तथामनुस्मृतावपि

वैश्यवृत्यापिजीवंस्तु ब्राह्मणःक्षत्रियोपिवा ॥
हिंसाप्रायांपराधीनां कृपियत्नेनवर्जयेत् ॥
कृषिंसाध्वितिमन्यंते सावृत्तिःसद्गिर्गर्हिता ॥
भूमिंभूमिशयांश्चैव हंतिकाष्ठमयोमुखं ॥
मनुस्मृ० अ० १० श्लो० ८३, ८४.

अ० वेदांत ब्राम्हणाला हलकर्म ( नांगरधरूनस्वतांनांगरणें )

---

१ चिपळोण प्रांतीं व सोलापुरादिक प्रांतीं ब्राम्हण म्हणवि-
णारे स्वतां नांगरधरून, नांगरीत असतात्. त्या योगानें ते पतित
झाले असतील किंवा नसतील तें पहा.

हें वर्ज्य सांगितलें असून याविषयीं स्मृतिप्रमाणेंहि आहेत. तीं अशीं कीं, हे राजन्, सर्व पातकांमध्यें लांगलाकर्षण ( नांगरणें ) हें महत्पातक सांगितलें आहे कीं, स्वतां नांगरधरून नांगरणारा जो ब्राम्हण, तो त्या नांगरण्याच्यायोगानें भ्रूणहत्येस ( गर्भपाताचे पातकास ) पात्र होतो; आणि त्या हलकर्म करणाऱ्या ब्राम्हणास अवलोकून देव, पितर, ऋषी, गंधर्व, चारण, सिद्ध, तसेंच लक्ष्मीपति भगवान्आदीकरून सर्व त्यास शापितात कीं, तूं भाग्यरहीत होऊन नरकास जा. आणि तुझ्या कुलांमध्यें जे उत्पन्न होतील तेहि सर्व कर्मांत बहिष्कृत असून दरिद्री, अंगहीन संतान राहित, बंधुवर्गानें टाकलेले आणि नरकास योग्य असे होतील. असें हरिवंशाच्या शेषधर्मांत सांगितलें आहे, आणि ब्राम्हणानें अथवा क्षत्रियानें वैश्यवृत्तीनें जीवन करावें; परंतु हिंसातुल्य असून पराधीन अशी जी शेतकी ती सर्वथा ब्राम्हणांनीं करूं नये. कारण शेतकीहि साधुनीं निंद्य अशी मानिली आहे कीं, अधोमुखकाष्ठानें, ( नांगरेत्यादिकानीं ) अनेक प्राण्याची हत्या घडती सबब ब्राम्हणांनीं यत्नपूर्वक शेतकी ( स्वतां नांगरण्याची चाल ) वर्ज्य करावी, असें मनुस्मृतीचें वचन आहे. त्याच प्रमाणें,

तत्रस्वभावदुष्टलशुनगृंजनच्छत्राकविड्वराहग्रामकुक्कुटपलांडूनांप्रत्येकममत्यासकृद्भक्षणेसांतपनं, अभ्यासेयतिचांद्रायणं, मत्यासकृत्वेच्चांद्रं, आभ्यासेदावृत्तिः अत्यंताभ्यासेसुरापानसमं; प्रायश्चित्तांतेपुनरुपनयमेतेषुसर्वत्रइतिप्रायश्चित्तेंदुशेखर प० ३८

निंदितान्नविधिः ॥

अ० प्रायश्चितेंदुशेखरांत, लसूण, कांदा, गाजर, आळांबी, घरडुकर आणि कोंबडी हे पदार्थ अज्ञानत्वेंकरून एकवार भक्षण करणारांस सांतपन[१] प्रायश्चित्त, वारंवार भक्षण करणारांस

---

१ पंचगव्यंचगोक्षीरंदधिमूत्रंसकृत्घृतं ॥ जग्ध्वापरेद्युपवसेत्कृच्छ्रसांतपनंस्मृतं । पृथक्सांतपनैर्द्रव्यैःषडहः सोपवासकः । सप्ताहेनतुकृच्छ्रोऽयंमहासांतपनंस्मृतं अत्रिस्मृ० अ० १ श्लो० ११५,११६.

चांद्रायण[1] प्रायश्चित, ज्ञानत: एकवेळ खाणारांस चांद्रायण प्रायश्चित्त, ज्ञानपूर्वक वारंवार खाणारांस चांद्रायण प्रायश्चित्ताच्या आवृत्त्या, सांगितल्या आहेत. आणि अत्यंताभ्याश्यांस पूर्वोक्त कांदो[2]लसुणादिक सुरापानसमं[3] ( मद्यप्राशनकेल्या सारखें ) त्यांस मद्य प्राशन जन्य दोषनिवारणार्थ जें उक्त प्रायश्चित्त सांगितलें असेल, तें देऊन नंतर पुन: उपयन संस्कार करावा असें आहे. त्याचप्रमाणें

" पलांडुंविड्वराहंच छत्राकंग्रामकुक्कुटं ॥
लशुनंगृंजनंचैव जग्ध्वाचांद्रायणंचरेदिति
याज्ञवल्क्यः अ० १ प० २७ श्लो० १०.

---

१ एकैकंवर्द्धयेन्नित्यंशुक्लेकृष्णेचन्हासयेत् ॥ अमावास्यांनभुंजीतएषचांद्रायणोविधि:अत्रि० अ० १ श्लो० ११०.

२ कांदा खाणें हा तर कांहीं ब्राह्मणाचा कुल धर्म आहे. ह्मणजे चंपाषष्ठीचे दिवशीं नैवेद्यार्थ जे पदार्थ करितात त्या प्रत्येक पदार्थांत कांदा घालण्याची चाल प्रस्तुत काल पर्यंत शास्त्रज्ञ ब्राह्मणांत दिसती यावरून अर्थांत ते, हीं वरील प्रायश्चित्तेंकरून पुन: संस्कार करीत असतील असें वाटतें नाहीं बरें.

अ० याज्ञवल्क्ययस्मृतींत कांदा, ग्रामडुकर, आळंबी, कोंबडी, लसूण, आणि गाजर इत्यादिक पदार्थ भक्षण करणारांस चांद्रायण प्रायश्चित सांगितलें आहे.

याप्रमाणें अनेक आधार ऋष्यादिकांनीं केलेल्या ग्रंथांत उपलब्ध आहेत; परंतु विस्तार भयास्तव सर्व येथें न घेतां उदाहरणापुरतेंच घेतले आहेत; तर या प्रदर्शित सर्व आधारांवरून विचार करितां ब्राम्हण मात्रांचें आचरण या प्रदर्शित आधारांविरुद्ध दिसतें. तर त्या विरुद्ध आचरणानें त्यांचें ब्राम्हणत्व नष्ट झालें किंवा नाहीं ? जर नष्ट झालें तर ते शूद्रांत गणावे किंवा ब्राम्हणांत. ? ब्राम्हणांत गणावे असी जर लोक समजूत असेल; तर स्वर्णकारित्यादिक वृत्तिवाचक नामानें ब्रम्हपांचाल शूद्राहीपेक्षां नीच म्हणणें हें सयुक्तिक किंवा अयुक्तिक ? कारण जसे इतर ब्राम्हणांचें उक्त धर्माविरुद्ध आचरण आहे कीं, तद्वत् या ब्रम्हपांचालांचेंहि असून त्या योगानें मूल पदापासून ते न भ्रष्ट होतां ब्रम्हपांचालच होतात, असें म्हणून हट वैर संपादणें हें केवळ द्वेषास्पद भासतें. कारण कायदा किंवा रीत म्हटली असतां शास्त्राविहित आचरणाच्या पुरुष मात्रास लागूं असून

त्या योगानें येक नीच व येक उत्तम असें कधींच होणें नसून या विषयीं शास्त्रार्थ किंवा शिष्टाचारहि नाहीं, असें असतां, पुर्वोक्त न्याय एकास लागूं व एकास लागू नाहीं, असें ह्मणणें किती वरें मतलबी दिसतें, ! तर एतादृश मतलब न साधतां,

"आत्मवत्सर्वभूतानि यःपश्यतिसपश्यति"

या नीत्युक्ति प्रमाणें वर्तून द्वेष, किंवा कायदा लागूं कराल. तर त्या कृत द्वेषापासून अथवा कायद्या पासून कांहीं तरी निष्पन्न होईल. न पेक्षां पिष्ट पेषण न्यायानें, निरर्थक वडवड केली म्हणून अथवा प्राचीन ग्रंथांत स्वोक्ति वाक्यें घुसडून त्या आधारानें द्वेष केला म्हणून त्या द्वेषानें निष्पन्न तर कांहीं एक न होतां उलट परस्परांमध्यें वैमनस्यें मात्र वाढतात, तर परमेश्वरानें ही जी कांहीं नरतनू दिली ती परस्परांत वैमनस्यें वाढविण्याकरितां दिली नाहीं, तसेंच वेदशास्त्रादिक ग्रंथ हेहि स्वोक्ति वाक्यांच्या आधारावरून भांडण्याकरितां नाहींत. तर अति दुर्लभ असा जो कांहीं हा मनुष्यदेह उत्तम कुळीं दिला त्या देहाचें सार्थक्य (वेद शास्त्रांत तत्तद्ग्रंथ कर्त्तांनीं सत्या सत्यतेचा काय निर्णय केला तो पाहून तदनुसार वर्तण्यास्तव) करण्यास्तव दिला

शिवाय; स्वकपोल काल्पित श्लोक करण्यास्तव अथवा अल्पमतिच्या लोक सागणींनें द्वेषकरण्यास्तव नाहीं; तर ज्या ग्रंथांच्या योगानें विद्वान् व बुद्धिमान् मतिहीनासही मतिमंतकरून परस्पर प्रीत्युत्कर्षानें वर्ततील, अशा कारणास्तव हे वेदशास्त्रादिक ग्रंथ आहेत. तर सांप्रतचे बुद्धिमान् लोक असे हे सद्बोध कारक ग्रंथ एकीकडेच ठेऊन

" नलिकागतमपिकुटिलं नभवतिसरलंशुनःपुच्छं ॥

ह्या नीत्यनुसार अल्प मनुष्यांच्या आश्रयानें निरर्थक या ब्रम्हपांचालांची निंदाकरण्यास पुढारीं होतात. तर अशा अप्रशस्थ मार्गानें निंदा करण्यापेक्षां; जर ते आपला अविचार रूप अहंकार टाकून स्कांदेत्यादिक पुराणांतील आख्यानें व वेदवचनें पाहण्याचें परिश्रम घेतील; तर त्यापासून ब्रम्हपांचाल हे कोण ? व कोणापासून उत्पन्न झाले, इत्यादिकांचें विवेचन खातरी पूर्वक होणार आहे. कारण, जगदादि कारण, असा जो विराट् विश्वकर्मा, त्याणें आपल्या मुखापासून ब्राम्हण, बाहूंपासून क्षत्रिय, उरूंपासून वैश्य आणि पायांपासून शूद्र,

असे ४ वर्ण उत्पन्न केले, असें सांगितलें असून, या विषयीं पुरुषसूक्ताचें प्रमाणही आहे, तें असें कीं,

> " ब्राह्मणोऽस्यमुखमासीद्बाहूराजन्यःकृतः ॥
> ऊरूतदस्ययद्वैश्यः पद्भ्यांशूद्रोअजायत "
> ऋग्वेद. पुरुषसूक्त ऋ० १२.

अ० जेव्हां पुरुष उत्पन्न केला तेव्हां ब्राम्हण त्याचें मुख, क्षत्रिय भूज, वैश्य मांड्या आणि शूद्र पाय, याप्रमाणें विभागला होता. यास दुसरें प्रमाण,

> " ब्रह्मवक्त्रंभुजौक्षत्रं मूरूमेसंस्थिताविशः ॥
> पादौशूद्राभवंतीमे विक्रमेणक्रमेणच " ॥
> भारत वनपर्व अ० १८७.

अ० ब्राम्हण मुख, क्षात्रिय भुज, वैश्य मांड्या आणि शूद्र पाय, असे क्रमें करून ४ वर्ण उत्पन्न झाले आहेत असें वनपर्वांत सांगितलें आहे.

याप्रमाणें ब्रम्हपांचाळांची उत्पत्ति आदिपुरुषाच्या मुखापासून कथन केली असून सर्वांत हे उत्तम असतां; हें ब्राम्हणच नव्हे असें म्हणणें हे किति आश्चर्यकारक आहे, तें पहा! खरें परंतु या पदार्शित, आधारांवर कांहीं शास्त्रीय लोकांची शंका आहे कीं, " ब्राम्हणोस्यमुखमासीत् " या वचनावरुन ब्रम्हपांचाल आदि-पुरुषाच्या मुखापासून उत्पन्न झाले असें जें म्हटलें हें अगदीं असंभवीत आहे, कारण, मुखमासीत्, पांचाल, ब्राम्हण याशब्दांत कांहीं अर्थ उत्पन्न होतनसून मुखमासीत् ब्राम्हण असा समावेशही होणें नाहीं. कारण, आसीत् हें क्रियापद असल्याकारणानें त्याच रूपानें विशेषण जोडलें जाणार नाहीं, फक्त हें विशेषण परमेश्वराचेंच असून यामध्यें पुरुषाची स्तुति मात्र आहे. म्हणून,

" मूलंतुब्राह्मणाःस्कंधाः क्षत्रियाःसंतितेप्रभो ॥
वैश्याःशाखास्त्वचःशूद्रा वनस्पतिनमोस्तुते " ॥
ब्रह्मपुराण.

अ० या मंत्रानें वृक्षरूप असा जो परमेश्वर त्याप्रत देवादिक नमस्कार करितात, कीं, ब्राम्हण तुझीं मुळें, क्षत्रिय तुझे कांड

वैश्य तुझ्या डहाळ्या आणि शूद्र तुझी साल, अशा तऱ्हेचा वृक्षरूप जो तूं त्या तुला, नमस्कार जो तो असो. असें ब्रम्ह पुराणाचें वचन असून, "आसीत्" हें परमेश्वराचेंच विशेषण आहे. शिवाय मुखापासून झाले असा मुळींच अर्थ होत नाहीं. कारण "पासून" ही पंचमी विभक्ती असून वाक्यांत "ब्राम्हणः अस्य मुखं, आसीत्" ह्या विभक्त्या आढळतात. असें असतां "मुखापासून" हा पंचमी विभक्तीचा अर्थ कोठून प्राप्त झाला!" असें म्हणतात व कांहीं अर्थी ही शंका खरी आहे, असें म्हटलें तरी चालेल; परंतु याखालील आधारांवरून चालत नाहीं असें म्हटलें पाहिजे. कारण,

"ब्राह्मणोऽस्यमुखमासीद्बाहूराजन्योऽभवत् ॥
मध्यंतदस्ययद्वैस्यः पद्भ्यांशूद्रोअजायत" ॥
अथर्ववेद कांड १९ प्रपाठक ३५ अनु-
वाक् ५ ऋ० ६ वी.

"मुखाद्ब्राह्मणवर्णोभूत्क्षत्रियःकिलवाहुतः ॥

ऊर्वोःसकाशाद्वैश्योभूच्छूद्रश्चरणतःकिल ॥
एवंवर्णाःसमुद्भूताब्राह्मणादिगजानन ॥
स्वेस्वेकर्मणिनिष्णाताः श्रुतिमार्गप्रवर्तिनः ॥
पुराणश्रवणेदक्षाः शांतादांताजितेंद्रियाः ॥
स्कंदपुराण सृष्टिखंड अध्याय ३५ श्लो० ७.

अ० अथर्वण वेदांत व वेदसार असें जें स्कंदपुराण त्यांत असें सांगितलें आहे कीं, "मुखात् ब्राम्हणवर्णोभूत्" मुखापासून ब्राम्हण, "क्षत्रियःकिलबाहुतः" बाहू पासून क्षत्रिय; "ऊर्वोः सकाशात् वैश्योभूत्" माड्यांपासून वैश्य, आणि "शूद्रश्चरणतः किल" पायांपासून शूद्र, असे चार वर्ण उत्पन्न केले. त्यांपैकीं, ब्राम्हण कर्मांचे ठायीं निष्णात् असून श्रुतिमार्ग प्रवर्तक पुराण श्रवणांत दक्ष, शांत उदार स्वभावाचे जितेंद्रिय असे होते. यास दुसरें प्रमाण.

वामदेवस्तुभगवान्सृजन्मुखतोद्विजान् ॥

राजन्यानसृजद्बाव्होर्विट्शूद्रानुरूपादयोः ॥
मत्स्यपुराण अ० ४ श्लो० २८.

अ० असें आहे कीं; वामदेव ( महादेव ) मुखापासून ब्राम्हण, बाहूंपासून क्षत्रिय, उरूंपासून वैश्य आणि पायांपासून शूद्र, यांस उत्पन्न करिता झाला. याप्रमाणें मत्स्यपुराणाचें वचन आहे.

आणि याच प्रमाणें यजुर्वेदांत महाभारतांत, लिंगपुराणांत, व वामनपुराणांतहि ब्राह्मणवर्ण हा मुखापासून उत्पन्न झाला असें स्पष्ट लिहिलें आहे. तस्मात् इत्यादिक आधार मिळत असल्याकारणानें आसीत् या क्रियापदानें " ब्राम्हणः अस्य, नाम विराट पुरुषस्य, मुखं आसीत् " असते झाले, अर्थात् परमेश्वराच्या मुखापासून ब्राम्हण झाले हें सिद्ध. तस्मात् याप्रमाणें हे मनु, मय, त्वष्ट, शिल्पिदेवज्ञादिक पांचाल आदिपुरुषाच्या मुखापासून उत्पन्न झाल्याविषयीं प्रत्येक वेदांत व पुराणांत सबळ व सर्व मान्य असे आधार उपलब्ध होत असतां; लोक त्यांवर काना डोळाकरून पांचाल हे ब्राम्हणच नव्हे असें म्हणतात; तेव्हां अर्थात् ते द्वेषरूप समुद्र मथन करण्यास पाहतात असें म्हटळें पाहिजे. कारण

"तावद्गर्जंतिशास्त्राणिजंबूकाविपिनेयथा ॥
नगर्जंतिमहाशक्तिर्यावद्वेदांतकेसरी" ॥

ह्या नीत्यनुसार जावत्काल पर्यंत शास्त्रार्थ माहित नव्हते, अगर असून पुढें येत नव्हते तो पर्यंत मनु, मय, त्वष्ट, शिल्पे त्यादिक पांचाल हे ब्राम्हण नव्हे, अगर ते शूद्र तुल्य आहेत् इत्यादिक बोलणें शोभलें गेलें; परंतु सांप्रत हे आधार पहातां स्वर्णकारेत्यादिक पांचाल हे कोण आहेत, कोणापासून उत्पन्न झाले, व यांस ब्राम्हणत्व आहे किंवा नाहीं याचा विचार सर्व विद्वज्जनवाचकानीं आपापल्या शुद्धांतः करणानेंच करावा.

खरें; परंतु, " प्रागुक्त सर्व वचनांत. मनु, मय, त्वष्ट, शिल्पी दैवज्ञादिक शब्द नसून, भावार्थांत ते शब्द कोठून प्राप्त झाले, आणि " मुखमासीत् " हे ब्रम्हपांचाल, येतद्विषयीं प्रमाण काय ? आणि ' मुखमासीत् ' या वाक्यांत अगर दुसऱ्या प्रमाणांत पांचल शब्द कोठें आहे? व ते विराट् पुरुषाच्या कोणत्या मुखापासून झाले? आणि मनु, मय, त्वष्टादिकांलाच हें मुखमासीत् पद कसें लागूं झालें कारण, वास्तविक त्या ' आसीत् ' क्रियेचा अर्थ असते झाले

असा असून, कोण झाले व कोणत्या मुखापासून, झाले, येतद्विषयीं त्या वाक्यांवरून कांहींच अर्थ निघत नसून मनु मयादिक सर्व पदें केवळ ओढाताणीचींच असून निर्मूल समजलीं जातात " असें कांहीं लोकांकडून बोलण्याचा भावार्थ दिसतो, आणि कांहीं अर्थी हा वास्तविक आहे, असें म्हणण्यास कारणांतरहि सांपडतें; परंतु सांपडत नाहीं, कारण ' मुखमासीत् ' या पदाधिकारी तेच हे ब्रम्हपांचालअसून यास प्रमाण स्कंदपुराणांतर्गत नागरखंड.

" तृतीयंजन्मभेदंच सकलैःकारणैःशृणु ॥
पंचवक्त्रात्समुत्पन्ना पंचभिःकर्मभिर्द्विजाः ॥
मनुर्मयस्तथात्वष्टा शिल्पिकश्चतथैवच ॥
दैवज्ञःपंचमइति ब्राह्मणाःपंचकीर्तिताः" ॥

अ० यांत शंकर पार्वतीप्रत म्हणतात् कीं, हे पार्वती सर्वांच्या हिता करितां जे पांच ब्राम्हण मनु, मय, त्वष्टा, शिल्पी, आणि दैवज्ञ, मिळून ब्रम्हयज्ञादिक पंच महा यज्ञ करण्यांत निष्णात

असे जे माझ्या मुखापासून झाले; त्यांचा हा तिसरा अवतार आहे तो कारण पूर्वक श्रवण कर.

" मनुःपूर्वमुखोद्भूतोमयोयाम्यमुखोद्भवः ॥
पश्चिमास्येभवत्त्वष्टा दैवज्ञःश्चोत्तराःस्मृतः ॥
ऊर्ध्वायांशिल्पिसंभूतः पंचगर्भमुनीश्वराः ॥
नागरखंड रथकारकल्पदृम पत्र ४६.

अ० तो असा कीं, ओंकारापासून विश्वकर्मा झाला ह्मणून ज्या जी कथा तुजकारणें सांगितली, त्या विश्वकर्म्याच्या पांच मुखांपासून हे पांच ब्राम्हण उत्पन्न झाले आहेत ते असे कीं,

" मनु हा पूर्व मुखापासून उत्पन्न झाला, मय, दक्षिण मुखापासून, त्वष्टा, पश्चिम मुखापासून दैवज्ञ, उत्तर मुखापासून, आणि शिल्पी हा ऊर्ध्व मुखापासून या क्रमानें मुनी म्हणजे मनन करणारे असे पांच ब्राम्हण उत्पन्न झाले. याप्रमाणें नागर खंडाचें वचन रथकारकल्पदृम ग्रंथांत आहे, यावरून पुर्वीं जे

वेदशास्त्रादिकांतील आधार दाखविले ते सर्व या पांचाल ब्राह्मणांस लागू होतात किंवा नाहीं ते पहा.

आतां कांहीं लोक यांहीं आधारांवरून संदिग्ध होत्साते अनिर्वाच्य अशा भलभलत्याच शंका उत्पादन करितात कीं, "पूर्वोक्त नागरखंडस्थ वचनांत शंकराच्या मुखापासून मनु, मय, त्वष्ट, शिल्पी, दैवज्ञादिकांची उत्पत्ति सांगितली असून त्या पुढील वाक्यांत, ओंकार विश्वकर्म्यापासून झाले असें म्हटलें आहे. तर यावरून असे प्रश्न उत्पन्न होतात कीं, शंकराच्या मुखापासून झाले असे पांचाल ते कोण ? आणि ओंकार विश्वकर्म्या पासून झाले ते कोण? व सांप्रत पांचाल म्हणविणारे सोनारादिक हे कोण ? कारण ज्या ग्रंथांत एकवार ज्यांची उत्पत्ति सांगितली ती त्याच अध्यायांत फिरत असती असें नाहीं; तर जी एकवेळ कथन केली तीच बहुधा खरी असून सर्व मान्य असती. तर या प्रदर्शित आधारांत "मनःपूतंसमाचरेत्" या न्यायानुसार अस्ताव्यस्त उत्पत्ति सांगितली आहे. तर अशा सांगणीनें त्या वाक्यांवर पूर्वापर विरोध येतो किंवा नाहीं ? जर विरोध येतो तर या उक्त ग्रंथाची योजना कोणाकडून झाली असावी ? कारण

नागर खंड हें स्कंद पूराणांतर्गत असून स्कंद पूराण हें व्यास कृत अष्टादश महापूराणांपैकीं आहे. तर व्यासांकडून हा पूर्वापर विरोध येईल असें वाटत नाहीं. कारण तो कांहीं अम्मल शेवन करणारा पैकी न होता, असें त्याच्या अष्टादश पुराणांवरून च सिद्ध होतें.

वास्तविक त्याविश्वकर्म पदावरून विचार करितां सांप्रत ब्रह्मपांचाल म्हणविणारे सोनार, [1]कांसारादिक हे देवांचा सुतार असा जो प्रभास पूत्र विश्वकर्मा त्यापासून उत्पन्न झाले असावेत्, असें म्हणण्यास अग्नि पुराण व विष्णु पुराण यांवरून सबळ एक कारण सांपडतें तें असें कीं,

" प्रत्युषादेवलीजज्ञे विश्वकर्माप्रभासतः ॥

---

१ ब्रह्मां,ऽभोरुह, विष्णु, वायु, भगवत्संज्ञं; ततो नारदं, मार्कंडेय, मथाग्निदैवतमिति, प्रोक्तंभविष्योत्तरं, । तस्मात् ब्रह्मविवृत्त संज्ञमुदितं, स्कांदं, वराहं, तथा लैगं, वामन, मत्स्य, कूर्म, गरुड, ब्रह्मांड मष्टादश " ॥

कर्ताशिल्पसहस्त्राणां त्रिदशानांचवर्द्धकी ॥
मनुष्याश्चोपजीवंती शिल्पंवैभूषणादिकमिति
अग्निपुराण सृष्टिवर्णन अ० १८ श्लो० ४० ॥

प्रभासस्यतुयाभार्या वसुनामाष्टमस्यच ॥
विश्वकर्मामहाभाग स्तस्यांजज्ञेप्रजापतिः ॥
कर्ताशिल्पसहस्त्राणां त्रिदशानांचवर्द्धकीति
विष्णुपुराण० अं० १ अ० १५ श्लो० ११५ ॥

अ० प्रत्युषाचा पुत्र देवल, आणि वसुनामक जी आठवा वसु प्रभास याची भार्या, ईचे ठायीं विश्वकर्मा जन्मला; हा प्रजापति असून नानाप्रकारच्या हजारो शिल्प विद्या यांचा उत्पादक व देवांचा कारागीर (सुतार) आहे. आणि याच्या शिल्प विद्यानुसार भूषणादिक (स्वर्ण, रौप्य, ताम्र, कांसेत्यादिक धातूंचे अलंकार) करून मनुष्य आपली उपजीविका करितात. असें विष्णुपुराणांत व अग्नि पुराणांत सांगितलें आहे." तेव्हां अर्थात विश्वकर्मा हा

देवांचा सुतार असल्याकारणानें त्यापासून जी संतती झाली; ती सुतार सोनार लोहार, कांसार फातरवटेत्यादिक नामातें पावली; अर्थात् त्यपैकींच हे सोनार, सुतार, कांसारेत्यादिक लोक आहेत असें यांच्या उद्योगांवरूनच म्हणतां येतें. आतां सुतार, सोनार, कांसार लोहारेत्यादिक नामावरून लोक यांस हलकट मानीत असल्याकारणानें तदाच्छादनार्थ हे सोनारेत्यादिक आपण मुख मासित् आहों, षटकेंत ब्रम्हपांचाल आहों, षटकेंत ओंकार विश्वकर्म्यापासून आमची उत्पत्ति आहे, इत्यादिक "मनः पूतंसमाचरेत्" या न्यायानुसार जसी सवड सांपडेल, त्या रीतीनें बोलून श्रेष्ठ व ब्राम्हण होण्यास पाहतात. परंतु उक्त विष्णवाग्न्यादिक पुराण वचनांवरून ब्राम्हणत्वाचा लेशहि यांचे ठिकाणीं लागूं होत नाहीं, असें असतां मुखमासीत् हे कोठून होतील? असें म्हणतात. परंतु यांहीं शंकेवरून शंकितांचें स्वरूप दिसण्यांत येतें कारण,

"तुल्यवर्णच्छदःकृष्णः कोकिलैःसहसंगतः ॥
केनविज्ञायतेकाकः स्वयंयदिनभाषते ॥

वागोक्तिः

अ० कावळा हा वर्णेकरून व अंगोपांगेंकरून कोकील पक्षोपमानअसून आपल्या मृदूभाषणाचा उपयोग न करितां कोकील पक्षांसह वसूं लागला; तर तो काक आहे, असें कोण ह्मणेल ? परंतु ज्या वेळेस तो आल्या गांभीर्य शब्दानें कॉं कॉं कें कें इत्यादिक ध्वनीं करीतो; तेव्हां मात्र लोकांस ज्ञान होतें कीं, हा वायस आहे. त्याप्रमाणें या वरील शंका घेणाराचें स्वरूप दिसतें. कारण, हज्जारों प्रमाणें या शंकितां समोर ठेविलीं, तथापि त्यांचा विचारहि न करितां ज्याप्रमाणें तापलेल्या लोखंडावर पाण्याचा बिंदु पडतांच नाहींसा होतो कीं, त्याप्रमाणें हे लोक शशविषाणोपमानन्यायवरून सोनारादिक वृत्तिवाचकनामानें नागर खंडस्थवचनांवर दोष देऊन विष्ण्वादिक पुराणांवरून ब्रह्मपांचालादिकांस नीच मानण्यास पाहतात, परंतु त्यांच विष्ण्वादिक पौराणाधारांवरून ब्रह्मपांचालादिक हे ब्राह्मण नव्हें अगर ते शूद्र आहेत, असें ह्मणतां येत नाहीं. कारण असें आहे कीं प्रभासापासून जरी विश्वकर्मा झाला असें ह्मटलें, तरी प्रभास हा कोण होता ? व प्रजापति या शब्दाचा अर्थ काय? याचा कांहीं तरी विचार झाला पाहिजे. कारण, वास्तविक ह्मटलें असतां प्रभास हा आठवा वसु असून या वसूंची मत्स्यपुराणांत अशी कथा आढळते कीं,

"ततस्तेषु विनष्टेषु षष्टिंकन्याःप्रजापतिः ॥
वैरिण्यांजनयामास दक्षःप्राचेतसस्तथा ॥
प्रादात्सदशधर्माय कश्यपायत्रयोदश ॥
सप्तविंशतिसोमाय चतस्रोरिष्टनेमये ॥
द्वेचैवभृगुपुत्राय द्वेकृशाश्वायधीमते ॥
द्वेचैवांगिरसेतद्वत्तासांनामानिविस्तरात् ॥

अ० पांचजनीपासून उत्पन्न झालेले पुत्र नष्ट झाले असतां दक्षप्रजापतीनें वैरिणीच्या उदरीं साठ कन्या उत्पन्न केल्या. त्या ह्या कीं, दक्षानें १० कन्या धर्माला, १३ कश्यपाला, २७ चंद्राला ४ अरिष्टनेमीला २ भृगुपुत्राला, २ बुद्धिमान् जो कृशाश्व त्याला, आणि २ अंगिराऋषीला दिल्या त्यांचीं नामें विस्तारें करून सांगतों.

"शृणुध्वंदेवमातॄणां प्रजाविस्तरमादितः ॥
मरुत्वतीवसूर्यामीलंबाभानुररुंधती ॥
संकल्पाचमुहूर्ताच साध्याविश्वाचभामिनी ॥

धर्मपत्न्यःसमाख्याता स्तासांपुत्रान्निबोधत ॥

अ० हे ऋषीनो देव मातांच्या प्रजांचा विस्तार ऐका.—मरुत्वती, वसू, यामी, लंबा, भानुः, अरुंधती, संकल्पा, मुहूर्ता, साध्या, कोपिष्ठ विश्वा, या प्रमाणें धर्म पत्न्या सांगितल्या. आतां त्यांचे पुत्र सांगतों,

" विश्वेदेवांस्तुविश्वायाः साध्यासाध्यानजीजनत् ॥
मरुत्वत्यांमरुत्वंतो वसोस्तुवसवस्तथा ॥
भानोस्तुभानवस्तद्वन्मुहूर्तायांमुहूर्तकाः ॥
लंबायांघोषनामानो नागवीथीतुयामिजा ॥
पृथिवीतलसंभूत मरुंधत्यामजायत ॥
संकल्पायास्तुसंकल्पो वसुसृष्टिंनिबोधत ॥

अ० ते असे कीं विश्वेपासून विश्वेदेव, झाले. साध्येपासून साध्य, मरुत्वतीपासून मरुत्वंत, वसूपासून, अष्टवसू, भानूनामकस्त्री पासून भानू, मुहूर्तेपासून मुहूर्त, लंबेचेठायीं घोष नामक झाले.

यामीस नागविथी नामक कन्या झाली. पृथ्वी वरील सर्व अरुंधतीपासून झाले. संकल्पेपासून संकल्प झाला. आतां वसूंची सृष्टी ऐका.

" ज्योतिष्मःतस्तुयेदेवा व्यापकाःसर्वतोदिशं ॥
वसवस्तेसमाख्यातास्तेषांसर्गंनिबोधत ॥
आपोध्रुवश्चसोमश्च धरश्चैवानिलोनलः ॥
प्रत्युषश्चप्रभासश्च वसवोष्ठौप्रकीर्तिताः ॥

अ० सर्व दिशांस व्यापणारे तेजस्वी देव ते वसू, त्यांची संतती ऐका. ती अशी कीं, आप, ध्रुव, सोम, धर, अनिल, अनल, पत्युषस, आणि प्रभास याप्रमाणें आठ वसू सांगितले आहेत. आतां यांची संतती सांगतों,

अपत्यंकृत्तिकानांतु कार्तिकेयस्ततःस्मृतः ॥
प्रत्यूपसऋषिःपुत्रो विभुर्नाम्नाथदेवलः ॥
विश्वकर्माप्रभासस्य पुत्रशिल्पीप्रजापतिः ॥
मत्स्यपुराण अ० ५ श्लो० १२ पासून २७ पर्यंत.

अ० तो अग्नि पुत्र कुमार कृत्तिकांचा मुलगा म्हणून

त्यास कार्तिक स्वामी ह्मणतात. तसाच प्रत्युषाचा पुत्र, ऋषी, विभू या नामानें प्रसिद्ध होता. प्रभासास देवल आणि विश्वकर्मा हे पुत्र झाले; त्यांत विश्वकर्मा हा प्रजापति असून नानाप्रकारच्या शिल्पादिक विद्या उत्पन्न करणारा होय. असें मत्स्यपुराणांत सांगितलें आहे.

याच प्रमाणें प्रत्येक पुराणांत या अष्ट वसूंची उत्पत्ति असून विस्तार भयास्तव घेतली नाहीं. " अस्तु, आतां या प्रदर्शित वचनांवरून प्रभासादिक अष्ट वसू हे शूद्रांत योजिले जातात किंवा देवांत. ?

शूद्रांत गणले जातात, असें जर कोणाचें मत असेल, तर " श्रेष्ठोदेवानांवसुः " या श्रुतीचा अर्थ काय ?

जर देवांत गणले जातात असें जर कोणाचें मत असेल, तर त्या देवांपासून तत्‌ स्त्रीयांचें ठायीं झालेली संतती, शूद्रांत धरावी किंवा देवांत ? जर देवांत धरावी, तर विश्वकर्मा हा कोण व त्या विश्वकर्मा पासून झालेल्या संततीस काय ह्मणावें ? कारागीर शब्दानें नीच किंवा श्रेष्ठ असे अर्थ होतात काय ?

जर विश्वकर्मा शूद्र किंवा नीच म्हणावें तर त्याच्या

कन्येसीं विवाहकरणान्यास कालत्रयीं अर्घ्यादिक देऊन तदुपासना करणें हें सांप्रत ब्राम्हण म्हणविणारांस योग्य किंवा अयोग्य ? कारण मत्स्य पुराणांत असें सांगितलें आहे कीं,

सूतउवाच ।

विवस्वान्कश्यपात्पुर्व मदित्यामभवत्सुतः ॥
तस्यपत्नीत्रयंतद्व त्संज्ञाराज्ञीप्रभातथा ॥
रैवतस्यसुताराज्ञी रेवतंसुषुवेसुतं ॥
प्रभाप्रभातंसुषुवे त्वाष्ट्रीसंज्ञातथामनुं ॥
यमश्चयमुनाचैव यमलौतुबभूवतुः ॥
ततस्तेजामयंरूप मसहंतीविवस्वतः ॥
नारीमुत्पादयामास स्वशरीरादनिंदिताम् ॥
त्वाष्ट्रीस्वरूपरूपेण नाम्नाछायेतिभामिनी ॥
मत्स्यपुराण अ० ११ श्लो० २ पासून ५ पर्यंत.

अ० सूत ऋषींस बोलले कीं, पूर्वी कश्यपापासून

अदितीला सूर्य पुत्र झाला. त्या सूर्यास तीन स्त्रिया होत्या, त्यांचीं नामें. १ संज्ञा, २ री राज्ञी, ३ प्रभा. ह्यांत राज्ञीही रैवत राजाची कन्या. हिला 'रेवत,' या नांवाचा पुत्र झाला. प्रभा स्त्रीला प्रभात पुत्र होता. त्वष्टयाची म्हणजे विश्वकर्म्याची, कन्या संज्ञा तिला पुत्र झाला, तो मनु, होता. आणि यमुना व यमधर्म हे दोन जुळे कन्यापुत्र संज्ञेचेच आहेत. संज्ञेला सूर्याचें अती तेजस्वी रूप सहन होईना तेव्हां, तीनें आपल्या देहापासून आपणा सारखी पवित्र व उत्कृष्ट, सुंदर अशी एक छाया नांवाची स्त्री उत्पन्न केली. याप्रमाणें मत्स्य पुराणाचें अनुमत दिसतें. यावरून जर विश्व-कर्मा शूद्र किंवा नीच असता; तर सूर्यानें नीच्याची, कन्या वरिली असती काय? कधींच वरिली नसती. कारण तो ब्राह्मण होता आणि हें कृत्य कश्यपादिक ऋषींलाहि सहन झालें नसतें. कारण ब्राह्मणांस सवर्णांतीलच कन्या वरण्यास उक्त सांगितली आहे. शिवाय शूद्र कन्या वरण्यास बिलखुल आधार नाहीं. इतकेंच नव्हे; तर शूद्रकन्या वरणारास महद्दोषहि कथन केला आहे, कीं,

हीनजातिस्त्रियंमोहादुद्वहंतोद्विजातयः ॥

कुलान्येवनयंत्याशू ससंतानानिशूद्रतां ॥
शूद्रावेदीपतत्यत्रे रुतथ्यतनयस्यच ॥
शौनकस्यसुतोत्पत्या तदपत्यतयाभृगोः ॥
शूद्रांशयनमारोप्य ब्रह्मणोयात्यधोगतिं ॥
जनयित्वासुतंतस्यां ब्राह्मण्यादेवहीयते" ॥

इति मनुस्मृ० अ० ३ श्लो० १५, १६, १७.

अ० हीन जातिस्थ कन्येसीं मोहेंकरून ब्राह्मण, अथवा क्षत्रिय किंवा वैश्यादिक जो लग्न लावून संतती उत्पन्न करील तो आपल्या कुलांसह व त्या उत्पादित पुत्रांसह शूद्रत्वातें पावेल. व पतित होईल असें आत्रीचें मत आहे. व उत्पादित पुत्रहि शूद्रांत गणळे जातील हें गौतमाचें मत आहे. हा शास्त्रार्थ ब्राह्मणाविषयीं असून पुत्र उत्पादन केला असतां पुत्रासह पतित होतो हें शौनकांचें मत आहे. हें क्षत्रियपवर समजावें. भृगुचें मत शौनका प्रमाणेच आहे. याप्रमाणें या महर्षित्रयाचें मत असून मेधातिथी व गोविंदराजयांचेंहि मत शूद्र कन्येसीं विवाह न करण्याविषयीं

च आहे. याप्रमाणें मनुस्मृतींत सांगितलें आहे. यावरून विश्व कर्मा जर शूद्र असतां तर त्याच्या कन्येसीं सूर्यानें विवाह केलाच नसता. ज्या अर्थी सूर्यानें विश्वकर्म्याची कन्यावरिली त्या अर्थी विश्वकर्मा हा ब्राह्मण अथवा देव होता हें "श्रेष्ठोदेवानांवसूः" या श्रुतिवरूनच सिद्ध होतें. आणि हे श्रेष्ठच असल्या कारणानें श्राद्धांत,

"अष्टौवसवएकादशरुद्रद्वादशादित्या–"

इत्यादिक फक्किकेची योजना करितात. व अकरावे दिवसीं वसुगण श्राद्धेंहि घालितात. जर ते अष्टवस्वादिक शूद्रांत किंवा हीनापैकीं असते, तर सांप्रतच्या दुराभिमान्यानीं वरील फक्किकेची गाळागाळ केल्यावांचून प्रयोगांत उपयोग केला असता काय ? कधींच केला नसता. आतां बाप श्रेष्ठ कुलांतील व योग्य पदाचा असून त्या पासून स्वस्त्रीचे ठिकाणीं झालेला मुलगा नीच व अयोग्य प्रतीचा असें कधींच होणें नाहीं. तस्मात् जरी प्रभास पुत्र विश्वकर्म्यापासून पांचालांची उत्पत्ति आहे असें शंकितानीं म्हटलें; तरी त्या पासून पांचालांवर शूद्रत्व प्रतिपादन न होतां

उलट श्रेष्ठ असें सिद्ध होऊन इष्टापत्तीच प्रतिपादन केल्या सारखी होती, असो.

आतां पुर्वोक्तनागरगंडस्थ वचनांवर पूर्वापर जो विरोध दाखविला; तो हि सिद्ध करितां येत नाहीं. कारण, शंकर, रुद्र, विराट्, नारायण, विश्वकर्मा, प्रजापति, ओंकार, केशव, वासुदेवादिक सर्व विशेषणें एका परमेश्वरांचींच असल्याकारणानें शंकराच्या मुखापासून झाले ते भिन्न आणि ओंकार विश्वकर्म्यापासून झाले ते भिन्न असें म्हणण्याची मुळींच जरूरी दिसत् नाहीं. कारण ओंकार हाच मुळीं सर्व गुणांनीं युक्त असून ओम् हें परमेश्वराचें शुद्ध एक उत्तम नाम आहे. कारण ओम् यांत अ, उ, आणि म्, हे तीन वर्ण असून हे सर्व एकत्र केले असतां शुद्ध 'ओम्' असें एक अक्षर होतें. आणि या येका अक्षरा पासून परमेश्वरांचीं अनेक नामाभिधानें येतात. कारण, अकारापासून "विराट्, अग्नी, विश्व, इत्यादिक नामें ग्रहण केलीं जातात. तसेच उकारापासून "हिरण्यगर्भ, वायू आणि तेज" हीं तीन घेतलीं आहेत. आणि मकारापासून "ईश्वर, आदित्य, व प्राज्ञादिक" हे तीन शब्द घेतले असून वेदांत, शतपथादिक ब्राम्हणांत व निरुक्तादिक ग्रंथांत स्पष्ट

याची व्याख्या केली आहे. त्यावरून हीं अग्न्यादिक सर्व नामें मुख्यत्वेंकरून परमेश्वराचेच ठिकाणीं वाचक होतात; आणि खरोखर व्याकरण शास्त्रानुसार पाहिलें असतां, "राजृदीप्तौ" याधातु पासून "विराट्" शब्द सिद्ध होतो; आणि वास्तविक त्या "विराट्" शब्दाचा अर्थ म्हटला असतां "विविधंनामचराचरंजगत् राजयते नाम प्रकाशयते सविराट्" असा होतो— म्हणजे, अनेक प्रकारचें चराचर जग प्रकाश ( उत्पन्न ) करितो सबब परमेश्वराचें नाम विराट्. त्याचप्रमाणें "अंचुगतिपूजनयोः" या धातुपासून परमेश्वराचें अग्नी असें नाम सिद्ध होतें. म्हणजे "गतस्त्रयोऽर्थाः ज्ञानंगमनंप्राप्तिश्चेति, पूजनन्नामसत्कारः अंचति अच्यते, गम्यते, प्राप्यते सत्क्रीयते, वेदादिभिः शास्त्रैर्विद्वाद्भिश्चेत्यग्निः" स्वतां ज्ञानस्वरूप असून सर्वज्ञ, असें जाणण्यास व प्राप्तिकरून घेण्यास योग्य आहे असा जो त्याचें नांव अग्नी. याही पदावरून परमेश्वरच ग्रहण केला जातो. त्याचप्रमाणें "विशप्रवेशने" याधातुपासून परमेश्वराचे ठायीं "विश्व" असा शब्द सिद्ध होतो. म्हणजे "विशति सर्वाणिभूतानि आकाशादीनियस्मिन्सविश्वः" यद्वा विष्टोस्तिप्रकृत्यादिषुयः सविश्वः"

वासकरित आहेत् आकाशादिक सर्व भूतें ज्या मध्यें, त्यांचें नांव विश्व, अथवा प्रकृत्यादिकांचें ठायीं सदैव वास करित आहे जो त्याचें नांव विश्व. म्हणून व्यासानें विष्णु सहस्त्र नामाच्या प्रथमारंभींच "विश्व" या शब्दाची योजना केली. याच्याहि अर्थ "विशति सर्वस्मिन् इति विश्वं" अथवा, "विशंति नाम प्रविशंति भूतानि यस्मिन् इति विश्वं"– किंवा, "विशंतिज्ञानानंदादयो यस्मिन् इतिविश्वं"– यद्वा "विशतिस्वकारणं इति विश्वं" या प्रमाणें होतो. ह्मणजे– जगताला उत्पन्न करून त्या जगांत जें प्रवेश करितें असें जें परब्रह्म, तें अथवा जगाचें आदिकारण तें. किंवा, संहारकालीं संपूर्ण जीव ज्याच्यामध्यें प्रवेश करिताहेत तें; अथवा ज्ञान, आनंद, इत्यादिक ज्याचे ठायीं प्रवेश करितात तें. यद्वा, स्वकारणाप्रत जें प्रवेश करितें ह्मणजे कार्य कारणाचा अभेद आहे या करितां विश्व शब्दानें कारणहि घेतलें जातें, ह्मणून जें जगत्स्वरूपी तें." इत्यादिक सर्व नामें 'अकारापासून घेतलीं जातात. आणि हाच विश्व शब्द कृत्स्नवाची, अथवा नामवाची मानिला असतां "विश्वस्मै" "विश्वाय" इत्यादिक चतुर्थ्यंत रूपेंहि

होतात ह्मणून परमेश्वराला " विश्वायनम : यानामानें तुलसी पत्र वाहत असतात.

आतां उकारापासून हिरण्य गर्भ, वायु इत्यादिकनामें परमेश्वरालाच वाचक होतात ह्मणून जें सांगितलें. त्याचाहि अर्थ असा आहे कीं, " हिरण्यं तेजसोनामास्ति हिरण्यानि सूर्य्यादीनि तेजांसि गर्भे यस्य सहिरण्यगर्भः " अथवा " हिरण्यानां सूर्य्यादीनां तेजसां गर्भः हिरण्यगर्भः" किंवा—" हिरण्यानांसुर्य्यादीनांतेजसांगर्भो योधिष्टानंसहिरण्यगर्भ : " ज्यापासून सूर्यादिकांसारखे तेजःपुंज असे पदार्थ उत्पन्न होऊन ज्याचे आधारावर राहत आहेत त्याचें नांव हिरण्य गर्भ. अथवा सूर्यादिक तेजांस जो गर्भ ( ह्म० ) वास करण्याचें स्थान, ह्म० जागा त्याचें नांव हिरण्यगर्भ असें असून याविषयीं यजुर्वेदाचें प्रमाणहि आहे.

" हिरण्यगर्भःसमवर्त्तताग्रेभूतस्यजातः

पतिरेकआसीत् ॥ सदाधारपृथिवीं

द्यामुतेमांकस्मै देवायहविषाविधेम" ॥

यावरून हिरण्यगर्भ हें परमेश्वराचेंच नाम आहे असें सिद्ध होतें.

त्याचप्रमाणें " वागातिगंधनयोः " या धातुपासून वायु शब्द परमेश्वराचेठिकाणीं सिद्ध होतो म्हणजे " गंधनं हिंसनं, वातिसोऽयंवायुः चराचरंजगद्धारयतिवासवायुः" जो ह्या चराचर जगताचा प्रलय करितो, अथवा धारण करितो किंवा सर्व बलवान् पदार्थांपेक्षां बलाढ्य असा जो त्याचें नांव वायू. सर्व बळकटींत बळकट एक परमेश्वरावांचून दुसरा कोणींच नाहीं सबब इश्वराचें नांव वायु. त्याचप्रमाणें " तिजनिषाने " या धातुपासून तैजस हा शब्द साधला जावून तो ही परमेश्वरालाच वाचक होतो. कारण जो स्वतां प्रकाशितअसून सूर्यादिक तेजांस हि प्रकाश करितो तो . म्हणजे सूर्यादिक तेजोमय पदार्थ प्रकाशविण्याविषयीं एक परमेश्वरांवांचून समर्थ असा दुसरा कोणींच नाहीं सबब तेज हें परमेश्वराचें नाम असून, हे सर्व अर्थ उकारापासून घेतले आहेत असे जाणावे. "ईशऐश्वर्ये" या धातुनें ईश्वर शब्द साधला जातो, याचा अर्थअसा आहे कीं " इष्टेअसौईश्वरः सर्वैश्वर्यवान् योभवेत् सईश्वरः" अथवा, " ईष्टेसावीशःसर्वशक्तिमान्याकारीश्वरः" सत्यसदन, विचारशील नाम आहे ज्याचें ज्ञान हें आहे अनंत ऐश्वर्य जें तें ज्याचें त्याचें नाम ईश्वर. म्हणजे निःपक्षपातानें न्याय करणाराअसून ईश (म्ह०) स्वामित्व आहे ज्याकडे, असा व भक्तांकारणें वर देण्यास समर्थ नाहीं

त्यावांचून दुसरा, असा जो पर म्हणजे आपणाहून वेगळा तो ईश्वर. त्याचप्रमाणें " दोवऽखंडने " या धातुपासून दिति शब्द सिद्ध होतो " अवखंडनन्नामविनाशः " "यास " क्तिन् " प्रत्यय केल्यानें " दिति " असा शब्द सिद्ध होतो. दिति हें कोणाचें नाम आहे कीं, ज्याचा विनाश होतो. यानें " जवनञ् " असा समास होऊन " अदिति " असा शब्द झाला. " अदिति " म्हणजे जो कधींच नाश पावत नाहीं तो; त्यालाच आदित्य असें म्हणतात. कधींच नाश न पावणारा जगांत एक ईश्वरावांचून दुसरा कोणीच नसल्याकारणानें ईश्वराचें नांव आदित्य असें पडलें. तद्वत् ' ज्ञा ' अवबोधने " या धातुपासून ईश्वराचें प्राज्ञ हें नाम सिद्ध होतें म्हणजे " प्रकृष्टश्चासौज्ञश्चप्रज्ञः प्रज्ञएवप्राज्ञः " असें अथवा " "प्रजानातिवाचराचरंजगत्सप्रज्ञः प्रज्ञएवप्राज्ञः " " म्हणजे जो स्वतां ज्ञानीअसून सर्व ज्ञान्यांत अत्युत्तम ज्ञानशील असा जो त्याचें नांव प्राज्ञ. अथवा पदार्थ मात्रांस जो यथार्थ रीतीनें जाणतो तो. म्हणजे सर्व प्राणीमात्रांस यथार्थरीत्या जाणणें हें परमेश्वरा-वांचून अन्याचेंकृत्य नसल्यामुळें परमेश्वराचें नांव ' प्राज्ञ ' हें सिद्ध. कारण जसें परमेश्वराचें ओंकार हें उत्तम नामा-

भिधान आहे, तसें नांव अन्याचें नसून या ओंकाराचे अनेक अर्थ आहेत; परंतु विस्तार भयास्तव, ओंकाराचा आति संक्षेप अर्थ लिहिला. आतां या ओंकारांत मित्रादिक अनेक नामें आहेत्. तींहि परमेश्वरालाच लागूं असल्या कारणानें शंकराच्या मुखापासून अथवा विश्वकर्म्याच्या मुखापासून पांचालादिक उत्पन्न झाले असें ह्मटलें ह्मणून उक्त नागरखंडस्थ वचनांवर पूर्वापार विरोध येत नाहीं. कारण

"मुख्यतःसर्वशब्दैश्च वाच्यएकोजनार्दनः[१]"

अणुभाष्य.

मुख्यत्वेंकरून सर्व शब्दालावाच्य असा जनार्दनस्वरूप परमेश्वर एकच आहे. हें

---

१ दुष्टजनात्अर्दयतीतिवा जनानांजन्ममरणानिअर्दयती नाशयतीतिजनार्दनःसचेश्वरएवमान्यः ॥

नामानिविश्वाभिनसंतिलोके यदाविरासीदनृ-
तस्यसर्वं ॥ नामानिसर्वाणियमाविशंति
तंवैविष्णुंपरमउदाहरंतीतिभाल्लवेयश्रुतिः" ॥

योदेवानांनामधाएकएवतंसंप्रश्नंभुवनायंन्य-
इतिश्रुतेः" ॥

इत्यादिक श्रुतींवरूनच सिद्ध होतें. तस्मात् जरी शंकर

---

१ "विषलृव्याप्तौ" या धातुपासून विष्णु शब्द सिद्ध होतो ह्मणजे– "विवेष्टिनामव्याप्नोतिचराचरंजगत्सविष्णुः उरुनाममहान् क्रमःपराक्रमोयस्यसउरुक्रमः" जगतांमध्यें व्यापक असून उरुक्रम ह्मणजे अनंत आहेत् पराक्रम जे ते ज्याला त्याचे नांव उरुक्रम तोच विष्णु, परमेश्वरच मानला आहे.

विश्वकर्मा, प्रजापति[1], नारायण[2], वसू[3], गणेश[4], देव[5], वरुण[6], ब्रह्मा[7],

---

१ प्रजानां नामलोकानांपति:प्रजापति:सर्वजगत:स्वामिरक्षकई-श्वरः" प्रजापति याचा अर्थ लोकांचा पति म्हणजे स्वामी लोक शब्देंकरून स्वर्गादिक यांचा संरक्षण करणारा पति म्हणजे स्वामी असा एक इश्वरावांचून दुसरा कोणीच नाहीं. सबब परमेश्वरांचें नांव प्रजापति जाणावें.

२ आपोनाराइतिप्रोक्ताआपोवैनरसूनवः ॥ तायदस्यायनं पूर्वतेननारायण: स्मृतइतिमनुस्मृतिअ० १ श्लोक० १० म्हणजे 'आप' नांव उदकाचें असून 'नार' हें हि उदकाचें नांव आहे, आणि हा प्राणहि जलसंज्ञ आहे तस्मात् सर्व प्राण मात्र ज्याचें अयन म्हणजे निवास स्थान (राहण्याची जागा) असल्याकारणानें परमेश्वराला 'नाराणय' असें म्हणतात.

३ "वसनिवासे" या धातुपासून परमेश्वराचे ठिका-

आकाश, अन्न, निराकार शुद्ध, रुद्र इत्यादिक नामभेद आहेत;

---

णीं वसु शब्द सिद्ध होतो. कारण— "वसंतिसर्वाणिभूतानि यस्मिन्सवसुः अथवा "सर्वेषुभूतेषुयोवसतिसवसुः" सर्व आकाशादिक भूतें ज्यांत वास करित आहेत त्याचें नांव वसु अथवा— सर्व भूतांचेठिकाणीं सूक्ष्मरूपानें जो वास करितो. त्याचें नांव वसु असें जाणावें. कारण प्राणिमात्राचें ठायीं वास करण्याविषयीं परमेश्वरावांचून दुसरा कोणींच समर्थ नाहीं. यास प्रमाण गीता अ० ६ श्लो० ३१ "सर्वभूतस्थितंयोमां भजत्येकत्वमास्थितइति" ज्ञात्वा शिवं सर्वभूतेषु गूढं विश्वस्यैकं परिवेष्टितारमितिश्वेताश्वतरोपनिषदश्रुतिः"

४ "गणसंख्याने" या धातुपासून परमेश्वराचें ठिकाणीं गण हा शब्द सिद्ध होतो आणि या शब्दा पुढें 'ईश' असा शब्द लावल्यानें परमेश्वराचें नाम गणेश असें सिद्ध होतें कारण "गणानांसमूहानांजगतामीशस्सगणेशः" जो सर्व

तरी त्या नाम भेदानें उक्त नागर खंडस्थ वचनांवर पूर्वा-

---

गणांचा अर्थात् जगताचा ईश म्हणजे स्वामी असल्याकार-
णानें परमेश्वराचें नांव गणेश जाणावें.

५ " दिवुक्रीडाविजिगीषाव्यवहारद्युतिस्तुतिमोदमदस्वप्न क्रांतिगतिषु " या धातुवरून परमेश्वराचेठायीं देव असा शब्द सिद्ध होतो. कारण— " दीव्यतिसदेवः " असें आहे कीं, दीव्यति म्हणजे जो स्वतः प्रकाशवान्असून सर्व जगालाहि प्रकाशित करितो म्हणून त्याला देव असें म्हणतात.

६ अथवा, 'क्रीडतेसदेवः" आपल्या आनंदांत आपल्या आपणच जो क्रीडा करितो, किंवा " क्रीडामात्रेंकरून अन्य क्षुल्लक्‌देवतांचें सहाय्य घेतल्यावांचून, जग निर्माण करितो, अथवा सर्व जगताला क्रीडा करण्याविषयीं जो आधारभूत आहे त्याचें नांव देव.

७ अथवा " विजिगीषतेसदेवः" 'विजिगीषते—ह्मणजे सर्वत्र

पर विरोध येतो असें म्हणतां येत नाहीं. कारण, "प्रधानाप्रधानयोः–

---

जिंकणारा असून स्वतां अजिंक्य आहे ह्मणजे त्याला जिंकणारा दुसरा कोणच नाहीं त्याचें नांव देव.

८ किंवा "व्यवहारयतिसदेवः" व्यवहारयाति–ह्मणजे, न्याय आणि अन्याय यांचाज्ञापक नाम उपदेष्टा, व सर्व व्यवहार मात्रांला आधारभूतहि आहे, त्याचें नांव देव. अथवा 'द्योतयतिसदेवः' ह्मणजे सर्वप्रकाश मात्रांला आधारभूताधि करण तो देव. किंवा "स्तूयतेसदेवः" ह्मणजे–सर्व लोकमात्रांस स्तुति करण्याविषयीं योग्य असून अनिंद्य असा जो, त्याचें नांव देव. यद्वा, "मोदयतिसदेवः" म्हणजे–आपण स्वतां आनंदस्वरूप असून सत्ता मात्रें करून जग आनंदवितो व ज्याला दुःखाचा किंचित्‌हि लेश नाहीं, त्याचें नांव देव आहे. किंवा, "माद्यतिसदेवः" माद्यति नाम स्वतां हर्षयुक्त असून, शोक याचा लेश कधींच ज्याला नाहीं त्याचें नांव देव अथवा, जो स्वतां हर्ष स्वरूप असून इतर प्राणिमात्रांलाहि हर्ष युक्त करितो त्यांचें नांव देव आहे. अथवा "स्वापयतिसदेवः" म्हणजे.

प्रलय काळीं अव्यक्तरूपानें सर्वत्रांस जो निजवितो त्याचें नांव देव आहे, किंवा "कामयते काम्यते वासदेव: " म्हणजे ज्याचें सर्व काम विघ्नांवांचून सिद्ध होतें अथवा ज्याचे प्राप्तिस्तव सर्व सिष्टादिक, कामना बाळगितात त्याचें नाम देव. अथवा. " गच्छाति गम्यतेवासदेव :" म्हणजे जो सर्वांमध्यें गत नाम प्राप्त होय आणि जाणण्याला योग्य होय त्याचें नाम देव. म्हणजे उक्त सर्व गुणांनीं परिपूर्ण असून कर्ताकरविता धाता, त्रातादिक सर्व विशेषणें त्याचींच असल्याकारणानें परमेश्वराला देव असें म्हणतात. ६ त्याच प्रमाणें वरुण हें जगदादिकत्याचें उत्तम एक नाम असून "वृञ्वरणे वरईप्सायाम्" या दोनधातूनीं वरुण शब्द परमेश्वराचे ठिकाणीं सिद्ध होतो. म्हणजे " वृणोतिसर्वान्शिष्टान् मुमुक्षून्मुक्तान् धर्मात्मनोयस्सवरुण: " यद्वा, " व्रियतेशिष्टै: मुमुक्षुभि: मुक्तै: धर्मात्मभि: य: सवरुण: परमेश्वर: " अथवा, वरयतिशिष्टा-दीन्वर्यतेवाशिष्टादिभि: सवरुण: परमेश्वर:" असा. याचा

महाभाष्याचें वचन आहे. म्हणजे या वचनाचा अर्थ असा आहे कीं;

---

अर्थ— जो स्वीकार करीत आहे, त्याचें नांव वरुण. किंवा 'वरयति' म्हणजे जो सर्वत्र प्राप्त होऊन राहिला आहे त्याचें नांव वरुण. यद्वा— 'वर्यते' म्हणजे श्रेष्ठ लोक यांस प्राप्त होण्याविषयीं योग्य असा जो, त्याचें नांव वरुण आतां या वरुण शब्दावरुन असाहि अर्थ होतो कीं- "वरुणोनाम वरः वरोनाम श्रेष्ठः" म्हणजे सर्वत्रांत जो श्रेष्ठ त्याचें नांव वरुण. आतां सर्व देवांत श्रेष्ठ, इच्छिण्यास सयोग्य असा एक परमेश्वर खेरीज करुन दुसरा कोणीच समर्थ नसल्या कारणानें परमेश्वराचें नांव वरूण हें जाणावें.

७ "बृहबृहिवृद्धौ" या धातुपासून परमेश्वराचेठिकाणीं ब्रह्म शब्द सिद्ध होतो. कारण तो सर्वांवर विराजमान होणारा व सर्वांत श्रेष्ठ असा जो, त्याचें नांव ब्रह्म. अर्थात् शबल ब्रह्मादिक सर्व याचीच उपासना करीत असून श्रेष्ठांत श्रेष्ठ, व यासारखा दुसरा

---

नाहीं; सर्वत्र परमेश्वराला अद्वितीय ब्रह्म असें ह्मणतात. याविषयीं प्रमाण कैवल्योपनिषद. "सब्रम्हा, सविष्णुस्सरुद्रः सशिवः सोऽक्षरः सपरमस्वराट्सइंद्रः सकालाग्निःसचंद्रमाः" तथा "त्वमेवप्रत्यक्षंब्रह्माऽसी" ति.' त्याचप्रमाणें परमेश्वराला आकाशहि ह्मणतात. आणि व्याकरणतः अकाश शद्ब ह्मटला असतां "काशृदीप्तौ" या धातुपासून सिद्ध होतो. याचा अर्थ. "आसमंतात् सर्वतः सर्व जगत्प्रकाशतेसआकाशः' असा होतो. ह्मणजे, जो सर्व जगतादिक धर्म-व सर्व प्रकारें करुन सर्वांला दैदीप्यमान (प्रकाश) करितो ह्मणून परमेश्वराला आकाश असें म्हणतात. तद्वत् ' अदभक्षणे ' या धातुपासून परमेश्वराचे ठिकाणीं अन्न शद्ब सिद्ध होतो. म्हणजे "अत्तिभयक्षतीचराचरंजगत्तदन्तम् असा. याचा अर्थ– जो चराचर जगताला भक्षक आहे आणि काळालाहि खाऊन पचवितो, त्याचें नांव अन्न. यास प्रमाण "अद्यतेऽत्तिचभूतानि

याचेंच ग्रहण होतें. कारण जसे कोणीं, कोणाला विचारलें कीं,

---

तस्मादन्नंतदुच्यतेतितैत्तिरीयोपनिषद. प० ७१ ब्रह्मानंदवल्ली. अनुवाक २ तसेच " अहमन्न १ महमन्न १ महमन्नं १ अहमन्नादो२ ऽहमन्नादो २ ऽहमन्नादः इतितैत्तिरियोपनिषद ब्रह्मानंदवल्लीपत्र १३८ अनुवाक् १० अन्नमत्तीत्यान्नाद : येथें अन्न शब्दानें चेराचर जगताला जो ग्राहक, त्याचें नांव अन्नाद, असें असून हें हि नांव परमेश्वराचेंच आहे. कारण, तोच ह्मणतो कीं, मीं ' अन्न ' आहे, मींच अन्नाद आहे. याश्रुतींत तीन वेळ जो पाठ आहे तो केवळ आदरार्थ आहे; जसे " त्वं ग्रामं गच्छ गच्छ गच्छ " यानें काय समजलें जातें कीं, तूं ग्रामांत जा. कोठेंच राहूं नको. या प्रकारच्या व्यवहारांत पुष्कळ वेळ सांगणी० असून जसी ती अनर्थक नाहीं कीं, तसे यांतहि, अनर्थ नाहींत्. याविषयीं ब्रह्मसूत्र भाष्याच्या प्रथमाध्यायाच्या द्वितीय पादांत व्यासाचें सूत्रहि आहे कीं, " अत्ताचराचरग्रहणात् " अत्ता नाम खाणाराचेंअसून याचेंच

हा कोण जातो ? त्याणें त्याला सांगितलें कीं, राजा जातो. तर

नांव अन्नाद आहे. चराचर ह्मणजे जड आणि चेतन असें सर्व जग त्याचेंच असें ग्रहण केल्यानें परमेश्वराचें नांव 'अत्ता' व 'अन्नाद' आहे कारण– जसे उंबराचें फळांत क्रमी उत्पन्न होऊन त्यांतच राहतात, शेवट त्यांतच नाश पावतात कीं, त्याप्रमाणें हें सर्व जग ज्यापासून उत्पन्न होऊन प्राणिमात्रत्यांमध्यें वास करितात. शेवट त्यांतच नाश पावतात. आतां वसविणें व शेवट नाश करणें मिळून हीं दोनीं कर्में एकाचींच असल्याकारणानें, 'अत्ता, अन्न,' आणि 'अन्नाद' हीं परमेश्वराचींच नामें जाणावीं.

८ आतां परमेश्वराला निराकारहि ह्मणतात; आणि वास्तविक ह्मटलें असतां "डुकृञ्करणे" या धातुपासून परमेश्वराचे ठिकाणीं निराकार शब्द सिद्ध होतो. म्हणजे "निर्गत:आकारोयस्मात्सनिराकार:" असा. याचा अर्थ– ज्याला अमुकच तऱ्हेचा आकार आहे, असें सांगतां देखील येत नाहीं, त्याचें नांव निराकार; आणि या निराकाराविष-

यांत विचार केला पाहिजे कीं, राजा जर जात असला

---

यीं प्रमाण. नारायणअथर्वशीर्ष " नारायणएवेदंःसर्वंयद्भूतंयच्च भव्यंनिष्कलंकोनिरंजनोनिर्विकल्पोनिराकार: शुद्धोदेवएकोनारायणो नद्वितीयोस्तिकश्चिदितिश्रुते : " °तथाकटोपनिषदेपि. " अशब्द-मस्पर्शमरूपमव्ययं तथारसंनित्यमगंधमच्चयत् इति पत्र० ११९ मं० १५ त्याचप्रमाणें राम गीतेंतहि " त्वंशुद्धबोधोसिहिसर्वदेहि नामात्मास्यधीशोसिनिराकृतिःस्वयं" या वचनाचा परिस्फोट केला आहे. यांवरून परमेश्वराचें निराकार हें नांव सिद्ध होतें. आतां परमेश्वराला मुक्तहि म्हणतात, आणि खरोखर म्हटळे असतां " मुच्लृमोचने " या धातुपासून मुक्त शब्द सिद्ध होतो. म्हणजे, जो स्वतां मुक्त स्वरूप असून मुमुक्षू-जनांस मुक्ति देण्याविषयीं साक्षात् हेतुभूत असल्याकारणान परमेश्वराचें नाम मुक्त असें आहे. " सदकारणवन्नित्यं " आणि जो स्वतां सत् स्वरूप असून ज्याला कारणभूत दुसरा नाहीं सबब परमेश्वराला नित्यहि म्हणतात. ९ त्याच-

तर त्याचे बरोबर पुष्कळ सैन्य, हत्ती, घोडे, आणि रथे

---

प्रमाणें परमेश्वराला रुद्र हें नामाभिधान असून रुद्र शब्द " रुदिरअश्रुविमोचने " " रुदेर्णिलोपश्च " या धातुपासून व या सूत्रानें सिद्ध होतो. म्हणजे " रोदयत्यन्यायकारिणोजनान्सरुद्रः " असा. याचा अर्थ–रडवीत आहे दुष्टकर्म करणारे लोक जे त्यांप्रत, त्याचें नांव रुद्र असून याविषयीं यजुर्वेदाच्या ब्राम्हणाचें श्रुतिप्रमाणहि आहे. तें असें कीं, " यन्मनसाध्ययाति तद्वाचावदाति यद्वाचावदाति तत्कर्मणाकरोति यत्कर्मणाकरोति तदभिसंपद्यते " ह्मणजे याचा अर्थ–असा आहे कीं, जो जीव मनास विचारतो तोच वचनेंकरून बोलत आहे. तोच त्याचा कर्ता. आणि जो कर्ता आहे तोच त्यासीं प्राप्त होत आहे. आणि अशी परमेश्वराची आज्ञा आहे कीं, जो जसें कर्म करील, तो तसें सर्वत्र मान्य पावेल. ही आज्ञा देणारा परमेश्वरच असून ही आज्ञा मान्य हि आहे. यारून जो जसी दानत टेवितो, तो तसी बरखत पावतो यावरून काय समजलें गेलें कीं, दुष्टकर्म करणारे जेवढे पुरुष आहेत ते सर्व त्या कृत कर्माच्यायोगानें रोदनहि करितात. अर्थात्

त्यादिकाहि जात असतात. परंतु राजा समोर त्यांचें ग्रहण झालें नाहीं व होत नाहीं; आणि होणारहि नाहीं. किंतु राजाचेंच होतें. कारण प्रधान आणि मुख्य यांचे समोर अप्रधान आणि गौण यांचें ग्रहण होणार नाहीं. जसें प्र-

---

मनुष्य वाईट कर्म करूं लागले असतां परमेश्वर त्यांच्या आचरणानुसार त्यांस रडवितो, सबब परमेश्वराला रुद्र असें म्हणतात आणि याविषयीं अन्य प्रमाणहि आहे कीं, "रुजंद्रावयतेयस्मात्रुद्रस्तस्माज्जनार्दनइति." सारांश या प्रमाणें नाम मात्रांचा अधिकारी एक परमेश्वरा वांचून अन्य कोणीच नसल्या कारणानें "नामानिसर्वाणियमाविशंति तंवैविष्णुंपरमउदाहरंतीति ॥ ही श्रुति आणि धात्वादिक सर्व अर्थ येथें दाखवावे लागले. आणि "सहस्रनाम्ने पुरुषायशाश्वते" "योदेवानांनामधाएकएवे" त्यादिकप्रमाणांवरून शंकर, आणि विश्वकर्मा मिळुन या उभय पदभिन्नत्वानें प्रागुक्त नागरखंडस्थ वचनांवर पूर्वापर विरोध येतो असें म्हणण्याची जरूरीच दिसत नाहीं. कारण "एकोदेवःसर्वभूतेषुगुढे" त्यादिकश्रुतिप्रमाणांचा आधार आहे म्हणून.

धान वस्तूं समोर अप्रधान आणि गौणाची साम्यता होत नाहीं कीं, तद्वत् नागरखंडस्थ वचनांत जरी शंकर विश्व-कर्मादिक पदें आलीं तथापि त्या उभय पदांची एक वाक्यता मुख्य व प्रधानानेच केली पाहिजे. आणि असें केल्यानें पूर्वापर मुळींच विरोध येणार नाहीं. कारण शं-कर असें जरी त्या श्लोकांत म्हटलें; तरी त्या शंकर पदाचा अर्थ काय ? आणि शंकर म्हणण्याचें कारण कोणतें? याचा आपण विचार केला पाहिजे. कारण वास्तविक जर शंकर या पदाचा अर्थ म्हटला असतां " शं नाम कल्याणं करोतीति शंकरः " असा होतो. म्हणजे स्वतां कल्याणस्वरूप असून ज्याच्या प्राप्तीनें लोकहि कल्याण पावतात् तो. अथवा स्वतां कल्याणस्वरूप होत्साता लोकांचेंहि कल्याण करितो म्हणून परमेश्वराला शंकर, शिव, इत्यादिक नामें लागूं होतात. आणि विश्वकर्मा हेंहीनाम परमेश्वराचेंच असुन वास्तविक याचा अर्थ असा आहे कीं, "विश्वंकर्म यस्य सविश्वकर्मा" जगत् आहे कृतिविषय जोतो ज्याचा तो विश्वकर्मा म्हणजे जगत्कर्ता. अथवा, "विश्वा-नि (सर्वाणि) कर्माणि यस्य सविश्वकर्मा" सारथ्यादिक सर्वकर्मं ज्याला आहेत, त्याचें नांव विश्वकर्मा, जगदादिकारण जाणावा. किंवा

" विश्वकर्माणं "— ' विश्वानां भुवनानां कर्मयस्य सविश्वकर्मा—अनेक मन्यु पदार्थ इतिबहुव्रिहिः तंविश्वकर्माणं; प्रजापतिर्विश्वकर्मामनोजयत्वितिश्रुतेः" विश्व ( जग ) उत्पन्न करणें हेंच आहे मुख्य कर्म जेंतं ज्याचें असा शब्दार्थ, अनेक अन्य पदार्थ असें व्याकरण सूत्रानें होणारा जो बहुव्रिहिसमास त्याणें प्राप्त होतो; आणि सर्व सृष्टीला उत्पन्न करणारा विश्वकर्माच आहे असें " प्रजापतिर्विश्वकर्मामनोजयत्विति " या श्रुति प्रमाणानें सिद्ध होत असून याविषयीं याखालील श्रुतीचा दृष्टांतहि आहे. तो असा कीं,

" यथोर्णनाभिःसृजेगृण्हतेच तथाक्षरात्संभवतीहविश्वमितिश्रुतेः "

अ० जसा ' सुतेरा ' सुत्राला पसरतो आणि ग्रहण करितो त्या प्रमाणें परमेश्वराच्या नामाक्षर मात्रें करून विश्व (जग) उत्पन्न होतें. ह्मणजे स्वचेतन्य मात्रेंकरून जग उत्पन्न करितो, आणि प्रलयकालीं आवरितो. हें " यस्यभासात्सर्वमिदंविभाति " या श्रुतिप्रमाणावरून देखील सिद्ध होतें. तस्मात् जरी शंकर, विश्वकर्मादिक विशेषणें दिलीं; तरी त्या विशेषणां वरून पूर्वापर विरोध येतो असें

म्हणतांच येत नाहीं. कारण, प्रागुक्त सर्व नामें एका ॐकार विश्व कर्म्याचींच ( जगत्कर्त्याचींच ) असून याविषयीं अनेक श्रुतिप्रमाणें हि आहेत तीं अशीं कीं,

“ तदेवाग्निस्तदादित्यस्तद्वायुस्तदु चंद्रमाः ॥
तदेवशुक्रंतद्ब्रह्म तदापस्तत्प्रजापतिः ” ॥
यजुर्वेद अध्या० ३२ मंत्र १, व श्वेताश्वतरोप-
निषद पृ० ३३५ मं० २.

“ यं कामये तं तमुग्रं कृणोमि तं ब्रह्माणं
तमृषिं तं सुमेधां ऋग्वेद अष्टक ८ वा,
सू० १२६ वें.”

“ त्वंब्रह्मा त्वंविष्णुस्त्वं रुद्रस्त्वमग्निस्त्वं
वायुस्त्वं सूर्य्यस्त्वं चंद्रमास्त्वमिति गणपति
अथर्वशीर्ष.”

"यो देवानां प्रभवश्चोद्भवश्च विश्वाधिपो रुद्रो महर्षि ॥ हिरण्यगर्भं जनयामास पूर्वं स नो बुद्ध्या शुभया संयुनक्तुः ॥ ज्ञात्वा शिवं सर्व भूतेषु गूढं ॥ विश्वस्यैकं परिवेष्टितारं ज्ञात्वा देवं मुच्यते सर्व पाशैः ॥ एष वेदो विश्वकर्मा महात्मा ॥ त्वं स्त्री त्वं पुमानसि त्वं कुमार उत वा कुमारी ॥ तमीश्वराणां परमं महेश्वरं तं देवतानां परमंच दैवतं पतिं पतीनां परमं परस्तात् ॥ विदाम देवं भुवनेश मीड्यं इति श्वेताश्वतरोपनिषद अ० ५ वा."

तस्मात् या सर्व प्रमाणांवरून शंकर आणि विश्वकर्मा या पदांत भिन्नत्व आहे कीं काय ? याचा विचार सर्व सूज्ञानींच करावा. कारण यासर्व प्रमाणांत जीं नामें सांगिलीं तीं सर्व जग-

दादि कारण असें जें परब्रह्म त्याचींच असून सर्वांचा नियंता तोच आहे. तस्मात् जरी विश्वकर्मा असें ह्मटलें ह्मणून, त्या विश्वकर्म पदानें त्यास हीन असें ह्मणतां येत नाहीं. कारण प्रागुक्त विष्णु पुराणस्थ वचनांत ' तस्यांजज्ञे प्रजापतिः " हें पद असल्या कारणानें " प्रजापतिश्चरतिगर्भेअंते " त्यादिक श्रुतिप्रमाणें असून.

"मंत्रस्यदेवतायाश्चअनादेशेप्रजापतिः" "हेमाद्रिः"

हीं विशेषणें असल्याकारणानें व पूर्वोक्त नागरखंडस्थ वचनाधारानें मुखापासून झालेले पांचाल ब्राम्हणतेच हे असें म्हणण्यास कांहींएक बाधक दिसत नसून याविषयीं श्रुतिप्रमाणेंहि आहेत.

"विश्वकर्मांगिवृद्धानि तानेवाहप्रतिष्ठितानी-
त्यारभ्य मनुः प्रथम मय द्वितीय त्वष्टा
तृतीय शिल्पि चतुर्थः दैवज्ञः पंचम इति
पर्यंतपंचब्रह्मोपनिषद ॥

"सएष्वाद्यमनुः भद्रमयः जयोत्वष्टा, शिल्पि, रिक्त दैवज्ञः पंचमइति" ॥ श्रुत्यंतरं.

अ० तीं अशीं कीं, विश्वकर्म्यानें चराचर जग ज्याकाळीं महाप्रलयाच्या योगानें बुडालें, त्यासमयीं "अणोरणीयान्महतो-महीयान्" या श्रुतीनें प्रतिपाद्य जें परब्रम्ह त्यापासून पुनःहें जग उत्पन्न केलें येताद्विषयीं प्रमाण चित्योपानिषद.

अद्भ्यः संभूतः पृथिव्यैरसाच्च विश्वकर्मणः समवर्तताधिः ॥ तस्य त्वष्टा विदधत् रूप मेति ॥ तत्पुरुषस्य विश्व माजान मग्रे ।

अ० तें असें कीं, अभ्द्य नाम उदक उत्पन्न के-ल्यानंतर पृथ्वी उत्पन्न करावी याजकरितां त्वष्टा नारायण रूप (पुरुष) होताझाला. 'रसाच्चविश्वकर्मणः' या शब्दानें

सकल रस जे आहेत, त्या रसाचें आदिकारण जो विश्वकर्मा त्यापासून ' समवर्तत ' म्हणजे अधिकाधिक्यें करून वृद्धि होतीझाली. कारण रस किंवा बीज यां खेरीज कांहींच उत्पन्न होणें नाहीं. तस्मात् बीज वृद्धीनें बीज होत आहे आणि " तस्यत्वष्टाविदधत्तरूपमेति " म्हणजे त्वष्टा जो आहे त्याणें पुर्वोक्त रसरूप बीजांचीं वेगवेगळीं रूपें दाखविलीं. "

यास दुसरें प्रमाण.

" तस्माद्वा एतस्मादात्मनः । आकाशःसंभूतः । आकाशाद्वायुः । वायोरग्निः । अग्नेरापः । अद्भ्यःपृथिवी । पृथिव्याओषधयः । ओषधी-भ्योऽन्नं । अन्नाद्रेतः । रेतसःपुरुषः । सवा-एषपुरुषोऽन्नरसमयः । इति तैत्तिरीयोपनिष-द्वचनं प० ६८ ब्रह्मानंदवल्ली अनुवाक् ॥ १ ॥

अ० ज्यासमयीं सृष्टि उत्पन्न करण्याची इच्छा परमेश्वराला झाली ते केळीं परमेश्वरानें आपल्या अंगापासून आकाश

उत्पन्न केलें. आकाशापासून वायु. वायुपासून अग्नि. अग्निपासून उदक. उदकापासून पृथ्वी. पृथ्वीपासून नानातऱ्हेचीं धान्योप धान्यें व वल्यादिक. आणि त्या उत्पादित धान्योपधान्यरूप औषधींपासून अन्न. अन्नापासून रेत. रेतापासून पुरुष उत्पन्न केला असें तैत्तिरीयोपनिषदाचें वचन आहे. आणि त्याच प्रमाणें पंचब्रम्होप निषदाचें वचनहि आहे. •

ओषधीभ्योऽन्नं । अन्नाद्देवरसः । तद्रसेन जंतोरेतः शुक्लशोणितरूपमेवाह । तस्मा-दित्यारभ्य मनुः प्रथम मथ द्वितीय त्वष्टा तृतीय शिल्पि चतुर्थ दैवज्ञः पंचमइतिसमे वाक्योविधीयतेतिपर्यंतं ॥

अ० यांतील वरील वाक्यांचा अर्थ प्रागुक्तार्था प्रमाणें असून तृतीयचरणांत विश्वकर्मा याणें आपल्या पांच मुखांपासून सूर्या प्रमाणें दैदीप्यमान असे पांच ब्राम्हण उत्पन्न केले. त्यांत

१ मनु, २ मय, ३ रा त्वष्टा, ४ शिल्पी, आणि पांचवा दैवज्ञ, मिळून हे पांच ब्राम्हण पुत्रत्वें करून उत्पन्न केले. याप्रमाणें पंच ब्रम्होपनिषदाचें वचन आहे.

यावरून प्रागुक्त नागरखंडस्थ वचनांची आणि या पंच ब्रम्होपनिषद श्रुतीची साम्यता केली असतां उभयवचनांची एक वाक्यता होत असल्या कारणानें "ब्राम्हणोऽस्यमुखमासीते" त्यादिक सर्व आधार या पांचालांस लागूं होऊन निर्विवाद निर्व्यभिचारत्वेंकरून मुखमासीत् या पदाधिकारी मनु, मय, त्वष्ट, शिल्पि, दैवज्ञादिकच सिद्ध होतात.

आतां या प्रदर्शित सर्व आधारावलोकनानें कांहीं शास्त्रीय नामक असें म्हणतात कीं, सोनारादिक लोक जिकडे तिकडे मनु, मय, त्वष्ट, शिल्पि आणि दैवज्ञ इत्यादिक नामें सांगून लोकांची डोळे झांक करितात; परंतु वास्तविक मनु म्हटले असतां

स्वायंभुमनु, स्वारोचिषमनु, औत्तमीमनु, तामसमनु, रैवतमनु, चाक्षुषमनु, वैवस्वतमनु, सावर्णिमनु, दक्षसावर्णिमनु, ब्रम्हसावर्णिमनु, धर्मसावर्णिमनु, रुद्रपुत्रसावर्णिमनु, रौच्यमनु, भौत्यमनु, मिळुन पुराणांत हे

---

१ स्वायंभुवोमनुः पूर्वो मनुः स्वारोचिषस्तथा ॥ औत्तमिस्तामसश्चैवरैवतश्चाक्षुषस्तथा ॥ षडेतेमनवोतीताः सांप्रतंतुरवेःसुतः ॥ वैवस्वतोयंयस्यैवत्सप्तमंवर्त्ततेंतरं ॥ विष्णुपुराण अं० ३ रा. अ० १ श्लोक ६-७-८.

२ छायासंज्ञासुतोयोसौद्वितीयःकथितोमनुः ॥ पूर्वजस्य सवर्णोसौसावर्णिस्तेनसोच्यते तस्यमन्वंतरंह्येतत्सावर्णिकमथाष्टमं ॥ १४ ॥ नवमोदक्षसावर्णोमैत्रेयभवितानुः ॥ २० ॥ दशमोब्रम्हसावर्णि भविष्यतिमुनेमनुः ॥ २४ ॥ एकादशश्चभविताधर्मसावर्णिकोमनुः ॥ २८ ॥ रुद्रपुत्रस्तुसावर्णोभविताद्वादशोमनुः ॥ ३२ ॥ त्रयोदशोरौच्यनामा भविष्यातिमुनेमनुः ॥ ३६ ॥ भौत्यश्चतुर्दशश्चान्यो मैत्रेयभवितामनुरिति ४० विष्णुपुराण अंश. ३ रा. अध्याय २ यांत प्रदर्शित अंकां प्रमाणें श्लोक

१४ मनु सांगितले आहेत. तर यांमध्यें सोनारादिकांचा मनु कोणता? कारण जर सोनार लोकांचा मनु या चवदा मनु पैकींच असेल तर त्यांचें सर्व बोलणें मिथ्या समजलें जातें. कारण या चौदा मनूचा वंश पाहूंगेलों असतां सोनारांनीं दाखविण्याच्या प्रमाणास आणि या १४ मनूंच्या वंशास अर्थाअर्थी संबंध लागूं होत नाहीं. कारण स्वायंभुमनु हा शतरूपेचा पुत्र असून शतरूपाहि ब्रम्हाची

पहावे. १ स्वायंभुव मनूला अथर्व, साम, यजु, ऋक्, वेदव्यास, आणि प्रियव्रत असे सहा पुत्र हाते. हे मुख्य असून शिल्पायन, गौरवायन, कायस्थायन आणि मागधायन, असें हे चार त्यांचेउपन्नाम्हण होते. आणि हे ऋग्वेदादिक वेद व वेदांगाचे मुख्यज्ञाते असून, शिल्पायनास पांचालनामेंकरून लोह, काष्ठ, ताम्र, शिला, स्वर्ण इत्यादिक धातु पदार्थांचें रूपांतर करणारे पांच पुत्र होते. आणि हे या वरील धात्वादिक पदार्थांचीं रूपांतर करण्याच्या विद्या ऋषिश्रेष्ठ यांपासून शिकून त्यांवर त्यांनीं ताम्रादिक संहितानामक ग्रंथ केले अशी कथा शैवागमांत आहे असें रथकार कल्पद्रुमग्रंथांत म्हटलें आहे.

पत्नी आहे. सावर्णिमनु सूर्याचा पुत्र आहे. वैवस्वत हाहि सूर्याचा-पुत्र, असून याप्रमाणें १४ मनूंचेंहि कुल दिसतें. यावरून प्रदर्शित प्रमाणांसीं आणि यामनु वंशावळीसीं अंतर किति दिसून येतें तें पहा.

आतां मयाविषयीं विचार करूं लागलों असतां मय हा असुर असून कश्यापासून दिति[1]नामक स्त्रीचे ठिकाणीं उत्पन्न झाला, येतद्विषयीं मत्स्यपुराणांत सम्यक् विवेचन आहे. यावरून मय हा विश्वकर्म मुखोत्पन्न नाहीं, हें सिद्ध होतें.

त्याचप्रमाणें हे सोनारादिक पांचाल आपणास त्वष्टा असेंहि म्हणवितात, परंतु यावरून देखील त्यांचें बोलणें निर्मूल समजलें जातें. कारण वास्तविक ह्मटलें असतां इंद्र[2], धाता, भग, त्वष्टा,

---

१ मयोनामदितेःपुत्र स्त्रिनेत्रकलहप्रियइति मत्स्यपुराणे अ० १३२ श्लोक० ७

२ तुषितानामयेदेवाश्चाक्षुषस्यांतरेमनोः ॥ वैवस्वतेंतरेचैते आदित्याद्वाशस्मृताः ॥ इंद्रोधाता भगत्वष्टामित्रोथवरुणोयमः ॥ विवश्वान् सविता पूषा अंशुमान् विष्णु रेवचेति मत्स्य पुराणे अ० ६वा.

मित्र, वरुण, यम, विवश्वान्, सविता, पूषा, अंशुमान्, आणि विष्णु, मिळुनहीं १२ नांवे सूर्य्यांचींच असून, हे चाक्षुषमन्वंतरांत "तुषिता" नामक देव होते. तेच वैवश्वतमन्वंतरांत मरीच पुत्र कश्यप याची जी अदितिनामक स्त्री, तीचेठायीं अत्युत्तम व हजारो किरणांनीं युक्त असे द्वादशादित्य या नामें पुत्रत्वें करून उत्पन्न होतेझाले, असें अग्निपुराणाच्या १९ व्या अध्यायांतील वर्णन आहे. यावरून त्वष्टा पद या पांचालांस कसें लागूं होईल ? याचा विचार करा ? कारण नागरखंडस्थ वचनांत विश्वकर्म्याच्या पश्चिम मुखापासून त्वष्टा उत्पन्न झाला म्हणून जें म्हटलें, त्यास आणि या अग्नि पुराणांतील कथेस देशांतर भेदाभिन्नत्व दिसून येतें किंवा नाहीं तें पाहून, नंतर त्वष्टा या शब्दाचा उपयोग करावा.

आतां हे लोक आपणास शिल्पी असें म्हणवितात; परंतु याहि पदावरून सोनारादिकांच्या बोलण्यांत व्यत्यय येतो. कारण, शिल्प शब्दानें कांहीं जात समजली जात नाहीं. तर शिल्प नाम कलाकौशल्यादिक करणाराचें असून कलाकौशल्यादिक केवळ सोनारादिकच करितात असें नाहीं; तर शूद्रांत्यजादिकहि कलाकौशल्यादिक करणारे असून लोक त्यांस शिल्पीच

असें म्हणतात; तर तीहि विश्वकर्म्याच्या मुखापासून झाले असें म्हणण्यास बाधक काय ? तस्मात् याहि प्रमाणावरून सोनारादिकांचें बोलणें अग्राह्य व अप्रमाण समजलें जातें. अस्तु आतां "हे सोनार लोक आपणास दैवज्ञ ब्राम्हण असें म्हणवितात. तर याहि शब्दावरून त्यांवर व्यभिचार येतो, कारण. दैवज्ञ म्हणजे—" पूर्वजन्मार्जित जें शुभाशुभ कर्म त्याचा विपाक म्हणजे परिणाम त्याला दैव म्हणावें. आणि त्याला जाणतो, तो दैवज्ञ समजावा. असें असून अमरांमध्यें या दैवज्ञाला,

"सांवत्सरोज्योतिषिको दैवज्ञगणकावपि ॥
स्यूर्मौहूर्तिकमौहूर्त ज्ञानिकार्तांतिकाअपि ॥
अमरकोश कां० २ क्षत्रियवर्ग श्लो० १३.

अ० सांवत्सर, ज्योतिषी, दैवज्ञ, गणक, मौहूर्तिक, ज्ञानीं तर्कांतित्यादिक नामें असून हें शास्त्रमुख्य ब्राम्हणांनींच पढावें, या विषयीं नारदाचें वचनाहि आहे कीं, "जोतिषशास्त्र ब्राम्हणांनीं पढावें म्हणजे तें परम उत्तम व पुण्यद असून वेदाचें रहस्य

आणि परमतत्व होय. ग्रंथेंकरून अथवा अर्थेंकरून जो या ज्योतिषशास्त्रातें जाणतो तो द्विज म्हणजे ब्राम्हण. आणि या ज्योतिषशास्त्राचा संबंध म्हणजे, गुरुपरंपरा, ब्रम्हदेव, नारद आणि गर्ग, असे असून तें वेदांत असल्याकारणानें इतर लोकांनीं शिकूंनये व त्यांस अधिकारहि नाहीं. आणि दैवज्ञ संज्ञाहि दुसऱ्यास मिळावयाची नाहीं. जितके दक्षिण प्रांतांत राहाणारे लोक आहेत त्यांस लागूं आहे, यावरून सोनार दैवज्ञपदाधिकारी कोठून ठरले जातील? ते पहा. असें कांहीं शास्त्रीय ह्मणतात. आणि हें खरें आहे; परंतु अशा या शास्त्रज्ञानीं उत्पादित शंका पाहून समाधान करण्यास मोठा आनंद वाटतो. कारण हे शास्त्रीयनामक अमर-कोशाचें नाम घेऊन प्रथमत: दैवज्ञादिक नामें ज्योतिष सांगणाराचीं असून हा अधिकार ब्राह्मणावांचून इतरांस मिळावयाचा नाहीं असें म्हणतात. तर या शास्त्रीबुवांस माझें असें विचारणें आहे कीं, अमरकोशांतील जो श्लोक दाखविला तोच मुळी क्षत्रिय वर्गांत असून द्विज शब्दानें क्षत्रिय कां ज्योतिषाचे अधिकारी होऊं नेयत कारण द्विजशब्दें करून ब्रम्ह, क्षत्रि, आणि वैश्य हे तीन वर्ण समजले जातात. तर त्या श्लोकावरून ब्राम्हणच असें कशावरून सिद्ध केलें. आणि क्षत्रिय वैश्य कां नसावेत ?

दुसरें—दक्षिण प्रांतांत शूद्रांत्यजादिक लोक राहतात. किंवा नाहीं ? वास्तविक म्हटलें असतां "दक्षिण प्रांतांत राहणारे लोक" या म्हणण्यावरून शूद्रांत्यजालांही दैवज्ञ संज्ञा लागूं असावी असें, सदरहू शास्त्री यांच्या बोलण्यावरून सिद्ध होतें. आणि धर्मशास्त्रादिका धारें करून पाहिलें असतां जोतिषविद्ये वरून ब्राम्हणानें निर्वाह करूंच नये असें या

"विप्रोदैवज्ञजीविच वैद्यजीविचिकित्सकः ॥
तथा आवाह्यकादेवलका नाक्षत्राग्रामयाजकः ॥
एतेब्राह्मणचांडालामहापथिकपंचमः ॥
इतिदेवीभागवते, भारतराजधर्मेपि.

प्रमाणावरून उघड दिसतें. आणि यावरून ज्योतिषशास्त्र मुख्यत्वें करून ब्राम्हणांनीच शिकावें असें नाहीं; तर सर्वांनि शिकावें असें सिद्ध होत असून गृहीत शंकेंत कांहींच अर्थ दिसत नाहीं. अस्तु आतां मनु, मयत्वष्ट शिल्पीत्यादिक नामाभिधानांवरून ज्या

शंका घेतल्या त्यांचें ही समाधान सांगतों. तें असें कीं, १४ मनु जे दाखविले, त्यांपैकीं हा सोनारादिकांनीं सांगण्याचा मनु नाहीं, तर मनु शब्दाचा अर्थ "मानयति चराचरं जगत्" यद्वा "सर्वैर्वेदादिभिः शास्त्रै शिष्टैश्चमन्यतेयः समनुः" अथवा "मनुतेऽइतिमनुस्सचेश्वरएवनान्यः" असा आहे. म्हणजे सर्व जगताचा मान करितो त्याचें नांव मनु, अथवा सर्व वेदशास्त्रादिक व शिष्टादिक लोक ज्यास अत्यंत प्रीतिनें मानतात त्याचें नांव मनु. किंवा मजपेक्षां दुसरा नाहीं असें जो मानितो त्याचें नांव मनु, हा जगदादि कर्ताच समजावा. कारण जगतास मानदेणारा, अथवा वेदशास्त्र व शिष्टादिकांनीं मानण्याविषयीं योग्य किंवा मजपेक्षां दुसरा नाहीं असें म्हणण्याविषयीं समर्थ असा एक परमेश्वरा वांचून दुसरा कोणच नसल्यामुळें मनु नांव परमेश्वराचेंच आहे असें जाणावें. आणि मुख्यत्वेंकरून मनु हें परमेश्वराचेंच नांव असल्यामुळें लोक पूजेचे वेळीं "मनवेनमः" याना-मानें तुलसी पत्र वाहत असतात.

आतां 'मय' असें ह्मटळें आहे, त्यावरून कश्यपपुत्र मयासुर घेतला जात नाहीं. तर मय या शब्दाचे प्रत्यय-

परत्वेंकरून अनेक अर्थ होतात; परंतु मुख्य हा मय शब्द ह्मटला असतां सुखवाचक असून "मेङ्प्रणीदानें" अथवा "डुमिञ्प्रक्षेपणे" या दोन धातुनीं सिद्ध होतो. आणि हा सुखवाची असल्या कारणानें वेदांत "आपोहिष्ठामयोभुव:" असें ह्मटळें आहे. "आणि वास्तविक याचा अर्थ असतां "आसम्यक् पालनकर्तृत्वात् नारायग मूर्त्तयोवा हि यस्मात् कारणात् या: यूयंन: अस्माकं मयोभुव: मय: सुखंभवयतीतिमयोभुव:सुखकत्र्य: सुखदात्र्य:" असा होतो. तेव्हां अर्थात् सुखरूप असून प्राणिमात्रांस माते प्रमाणें सुख देण्याविषयीं समर्थ, असा एक परमेश्वरच आहे. सबब मय हें परमेश्वराचें उत्तम नामाभिधान जाणावें.

आतां त्वष्टा याशब्देंकरून द्वादशादित्य जे खलविले, ते खरे आहेत; परंतु हा कांहीं द्वादशादित्यांतील त्वष्टा नाहीं. तर तेथें त्वष्टाशब्दानें परमेश्वर ग्रहण केला जातो. कारण त्वष्टा या शब्दाचा अर्थ "त्वक्षति नाम तनू करोति इतित्वष्टा" असा होतो म्ह० संहारसमर्थी जगताला क्षीण करितो त्याचें नांव त्वष्टा अथवा प्रजापति रूपानें स्वरूपांतर देतो त्याचें नांव त्वष्टा परमेश्वर

जाणावा. कारण जगताला क्षीण करणें किंवा अवयवादिकें करून वृद्धीस नेणें हें परमेश्वराचेंच कृत्य असल्याकारणानें लोक त्यास "त्वष्ट्रेनमः" या नामानें तुलसीपत्र अर्पण करीत असतात. त्याचप्रमाणें शिल्प शब्दही परमेश्वरालाच वाचक आहे. ह्मणजे "यस्यभासात्सर्वमिदंविभाति" स्वचैतन्य मात्रें करून जगउत्पन्न करण्यास अनंत आहे शक्तिरूप कलाकौशल्य जेंतें ज्याचें त्याचें नांव शिल्पी. यास प्रमाण

"सुदर्शनंचशस्त्राणां विश्वकर्माचशिल्पिनां ॥
धर्मिष्ठेषुदयावत्सु देवर्षिषुमहत्सुचेति नार-
पंचरात्र. रात्र १ प० ८ श्लो० ८०.

त्याच प्रमाणें दैवज्ञ शब्दहि परमेश्वर वाची जाणावा. कारण "दैवंजानातीतिदैवज्ञः" ह्मणजे प्राणिमात्रांचें पूर्वजन्मार्जित सुकृत दुःष्कृतादिक जाणून तदनुसार फल देण्याविषयीं समर्थ असा एक परमेश्वरच असल्या कारणानें दैवज्ञ हें परमेश्वराचेंच उत्तम नामाभिधान जाणावें. सारांश हीं सर्व नांमें जगव्यास अशा

परमेश्वरालाच वाच्य असून त्याच्या पांच मुखापासून हे पांच ब्राह्मण झाल्या कारणानें

"मासनामगुरोर्नाम्नद्द्याद्बालस्यवैपिता ॥
कृष्णोनंतोच्युतश्चक्रीत्यादिगार्ग्यः" ॥

इत्यादिकोदाहरणानुसारहि हीं नामें जाणावीं. कारण बहुनकरून प्राणि ज्या वंशांत उत्पन्न होतो तो त्याच वंशाचे नामेंकरून प्रसिद्धींतहि जाणला जातो; आणि हें सर्वत्र विदितही आहे याविषयीं विशेष लिहिण्याची अवश्यकताहि दिसत नाहीं.

आतां कित्येक लोक पांचाल शब्दावरून असें ह्मणतात कीं, सोनारादिलोक जिकडे तिकडे आह्मीं पांचाल ब्राह्मण आहों असें म्हणतात. परंतु वास्तविक म्हटळें असतां पांचाल नाम हें भद्राश्व पुत्रांच्या देशाचें असून त्याचें संरक्षक तेच पांच करितात. असें असून त्यांची योजना क्षत्रियांत केली आहे, तर या सोनारादिकांनीं सांगण्यांच्या पांचाल नामावरून हेही त्या भद्राश्व पुत्राचें व देशांतील आहेतसें वाटतें."

असें म्हणतात परंतु याहि शंकेचें समाधान सांगतों तें श्रवण करा. तें असें कीं, पांचाल हा कांहीं जातिवाचक शब्द नाहीं तर पांचाल शब्द देशवाचक असून या देशांतील नृप पुत्रांस पांचाल म्हणण्याचें कारण याच पुस्तकच्या ७० व्या पृष्ठांत दर्शविलें आहे; आतां यांचा मूळ शब्द म्हटला असतां "पंचानल अथवा पंचाननात्मज" हा होय. याचा अर्थ– पंच म्हणजे पांच, अनल म्हणजे अग्नि याचा संबंधार्थ अग्नि प्रमाणें दैदीप्यमान अशा पांच मुखां पासून झाले ते पंचानल; किंवा पंचानलेय, यद्वा, पंचानन हे शंकराचें नांव असून त्याचा पांच मुखांपासून मनु, मय, त्वष्ट, शिल्पि दैवज्ञादिक जे पांच पुत्र झाले, तेहि पंचननात्मज यानामातें पावले." आतां पंचानलेय अथवा पंचाननात्मज, यांचा अपभ्रंश होऊन लोक यांस पांचाल, पांचले इत्यादिक विशेषणेंकरून हाक मारितात. परंतु, वास्तविक म्हटलें असतां जसे स्वर्णकार, याच्या अपभ्रंश सोनार, कुलाल याचा अपभ्रंश कुमार, कुंभार, अयोध्या याचा अपभ्रंश अजोध्या लवण याचा अपभ्रंश नोण मीट; इत्यादिक आहेत कीं त्याचप्रमाणें पांचाल हाही अपभ्रंश आहे असें जाणावें.

असो आतां कांहीं लोक "ब्राह्मणोऽस्यमुखमासीत्"

ही श्रुति ब्रह्म पांचालांसच लागूं आहे, येतद्विषयीं प्रमाणतरी काय आहे ? आणि ही श्रुति ऋषि लोकांस कां लागूं नाहीं. वास्तविक म्हटलें असतां "ब्राम्हणोऽस्य" ही श्रुति ऋषिश्रेष्ठांसच लागूं असावि" असें म्हणतात. आणि हें खरें आहे; परंतु ही श्रुति ऋषि लोकांस कां लागूं होत नाहीं, येतद्विविषयीं कारणपूर्वक विचार केरू गेलों असतां ऋषिहे परमेश्वराचा मुखापासून झाले असें कोणतेहि पुराणांत अथवा वेदांत किंवा शास्त्रादिक ग्रंथांत देखील वर्णन नसून पुराणांतर्गं येवढेंच कथन आढळतें कीं,

"वेदाभ्यासरतस्यास्य प्रजाकामस्यमानसाः ॥
मनसःपूर्वसृष्टावै जातायत्तेनमानसाः ॥

अ० वेदाभ्यासाविषयीं तत्पर व प्रजा उत्पन्न होण्याची इच्छा करणाऱ्या ब्रह्मदेवाच्या मनापासून दहा पुत्र उत्पन्न झाले यास्तव त्यांस मानस असें ह्मणतात ते असे कीं

"मरीचिरभवत्पूर्वं ततोत्रिर्भगवानृषिः ॥
अंगिराश्चाभवत्पश्चात् पुलस्त्यस्तदनंतरं ॥

ततःपुलहनामावै ततःक्रतुरजायत ॥
प्रचेताश्चततःपुत्रो वसिष्ठश्चाभवत्पुनः ॥
पुत्रोभृगुरभूत्तद्वन्नारदोप्यचिरादभूत् ॥
दशेमान्मानसान्ब्रह्मामुनीन्पुत्रानजीजनत् ॥
मत्स्यपु० अ० ३ श्लो० ५ पासून.

अ० १ मरीचि, २ अत्रि, ३ अंगिरा, ४ पुलस्त्य, ५ पुलह ६ क्रतु ७ प्रचेता ८ वसिष्ठ ९ भृगू आणि १० नारद मिळुन हे दहा पूत्र ब्रह्म देवाच्या मनापासून उत्पन्न झाले अशी कथा मत्स्य पुराणांत आहे. शिवाय मुखापासून झाल्याचें वर्णन कोठेंच नाहीं. असें असल्या कारणानें "ब्राह्मणोऽस्यमुखमासीत्" ही श्रुति केवळ पंचननात्मजांवांचून ऋषिलोकांस लागूं होत नाहीं हें अक्षरशः खरें आहे असें ह्मणण्यास किंचिन्मात्राहि बाधक दिसत नाहीं.

याशिवाय याच पुराणांत दुसरी अशी एक कथा आहे कीं

" शारीरानथवक्ष्यामिमातृहीनान्प्रजापते ॥

अंगुष्ठाद्दक्षिणाद्दक्षः प्रजापतिरजायत ॥
धर्मस्तनांतादभवत्हृदयात्कुसुमायुधः ॥
भ्रूमध्यादभवत्क्रोधोलोभश्चाधरसंभवः ॥
बुद्धेर्मोहःसमभवदहंकारादभून्मदः ॥
प्रमोदश्चाभवत्कंठामृत्युर्लोचनतोनृप ॥
भरतःकरमध्यात्तुब्रह्मसूनुरभूत्ततः ॥
एतेनवसुताराजन्कन्याचदशमीपुनः ॥
अंगजाइतिविख्यातादशमीब्रह्मणःसुता ॥
मत्स्यपु० अ० ३ श्लो० ९ पासून.

अ० ब्रह्मदेवाच्या आंगठया पासून दक्षप्रजापति झाला. स्तना पासून धर्म, हृदया पासून मदन, भ्रुकुटीच्या मध्य भागापासून क्रोध, अधरोष्ठापासून लोभ, ब्रह्मदेवाच्या बुद्धीपासून मोह, अहंकारापासून मद, कंठापासून हर्षः आणि नेत्रांपासून मृत्यु उत्पन्न

याप्रमाणें ब्रह्मदेवास अंगापासून नऊ पुत्र उत्पन्न झाले. ह्मणून यांची अंगज अशी प्रसिद्धी आहे.

आतां हें वर्णन येथें येण्याचें कारण इतकेंच कीं, ब्रह्मदेवाच्या मनापासून १० पुत्र आणि अंगापासून ९ पुत्र जरी उत्पन्न झाले तरी त्यांस मुखमासीत् हें पद नसून अंगज आणि मानस अशी संज्ञा असल्या कारणानें त्यांचें ठिकाणीं "ब्राह्मणोऽस्यमुखमासीत्" ही श्रुती लागूं होत नाहीं.

खरें; परंतु श्रीमद्भागवताच्या तृतीयस्कंधांतील १२ व्या अध्यायांत.

"अथाभिध्यायतःसर्गं दशपुत्राप्रजज्ञिरे ॥
भगवच्छक्तियुक्तस्य लोकसंतानहेतवः ॥
मरीचिरऽयंगिरसोपुलस्त्यःपुलहंक्रतुः ॥
भृगुर्वसिष्ठोदक्षश्चदशमस्तत्रनारदः ॥
उत्संगान्नारदोजज्ञे दक्षोंऽगुष्ठःस्वयंभुवः ॥

प्राणाद्वसिष्ठःसंजातो भृगुस्त्वचिकरात्क्रतुः ॥
पुलहोनाभितोजज्ञे पुलस्त्यःकर्णयोऋषिः ॥
अंगिरामुखतोअक्ष्णो ऽत्रिर्मरीचिर्मनसोभवत् ॥
धर्मस्तनाद्दक्षिणतोयत्रनारायणःस्वयं ॥
अधर्मःपृष्टतोयस्मान्मृत्युर्लोकभयंकरः ॥
भागवत स्कं० ३ अ० १२.

इत्यादिक वचनांचापरिस्फोट असून यांतील सर्व अर्थ पहातां अंगिराऋषिहा ब्रह्म देवाच्या मुखापासून उत्पन्न झाला, असें स्पष्ट दिसत असल्याकरणानें "ब्राह्मणोऽस्य मुखमासीत्" ही श्रुति ऋषि लोकांवांचून सोनारेत्यादिक लोकांस कशी लागूं होईल ?" असें कांहीं लोकाचें बोलणें दिसतें आणि कांहीं अर्थी हें संभवदुक्तिकहि आहे; परंतु पूर्वोक्त मत्स्यपुराणस्थ वचनांवरून संभवत नाहीं, असें ह्मटलें पाहिजे. कारण मत्स्यपुराणांत " मनसः पूर्वसृष्टावैजाता

यत्तेनमानसाः " असें ह्मटलें आहे. म्हणजे ब्रम्ह देवाच्या मनापासून झाले म्हणून त्यांची मानस अशी संज्ञा आहे असें सांगून तेच पुनः मुखापासून झाले; असें म्हणणें हें केवळ स्वव्याघात पर समजलें जातें. कारण, उभय पुराणांचा कर्ता एक असून त्यांत "व्यासोनारायणःसा-क्षात्" हें विशेषण त्याला असतां त्याचे हस्तून ही चूकी घडेल असें म्हणवत् नाहीं. तर हें शहाणपण एखाद्या दुराग्रही मनुष्याकडूनच झालें असावें. अस्तु आतां या ऋषि लोकांविषयीं कांहीं स्मृत्यादिक ग्रंथांत असें वर्णन लिहिल्याचें आढळतें कीं,-

"हस्तिन्यामचलोजातउलूक्यांकेशपिंगलः ॥
अगस्त्योऽगास्तिपुष्पाच्च कौशिकःकुशसंभवः ॥
कपिलःकपिलाज्जातः शालगुल्माच्चगौतमः ॥
द्रोणाचार्यस्तुकलशात्तित्तिरिस्तित्तिरीसुतः ॥
रेणुकाऽजनयद्राममृष्यशृंगमुनिंमृगी ॥
कैवर्तिन्यजनद्व्यासंकौशिकंचैवशूद्रिका ॥

विश्वामित्रंचचांडाली वशिष्ठंचैवउर्वशी ॥
नतेषांब्राह्मणीमातालोकाचारश्चब्राह्मणाः ॥

अ० अचलमुनि हा हत्तीच्या पोटीं झाला. अगस्ति ऋषि हा अगस्त्याच्या पुष्पापासून, कौशिक गवतापासून झाला, कपिल मुनि वानरी पासून, गौतम शालगुल्म नामक वल्ली पासून. परशुराम रेणुका धुळीपासून. शृंगऋषि मृगी पासून, व्यास कोळणी पासून. विश्वामित्र चांडाळिणीचे पोटीं. आणि वसिष्ठ ऋषी कलावंतिणी पासून झाला. यांतून एकास हि ब्राम्हणी माता नव्हती, असें साफ दिसून येतें. असें असतां लोकांत ते श्रेष्ठ किंवा ब्राम्हण असे मानले गेले.

याशिवाय महा भारताच्या शल्य पर्वांत कांहीं पुरुष क्षत्रिय होत्साते तपोबलें करून ऋषि पदास पावते झाले असें म्हटळें आहे, तेहे. कीं

"तथा च कौशिकस्तात तपोनित्यो जितेंद्रियः ॥
तपसा वै सुतप्तेन ब्राह्मणत्वमवाप्तवान् ॥

गाधिर्नाम महानासीत् क्षत्रियः प्रथितो भुवि ॥
तस्य पुत्रोऽभवद्राजन् विश्वामित्रः प्रतापवान् ॥
स राजा कौशिकस्तात महायोग्यभवत् किल ॥
स पुत्र मभिषिच्याथ विश्वामित्रं महातपाः ॥
देहन्यासे मनश्चक्रे तमूचुः प्रणताः प्रजाः ॥

इत्याद्यारभ्य,

स तु वव्रे वरं राजन् स्यामहं ब्राह्मणस्त्विति ॥
तथेति चाब्रवीद्ब्रह्मा सर्वलोकपितामहः ॥
स लब्ध्वा तपसोग्रेण ब्राह्मणत्वं महायशाः ॥

इत्यादिपर्यंत श्लोक असून यांतील भावार्थ पहातां तपोबलें करून ब्राम्हणत्वातें पावले, असें साफ दिसतें आणि खरोखर जर शास्त्रावलोकन केलें असतां ब्राम्हणत्वास तपादिक गुण हेच मुख्य कारणीभूत आहेत म्हणून युधिष्ठिर महा सर्पास उत्तर देतो कीं,

"सत्यं दानं क्षमा शीलमानृशंस्यं तपो घृणा ॥
दृश्यंते यत्र नागेंद्र स ब्राह्मण इतिस्मृतिः ॥

शास्त्राप्रमाणें म्हटलें असतां जो मनुष्य सत्य, दान, क्षमा-शीलता, निर्दोषपणा, तप, आणि दया, यांचा अंगीकार करितो, तो ब्राम्हण असें जाणावें. याप्रमाणें युधिष्ठिरानें सांगितलेलें उत्तर सर्पानें ऐकून पुनः सर्प प्रश्न करितो कीं,

सर्प उवाच ।

चातुर्वर्ण्यं प्रमाणंच सत्यंच ब्रह्म चैव हि ॥
शूद्रेष्वपि च सत्यंच दानमक्रोध एव च ॥
आनृशंस्यमहिंसा च घृणा चैव युधिष्ठिर ॥

युधिष्ठिर उवाच ।

शूद्रे तु यद् भवेलक्ष्म द्विजे तच्च नविद्यते ॥
न वै शूद्रो भवेच्छूद्रो ब्राह्मणो न च ब्राह्मणः ॥

यत्रैतल्लक्ष्यते सर्व वृत्तं स ब्राह्मणः स्मृतः ॥
यत्रैतन्न भवेत् सर्प तं शूद्रमिति निर्दिशेत् ॥

अ० चारवर्ण प्रमाण आहेत; असें असतां शूद्रांमध्यें जर सत्य, दान, क्षमा, निर्दोषपणा, तप, आणि दया, हे गुण असले तर त्यास काय म्हणावें ? त्यास युधिष्ठिर राजा उत्तर देतो कीं, शूद्राचेठायीं सद्गुण आहेत, ते जर ब्राम्हणाठायीं नसतील, तर तो ब्राम्हण नव्हे व तो शूद्राहि नव्हे. तर ज्या मनुष्याचे अंगीं सद्गुण असतील तोच ब्राम्हण जाणावा. आणि ज्याचे अंगीं यागुणांचा-अभाव असेल; तो शूद्र असें समजावें.

सर्प उवाच ।

यदि ते वृत्ततो राजन् ब्राह्मणः प्रसमीक्षितः ॥
वृथा जातिस्तदाऽऽयुष्मन् कृतिर्यावन्नविद्यते ॥

युधिष्ठिर उवाच ।

जातिरत्र महासर्प मनुष्यत्वे महामते ॥

संकरात् सर्व वर्णानां दुष्परीक्ष्येति मे मतिः ॥
सर्वे सर्वास्वपत्यानि जनयंति सदा नराः ॥
वाङ् मैथुनमथो जन्म मरणंच समं नृणाम् ॥
इदमार्षं प्रमाणंच ये यजामह इत्यपि ॥
तस्मात् शीलं प्रधानेष्टं विदुर्ये तत्वदर्शिनः ॥
प्राङ् नाभिवर्द्धनात् पुंसो जातकर्म विधीयते ॥
तदाऽस्यमाता सावित्री पिता त्वाचार्य उच्यते ॥
तावच्छूद्रसमो ह्येष यावद् वेदे नजायते ॥
तस्मिन्नेवं मतिद्वैधे मनुः स्वायंभुवोऽब्रवीत् ॥
कृतकृत्याः पुनर्वर्णा यदि वृत्तं नविद्यते ॥
संकरस्तत्र नागेंद्र बलवान् प्रसमीक्षितः ॥
यत्रेदानीं महासर्प संस्कृतं वृत्तमिष्यते ॥
तंब्राह्मणमहं पूर्वमुक्तवान् भुजगोत्तम ॥

भारत वनपर्व.

अ० हें ऐकून सर्प पुनः युधिष्ठिर राजा प्रत ह्मणतो कीं जर सदाचारानेंच ब्राम्हण; तर जातिप्रमाणें आचरण नसेल तर तीचा उपयोग कांहींच नाहीं असें ठरतें. त्यास युधिष्ठिर म्हणाला कीं, हे सर्पराज वर्णसंकर झाल्यावरून मनुष्यांची जाति निश्चयानें सांगतां येत नाहीं. कारण सर्व वर्णांचे लोक सर्व वर्णांच्या स्त्रियांपासून सदैव संतति उत्पन्न करीत असतात. आणि वाचा, मैथुन करण्याचा प्रकार, जन्म व मरण हीं सर्व मनुष्य जातीस सारखींच आहेत. यास्तव ज्यांस तत्वाचें ज्ञान झालें आहे. त्याणें सुशीलतेचें अवलंबन करावें. पुरुषाचे जातकर्मादि विधि-प्रकार नालछेदन करण्यापूर्वीं करावे, असें सांगितलें आहे. यानंतर सावित्री (गायत्री) त्याची माता आणि आचार्य त्याचा पिता होतो. याप्रकारें वेदांचेठायीं पूर्ण जन्म होई तोपावेतों तो पुरुष (बालक) शूद्र आहे. असा स्वायंभुव मनुनें

१ जन्मनाजायते शूद्रःसंस्काराद्द्विजउच्यते ॥ वेदाध्यायीतुवि-प्रःस्यात् ब्रम्हज्ञानीतुब्राम्हणः ॥ म्हणजे. जन्मानें शूद्र, कर्मानें

स्वतां निर्णयकेला आहे. अशा प्रकारें करून तो संस्कृत झाला असतांहि, जर त्याचेठायीं सुशीलता नसली; तर तो वर्णसंकर होतो असें म्हटलें आहे. यास्तव जो सुशीलता धारण करितो तोच ब्राम्हण असें म्हटलें आहे.

आतां हाजो प्रकार युधिष्ठिर राजानें सर्पास सांगितला तो केवळ स्वांगभूत सांगितला असें नाहीं; तर या वर्तनानें अनेक पुरुष शूद्राचे व क्षत्रियाचे ब्राम्हण व ऋषिही झाले, असें वर्णन वेद्रांत देखील आहे. म्हणजे ऐतरेय[1] ब्राम्हण म्हणून जो वेदभाग

---

द्विज वेदाभ्यासें करून विप्र आणि ब्रम्हज्ञानानें ( वेदार्थ समजल्यानें ) ब्राम्हण असें या वचनाचें स्पष्टीकरण दिसतें.

१ "ऋषयो वै सरस्वत्यांसत्रमासत ते कवषमैलूषं सोमादनयंदास्याः पुत्रः कितवो ब्राह्मणः कथं नो मध्ये दीक्षिष्टेति तं बहिर्धन्वोदवहन्नत्रेनंपिपासाहंतुसरस्वत्याउदकं मापादिति स बहिर्धन्वोदूळ्हः पिपासयाबित्त एत दपो न

आहे, त्याच्या द्वतीय पंचिकेंत "कवष" नामक ऋषिविषयीं असें लिहिल्याचें आढळतें कीं, "हा ऋषि सरस्वती नदीचे तीरीं सोमयाग चालत असतां तेथें गेला, हें पाहून तेथें जे ऋत्विज होते, त्यांनीं तूं ब्राम्हण नसतां दासीपुत्र आणि द्यूतकर्मी असून याज्ञिक कर्म शिकून आम्हांमध्यें कसा येतोस ? असें म्हणून त्यास अरण्यांत हांकून लाविलें आणि त्यानें तृषेनें मरावें, असें उद्देशून सरस्वतीचें पाणीं पीऊं नये अशी त्यास

---

पीयमपस्यत्प्रदेवत्रा— "ब्रम्हणेगातुरेत्विति"— तेनापांप्रियंधामोपगच्छत्तमापोनूदायंस्तंसरस्वतीसमंतंपर्यधावत्तस्माद्धाप्येतर्हिपरिसारकमित्याचक्षते. यदेनंसरस्वतीसमंतंपरिससारतेवाऋषयोब्रुवन् विदुर्वा इमंदेवाउपेमंह्वयामहाइतितथेति ॥ तमुपाह्वततमुपहूयैतदपोनप्रीयमकूर्वत, प्रदेवत्रा "ब्रम्हणेगातुरेत्विति" तेनापांप्रियंधामोपागच्छन्नुपदेवानामुपापां प्रियंमधामगच्छत्युपदेवानांजयतिपरमलोकं यएवंवेद इतिऐतरेयब्राम्हणेद्वितीयपंचिका खं १९.

आज्ञा केली. तेवेळेस तो तृषाक्रांत होत्साता आर्त स्वरें करून सरस्वतीची स्तुति करूं लागला तेव्हां. कृतस्तुतीनें सरस्वती संतुष्ट होत्साती आपलें मूलस्थान सोडून तो ज्या ठिकाणीं होता, त्याठिकाणीं जाऊन त्यास चोहूंकडून वेढून सर्व ठिकाणीं जल करून दिलें. हें त्या ऋत्विजांनीं पाहून त्यास देव प्रसन्न आहेत, असें जाणून, परत आपणांत बोलाविलें. आणि त्याणें ज्या मंत्रें करून सरस्वती व देव प्रसन्न करून घेतले होते, ते मंत्र त्यापासून शिकून त्यांनी देव प्रसन्न करून घेतले."

याप्रमाणें कौशिकी ब्राम्हणांत कवश ऋषीची कथा आहे. या सर्व आधारांवरून विचार करितां ऋषि लोकांची उत्पत्ति अत्यंत भिन्नदिसत असल्या कारणानें " ब्राम्हणोऽस्यमुखमासीत् " या पदाधिकारी ते कोठून होतील ?

अस्तु आतां " ब्राह्मणोऽस्यमुखमासीत् " ही श्रुति मनु, मय, त्वष्ट, शिल्पि आणि दैवज्ञ यांसतरी लागती हें कशावरून ? आणि जर ते ब्राम्हण आहेत; तर वेदाध्ययनशील

कां नाहींत ? ब्राम्हण म्हटला असतां यजन याजनादि कर्मांत संपन्न असून ग्रामांत उपाध्यपणादिक कर्म चालवीत असलें पाहिजे. तर तें या वरील लोकांत दिसत नसून ओंचिगांठ सुद्धां फोडतां येत नाहीं; तर अशा कुबुद्धी लोकांस ब्राम्हण हें पद शोभेल तरी कसें ?

इत्यादिक अनेकप्रकारें शंका घेणारे घेतात. परंतु मागील कथेवरून या शंका गेण्याचें अवश्य मुळींच दिसत नाहीं. कारण ज्या अर्थी "ब्राह्मणोऽस्यमुखमासीत्" ही श्रुति ऋषि लोकांस लागूं होत नाहीं, आणि पूर्वोक्त श्रुति स्मृत्यादिक वचनांवरून मनु, मय, त्वष्ट, शिल्प, दैवज्ञादिकांचींच नामें मिळतात, त्या अर्थी मुखापासून जे कांहीं उत्पन्न झाले ते हेच आहेत असें पुर्वोक्त ग्रंथांवरून निर्विवाद सिद्ध होतें.

आतां हे जर ब्राम्हण असते तर ते वेदाध्ययनशील कां नाहींत, असें जें म्हटलें, त्याचें सविस्तर लिहूं गेलों असतां ग्रंथ विस्तार फार होईल या भितीस्तव सारांश मात्र लिहितों. कीं,

" मनुमयादिक हे उत्पन्न झाल्यापासून पेशवाई होई तों पर्यंत अध्ययनशील ते तर काय, वेदवेदांगें, तसे शास्त्र पौराण न्याय मीमांसा जोतिष शाकुनेत्यादिक शास्त्रें जाणण्याविषयीं अद्वितीय असे होते. परंतु पेशवाई झाल्यापासून स्वतां ते अब्राह्मण असल्याकारणानें ब्राह्मणांची कुचेष्ठा करणें त्यांस योग्य वाटत असे. आणि तें पुर्वोक्त कारण मनांत आणून वारंवार सर्व ब्राह्मणमात्राची निंदाकरण्यास प्रारंभ करी. परंतु, तादृश निंदेस ऋषि कुलस्थ ब्राम्हण लोक भित नसत तेणें करून त्यांस आपलें वर्चस्व उदयास आणण्यास सबब सांपडत नसे. असें त्या लोकांनीं जाणून ऋषि कुलस्थांची निंदा केली असतां ते कांहीं आम्हांस गणकावीत नसून उलट आमची अप्रतिष्ठा करण्यास पुढें होतात तर त्यांचें सहाय्य घेऊन पंचाननात्मजांची निंदा करूं (म्ह०) तेणें करून ते बोलणार ही नाहींत; कदाचित प्रत्युत्तर करतील तर रीत्यानुसार पेशवाईतील पांचालाचें पारिपत्य करूं असें ह्मणून ते या मनु, मय, त्वष्टेत्यादिकांची निंदा करूं लागले. कीं, पांचालांनीं वेदोक्त कर्म करूं नये;

करण्याचें पहाण्यांत अल्यास त्यांची जिव्हा छेदावी पांचालांनीं यज्ञोपवीतादिक धारण करूं नये, कदाचित केलें तरी मळकें यज्ञोपवीत धारण करावें. अथवा कोरें यज्ञोपवीत रेड्याचे पाठीवर घर्षून मलीन झाल्यावर तें धारण करावें. गंध आडवें लावूं नये. नमस्कार करूं नये, नमस्कार करतील तर हस्त छेद करावा. इत्यादिक नूतन कायदे रचून सर्व मान्य करण्याविषयीं कांहीं वर्षें लोकांचीं खुशामत चालली होती. परंतु लोक कांहीं या नूतन कायद्याविषयीं आपलें मत देईनात; तेव्हां "बापदां-खीव नपेक्षां श्राद्ध घाल" या न्यायाप्रमाणें लोकांवरही जुलुम चालविला. तेसमयीं लोक त्या स्वमतानुसार वर्तन करणाऱ्या लोकांस पाहून हतवीर्य होत्साते नाइलाजास्तव नूतन कायद्यांविषयीं आपापलें अनुमत देऊं लागले तेणेंकरून "मर्कटस्यमदिरापानंतन्मध्येवृश्चिकदंशनं" या वचना प्रमाणें ते या गरीब पांचाल लोकांस अत्यंत त्रास देऊं लागले, तेव्हां सहनशील अशा या स्वर्णकारेत्यादिकांनीं हें सर्व कृत्य अवलोकून ज्या कृत्यास्तव आह्मीं हें दुःख

भोगितों, त्या कृत्याचा अभावच केला असतां दुःखापासून तरी मुक्त होऊं असें आशून सर्व त्या वेदादिकाचरणापासून वेगळे झाले; आणि या गोष्टीस दिनांतर फारच होऊन गेल्या कारणानें सांप्रत या स्वर्णकारेत्यादिक ब्राह्मणांस अविद्यांधकार रूप अरण्यांत प्रवेश करावा लागला, तेणेंकरून दुष्टांस व अभिमान्यांस आपलें मनतरंग पाहिजे तसे उडविण्यास मार्ग मिळाल्याकारणानें यथास्तीत ते पांचालांची निंदा करून खरे ब्राह्मण चित्पावन खरहाडे आणि देवरुखे मिळून हे त्रिवर्गच कायते श्रेष्ठ असें जाणतात. इतकेंच नाहीं; तर हें श्रेष्ठत्व संपादण्यास्तव अमोल्य अशा प्राचीन स्मृत्यादिक ग्रंथांत पाहिजे तशीं स्वोक्ति वाक्यें घुसडून देतात परंतु

“ काकःकृष्णपिकःकृष्ण कोभेदपिककाकयोः ॥
वसंतसमयेप्राप्ते काकःकाकपिकःपिकः ॥

यानीत्युक्तिप्रमाणें नूतन श्लोकांवरून लागलेंच त्यांचें स्वरूप दिसण्यांत येतें.

असो सारांश यचित्पावनीं राज्यापासून या स्वर्णकारेत्यादिक लोकांस अविद्वत्तेंत यावें लागलें. शिवाय चित्पावनीं राज्याचे आदीं मनुमयेत्यादिक शास्त्र संपन्न होते असें ह्मणण्यास किंचित्मात्रही बाधक दिसत नाहीं. असो

आतां पेशवाईंतील लोकांनीं राज सांगितरून जरी मनुमयेत्यादिकांचा द्वेष करून त्यांकरवीं कर्म त्याग केला, आणि मळकीं यज्ञोपवितादिक धारण करविलीं; तथापि त्या योगानें स्वर्णकारेत्यादिक ब्राम्हण नव्हे असें ह्मणतां येत नाहीं. कारण पेशव्यांचा कर यज्ञोपवीत मळविण्यावरच असून तें यज्ञोपवीत कापसाचें असल्याकारणानें त्यांचे द्वेषानेंच हे ब्राह्मण असे सिद्ध होतात. कारण असें आहे कीं,

" कार्पासमुपवीतंस्या विप्रस्योर्ध्ववृतंत्रिवृत् ॥
शणसत्रमयंराज्ञो वैश्यस्याविकसौत्रिकं ॥
मनुस्मृ० अ० २ प० १७ श्लो० ४४.

अ० ब्राम्हण बटूंस कार्पासोपवीत, ( कापसाचें ) असून

नव तंतू आणि ग्रंथियुक्त असावें; क्षत्रियांस सणाचें आणि वैश्यांस मेंढ्याच्या लोकरीचें, याप्रमाणें तीनीं वर्णांस तीन प्रकारचीं यज्ञोपवीतें मनु स्मृतींत सांगितलीं आहेत. तर यावरून कापसाचें यज्ञोपवीत ब्राह्मणांवांचून अन्यास धारण करण्याचा अधिकार नाहीं. असें असून मनु, मय, त्वष्ट, शिल्पेयादिकांच्या कंठांत कार्पासोपवीतच आनादि काला पासून दिसत असल्याकारणानें खरोखर हे ब्राम्हणच आहेत असें निर्व्यभिचारत्वें करून सिद्ध होतें. आतां पेशव्यांचे मनांत हे शूद्र असें जर प्रतिपादन करण्याचें असतें, तर त्यानीं या स्वर्णकारेयादिक पांचालांस कार्पासोपवीत कधींच धारण करूं दिलें नसतें. मळविणे हा तर त्यांचा उघड द्वेष दिसतोच आहे.

अस्तु स्वर्णकारेयादिक जर ब्राम्हण आहेत; तर त्यांच्यामध्यें यजन याजनादिक व उपाध्यगिरी चालविण्याचें काम कां नाहीं? येतद्विषयींचें समाधान व हे उपाध्ये होते किंवा नाहीं हें या खालील नकले वरून पहा.

आठ आणे.

# सदर दिवाणी अदालतीचा नं० २५८९.

## यांतील तर्जुमा. ता० १८।४।७४.

मुंबई ता० ७ माहे मार्च सन १८५१ शुक्रवार.

सदर दिवाणी Seal. अदालत.

स्पेशल आपील नं० २५८९.

वादी— महादेव भट्ट बिन शिवराम भट्ट व अन्याबा नाईक पालपं (हे जातीचे सोनार.)

प्रतिवादी— आबाजी गिरमाजी, व पांडुरंग मय्यत याचा

वारस पुत्र भटंभट त्रिम्न पांडुरंग भट्ट व सकाराम नीलकंठ याजवर. ( हे जातीचे जोशी ब्र० देशस्थ ).

## दावा रु० १६ आणें १३.

या कामांत जिल्हा पुणें येथील जज्ज साहेबांच्या कोर्टांत फैसला झाला आहे. तो फिरविण्याकरितां वादी अर्ज करून जाहीर करतात कीं, वादी याचे घरीं लग्न झालें त्याबद्दल लग्नसंबंधीं हक्क वसूल करण्याकरितां, व तो हक्क पुढें आपणास मिळण्या करितां जिल्हा मजकूर येथील प्रीन्सिपाल् सदरमीन कोर्टांत प्रतिवादीनें प्रथम दावा केला. त्याचें वादीनें उत्तर दिलें कीं, प्रतिवादीस सदरहू ( हक्क ) घेण्याचा अधिकार नाहीं. व सदरहू हक्क देणें तो देणाराच्या मर्जीवर आहे. त्यावरून प्रीन्सिपाल् सदरमीनाचे नजरेस आलें कीं, सदरहू हक्क प्रतिवादीस घेण्याचा अखत्यार आहे; असें साबीत झालें. व सदरहू हक्क वादीनें हरकत केल्या पूर्वीं प्रतिवादीस मिळा-

ला आहे. सबब सदरहू हक्क पुढें मिळावा, याप्रमाणें हुकूमनामा केला, तो असिष्टन्जज्ज साहेबांनीं आपीलांत बहाल ठेविला कीं, त्यांत कमजास्त करण्याविषयीं, कांहीं सबब नाहीं. व वादीनें जे पुरावे दाखविले त्यापैकीं कांहीं पुराव्या वरून सदरहू हक्क प्रतिवादीस पोंहचतो; असें साफ सावीत होत आहे. त्याजवरून जज्ज साहेबांचे कोर्टांत आपील झालें. तेथें सदरहू फैसलै अशा कारणावरून बहाल ठेविले कीं, सदरहू दाव्याचे हक्कास बहुत दिवसांच्या सनदेचा आधार आहे. त्याविषयीं पूर्वीं कधींही हरकत झाली नाहीं. आलीकडे मात्र हरकत झाली आहे. ती फक्त वादीनें व त्याजबरोबर वहिवाट करणारांनीं केली आहे. त्याचा असा इरादा आहे कीं, आमच्या मर्जीस येईल त्या जोशास सदरहू हक्क देण्यास, आह्मीं मुखत्यार आहों, असें ते स्थापन करण्यास पाहतात्. यास वादी नाराजी होऊन आपलें स्पेशल् आपील मंजूर होण्याकरितां अर्ज केला, तो अशा कारणा वरून मंजूर केला कीं, पुढें अमुक रीतीनें अमुक असामीनें चालावें. अथवा वादी प्रतिवादीच्या धर्म प्रकरणांत ठराव करावा;

असा हुकूमनामा करण्यास इनसाफाचें कोर्ट मुखत्यार नाहीं. ज्या सनदा व करार फक्त सोनार ज्ञातिविषयीं आहेत, असें वादी सांगतो. त्याप्रमाणें वादीनें चालावें किंवा कसें ?

दुसरे सनदे विषयीं तर कांहीं हरकत घेतली नाहीं परंतु या प्रकरणांत "पेशवे" सरकारांनीं जी सनद

---

१ हें आपील होण्यापूर्वी जे अर्ज व फैसले झाले ते सर्व या टिपींत पहावे.

मेहरबान् उयलीयम् च्यापलेन साहेब बहादूर दक्षिणचे कमिशनर याजकडे. आपला हुकूम गेल्या जुलई महिन्याचे २९ वे तारखेचा आला त्या अन्वयें पुण्याचे जोशी, वतनदार व सोनार यांनीं रुजू केलेले दाखले पाहून आपल्यास कळंण्याकरितां सविस्तर हकीकत लिहून कळवितों ती एणेप्रमाणें कलमें

बीतपसील.

दिली आहे, त्या प्रमाणें हल्ली वादीनें चालावें किंवा

---

१. जोशी यांचें पहिलें परीशिष्ट हें बाजीरावा पासून मिळविलेली सनद आहे; असें म्हणतात, इहीदे सलाशीन मय्या व अलफ म्हणजे सन १७३० मद्धें पांडुरंग नारायण कसबे पुणे व पुण्याचे व इतर पेठेचे व्यवहारी जोशी उपाध्ये महाजन यांना दिलेली आहे. ह्या सनदेंत नारायणाचे आजे आणि त्याचे दोन भाऊ यानां मोगलांचे वेळेस रामकृष्ण आचार्य सोनार आणि पुण्याचे सर्व पेठेचे सोनारांनीं जोतिष, उपाधिक, अष्टाधिकारी आपल्या कुटूंबांत करण्याविषयीं अधिकार दिलेला असें जें म्हटलें आहे, तें ह्या सनदेंत तपशिलवार पुन्हां लिहीलें आहे. आणि सनदेंत जो मजकूर आहे तो एकरिती, वतन पत्र, काजी देशमुख, देशपांड्ये, यांची मोहोर शिक्के, व पांढरी गांवचे सर्व अम्मल दारांच्या सह्या असल्यावरून दाखल केली आहे. ह्या परीशिष्टावरून आणखीं असें दिसतें कीं नारायणानें हा जो हक्क आपल्यास मिळवून दुरूस्त केला, तो थोडे दिवसांवर सोनारांनीं

कसें ! या कामाची चौकशी आज रोजीं सुरू केली. व

---

आपला भट उपाध्या उभा करून जोतिष, उपाध्ये, वेदोक्त ब्रम्हकर्म, विवाह, मौंजी, हीं करूं लागला, तों पर्यंत तो हक्क बीन हरकत आपल्या जवळ होता असें नारायण म्हणतो. आणि सोनारांच्या वडीलांनीं नारायणाचे वडीलांस कर्म-धर्म करण्यास ज्या लेखांनीं नेमिलें होतें, तो लेख तपासून खरा असें समजल्या-वरून नारायणास तें काम चालविण्यास आज्ञा दिली. आणि सोनारांनीं तांदळाचा पिंड न करितां गव्हांचा करावा असें ठरविलें

२. हें परिशिष्ट ह्या तंट्या संबंधीं पुराव्याचा दाखला आहे असें समजून खालीं लिहिल्या प्रमाणें आमच्या मनांत विचार येतात.

१. ह्या सनदेचा मतलब खरा आहे असें समजल्यास ब्राह्मणांनीं सोनारांपासून हा हक्क देणगी प्रमाणें मिळवून घेतला असें हे ब्राह्मण साफ कबूल करितात. ह्या वरून दोन प्रश्न

वादी प्रतिवादीचे वकील हुजूर हाजीर झाले; व या

---

उत्पन्न होतात. नारायणा पूर्वी हा हक्क कोणी चालविला ? तो ब्राह्मण होता कीं सोनार होता ? आणि त्याचें वतन कसें गेलें ? कोणी मनुष्य अथवा कांहीं मंडळी एखादा अधिकार वंश परंपरा जरी देऊं शकतात; तरी त्यांनां त्या अधिकाराचें काम बेरोबर प्रथमचें किंवा त्याच्या पुढील काम चालविणारांनीं खातरी प्रमाणें न चालविलें तर मागें घेण्यास अखत्यार नाहीं काय ?

२. हा कागद खरा आहे असें पूर्वी प्रमाणें मानलें तर पुर्तेपणीं स्पष्ट आहे कीं, ब्राम्हणांशीं संबंध न ठेवण्याचा सोनारांचा हक्क कांहीं तरी निदान शंभर वर्षांचा तरी आहे.

३. हा कागद खरा जरीं आहे तथापि खरा नाहीं असा संशय येण्यास कारणें आहेत तीं. १ ही सनद

ब्राम्हण जातीच्या राजाची आहे. ह्या सनदेचा मजकूर ज्या कागदांतून घेतला, तो कागद ही सनद खरी दाखविण्यास रुजू केला नाहीं, हें मोठें न्यून आहे. कारण नारायणाचे वडिलोपार्जितास हा कागद जेव्हां मिळाला, त्या वेळेस दुसरे कागद मिळालेले ते अद्याप आहेत. हे कागद जोशी ज्ञातीच्या कर्म धर्म संबंधीं आहेत. आणि नारायणाच्या सदरीं लिहिल्याप्रमाणें उभयतां चुलत्यांचें नांवचे आहेत. हे कागद अग्नीनें जळाले नाहींत. परंतु हल्लींचे तंट्या संबंधीं आहेत ते कागद म्हणजे रीती पत्र व कतबा सोनार लोकांचाहीं जळाला असें म्हणतात.

४. दुसरें परिशिष्ट जें आहे तें ही सदरीं लिहिल्याप्रमाणें नारायणाच्या चुलत्यासच दिलेलें असून त्याजवर पारशी आणि मराठी शिक्के मोहोरा आहेत. ह्या कागदावर

दाखल केले होते; ते वाचून दप्तरीं दाखल केले. आणि

---

सोनार शिवाय करून सर्व मंडळ्या (ह्म०) ज्यांजवर जोशी व्यवहारी यांचे हक्क होते, त्या मंडळींच्या सर्व मुख्यांच्या सह्या आहेत यास्तव ह्या कागदाचा हल्लींच्या तंट्यास संबंध लागूं होत नाहीं. जर लागूं केला, तर जोशी लोकांचेच विरुद्ध साक्षीदी होती.

५. तिसरें परिशिष्ट, हें औरंगाबादच्या कामदाराचें ताकीद पत्र आहे. ह्याचा हि हाल्लींच्या तंट्याशीं संबंध लागत नाहीं फक्त एवढेंच दिसतें कीं, जोतिष मंडळी संबंधीं सर्व कागद मोठ्या काळजीनें बाळगून ठेविले असून सोनारांचे कागद नाहींसे जहाले.

६. चौथें जें परिशिष्ट आहे, तें शके १७१५ म्हणजे सन १७९३ सालीं बाळंभट सोनार यांनीं बापूजी नारायण जोशी याजला लिहून दिलेला कतबा आहे. बाळंभट

त्याचा पूर्तेपणी विचार केला; त्याजवरून सर्टिफिकीटांत पहिली

---

मजकूर अद्याप जिवंत आहेत, त्यांचें म्हणणें कीं हा कतबा जबर दस्तीनें लिहून घेतला. ह्या कतब्याचा मजकूर हा आहे कीं लिहून देणारा क्रिया कर्म करण्यासाठीं गांवा बाहेर कधीं जाणार नाहीं; तो लकडी पुला पलिकडे हिंडवण्यास गेला होता.

७. ह्या परिशिष्टावरून असें दिसतें कीं, जर सोनारांचें हक्क वास्तविक व बीन हरकतीनें त्यांजकडे असते तर गांवां बाहेर जाण्याची कांहीं जरूर दिसत नाहीं. तसेंच गांवा बाहेर जाणे यावरून असें दिसतें कीं, जोशांचे जे हक्क ते सोनारांनीं सन १७९३ त कबूल केले नाहींत सन १७९३ त हि, जो राजा होता तो ब्राह्मणच होता; तेव्हां धर्म आणि कायदा त्यानें आपल्या बुद्धी बलानें फेर फार केला हें निःसंशय आहे.

सबब दाखल केली आहे. त्याविषयीं असें कोर्टाचे नजरेस

---

८. पांचवें परिशिष्ट जें आहे तें लढाईच्या पूर्वीच्या २० स वर्षांच्या वह्या आहेत; त्यांत त्यानें जी कांहीं जमा केली, त्या जमेच्या एकंदरी वरून किती एक वर्षं पर्यंत कांहीं उत्पन्न जहालें नाहीं, फक्त विसाव्या वर्षी मात्र १७ रुपये जमा आहेत. एखादे मनुष्या जवळ त्याचे हिशेबांचीं जीं पुस्तकें असतात त्यावरून त्याच्या वत्तीचा पुरावा मिळण्याची आशा असते; परंतु जोशी लोकांचीं जीं पुस्तकें आहेत, त्यावरून त्यांचा हक्क नक्की जहालेला किंवा बीन हरकतीचा त्यांजकडे आहे, असें दिसत नाहीं; जोशी लोकांनीं जे दाखले रुजू केले ते एवढेच."

९. सोनार लोकांचे वत्तीनें कांहीं दाखले नाहींत. व त्यांजवळ कांहीं कागद ही नाहींत, कारण त्यांचें ह्मणणें कीं आमचे जे हक्क आहेत, हे स्वाभाविक ह्मणजे ईश्वरी

येतें कीं, कोणा एका असामीचे हक्का विषयीं ठराव करणें व

---

दत्त आहेत. आणि ते कांहीं कागदावर लिहिण्याची किंवा दाखल करण्याची जरूरी नाहीं. बाजीरावाची सनद, रिती पत्र, मोगलांचे वेळेस लिहून घेतलेला कतबा या विषयीं आम्हांस कांहींच माहिती नाहीं. असें ते साफ बोलतात. परंतु सदरीं लिहिलेल्या चौथ्या परिशिष्टांत असलेल्या दोन तीन गोष्टी दाखवितात, त्यावरून असें दिसतें कीं जोशी लोकांनीं आपल्यास भट असें म्हणण्याची संज्ञा घेतल्याचें ते प्रत्यक्ष कबूल करितात; आणि जरं सोनारां पैकीं कोणि ही भट असें लिहून सही केलेला कतबा जोशी लोकांनीं आपल्या जवळ कधींच ठेविला नसता.

एणे प्रमाणें तारिख २१ डिसेंबर सन १८२४ मुक्काम पुणें.

एच. डी. राबर्टसन्,

कलेक्टर. जिल्हा पुणें.

तो हक्क देणें महकूप केल्यानें, अथवा, त्या हक्काकडे लक्ष्य न

---

मेहरबान् उयालियम् च्यापलेन् साहेब बहादूर कमिशनर दक्षिण मुक्काम पुणें यांजकडे आपलें पत्र तारीख १६ जून सन मजकूरचें सोनार व ब्राम्हण लोकांमध्यें चालू असलेल्या तंट्याबावद पंचायतनिं केलेल्या निकालाचा संक्षेप आणि ह्या मजकूरा बावद आपण पुण्याचे कलेक्टर साहेबांस पत्र लिहिलें त्याचे नकले सहित आलें तें पावलें.

२. आपले मेहरबान् कपतान् राबर्टसन् साहेब. बहादूर यांच्या नांवच्या पत्रांतील प्रथम कलमावरून असें दिसतें कीं हा बखेडा पंचायती मार्फ ठरलागेला. आणि त्याजवरअपील जहालें नाहीं त्यावरून असें सिद्ध होतें कीं, तो ठराव अमलांत आणिला पाहिजे. नामदार गव्हरनर दरइन्लास कौन्सल बाहादूर यांचे लक्ष्यांत असें येतें कीं, आपलें हें अनुमान खरें नाहीं असें ह्मण-ण्यास मजबूद कारणें आहेत. आणि ही पंचायत पुण्याचे १९७

दिल्यानें जें नुकसान होईल तें देवविण्याचा हुकूम नामा करण्या

आणि नगरचे ६ ब्राम्हण यांजमध्यें चालूं असलेल्या तंट्याचा निकाल करण्याकरितां भरली होती. आणि जरी साफ लिहिण्यांत आलें नाहीं तरी असें दिसतें कीं, उभयपक्षांकडून पंचायतींतील पंच लोकांविषयीं कांहीं हरकत घेण्यांत आली नाहीं. आणि अशा कल्पनेंवरून हा ठराव उभयपक्षीं लागूं असावा, परंतु पंचायतीस जो तंटा तपासण्या विषयीं सांगितलें होतें त्या बाहेर पंचायतीनें काम केलें. आणि सर्व सोनार ज्ञातिच्या महत्वाच्या हकाबद्दल निकाल केला. परंतु ह्या मुकदम्यामध्यें सोनार वादी व प्रतिवादीही नसून कोणत्याही प्रकारें पंचायतीनें केलेला ठराव आम्हांस मान्य आहे असें बिलकूल त्यांनीं कबूल केलें नाहीं. यदा कदाचित् कित्येक सोनारांचा या ठरावास रुकार घेतला असता. तथापि पंचायतीस ठराव करण्यास अधिकार नाहीं कारण तसें केल्यानें थोडे दिवसांवर जो कायदा अमलांत आणिलेला आहे कीं जाति प्रकर्णीं आप-

विषयीं, इनसापाचें दिवाणी कोर्ट मुखत्यार आहे. याविषयीं संशय नाहीं. परंतु पुढें हुकुमा प्रमाणें हक्क न देणारांनीं, चाललेंच पाहिजे. असें कीं, पुढें हक्क न दिला असतां कोर्टाचे

---

सांतलि तंटे (ह्म०) ज्या जातींत तंटा आहे त्या जातींतील पंच नेमून पंचायतीचे मारिफत त्या तंट्याचा निकाल करावा. अशा ठरावास बाध आला असता.

२ ह्या कारणावरून नामदार गव्हरनर साहेब बहादूर दरइनलास कौन्सल यांचे ध्यानांत असें एतें कीं हा कांहीं यथायोग्य न्याय प्रकर्णी सोनारांचे हका बाबद ठराव झाला नाहीं यास्तव त्यांचा अभिप्राय असा आहे कीं हलींच्या ठरावावरून सोनारांच्या हकास स्पष्ट रितीनें बाध येईल असी तजवीज होऊं नये." यावर आणखी विषय असून त्यापुढें "जेम्सप्यारीस सेक्रेटरी निसबत सरकार; अशी सही आहे. परंतु विस्तार भयास्तव सर्व उतारा घेतला नाहीं.

हुकुमास अटकाव केल्याबद्दल त्या असामीस कायद्या प्रमाणें दंड होईल, या प्रमाणें हुकूम नाम्यांत लिहिणें बेशस्त आहे,

दुसऱ्या मुद्याविषयीं कोर्टाच्या नजरेस येतें कीं, प्रतिवादीनें सदरहू हक्क सोनारज्ञाति पासूनच घ्यावा अशी निशाणी ३९-ते ५२ चे दस्तैवजांत नाहीं.

सर्टिफिकीटांत तिसरी सबब लिहिली आहे, यांविषयीं कोर्टाचे नजरेस असें येतें कीं, सदरहू सबबेविषयीं स्पेशल अपीलाचे अर्जांत कांहीं तकरार केली नाहीं. सबब सन १८४३ चा आक्ट ३ रा याजवरून त्या सबबेची चौकशी करण्यास कोर्ट मुखत्यार नाहीं. असा ठराव केला कीं, सदरहू असामींनीं प्रतिवादीस हक्क वगैरे पुढें देत जावे, याप्रकारें कनिष्ट कोर्टाच्या हुकूम नाम्यांत जो मजकूर आहे, तो रद्द करून बाकीचा बहाल ठेविला. खर्च प्रतिवादीनें द्यावा."

यावर खर्चाचा व चालू कागदांची याद असून आपुढें

साहेब लोकांच्या व कारकून्याच्या सह्या आहेत. परंतु विस्तार भयास्तव सर्व मजकूर येथें न घेतां सारांश मात्र घेतला आहे.

याची अस्सल बरहुकूम नकल कांदेवाडीजवळ उरण कराचे चाळींत "श्रीधर बाबाजी मठकर" यांपासीं आहे. ज्यांस ती पाहणें असेल, त्यांनीं सदरहू गृहस्थ यांस भेटावें, म्हणजे ते ती अत्यानंदानें दाखवितील.

आतां हा सरकारी निवाडा येथें दाखविण्याचें कारण हेंच कीं, जर सोनारादिकांत उपाध्ये नसते, तर त्यांपासून उपाध्यपणाचा हक्क देशस्थादिकांस विकत कसा मिळाला ? आणि तो अमलांत आणण्याविषयीं पुण्यांतील जोशी लोकांनीं खटपट कां म्हणून केली ? कारण जर ते शूद्र असते; तर त्यांकडील हकाच्या उद्देशानें सरकारापर्यंत जाण्याची जरूरी नव्हती. ज्या अर्थीं हकासाठीं सरकारापर्यंत जाण्याची खटपट जोशी लोकांकडून झाली; त्याअर्थीं यांचे जवळ उपाध्यपणादिकांचे हक्क निर्विवाद प्राचीन कालापासून आहेत व होते असें सिद्ध होऊन निर्व्यभिचारत्वें करून याचें ब्राम्हण्य सिद्ध होतें.

या शिवाय या सोनारादिक लोकांविषयीं ५–८ वर्षां आलीकडे चित्तूर प्रांतस्थ कांहीं लोकांनीं सरकार मारफतीनें कांहीं खटपट केली होती; परंतु शेरशेवट प्रतिवादींचा नाइलाज होऊन सोनारांस प्राचनिकालापासून ब्राम्हण हीच संज्ञा आहे असें ठरून वादीस जें नुकसान झालें असेल तें प्रतिवादीनें द्यावें असें ठरलें. आणि या मुकदम्यांत

वादीतर्फे

१ वलियाचार्य.
२ वेंकटाचलाचार्य.
३ सुब्बाचार्य.
४ चिकनियाचार्य.
५ नळाचार्य.
६ अरुणाचलाचार्य.
७ केलोरिहाचार्य.
८ उफराचार्य.
९ यलाचार्यादिक होते.

प्रतिवादी तर्फे.

१ अरुणाचलैय्या.
२ व्यंकटसुबैय्या.
३ पंचांगनारायणैय्यां.
४ गुंडप्पा.
५ वेंकटरामसिरस्तेदार.
इत्यादिक होते.

याप्रमाणें यातंत्र्याची स्थिति असून हे अस्सल बर हुकूम कागद आह्मांस हें पुस्तक तयार होण्याचे आंत न येऊन पोहोंचल्यामुळें नंबरवार तंठा दाखविला नाहीं; फक्त यांतील व्यवस्था मात्र दाखविली. ती हि याकरितां दाखविली कीं, जर सोनारादिकांस कोणतेंहि कर्म धर्माचा अधिकारच नसेल, तर सरकार प्रतिवादीकडून खर्च कसा देवील ? ज्या अर्थी जिकडे तिकडे हे जिंकतात, त्या अर्थीं यांस ब्राम्हणत्व आहे असें साधारण तर्कावरून देखिल म्हणतां येतें. याखेरीज जगद्गुरु म्हणविणारे शंकराचार्यादिक दंडींनीं या सोनारादिकांस स्वभावेंकरून जीं पत्रें पाठविलीं त्यांत देखील त्यांनीं ब्राम्हण चिन्हाचा उपयोग केल्याचा दृष्टोत्पत्तीस येतो, तो खरा खोटा या पुढील पत्रांवरून पहा.

सन खमस् मध्या-
तैन व अलफ.
सन १२९१.
नं० १६९७.

दस्तैवज
रुपये २० पर्यंत,
किं० १ आणा.
अक्षर गुजराथी.

शिक्का,
हपसी सरकारचा.
लिपी,
मुसलमानी.

जगूवाळशेट पोतदार जंजीरकर व
बाबाजी पांडशेट मजगांवकर राहणार मुरूड, यांसी

अर्जी करितां हस्ते जगू बाळशेट तागायत

चंद्र १८ माहे रमजान.

गोविंद बळवंत कारकून.

( हू )

खुदावंत सरकार संस्थान जंजीरा साहेबांचे खीजमतीस.

जगू बाळशेट पोतदार राहणार जंजीरा व

बाबाजी पांडशेट मजगांवकर राहणार मुरूड.

कारणें हुजूर वंदगीस माफ मागून अर्ज करितो ऐसाजे आमच्या स्वज्ञातींतील ब्राम्हण "गोपीनाथ भट्ट" असून "म्हसळें, पंचैतल, मुरूड, नांदगांव, बोर्ली, तर्फ मांडळें, येथील वृत्ति चालवित होता. नंतर त्याचे मागून बजाबा पंतोजी चालवित आला, त्यास अजमासें सुमारें वर्षे ६०—७० पर्यंत झालीं; हल्लीं बजाबा पंतोजी हे मय्यत. सबब, आम्हांस ब्राम्हण नाहीं, यास्तव आम्हीं स्वज्ञातींतील ब्राम्हण आणून वृत्ति

चालवूं. यास्तव नायबा तहशीलदार तर्फ मुरूड यांजवर हुकूम की, ब्राह्मण आणण्यांविषयीं कांहीं नड होऊं नये असा हुकूम मिळावा, ह्मणून खावंद कदमाजवळ अर्ज केला आहे. बं-दगीस रोशन होय. अर्जदार तागायत चंद्र १८ वा माहे रमजान स० मजकूर.

सह्या.

१ जगू बाळशेट पोतदार, दस्तुर खुद,

२ बाबाजी पांडशेट मजगांवकर, दस्तुर खुद,

लिपि बालबोध.

मुलकी अवग नंबर ८३.

नायबा तहशिलदार तर्फ मुरूड यांस

हुकूम.

अर्जदार, यांणीं लिहिल्याप्रमाणें, ते आपले ब्राह्मण-स्वज्ञाति गृहस्थ आणून वृत्ति विषयींचें काम चालवितील, त्यांस हरकत करूं नये. कारण, बहूत वर्षें त्यांची वहिवाट असून सुरू आहे. यास्तव त्यांस हरकत न करणें,

१९६घ.

नक्कल महालीं घेऊन अस्सल अर्जदार
यास देणें ता० समजणें.

रामचंद्र भिकाजी सिरस्तेदार.

रवाना ता० १८ रमजान.

सदरील अर्जा पैकीं, नकल हुकूम सह घेऊन अस्सल् अर्जदारांस दिलो असे. ता० १९ रमजान सन मजकूर.

सही.

अमरुद्दीन शेक महंमद.

ना० त० दा०

याचा विचार सर्व पक्षपात्यांकडूनच व्हावा. कारण, यांनीं जर उपाध्यपणादिक कर्मे चालवूं नये; तर सरकाराकडून ब्राह्मण आणण्याविषयीं हुकूम कसा मिळाला असता. असो,

या शिवाय या पांचालादिकांस विद्वज्जनाकडून मिळालेले अनेक दाखले आहेत; परंतु विस्तार भयास्तव त्यांतून कांहीं येथें घेतों. ते पहा.

१९६ङ.

# श्री

# सम्मतिपत्रम् ॥

—000—

स्वस्ति श्रीमच्छ्रेष्ठोपमायुक्तेभ्यः श्रीयुतश्रीधर बाबाजी, गणपत बजाबा, लक्ष्मण दशरथादि विश्वकर्म कुलोत्पन्नेभ्यो वेदधर्म श्रद्धालुभ्यो, दयानंद सरस्वती स्वामिन आशिषोभूयासुस्तमांश मिहास्तितत्रत्यमाशास्महे. भवद्भिः प्रेषितपत्रमागतंतत्रस्थो वृत्तांतोपि-विदितः यदि मनुष्यमात्रस्यवेदाध्ययनेश्रवणेचाधिकारोस्ति तर्हिभवतां तुकाकथा ? किंतु यो निर्बुद्धिस्सोनधिकारी. बुध्याविना पठन श्रवणयोर्विज्ञानासम्भवाभावात् यो बुद्धिमान् विद्वान् धर्मात्मा कृपालु स्सर्वोपकारी स ब्राह्मणः तदूनो विद्ययाक्षत्रियस्तदूनोवैश्यश्चेति. सर्वेषां मनुष्याणां वेदादिशास्त्रपठणश्रवणाधिकारोस्ति यत्रयजुः संहितादिप्रमाणानिसन्तीतिश्रोतव्यम् ॥ तद्यथा ॥ "यथेमा वाचंकल्याणीमावदानिजनेभ्यः ब्रह्मराजन्याभ्याᳬशूद्रायचार्यायचस्वाय चारणायच प्रियोदेवानामित्यादि" यजुर्वेद अ० २६ मं० २

अस्यायमर्थः ॥ अहं परमेश्वरः जनेभ्यः नाम सर्व मनुष्य हितार्थम् इमाम् ऋग्वेदादिस्वरूपाम् कल्याणीं कल्याणकर्त्री वाचम् यथा येनप्रकारेण आवदानी, आसमन्तादुपदिशानि । तथैव सर्वैर्मनुष्यैः ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्रेभ्यस्तथान्येभ्यः शूद्रविलक्षणेभ्योपिऋग्वेदादिलक्षणा वागर्थात्सर्ववेदाउपदेष्टव्या ॥ अतएव, वेदादिनाम्पठनपाठनश्रवणेषुब्राह्मणक्षत्रियवैश्यशूद्रातिशूद्र स्त्रीणामप्यधिकारोस्त्येवेतिसिद्धम् ॥ तथा, जनश्रुतिः पौत्रायणः सहस्त्रं गवां निष्कमश्वतरीरथम् दुहितरं तदादाय प्रतिचक्रमे शुनकसंवर्गोदावाअग्निरित्यादि छांदो० खं० १ अ० ४ तत्रैवान्यत्र। सत्यकामो जाबालो जाबालां मातरमा मंत्रयांचक्रे ब्रह्मचर्यंभवति विवत्स्यामि किं गोत्रोन्वहमस्मीति सह हारिद्रुमतं गौतममेत्योवाच ब्रम्हचर्यंभवतिवत्स्याम्युपेयां भगवंत मिति, तऽहोवाच किं गोत्रोनु सोम्यासीति सहोवाच नाहमेतद्वेदभोयद्गोत्रहमस्म्य पृच्छं मातरऽसा-माप्रत्यब्रवीद्बह्वहंचरंतीपरिचारिणीयौवनेत्वामलभे साहमेतंनवेदयद्गोत्र स्त्वमसिजाबालातुनामाहमस्मिसत्यकामोनामत्वमसीति सोहऽसत्यकामो जाबालोस्मिभोइति ॥ तऽहोवाचनैतदब्राम्हणोविवक्तुमर्हतिसमिधंसोम्या

हरोपत्वनेष्येनसत्यादगाइतितमुपनयित्यादि छां० अ० ४ खं०१ प्र० ४ तथा, ऋषयो वै सरस्वत्यां सत्रमासत. ते कवषमैलूषं सोमादनयन् दास्याः पुत्रः कितवो ऽ ब्राम्हणः कथं नो मध्ये दीक्षिष्टेति ? तं बहिर्धन्वोदवहन्नत्रैनं पिपासा हंतु सरस्वत्या उदकं मा पादिति. स बहिर्धन्वोदूढ्हः पिपासाया वित्त एत दपोनप्त्रीयमपश्यत् प्र देवत्रा " ब्रम्हणे गातुरेत्विति " तेनापां प्रियं धामो पागच्छत्तमापो ऽनूदायँस्तंसरस्वती समंतं पर्यधावत्तस्मात्धाप्येतर्हि परिसारकमित्याचक्षते. यदेनं सरस्वती समंतंपरिससार. ते वा ऋषयों ब्रुवन्विदुर्वा इमं देवा उपेमं ह्वयामहा इति तथेति. तमुपाह्वयंत तमुपहूयैतदपोनप्त्रीयम कुर्वत प्र, देवत्रा ब्रम्हणे मातुरेत्विति तेनापां प्रियं धामोपा गच्छन्नुपदेवानामुपापां प्रियं धाम गच्छत्युप देवानां जयति परमं लोकं य एवं वेद यश्चेनं विद्वानेतदपोनप्त्रीयं कुरुतेइति ऐतरेयब्राम्हणे पंचिका २ खं १० इत्यादिभिः प्रमाणैः सर्वेषांमनुष्याणां वेदादिनांशास्त्राणां पठन श्रवणाधिकारोस्त्येवेति निश्चयः

१ सम्मतिरत्रार्थेश्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्यश्रीयुतदयानंद
सरस्वतीस्वामिनांसज्जनैर्विद्वद्भिर्वेदितव्येति.

२ अत्रसंमतिपूर्णानंदस्वामि दयानंदसरस्वतीकेअनुयाई.

१ संमति रत्रार्थे व्यासोपनामावैजनाथसूनुलालजी शर्मणा.

१ समतिरत्र भोजानंद सरस्वती स्वामिनः

२ शंकरानंदस्य संमतं.

३ स्वामि नारायणानंद सरस्वती.

४ गजानंद सरस्वती स्वामिनः

५ सम्मतोयमर्थो रामचंद्र छत्रपति शास्त्रिणः

६ संमतिरत्र सूर्यानंद सरस्वती.

७ संमतोयमर्थ नंदलालस्य.

८ संमतिरत्रगंभीरपुरी.

९ समतोयमर्थछोटुलालगौडस्य.

श्रीशंकर.

अनेकश्रीशक्तिसंघट्ट
प्रकाशलहरीघनध्वां-
तध्वंसोविजयते वि-
द्याशंकरभारति.

श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्यवर्यपदवाक्यप्र
माण पारावार पारीणयम नियमासन प्राणाया
म प्रत्याहार धारणाध्यान समाध्यष्टांगयोगानु
ष्ठान निष्ठागरिष्ठ तपश्चक्रवर्त्यनाद्यविछिन्न गुरु
परंपराप्राप्त षड्दर्शन स्थापनाचार्य व्याख्यान
सिंहासनाधीश्वर सकलवेदार्थप्रकाशक सांख्य

त्रयीप्रतिपालक सकलनिगमागमसारहृदयवै
दिकमार्गप्रवर्तक सर्वत्रस्वतंत्रादिराजधानी श्री
विद्यानगर महाराजधानी कर्नाटकासिंव्हासन
प्रतिष्ठापनाचार्य श्रीमद्राजाधिराज गुरुभूमंडला
चार्य तुंगभद्रातीरनिवास ऋष्यशृंगपुरचराधी
श्वरशृंगेरी श्रीविरूपाक्ष श्रीविद्याशंकर देवदिव्य
श्रीपादपद्माराधकशृंगेरी श्रीविरूपाक्ष श्रीमद
भिनवोद्दंडनृसिंह भारतिस्वामिकरकमलसंजात
श्रीमदभिनवविद्याण्य भारतीस्वामिभिः ॥

अस्मच्छिष्यवर्गांतर्गत समस्त सुवर्णकार मंडळीवास्तव्य मुंबई यांप्रतीं आशीर्वादपूर्वक नारायण स्मरण. सांप्रत तुम्हीं येऊन विनंती केली कीं, आम्हांस कोणे कर्माचा अधिकार आहे ? कोणतें कर्म चालवावें ? त्यावरून तुम्हांस आज्ञापत्र दिलें कीं, “ अग्निपुराण ” तथा “ विश्वकर्मोत्पत्ति ” प्रतिपादित श्रुति कर्माचा अधिकार

आहे. तुह्मीं सुखें वेदोक्तकर्म करावें, तथा नमस्कार करावा याप्रमाणें श्रृंगेरी व विरूपाक्ष कर्नाटक प्रांतादिकांत चालत आहे, यांत हरकत नाहीं. आतां हें आज्ञापत्र तुम्हांस योग्य आहे, म्हणून दिल्हें असें, तर यास कोणी एक तुमचे संगाती स्पर्धा व हरकत न करावी; जर कोणी करील त्यास आमची शपत. असे, शके १७०९ प्लवंग नाम संवत्सरे. ज्येष्ट वद्य ९ मी भोमवासरे. "

इत्यलम्.

यावरून इतकेंच सिद्ध होतें कीं, सोनारादिकांस श्रुतीचा अधिकार जर शंकराचार्य लिहित आहेत, तर

" वेदाधिकारिणोविप्रःसर्वकर्माधिकारिणः "

यावचनावरून सोनारादिक यजनयाजनादिक सर्व कर्माचे अधिकारीअसून ब्राम्हण आहेत हें सदरहू जगत्‌गुरु ह्मणविणारांच्या लिहिण्यावरूनच सिद्ध होतें.

या शिवाय "सोंदे मठवाले जे माध्वसंप्रदायी सन्यासी" यांनीं देखील स्वर्णकारेत्यादिक पंचाननात्मजांस दिलेलें आज्ञापत्रहि आहे; परंतु भावार्थ एक असल्यामुळें येथें दाखविण्यांत अंदेश केला. आतां याच विषयावर दुसऱ्या पत्रांचें प्रमाण.

श्रीविरूपाक्षप्रसन्न.

श्रीदिपेदेस्ती तात-
ना सिंहासनारू-
ढाचार्यस्तु भित.

श्रीमन्महादेव परब्रह्मपंचाननो जातात्मकरूढ चतुर्दशभुवन निर्मितषण्मनोधार षड्दर्शनस्थापनाचार्य हम्मपय्यश्रीमज्जद्गुरु रायराजधानीय

श्रीमद्विश्वकर्मवंशपयःपारावारसुधाकर विद्वज्ज
जानुरंजनश्रीमद्वेदवेदांतेतिहासपुराणपारावा
रगांभीर्यमकरकुंडलाभरणभूषित यमानियमा
सनप्राणायामप्रत्यहारध्यान धारणसमाध्यष्टां
ग योगालंकारधूरीण वाग्वादमदेभकेसरीप्रताप
श्रीहंपिहस्तिनावतिशिरः शृंगिकासिकाळहस्ति
पंचसिंव्हासनपूजितगुरुराज श्रीरूढाचार्यानुज
संसारध्ययाचतनुज श्रीमद्विरूपाक्षेश्वरवर
प्रसादलब्ध कवितानिरातंकविद्यानगरसिंहा
सनांकश्रीमत्काळहस्ताचार्यनाम्नाकोटेंद्राचार्य
गर्भाब्धिपयः पारावार हिमकर समान धीरअज
पद्म गुरु स्वामि यांनीं ॥

अस्मदत्यंत सेवानिरत प्रियशिष्य नानाशेट शंकरशेट न

या शिवाय "सोंदे मठवाले जे माध्वसंप्रदायी सन्यासी" यांनीं देखील स्वर्णकारेत्यादिक पंचाननात्मजांस दिलेलें आज्ञापत्रहि आहे; परंतु भावार्थ एक असल्यामुळें येथें दाखविण्यांत अंदेश केला. आतां याच विषयावर दुसऱ्या पत्रांचें प्रमाण.

श्रीविरूपाक्षप्रसन्न.

श्रीदैपेदेस्तीतात-
ना सिंहासनारू-
ढाचार्यस्तुभित.

श्रीमन्महादेव परब्रह्मपंचाननो जातात्मकरूढ चतुर्दशभुवन निर्मितषण्मनोधार षड्दर्शनस्थापनाचार्य रूम्मपथ्यश्रीमज्जद्गुरु रायराजधानीय

श्रीमद्विश्वकर्मवंशपयःपारावारसुधाकर विद्वज्ज
जानुरंजनश्रीमद्वेदवेदांतेतिहासपुराणपारावा
रगांभीर्यमकरकुंडलाभरणभूषित यमनियमा
सनप्राणायामप्रत्यहारध्यान धारणसमाध्यष्टां
ग योगालंकारधुरीण वाग्वादमदेभकेसरीप्रताप
श्रीहंपिहस्तिनावतिशिरः शृंगिकासिकाळहस्ति
पंचसिंव्हासनपूजितगुरुराज श्रीरूढाचार्यानुज
संसारध्ययाचतनुज श्रीमद्विरूपाक्षेश्वरवर
प्रसादलब्ध कवितानिरातंकविद्यानगरसिंहा
सनांकश्रीमत्काळहस्ताचार्यनाम्नाकोटेंद्राचार्य
गर्भाब्धिपयः पारावार हिमकर समान धीरअज
पद्म गुरु स्वामि यांणी ॥

अस्मदत्यंत सेवानिरत प्रियशिष्य नानाशेट शंकरशेट व

देशस्थ.व कोंकणस्थ समस्त पंचानन दैवज्ञ ऊर्फ स्वर्णकार मु० जंजिरे मुंबई यांसी संध्याकालत्रयेपि आयुरारोग्य ऐश्वर्य पुत्रपौत्राभिधन कनकवातुवाहनाद्यनेक भोगभाग्य धुरंधर छत्र चामरांदोलनाद्यष्टैश्वर्य लक्ष्मीसमृद्धिर्भवत्विति ॥ व ॥ योवैतांब्रह्मणो वेदांअमृतनामृतापुरीं तस्मैब्रह्मचब्रह्माचआयुःकीर्तिंप्रजांददुरितिश्रुतेः कश्यपोविश्वकर्माणंभौवनमभिषिषेचतस्माद्विश्वकर्माभौवनःसमंतंसर्वतःपृथीवींजयनन्परीयायाश्वेनचमेध्येनेजे ॥ अथमंत्रार्थाः अस्याः श्रुतेर्व्याख्यानंप्रतिपदामिष्यामि श्रीमद्भिःश्रुयतांसावधानेन विश्वकर्मणःचराचरात्मकप्रपंचेमहाजलमग्ने " अणोरणीयान्महतोमहीयानित्यादिश्रुतेःप्रामाण्याववोधकविराट्स्वरूपंकश्यपोनामपरब्रह्मसमस्तभूर्भुवः स्वरादिलोकनिर्माणंचिकीर्षन्सन्तदपेक्षयास्वयमेवरूपांतरेणविश्वकर्माभिधेयमवधार्यतत्प्रभावजन्यविश्वकर्माकथमित्यपेक्षयामह कश्यपइति ॥ समस्तभुवनाधीश्वरः ॥ विश्वकर्माणं विश्वानां भुवनानां कर्मयस्यस विश्वकर्म अनेकमन्यु पदार्थ इति वहुव्रिहिस्तं विश्वकर्माणं प्रजापतिर्विश्वकर्माम नोजयत्विति श्रुतेर्विद्यमानत्वात्अभिषिषेचषिरूवसरणे परोक्षेलट्ति पस्छा इत्यादिनातिप्रत्ययःतिपोणलादेशः लिटिधातोरणभ्यासस्येति द्वित्वंअभिषिषेचेतिरूपसिद्धिः तत्सामर्थ्यत्वात्पंचाशत्कोटि निस्तीर्णसृष्टि

र्जन्यत्वात्सूचनार्थं श्रुतिप्रमाणं तस्मादित्यर्थः भूर्भुवःस्वरादि समस्तलो
काधीश्वरः विश्वकर्मइदं पारदृश्यमानंभूमंडलं जनुःसर्वोत्कर्षेणप्रव
र्ततइत्यर्थः तस्यविश्वकर्मणोरात्रिःपार्श्वनक्षत्राणि रूपंज्योतीरूपमित्यर्थः
अश्विनीव्याप्तमितिअश्विन्यादि सप्तविंशतिनक्षत्रमाहुः निराकाररूपेण
रात्रौ कालज्ञानकारणं संचरणोव्याप्तिस्तद्विश्वकर्मणो व्याप्तिरुच्यते ॥
पृथिव्यापस्तेजोवायुराकाशा श्चतुर्विंशतितत्वाश्च महेंद्रवचनाज्ज्येष्ठदिक्
पालश्चयुगवर्षर्तुमासपक्ष तिथिवारनक्षत्रयोगकरणवेदवेदांग शास्त्रपु
राणेतिहास स्वरूपश्चभोक्तृत्वा प्रेरकवस्तुहेतुश्च स्थावरजंगमात्मप्रपंच
संचितश्चसत्वरजस्तमस्वरूपश्च परात्परचिदानंद ब्रह्माख्यविकर्षजग
त्कर्तापरमेश्वरानुसम्मंधिः तद्विश्वंप्रसिद्धितइत्यर्थः * ** द्रूमिःभूमेरोषधि
बीजानिबीजान्निखिलसस्यानि सस्योद्भवंधान्यंधान्योद्भवमन्नं अन्नेद्भवंति
देवरसः तद्रसेनजंतोरेतःशुक्लशोणित रूपमेवाहतस्मात्पिंडः समुत्पन्नाः
समुत्पन्नानि जंगमरूपाणि जातानितानेवाहप्रातिष्ठितानि पंचमुखेभ्यः
पंचशीर्षितदेवब्रह्मादिवस्पति रथकारस्यआधानोपनयन संस्कारक्रिया
लयप्रतिष्ठावास्तुविद्या ध्ययनवृत्तिताचोत इतिवेदोक्तआशीर्वचन ॥
सांप्रत विरोधिनामसंवत्सर मार्गशीर्ष वद्य १३. पर्यंत समस्त शिष्य-
वर्ग सहित धारवाडस्थलीं आनंद जाणून तुह्मां सर्वत्रांचें क्षेमातिशय

सदां विज्ञापन पत्रिका लिहून चित्त संतोषवित आलें पाहिजे. विशेष आतां चिरंजीव राजेश्री फडुनारायण शेट टंकसाळी बांवडीकर हे आमचे समक्ष आले आहेत. त्यांणीं आपलें सर्व वर्तमान निवेदन केलें नंतर संतोष पावलों. येथील वर्तमान सर्वही नारायण स्मरणपूर्वक तुह्मांस पत्र लिहिलें आहे त्याजवरून कळों येईल मुख्यांतून सर्वत्रांस आम्हीं दर्शन द्यावें ऐसी अभिलाषा आहे सर्व जाणतां. मुख्य शिष्य समूहां प्रती नूतन उपचार लिहिणें नलगे, हे श्रीमुखापासून तुमची सर्वत्रांची नांवनिशी लिहून पाठिवणें.

## अर्थ.

आमचे अत्यंत सेवातत्पर प्रिय शिष्य नानाशंकर-शेट व शेट व देशस्थ कोंकणस्थ समस्त पंचाननात्मज दैवज्ञ उर्फ स्वर्णकार मुकाम मुंबई यांसीं संध्याकालत्रयीं आयुरारोग्यै-श्वर्य पुत्रपौत्राभिधन कनक वस्तुवाहनाद्यनेक भोगभाग्य धुरेचें धारण करतें आणि छत्र चामरांदोलनाद्यष्टैश्वर्य लक्ष्मी समृद्धि होवो. आणखीं; योनैतामितिप्रजाददुरितिश्रुति आणि कश्यप

इतिमंत्र या उभयांचा अर्थ सांगतों आपण सावधानपणानें ऐकावें. विश्वकर्म्यानें चराचर जग ज्याकालीं महाजलामध्यें बुडालें त्यासमई "अणोरणीयान्" याप्रकारच्या श्रुतीनें प्रतिपाद्य जें परब्रम्ह त्यापासून जालेला जो महाकश्यप तोच पुनः भूर्भुवः स्वरादि लोक निर्माण करण्याची ईछा करून आपणच विश्वकर्म या नावांचा अवतार धारण करून सृष्टि निर्माण करिताजाला. विश्वकर्मा हें नाव प्राप्त होण्याचें कारण विश्व उत्पन्न करणें हेंच आहे, मुख्य कर्म ज्याचें असा शब्दार्थ अनेक अन्य पदार्थ असें व्याकरण सूत्रानें होणारा जो बहुव्रिहि समास त्याणे प्राप्त होतो. विश्वकर्माणं प्रजापतिरिति जी श्रुती तीच्या तात्पर्यानें हि विश्वकर्माच सर्व सृष्टिचा निर्माण करिता असे श्रुतिप्रमाण्यानें सिद्ध होतें. तस्य विश्वकर्मणो धनुपंचशीर्षेभ्यः पंचशीर्षा एथपर्यंत लिहिलेल्या ज्या श्रुति यांचा तात्पर्यावलोकनेंकरून पाहातां विश्वकर्म वंशीय जे रथकारित्यादिक देवज्ञ ऊर्फ स्वर्णकार यांजला उपनयन, वेदाध्यन, आलयप्रतिष्ठा, वास्तु, अध्ययनादि वृत्ती, सांगितल्या आहेत. याज-

वरून वेदोक्त कर्म करावें, असें स्पष्ट दिसत आहे. वेदोक्त आशिर्वाद असो. समस्त शिष्य मंडळींसहित धारवाडस्थलीं आहों

तैलंगीसही.

ही नक्कल तैलंगीलिपींत असल्या कारणानें यांतील अक्षर बरोबर समजलें जात नाहीं. सबब अजमासावरून याचें हें भाषांतर केलें आहे.

याशिवाय यांचें ब्राह्मण्यनिर्विवाद आहे येतद्विषयीं अन्याधार ही आहेत, ते हेकीं,

## श्रीकाशिस्थपंडितैर्लिखितानिप्रमाणानि.

दैवज्ञ पांचाल रथकार सोनार सर्व पृथ्वीमय समुद्र वलयांकित पर्यंत यांसीं ब्रह्मकर्माची अर्हता आहे त्यास संमत श्रुति, स्मृति, पुराण, इतिहास, सुत्रें, मिमांसादिकरून प्रमाणें आहेत.

॥ श्रुति १७११ ॥

१ विश्वरूपोवैत्वष्टापुरोहितो देवानामासित् अस्यार्थम्तु विद्यारण्य चरणैर्व्याख्यातः ॥

१ त्वष्टासोमपिबस्त्वोहिति, विद्यारण्यचरणैः

१ त्वष्टाहतपुत्रो इंद्रसोममाहर.

१ त्वष्टारूपाणामधिपतिः •

१ त्वष्टेदं विश्वं भुवनं जजान.

१ अनवस्तेरथमश्वायुतक्षंत्वष्टावज्रं पुरहूतं द्युमत्तम्.

१ त्वष्टास्यवज्रं स्वयंततक्षेति.

१ ऋभूणांत्वादेवनांव्रतपते व्रतेनादधामीति.

१ तृतीयं संवृतं कवीनामिति.

१ त्वष्टास्मैवज्रंस्वयं तक्षयति.

१ आदित्यानांत्वेतिभृगूणांत्वाआंगिरसाव्रतपतइति.

॥ यांचीं भाष्यें असून त्यांत संपूर्ण विस्तार आहे.

॥ सूत्रें ॥

॥ कात्यायनसूत्रपरिभाषा अध्यायाचीं भाष्यें.

१ कर्कभाष्य.
१ देवयाज्ञिक.
१ माधविकाण्णवसंहिता.
१ श्री अनंत.

## हिरण्यकेशी सूत्र व त्याचें भाष्य

## वैजयंती.

१ बौधायनसूत्रभाष्य.
१ अपस्तंबसूत्रसभाष्य.
१ आश्वलायन अनुक्रमणिका.
१ षड्गुरुभाष्य.
१ जैमिनिसूत्रमिमांसाधर्मशास्त्रें.

१ संस्कारसार.
१ स्मृतिदर्पण.
१ विज्ञानेश्वर.
१ नृसिंहप्रसाद.
१ गोविंदार्णव.
१ शिल्पशास्त्र.

## पुराणें.

१ शैवपुराण
१ आदित्यपुराण.

१ लिंगानुशासन.
१ भारत आदिपर्व.
१ विराटपर्व.
१ ब्रह्मवैवर्त.
१ वराहपुराण.
१ स्कंदपुराण.
१ काशीखंड.
१ नागरखंड.
१ रामायण.
१ विष्णुपुराण.
१ भागवत.
१ पद्मपुराण.

मीमांसा

१ भाट्टदीपिका.
१ तंत्ररत्न.
१ व्याख्यानपार्थ.
१ रुद्रदत्तरामांडरूव्याख्यान.

## श्रीक्षेत्रकाशिस्थपंडितानांसंमतिपत्रं.

अथ स्वर्णकारणांवैदिककर्माहत्वेविवेचनीयेतत्रापस्तंबशाखांतर्गतानेक श्रुति, स्मृति, विद्यारण्यचरणभाष्य, कात्यायनसूत्रतद्भाष्य, हिरण्यकेशीयसूत्रतद्भाष्य, धूर्तभाष्य, बौधायनसूत्रतद्भाष्य, आश्वलायनसूत्रानुक्रम

णिका, षड्गुरुभाष्य, जैमिनिसूत्र, मीमांसाशास्त्र, कर्कभाष्य, आदित्य पुराण, स्कंदपुराणनागरखंड वराहपुराण कालिकापुराण रुद्रदत्तरामांडार, याज्ञवल्क्यस्मृत्याद्यनेकश्रुतिस्मृतीतिहासपुराणादिपर्यालोचनयारथकारग्रंथतात्पर्यार्थनिर्णयः ॥ तथाहि ॥ विश्वरूपोवैत्वाष्ट्रइतिश्रुतेः ॥ त्रिशिरस्मृतिः ॥ त्वष्टुःपुत्रःपुरोहितोदेवानामासीत्इति ॥ अस्यार्थः ॥ अथचत्वष्टुः त्वष्टासोमंपिबेतिसोमपानविधायकवाक्यमपित्वष्टाहतपुत्रइतियज्ञाधिकारविधायकंवाक्यंचत्वष्टुर्देवरथकारत्वंचअनवस्तेरथमितिश्रुत्यालभ्यते ॥ एतेषांरथकाराणांतद्वंशजत्वंनागरखंडस्कंदपुराणादौस्पष्टं ॥ अथचरथकारशब्दस्यतुपंकजादिपदवद्योगरूढिः ॥ वर्षासुरथकारोग्निमादधीतेत्यादिवाक्यबलप्रामाण्यात् ॥ एतेषांवेदविहितकर्मानुष्ठानयोग्यताच ॥ अतएवविज्ञानेश्वरेणापिरथकारस्योपनयनसंस्कारक्रियालयप्रतिष्ठारथवास्तु,विद्याध्ययनवृत्तिताचोक्ता ॥ तथावराहपुराणेपि ॥ जातकर्मादिसंस्काराब्राह्मणानांयथाविधिः ॥ तथैवमनुनाप्रोक्ताःविश्वकर्तुर्विशेषतः ॥ विश्वकर्मसुताह्येतेरथकारास्तुपंचच ॥ वैदिकेनैवमार्गेणतद्वंशानांविशेषतः ॥ स्वर्णकारोदारुकारेशिलाकारस्तथैवच ॥ आयस्कारस्ताम्रकारःपंचैतेरथकारकाः ॥ अतएवशिल्पिशास्त्रे ॥ आदौशौचविधिंकृत्वाइत्याद्यारभ्यकर्माण्यष्टादशकर्मादिस्यंतेनस्वाध्याया

ध्ययनमप्युक्तं ॥ किंच स्कंदपुराणे नागरखंडे विश्वकर्मवंशजानां वैदिक
कर्माधिकारत्वंस्पष्टमेवोक्तं ॥ विश्वकर्मतनूजस्य पत्नीदक्षस्यचाभवत् ॥
वरुणोनामविख्यातो ब्रह्मर्षिस्तनयोभृगोः ॥ विश्वकर्मतनूजस्य भार्या
भूतस्यशिल्पिनः ॥ एतेषांवैदिकंकर्मभविष्यतिनसंशयइति ॥
तथास्कंदपुराणे मनुःपूर्वमुखोद्भूतोमयोयाम्यमुखोद्भवः ॥ पश्चिमास्ये
भवत्त्वष्टादैवज्ञश्चोतरःमृस्तः ऊर्ध्वायांशिल्पिसंभुतःपंचगर्भमुनीश्वराः ॥
इत्यादिनाउत्पत्तिमुक्त्वाअग्रेवेदोक्ताधिकारश्चोक्तः ॥ चौलोपनयनंचैव
वेदाध्ययनपूर्वकं ॥ एतेचविश्वकर्मापिब्रह्मकर्मयथाक्रममिति ॥ तेनाग्रेतदे
वोक्तं ॥ स्कांदे ॥ स्कंदमैत्रेयसंवादे ॥ मेदोरूपत्वात्अस्पृश्यामेदिनी
तदानारदेनविश्वकर्माप्रार्थितः ॥ विश्वकर्मस्त्वमदैवब्राह्मणान्मुखतःसृ
जेतिइत्यादिनाब्राह्मणसृष्टिमुक्ता ॥ भूमावागम्यतेसर्वेविश्वकर्मप्रसादतः
॥ पवित्रामेदिनींकर्तुंचक्रुस्तेदुष्करंतपः ॥ तपःसामर्थ्यतःसर्वेस्वर्णाका
रांचमेदिनीं ॥ पवित्रांकृतवंतोहिब्राह्मणाःसकलक्रियाः ॥ तान्दृष्ट्वा
थमुदंप्राप्यविश्वकर्माजगत्प्रभुः ॥ ब्रम्हणासहतेषांवैनामधेयंददौ
तदा ॥ यतःस्वर्णकृताभूमिः स्वर्णकाराभविष्यथेत्यादि-
नोक्तं ॥ युष्मत्स्थितिर्भूमंडलेस्यात् भवंतोब्रम्हवल्लभाः ॥

इत्यादिनाभूमंडलनिवासंवृत्यर्थंकटककुंडलनिर्माण कौशल्यलाभमुक्त्वा ॥ अग्रेपि ॥ तस्यवेदविदःश्रेष्ठाः ब्राम्हणाःपरमेष्ठिनः ॥ महादेवाज्ञयापूर्वं वासनासहितामुखात् इत्यादिनातदुत्पत्त्यादिकमपिप्रपंचितं ॥ मिताक्षरायामपिएवमेव ॥ स्कंदपुराणपर्यालोचनयामप्येवमेव ॥ अग्निपुराणांतर्गतमुत्पत्तिंभृगुराह ॥ अग्निभ्यइदमुत्पन्नंमिथुनंकार्यसाधकं ॥ नाडिहस्तःपुमान्योषित् कुंडिहस्ताप्रदृश्यते ॥ तस्मादिदंस्वर्णरौप्यधातुकार्यप्रसाधकं ॥ वन्हिरेतःसुवर्णंचविदंवन्हिसमुद्भवं ॥ तत्कार्यसाधनंश्रेष्ठंभविष्यतिनसंशयः ॥ अग्निदेवात्समुत्पन्नंतस्मात्देवाग्निसंज्ञितं ॥ सुवर्णस्यकृतौदक्षंस्वर्णकारमतःस्मृतं ॥ नाम्रद्वयंतुशांडिल्यंगोत्रमेतस्यकीर्तितं ॥ भविष्यतिप्रजाह्यस्मात्गोत्रानेकप्रवर्तिनी ॥ प्रसिद्धाःसर्वदेशेषुस्वर्णकारेतिसंज्ञया ॥ निषेकादिस्मशानांताःपूर्तेष्टाः सकलाःक्रियाः ॥ भक्तिमद्भिःप्रकर्तव्याः श्रुत्युक्तेनैवमार्गतः ॥ सर्वपुराणे स्फुटं तस्य स्वर्णकारवंशस्य प्रसिद्धित्वेन नंदांतं क्षत्रियकुलमित्यादिना क्षत्रियवंशस्येव, स्वर्णकारवंशस्य छेदादर्शनमतएवकर्नाटकआंध्रद्रविडदेशादिषु वेदोक्तषट्कर्मोपभोगस्य नमस्करण क्रियायाश्च प्रसिद्धत्वेन सर्वप्रकारैः स्वर्णकाराणां वैदिककर्मार्हत्वमस्तीति सिद्धांतोवगम्यते ॥ कोंकणमुंबईग्रामस्थ शंकरशेटप्रमुख समस्त दैवज्ञ देवाग्नि सुवर्णकाराः

विद्वत्सकाशामागत्य अस्माकं कीदृशं कर्म, कोवा आचारः इति पृष्टवंतः तदनंतरं विद्वद्भिः बहुविधग्रंथपर्यालोचनया तदीय पूर्वापर वैदिककर्मोपभोगप्रमाणेनच श्रीमच्छंकराचार्य काशिस्थपंडित प्रतिष्ठानग्रामस्थपंडितकृत अनेक सिद्धांतनिर्णय पत्रावलोकनेन च एतेषां तद्देशीयत्वेन श्रुति कर्माधिकारंविनिश्चित्य कृत्वादत्तमिदं सिद्धांत निर्णयपत्रं ॥ शकाब्दाः १७३७ युवानामसंवत्सरेआषाढशुद्धदशम्यांलिखीतमिदं

लिखितार्थेविदुषांसंमतिः

१ अभिमतोयमर्थस्तस्वेंकटाचार्यशास्त्रिणः
१ चिंतामणभट्टदामळे.
१ शेषशास्त्रिणःसंमतोयमर्थः
१ उक्तेअर्थेगरुडाचलशास्त्रिणःसंमतिः
१ अनंताचार्यशास्त्रिणःसंमतं
१ वेहडेकरोपनामकसदाशिवभट्टस्यसमतं
१ नारायणशास्त्रिणःसंमतं
१ बाळंभट्टपुराणिकस्यसंतिराईरकर.

१ संमतोयमर्थवेंकटशास्त्रिण:

१ संमतोयमर्थव्यंकटनारायणशास्त्रिण:

## अर्थ.

अथ ह्मणजे प्रश्नानंतर स्वर्णकारित्यादिकांस वैदिक कर्म करण्याविषयीं अधिकार आहे किंवा नाहीं, या विषयीं विचार पाहतां आपस्तंब शाखांतर्गत बहुत श्रुति आणि स्मृति व त्यावर केलेलें विद्यारण्याचें भाष्य आणि कात्यायनसूत्र आणि त्याचें भाष्य तसेंच हिरण्यकेशीसूत्र व त्याचें भाष्य तसेंच धूर्त भाष्य आणि बौधायनसूत्र व त्याचें भाष्य आणि आश्वलायन सूत्राची अनक्रमणिका आणि षड्गुरु भाष्य व जैमिनी सूत्र तसेंच मिमांसा शास्त्र आणि कर्कभाष्य व आदित्यपुराण आणि स्कंदपुराण आणि नागर खंड व वराहपुराण व कालिका पुराण आणि रुद्रदत व रामांडार व याज्ञवल्क्यास्मृती तसेच अनेक श्रुति व स्मृती व इतिहास व पुराणें यांच्या तात्पर्यावलोकनेंकरून व रथकारग्रंथ तात्पर्यार्थ पाहून जो निर्णय झाला तो

असा कीं "विश्वरूपोवै०" अशी जी श्रुति व त्रिशिर स्मृती व त्वष्टुपुत्र० इत्यादिक त्या श्रुती, त्यांचा अर्थ आणि त्वष्ट्यास सोमपान विधायक जें वाक्य आणि त्वष्ट्याला यज्ञाधिकार विधायक जें वाक्य आणि त्वष्ट्याला देवरथकारत्वा विषयीं जी अनवस्ते अशी श्रुती तीणें प्राप्त होतें, आणि हल्लीचे जे स्वर्णकार ह्मणजे लोकांत सोनार या नावानें प्रसिद्ध हे त्या त्वष्ट्याच्या वंशांतले आहेत, असें नागरखंडांत स्पष्ट आहे; आणि रथकार शब्द पंकज शब्दासारिखा योगरूढ आहे, व वर्षाकालीं रथकारानीं अग्नीचें आधान करावें, अशा वाक्यबलानें यांजला वेदोक्त कर्माचें अनुष्ठान करण्याची योग्यता आहे; ह्मणूनच विज्ञानेश्वरानें रथकारेत्यादिकांस, उपनयन संस्कार आणि आलय प्रतिष्ठा रथवास्तु विद्याध्ययन वगैरे सांगितलें. तसेच वराह पुराणांतही जातकर्मादि संस्कार जसे ब्राह्मणांस यथाविधी तसेंच मनुनें विश्वकर्म्यास विशेषतः सांगितले आहेत. विश्वकर्म्याचे पुत्र हे रथकारादि पांचजण यांचा वंशीयांस वैदिक कर्म करूनच संस्कारादिक होय. आतां रथकार

पांच कोण कोणते ? ते हे; स्वर्णकार, १ दारूकार दुसरा, शिलाकार तिसरा, अयस्कार चवथा, ताम्रकार पांचवा, असें या भेदेंकरून. अतएव शिल्पि शास्त्रांत इतकेजणांस आचार कथन प्रसगीं शौचाविधिपासून वेदाध्ययन पर्यंत अष्टादशकर्मे कनुक्रमेंकरून सांगितलीं आहेत; आणखी स्कंदपुराणांतर्गत नागरखंडीं विश्वकर्मवंशीयांस वैदिक कर्माधिकार आहे, ह्मणून स्पष्ट लिहिलें आहे. विश्वकर्मा जो त्याच्या शरीरापासून उत्पन्न झालेला जो दक्ष याची येक पत्नी व वरूण या नांवाचा विख्यात ब्रह्मर्षि भृगुऋषीचा पुत्र व विश्वकर्म तनूपासून झालेला जो शिल्पी याची भार्या या सर्वांस वैदिकर्म असावें यांत संशय नाहीं, असें सांगितलें आहे; व स्कंदपुराणांत तसाच उत्पत्तिप्रकार लिहिला आहे तो याप्रमाणें; कीं मनु पूर्वमुखापासून झाला व मय दक्षिणमुखापासून झाला, त्वष्टा पश्चिममुखापासून झाला, उत्तरमुखापासून दैवज्ञ झाला, आणि ऊर्ध्वमुखापासून शिल्पी झाला, याप्रमाणें पांच गर्भतः मुनी झाले अशाप्रकारें उत्पत्तिप्रकार सांगून पुढें वेदोक्त कर्माचा अधिकार आहे

असें सांगितलें आहे, तो प्रकार असा कीं; चौळ आणि उपनयन तसेंच वेदाध्ययन हीं कर्मं वर सांगितलेले पांच मुनीश्वर यांणीं यथा क्रमें करून करावीं, आणि स्कंदपुराणांत स्कंद मैत्रेय संवादें करून लिहिलें आहे, तें असें कीं; पूर्वीं पृथ्वी मेदोरूप अस्पृश्य होती, तेंव्हां नारदानें विश्वकर्म्याची प्रार्थना केली; कीं हे विश्वकर्मा तूं आजच ब्राह्मणातें मुखें करून उत्पन्न कर, अशा प्रकारें ब्राम्हण उत्पन्न करवून पृथ्वीवर त्या सर्वांनीं येऊन शिवकर्म्याच्या प्रसादें करून त्या पृथ्वीस पवित्र करण्याकरितां पुष्कळ तप केले. मग त्या तपोबलें करून पृथ्वीला सुवर्णाकार (तेजोमय) केली व पवित्र करावी ह्मणून सकल क्रिया ह्मणजे कर्में करूं लागले नंतर त्या ब्राह्मणांतें पाहून सर्व जगताचा प्रभू जो विश्वकर्मा हा हर्षातें पावला. नंतर ब्राह्मदेवासहवर्तमान त्या ब्राह्मणांस नामाभिधान दिलें कीं, ज्यापेक्षां पृथ्वी सुवर्णाकार केली तेंव्हां तुह्मीं स्वर्णकार असे प्रसिद्ध नांवाचे व्हाल. असे सांगितलें व तुमची स्थिती भूमंडळाचे ठाईं असो; आणि तुम्हीं ब्राम्हणांत प्रिय व्हा; आणि उपजीवन होण्याकरितां कडी कुंडलें इत्यादिनें कालंकार चातुर्यानें निर्माणकरून त्यांचे लाभानें उपजीवन करा

असें सांगितलें आहे. व स्कंदपुराणाच्या अवलोकनें करूनही असेंच दिसतें, व त्याचप्रमाणें अग्निपुराणांत भृगुऋषींनें उत्पत्ति प्रकार लिहिला आहे. तो असा कीं, अग्निपासून एक मिथुन म्हणजे स्त्री आणि पुरुष हें उत्पन्न झालें, ते जगताचें कार्य साधन करण्यास्तव झालें, त्यांत पुरुष जो झाला तो नाडीहस्त म्हणजे फुकणी हातांत घेतलेला व स्त्री कुंडीहस्ता म्हणजे कुंडी हातांत घेतलेली त्याणीं सोनें रूपें याचा कार्याचें साधन करावें, कारण सुवर्ण हें अग्नीचें रेत होय व स्त्री पुरुष हे ही अग्नीपासूनच झाले, तेव्हां तदर्थेच झाले यांत संशय नाहीं. अग्निदेवापासून झाले म्हणून देवाग्नि नांवातें पावलें सुवर्णाच्या कृतीविषयीं दक्ष म्हणून स्वर्णकार अशीं दोन नावे व त्यांजला गोत्र शांडिल्य असें दिलें यांजपासून अनेक गोत्रें प्रवर्तन करणारी स्वर्णकार या नांवानें सर्व देशांत प्रसिद्ध असी प्रजा होईल. ईणें गर्भाधानादि स्मशानांत क्रिया कर्मे श्रुत्युक्त मार्गानें भक्तिपूर्वक करावीं; कारण सर्व पुराणांत स्वर्णकार वंशाची प्रसिद्धी आहे, जसें क्षत्रियवंश नंदराजापर्यंत राहाणार पुढें राहाणार नाहीं; तसा या स्वर्णकारांचा वंशाचा उच्छेद व्हावा असें कोठेंच नाहीं, एवढ्या करितां कर्नाटक आणि तैलंग व

द्राविड देशांत वेदोक्त मार्गानें कर्माचा उपभोग व नमस्कार करण्याची वहिवाट आहे, तेव्हां स्वर्णकारादिकांस वैदिक कर्माची अधिकारिता आहे, असा सिद्धांत दिसून येतो. हल्लीं कोंकणांतील मुंबई ग्रामस्थ शंकरशेट प्रमुख समस्त दैवज्ञ देवाग्नि सुवर्णकार यांणीं विद्वानांपाशीं येऊन विचारिलें कीं आह्मांस कोणते कर्माचा अधिकार व कोणे प्रकारें करावें, यावरून विद्वानांनीं अनेक ग्रंथतात्पर्य पाहून स्वर्णकारांस पूर्वींपासून वैदिक कर्माचा अधिकार आहे, ह्मणोन श्रीमच्छंकराचार्य व काशिस्थ पंडित व पैठणचे पंडित यांणीं केलेल्या अनेक सिद्धांतांचा पत्रांचा निर्णय तो समग्र पाहून या स्वर्णकारांस विश्वकर्म वंशीयत्व आहे सबब वेदोक्तकर्म करण्यास निश्चयपत्र दिलें आहे.

वर लिहिलेल्यास मान्यता देणारांचीं नांवें आहेत.

सारांश जर करितां सोनारादिकांस वेदोक्त कर्माचा किंवा उपाध्येपणादिक चालविण्याचा अधिकार नसता तर या पंडितेयादिकांनीं शास्त्ररीत्या आपलें मत दिलें असें काय ? कधींच दिलें नसतें. तस्मात् ज्याअर्थीं विद्वान लोकांचेंदेखील

मत या स्वर्णकारेत्यादिक लोकाविषयीं निर्विवाद मिळतें त्याअर्थी हे प्राचीन कालापासून उपाध्ये होते व सांप्रत कालपर्यंत आहेत असें ह्मणण्यास कांहींएक बाधक दिसत नसून याविषयीं प्रदर्शित प्रतीचे अनेक आधाराहि मिळतात. आतां मागें प्रभासपुत्र विश्वकर्म्यापासून, हे जाले असावें अशी जी शंका घेतली होती, त्याप्रमाणें जरी कबूल केलें तरी पौरोहित्यपणाचा अधिकार श्रीमद्भागतोक्ति वरून निर्विवाद या स्वर्णकारेत्यादिकांकडे लागू होतो. कारण भागवतांत

"वृणीमहेत्वोपाध्यायं ब्रह्मिष्टंब्राह्मणंगुरुं ॥
यथांऽजसाविजेष्यामः स्वपत्नांस्तवतेजसा
इत्याद्यारभ्य ॥ पौरोहित्यंव्रतश्चक्रे परमे
णसमाधिनाइत्यंतं" ॥

इत्यादिक वचनें असून या वचनांचा भावार्थ पहातां विश्वकर्मा हा देवांचा पुरोहित होता, हें सिद्ध होत असून याविषयीं

" विश्वरूपोवैत्वाष्ट्रः पुरोहितोदेवानामासी
त्स्वस्त्रियोसुराणांतस्यत्रीणिऽशीर्षान्यासन् ॥
त्वष्टासोमंपिबत्स्वाहेतिश्रुतिः ॥ तथा ॥
त्वष्टाहतपुत्रोवींद्रं सोममाहरत्तस्मिन्निंद्रउप-
हवमैछत् ॥ इत्याद्यारभ्य ॥ त्वष्टाहवनीय
मुपप्रावर्त्तयत्स्वाहेंद्रशत्रुवर्धस्वेतिसयावदूर्ध्वः
पराविध्यतीतिपर्यंतं " ॥

या श्रुतींचें प्रमाणही आहे. तर यासर्व वचनांवरून सूक्ष्म विचार करून पाहतां प्रभास पुत्र विश्वकर्म्यापासून जरी यांची उत्पत्ति आहे असें ह्मटलें, तरी यांचे ठिकाणी उपाध्यपणादिक कर्मैं निर्विवाद होतीं व आहेत असें ह्मणता येतें. याशिवाय प्रस्तुत काळीं देखील या स्वर्णकारेत्यादिक पांचाल ज्ञातींत जे उपाध्ये, कीर्तनी, जोतिषी, शाकुनें त्यादिक शास्त्रांचे अधित असे अनेक विद्वान् प्रसिद्धपणें आढळतात. त्यावरून हे विद्वान् होते असें ह्मणण्यास

किमपि संशय वाटत नाहीं. आतां सर्वांच्या अवलोकनार्थ, त्या सर्वांचीं नांवें या सदराखालीं दाखवितों तीं पहावीं.

## पांचाल मंडळींतील वैदिकांचीं नांवें.

वे०रा०रा० भास्कर विश्वनाथ भटजी राहणार मु० मुं० हे याज्ञिक व ज्योतिष विद्येविषयीं फार चतुर असून अती शांत आहेत.

„ शंकर अनंतभट. हे वैदिक विद्येंत प्रवीण असून मुंबईतच राहतात.

„ सदाशिव कृष्णंभट अरमने. मु० मुं० वैदिक विद्येंत फार कुशल आहेत.

„ रामकृष्ण गोविंद आर्ते. हे या०

„ केरोविठ्ठल हजारे मु० मुं०वै० पा०

„ रामकृष्ण रघुनाथ भट्ट वडके मु० मुं०

„ पुरुषोत्तम रामचंद्र भट्ट त्रिभुवने मु० मुं०

„ गोविंद बाळकृष्णभट महामुनी० मु० मुं० वै०

वे०रा०रा० बाळकृष्ण बापु भटजी काथे० मु० मुं० वै०.

,, बाळंभट्ट त्रिंत्र सखाराम भट्ट वै०.

,, विष्णुभाऊ भट्ट अरमने मु० पुणे वै०.

,, वामन वेंकटेश भट्ट मु० गोमांतक. वै०.

,, विश्वनाथ रामचंद्र मोहरे. मु० निजामपूर, हे कीर्तन करीत असतात.

,, विष्णुबावा मोहरे मु० नि०.

,, हरी जगन्नाथ बावा क्षिरसागर.

,, नारायण रामचंद्र बावा की०

,, नारायण हरी बावा.

,, भिकु गोपाळ बावा कीर्तनी. मु० कोलापूर.

,, बापु घनश्याम बावा मु० मालवण.

,, शिवराम गणेश बावा केळशीकर की० मु० माप

,, केरोगणेश खादाडे की० मु० नि०

इत्याद्यनेक पढीक या पांचालांत असून यांत कित्येकास वतन ही आहे; व कित्येक इनामदारही आहेत. तर पांचाला

दिकांस नोची गांट जर फोडतां आली नसती तर भिक्षुक शब्द या वरील लोकांत कसा चालूं झाला असता ? तस्मात ज्या अर्थी यांच्यांत भिक्षुक शास्त्री आचार्य इत्यादिक पदव्या जर निर्विवाद चालूं आहेत; तर यांच्या ब्राह्मण्याविषयीं कांहींच संशय वाटत नाहीं.

सारांश याप्रमाणें, श्रुति, पुराणेतिहासा, दिकांच्या आधारानें स्वर्णकारेत्यादिक पांचालांचें निर्विवाद ब्राह्मण्य असून, सांप्रतचे ब्राह्मण व शिष्ट ह्मणविणारे लोक प्रदर्शित आधारांवर लक्ष्यहि न देतां मनास वाटेल त्या रीतीनें स्वर्णकारेत्यादिक पांचालांची निंदा करितात. परंतु नीतिशास्त्रनुसार ह्मटलें असतां स्वर्णकारे त्यादिक या निंदकांनीं केलेल्या निंदेस पात्र हातात असें नाहीं.

“ नदूष्यंतेमहात्मानो दुर्जनानांकटुक्तिभिः ॥
काकमुखाशुचिक्षेपै हीरःकिंमलिनोभवेत् ” ॥
भर्तुहरि.

कारण, याविषयीं असा एक दृष्टांत आहे कीं, कावळ्या

नें आपल्या अपवित्र मुखानें हिऱ्यास स्पर्श केला, म्हणून त्या स्पर्शाच्या योगानें हिरा अपवित्र किंवा मलीन होतो, असें कधींच होणें नाहीं. कारण,

"मलोत्सर्गंगजेंद्रस्य मूर्ध्निकाकःकरोतिचेत् ॥
कुलानुरूपंतत्तस्य योगजोगजएवसः" ॥
सुभाषित.

अ० कावळ्यानें मीं हत्तीपेक्षां मोठा आहे, असें जाणून हत्तीच्या गंडस्थलावर बसून मलोत्सर्ग (हगणें) केला, म्हणून कावळा हत्तीपेक्षां मोठा झाला असें नाहीं. तर त्याणें आपल्या दुष्ट स्वभावानें हत्तीच्या गंडस्थळीं बसून जो मल विसर्जन केला, तो त्याच्या कुलानुरूप केला; म्हणून त्या मलोत्सर्गानें गज नीच आणि कावळा उंच, असें होईल काय? कधींच होणे नाहीं. तर गज तो गज व कावळा तो कावळाच जाणावा. त्याप्रमाणें जरी शास्त्रग्रंथादिक दुष्टांनीं नानाप्रकारचे स्वकपोलकल्पित ग्रंथ घेऊन त्यांच्या आधारानें

स्वर्णकारेयादिकांची अनिर्वाच्य निंदा केली, म्हणून त्या निंदेनें स्वर्णकारेयादिकांस ब्राम्हणत्व नाहीं किंवा ते अब्राम्हण आहेत, असें म्हणतां येत नाहीं. कारण स्वर्णकारेयादिक ब्राम्हण नव्हे, असें सिद्ध करण्यास जेवढे आधार पुढारीं केले, ते सर्व स्वकपोल कल्पित असून असंबद्ध हि आहेत. तर तशा त्या खोट्या आधारांवरून जर कोणीं कोणतेही जातीस दोष देणे असेल; तर प्राचीन ग्रंथांचा कांहींच उपयोग नाहीं, असें सिद्ध होतें. तर असें न करितां प्राचीन स्मृत्यादिक आधारांनीं जर ठीकठीक द्वेष कराल, तर त्या कृतद्वेषानें कांहीं तरी निष्पन्न होईल. न पेक्षां "नलिकागत मपिकुटिलंनभवतिं सरलंशुनःपुच्छं ॥ यान्यायानुसार वर्तन केल्यानें निष्पन्न तर कांहीं येक न होतां तीळ टाकून फूलमात्र उचारून घ्यावें लागेल.

इति पूर्वार्धंसमाप्तं.

# अथोत्तरार्धप्रारंभः ॥

——000——

## अध्याय २.

——000——

प्रथमाध्यायांत स्वर्णकारेत्यादिक पांचालांचें ब्राह्मण्य सिद्धकरण्यार्थ घेतलेल्या श्रुतिस्मृत्यादिकाधारांवरून व शंका समाधानरूपोदाहरणांवरून निंदकलोकांच्या मनाची खातरी न होतां पुनः ते असें ह्मणतात कीं, "सोनारादिकपांचाल जर ब्राह्मण आहेत; तर त्यांमध्यें ब्राह्मणांप्रमाणें षोडश संस्कार कां चालत नाहींत ? शूद्रांप्रमाणें छुरिकाबंधनादिक संस्कारत्रयच कां चालतात ? वास्तविक म्हटलें असतां, छुरिकाबंधन हें केवळ शूद्रांसच उक्त असून याविषयीं मुहूर्त मार्तंड नामक ग्रंथाच्या १७ व्या पृष्ठांतील १७ व्या श्लोकांत

" शूद्राणांमौंज्यभावातदुदिततिथिभेनस्ताशेभे ज्यशुक्रैर्व्यारिवारैल्वेमास्युपयमविहितेछूरिकाबं माहुः "

असें सांगितलें आहे कीं, शूद्रास व्रतबंध संस्काराचा अधिकार नाहीं, म्हणोन मौंजिबंधनास ज्यातिथी, नक्षत्रें व जे वार व मंगळ, शुक्र, गुरु, यांचें अस्त नसतां व मंगळ शनी इत्यादिक वारांचे अंश टाकून मौंजिला जो विहित काल, त्याकालीं छूरिकाबंधन करावें. याप्रमाणें आम्हीं ब्राम्हण लोक सोनारादिकांत छूरिकाबंधन गर्भाधान आणि विवाह मिळुन हे तीन संस्कार पुराणोक्त मंत्रानें करीत असतों. ज्यापेक्षां यांच्यांत हे तीनच संस्कार होतात, तदर्थी ते शूद्र तुल्य आहेत, असें म्हणण्यास बाधक काय ?

बरें, दुसरें एक असें आहे कीं, " हे सोनारादिक लोक जिकडे तिकडे आम्हीं ब्राम्हण आहों असें स्वमुखें करून

मात्र सांगतात; परंतु लोकांत सोनार हे ब्राम्हण असा कां व्यवहार नाहीं.

आणि वास्तविक ह्मटलें असतां याजगांत तर ब्राह्मण ब्राह्मण असा खरोखर व्यवहार आहे. अस्तु त्यांत या स्वर्णकारेत्यादिकांस कोणी स्वाभावीक रितीनें विचारिलें असतां ते आपण ब्राह्मण आहों असें न सांगतां, सोनार, कांसार, दैवज्ञ, त्वष्टा, शिल्पि, मया, इत्यादिक नामें सांगत असून सांप्रत कालीं मात्र आह्मी ब्राह्मण आहों, असें ह्मणून लोकांबरोबर कां वरें वादग्रस्त होण्याचीइछा करितात. कारण खरोखर त्यांचे सांगणें वरून विचार केला असतां सोनारादिक व्यवहारच त्यांचेठिकाणीं सिद्ध होतो. शिवाय ब्राह्मण असा व्यवहार सिद्ध होत नसून जर आग्रहानें आह्मीं ब्राह्मण आहों, असें जर ह्मणतील; तर तें निष्कारण असून अन्य वचनांस विरोध करणारें आहे. कारण, अमूकअर्थी अमुक शब्दाची शक्ती आहे, असें समजण्याविषयीं कारणें पुष्कळ आहेत. तीं असीं कीं, व्याकरण, उपमान, कोश, आप्तवाक्य, व्यवहार, वाक्यशेष, व्याख्यान, आणि सिद्धपदाचें सान्निध्य, इत्यादिक आहेत असें ज्ञानवृद्ध सांगतात. तर यांपैकीं, व्यवहार खेरीज करून व्याकरण

कोश वगैरे तुह्मांस नाम सोनारादिकांस ब्राह्मण ह्मणण्यास संभवत नाहीं. आतां मुख्य कारण जो व्यवहार, तोहि सोनारादिकांविषयीं नसून त्यांस ब्राह्मण ह्मणावें तरि कसें ? म्हणवत्नाहीं. कारण कीं, शक्ती नाहीं. शक्ति म्हणजे शब्दाच्या अर्थासीं जो खरा संबंध असतो त्याला शक्ती म्हणतात. आतां चिंतामणी ग्रंथांतील प्रकार कांहीं शक्ती नव्हे. तर तो असा आहे कीं, अमुक शब्दापासून अमुक अर्थ असा बोध होण्याविषयीं जो संकेत त्याला शक्ती म्हणावी. गंगा शब्दापासून तीराचा बोध इच्छिणारांनीं प्रयोग केला असतां गंगाशब्दास तीरार्थी जी शक्ति तीला लाक्षणीकी म्हणावें. तर येथें जात्याकृति विशिष्ट व्यक्तीच शब्दाचा अर्थ अंगिकार करणारी आहे. तथापि व्यक्तीपेक्षां जातीस अर्थ म्हणण्यानें लाघव असून व्यक्तिपेक्षां ज्ञातीचें ज्ञान प्रथमता पाहिजे. कारण शक्तिज्ञान शाब्द बोधाप्रत कारण होय. प्रभाकर मतीं शब्दाचा अर्थच जात म्हणावी. भाट्टमताप्रमाणें म्हटलें असतां जाति हीच शब्दाची शक्यार्थ आहे. असो. आतां व्यक्तिलाभ म्हटला असतां लक्षणानें अथवा आक्षेपानें जाती विशिष्ट होईल. तस्मात् अशाया सर्व प्रकारांवरून पहातां

शक्तिज्ञान होण्यास, व्यवहार हाच मुख्यकारण असून तो या सोनारादिकांत नसल्यामुळें त्याचें ब्राम्हणत्व सिद्ध होत नाहीं. आतां ते म्हणतील कीं, आम्हांस ब्राम्हण असा व्यवहार आहे. तर जो कांहीं खरोखर व्यवहार म्हणतात, तो सोनारादिकांस संभवत नाहीं; तर त्यांस ब्राम्हण व्यवहार कांहीं दुसऱ्या रीतीनें प्राप्त झाला असेल, कारण ब्रम्ह शब्दापासून अपत्य (पुत्र किंवा गोत्रज) या अर्थीं प्रत्यय होऊन ब्राम्हण शब्द निष्पन्न झाला असेल, तर तो ब्राम्हण शब्द कांहीं रूढ्यर्थ नव्हे; तर यौगिक आहे. आतां ब्रम्ह शब्दाचा अपत्य तोच ब्राम्हण आहे; असें म्हणताल तर ब्राम्हण शब्द चारी वर्णांवर संभव दुर्फक होता. म्हणजे ईश्वराचें मुख ब्राम्हण, भुज क्षत्रिय, उरू वैश्य आणि पायांपासून शूद्र उत्पन्न झाले. यावरून चारी वर्णांवर अपत्यत्व प्राप्त होतें. परंतु योगाला अवयवार्थ रूढीस समुदायार्थ बाधक करण्याविषयीं समर्थ होत नाहीं. फक्त जेथें ज्या रूढीच्या योगानें विवक्षितार्थ सिद्धीप्रत पावेल, व योगार्थ संभवत नाहीं, तेथें ती रूढी मात्र योगास बाधक करील. जसे अश्वकर्ण शब्द

( वृक्ष ) ह्या अर्थी रूढ आहे, येथें योगार्थ संभवत नाहीं. तर अवयवार्थ संभवेल; तर त्याणेच निर्वाह होत असतां रूढी घेऊं नये. अस्तु आतां अर्था पत्तिविषयीं प्रमाण कल्पावें, तर तें ही संभवत नाहीं. कारण ती क्षीण झाल्याकारणानें शक्ती कल्पनेविषयीं समर्थ होत नाहीं. पहा प्रोक्षणी शब्द ( यज्ञपात्र ) हा आपल्या अवयवव्युत्पत्तीनेच अर्थ काढीत असून यौगीक आहे, त्याच प्रमाणें वेदांतशास्त्रांत सांगितलेला ब्रम्ह शब्दाचा अर्थ आहे. आणि जेथें अक्षरापासूनच विवक्षितार्थ सिद्ध होतो व अवयवार्थ संभवत नाहीं, तेथें दुसरी गति नसल्यामुळें समुदायार्थ ( रूढ्यर्थ ) म्हणावा. वृक्षास अश्व आणि कर्ण असें संभवेल काय? कधींच संभवणार नाहीं परंतु संभवतें, कारण ज्या शब्दाच्या शक्ती विषयीं ज्ञान नाहीं असा जो अश्वकर्ण शब्द याची शक्ती, कोणत्या अर्थी कोण पुरुष कल्पेल? याप्रमाणें ब्रम्ह शब्द यौगीक आहे, यावरून स्वर्णकारेत्यादिकांस आज्ञानानें ब्राम्हणत्व यदा कदाचित सिद्ध होईल. अथवा स्वर्णकारेत्यादिकांचे ठिकाणीं ब्राम्हण शब्द लाक्षणीक आहे, असें म्हटलें तरी चालेल; कारण ब्राम्हणाचे शिष्य

म्हणून. आणि खरोखर म्हटलें असतां ब्राम्हण लोकांशीं स्वर्णकारादिक लोकांचा गुरुशिष्य संबंध आहेच आहे. जसें गंगेचेठायीं घोष (गवळी लोकांचा खेडेगांव) परंतु येथें गंगाशब्दाचा अर्थ तीर म्हणून समजावें. तर गंगाशब्द लाक्षणिक म्हणतात. जसे श्रुतीमध्यें "धान्यमसो" तूं धान्य आहेस. म्हणजे तूं धान्याचे आधीन आहेस, असा अर्थ होतो कीं, त्याप्रमाणें स्वर्णकारेत्यादिक हें ब्राम्हण आहेत. म्हणजे ब्राम्हण लोकांचे आधीन आहेत. तर स्वर्णकारादिकांस ब्राम्हण असा शब्द स्वतां सिद्ध नसल्यामुळें त्यांचे ब्रम्हण्य सिद्ध होत नाहीं; असें म्हणण्यास बाधक काय आहे ?" असें कांहीं लोक म्हणतात. आणि कांहीं अर्थीं हें संभवदुक्तिकही दिसतें खरें, परंतु या शंकेचें प्रागुक्त शंकराचार्य व काशिस्थ पंडितादिकांच्या समति पत्रांतील श्रुतिस्मृत्योक्त प्रमाणांवरून व नागरखंड तथा पंचब्रम्होपनिषदादिकोत्पत्तिकथनाधारां वरून निर्बाध निराकरण होतें. कारण पंडितादिक लोकांनीं जे आधार संमति पत्रांत दाखविले, ते अक्षरशः खरे असून तदनुसार सर्व संस्कार वगैरे प्राचीन कालापासून संप्रत कलपर्यंत निर्व्यभिचारत्वें करून या स्वर्णकारेत्यादिकपांचाल

लोकांत चालूं तर आहेत, त्यावरून यांच्या संस्काराहीनर्हते विषयां शंका घेण्याचें कारण कांहींच दिसत नाहीं. कारण वर्णाश्रम भेदाप्रमाणें ब्राम्हण जातिस्थ लोकांची चिन्हें म्हटलीं असतां मुख्य "अष्टमें[१] वर्षीं मौंजी बंधनकाल, काषाय वस्त्रधारणें,[२] हरिणाचें कातडें,[३] कार्पासोपवीत, दर्भ मौंजी ( मेखला )

---

१ अष्टमेवर्षे ब्राम्हण मुपनयेद्गर्भाष्टमेवैकादशे. क्षत्रियं द्वादशे वैश्यमापोडशात् ब्राम्हणस्यानतीतःकाल आद्वाविंशात् क्षत्रियस्याचतुर्विंशाद्वैश्यस्याति आश्वलायनगृह्यसू० अ० १ खं० १९ सू० १—२—३—४.

२ यदिवासांसिवसीरन् रक्तानिवसीरन् काषायं ब्राम्हणो. मांजिष्टं क्षत्रियो. हारिद्रं वैश्यइति आ० अ० १ खं० १९ सू० ९.

३ मैणेयेनवाऽजिनेन ब्राम्हणं. रौरवेणक्षत्रियं माजेन वैश्यमिति आ० अ० १ खं० १९ सू० ८.

केशप्रमाण पालाश (पळसाचा) दंड, गायत्री उपदेश, भवती शब्दाचा उच्चार, स्वश्रोत्रस्पर्श पूर्वक प्रणाम, गोत्रभेद, आणि

---

४ कार्पासमुपवीतंस्याद्विप्रस्योर्ध्ववृतंत्रिवृत् ॥ शणसूत्रमयं राज्ञोवैश्यस्याविकसौत्रिकम् मनुस्मृ० अ० २ श्लो० ४४.

५ तेषांमेखला मौंजी ब्राम्हणस्य, धनुर्ज्या क्षत्रियस्य, आविर्वैश्यस्यइति आ० अ० १ खं० १९ सू० ११.

१ तेषांदंडा पालाशो ब्राम्हणस्य, औदुंबरः क्षत्रियस्य बैल्वोवैश्यस्य, केशसंमितो ब्राम्हणस्य, ललाटसंमितः क्षत्रियस्य प्राणसंमितो वैश्यस्य इति आ० अ० १ खं० १९ सू० १३.

२ पितैवोपनयेत्पुत्रं तदभावेपितुःपिता ॥ तदभावेपितुर्भ्राता तदभावेपिसोदरः ॥ नक्षत्रियादिविषयं भवेत्तेषां पुरोहितात प्रयोगरत्ननिर्णासिं० प० ३ प० १६.

३ भवत्पूर्वंचरेद्भैक्षमुपनीतो द्विजोत्तमः ॥ भवन्मध्यंतुराज्यन्यो

वैश्यस्तुभवदुत्तरमिति मनु० अ० २ श्लो० ४९ या० अ० १ श्लो० २१.

४ स्वगुरुंब्राम्हणश्रोत्रःसमहस्तंप्रसारयेत् ॥ उदरस्यतुराजन्यो वैश्योमध्यममंततः ॥ नीचैःशूद्रः स्ततोन्योपितंप्रत्यभिवदेन्मुदेति स्मृत्यर्णवे० क्रों० प० २९ पं० ३.

५ अविप्लुतब्रम्हचर्यो लक्षण्यांस्त्रियमुद्वहेत ॥ अनन्यपूर्विकां कांतामसपिंडांयवीयसी ॥ अरोगिणींभ्रातृमाती मसमानार्षगोत्रजांइति याज्ञ० अ० १ श्लो० २. प्रवरोयंमानवैलपैारूरवसनामकः ॥ क्षत्रियाणांचसर्वेषामेकएवनचेतरः ॥ एकमेवतथा गोत्रं सर्वेषामनुनामकं ॥ भालंदलोवात्सप्रसांकितोति प्रवरस्त्वयं ॥ तथाभालंदलंगोत्रं वैश्यानामेकमेवहीति संस्कारकौ० गोत्रप्रवर निर्णय. ॥

६ व्रतवद्देवदैवत्येपित्र्येकर्मण्यथर्षिवत् ॥ काममभ्यर्थितोश्नीया

अनादिकाला पासून सांप्रत काल पर्यंत चालूं असल्याचीं प्रत्यक्षें करून दिसण्यांत येतात. यावरून स्वर्णकारेत्यादिक पांचाल हे शूद्रतुल्य आहेत किंवा त्यांस छूरिकाबंदनादिक तीस संस्कारांचा अधिकार आहे, इत्यादिक शंका घेण्याचे कारणच दिसत नाहीं. कांकीं, जर स्वर्णकारेत्यादिक पांचालांस छूरिकाबंधनादिक तीनच संस्कारांचा अधिकार असता, तर ब्राह्मण लोकांनीं त्याचे येथें द्विजचिन्हें चालूं न करितां शूद्र चिन्हेंच चालू केलीं असतीं. ज्यापेक्षां स्वर्णकारेत्यादिक पांचालांत शूद्र चिन्हाऽभाव असून ब्राम्हण चिन्हाचाच भास प्राचीन कालापासून दिसतो त्यापेक्षां स्वर्णकारेत्यादिकांविषयीं मुहूर्तमार्तंडेत्यादिक ग्रंथांचा आधार दाखविण्याचीं

---

द्रूतमस्यनलुप्यते ॥ ब्राम्हणस्यैवकर्मैतत् उपदिष्टंमनीषिभिः ॥ राजन्यवैश्ययोस्त्वेवं नैतत्कर्मविधीयतेति याज्ञ० अ० १ प० ३९ मनु० अ० २ श्लो० १८८ १८९ याचप्रमाणें शर्मादिक पदें-हीत्यांचे त्यांचे पत्रिकेवरून जाणावें.

व आह्मी ब्राह्मण लोक पुराणोक्त मंत्रानें तीनच संस्कार करित असतों, असें ह्मणण्याची मुळींच गरजच दिसत नाहीं. कारण तो केवळ शूद्राविषयींचाच आधार आहे. त्यावरून स्वर्णकारादिक शूद्रांत अथवा शुद्रतुल्य असें सिद्ध करूं लागलें आतां प्रागुक्त " विश्वकर्मा वै त्वाष्ट्रे " त्यादिक श्रुति वचनांवर व शंकराचार्यादिक शिष्टांच्या संमति मत्रांवर अत्यंत असंभव प्राप्त होतो. आतां तो असंभवच आहे असें जर म्हणावें तर प्रदर्शित सर्व आधारोक्त ग्रंथांवर नास्तिकत्व प्राप्त होतें; तर एका मुहूर्त मार्तंड नामक ज्योतिष ग्रंथाधारावरून सर्व मान्य ग्रंथांचे असे धर्मशास्त्रादिक ग्रंथांचें ग्रंथच खोट्या आरोपास पात्र होऊन धूळीस मिळतील असें शंका घेणारांनीं समजूं नये.

आतां शंकाघेणारे शास्त्री जरी मुहूर्तमार्तंडावरून शूद्रांस ३ संस्कारांचा अधिकार आहे असें म्हणतात; तरी त्यांचे बोलणें सर्व व्यर्थ जातें. कारण शूद्राविषयीं शूद्रकमलकर ग्रंथाच्या १२ व्या पत्रांत,

" तथाव्रतोपवासादेरपि शूद्रस्याधिकारः "

असें म्हटलें आहे—म्हणजे व्रतोपवासादिकांविषयीं शूद्रासही अधिकार आहे असें सांगून पुढें १५ व्या पृष्ठांत शूद्र लोकांस, गर्भाधान, पुंसवन, सीमंतोन्नयन, जातकर्म, नामकरण, निष्क्रमण, अन्नप्राशन, वपन, कर्णवेध, आणि विवाहेत्यादिक १० संस्कारांची अर्हता दाखविली आहे.

या खेरीज भारताच्या अनुशान पर्वांत शूद्रास,

"स्वाहाकारनमस्कारौ मंत्रौशूद्रौविधीयतां ॥
ताभ्यांशूद्रःपाकयज्ञैर्यजेतव्रह्मवान्स्वयम्" ॥

इत्यादिक कर्मांचा अधिकार सांगितला आहे. इत्यादिक म्हणजे, "स्वाहा" व "नमः" हे दोन मंत्र शूद्रास विहित असून या दोन मंत्रांनीं त्यानें स्वतांच पंच[1] महा यज्ञ क-

---

१.— १ ब्रम्हयज्ञ, २ देवयज्ञ, ३ भूतयज्ञ, ४ पितृयज्ञ, ५ मनुष्ययज्ञ,

रावे. हेंच व.दय संस्कार मयूखच्या ७७ ज्या पत्रांत असून पुढें त्याच ग्रंथांत "शूद्रावाजसनेयिन:" असें म्हटलें आहे म्हणजे शूद्र हे वाजसनेय शाखेचे होत. याप्रमाणें विचारांतीं अनेक शास्त्रार्थ असून ग्रंथ विस्तृत भयार्थ सर्व येथें दाखविले नाहींत. अस्तु सारांश शूद्रास देखील कर्म धर्माविषयीं शास्त्रांत न्यायादकांनीं मोकळीक दिली आहे. तर स्वर्णकारियादिक पांचाल ब्राम्हणांस मोकळीक असेल, यांत नवल काय ! कांहींच नाहीं. असो,

आतां स्वर्णकारियादिकांवर व्यवहारावरून जी शंका घेतली, तर तीचेंही समाधान प्रथमाध्यायांतील सरकार दाखल्यावरून व अध्यायांती प्रदर्शित भिक्षुकादिक नामाभिधानरूप व्यवहारावरूनच होतें; तर त्याचा विचार शंकतानीं मनांत न आणतां निरर्थक तार्किक विषयालंबन केलें आहे. अस्तु ज्यापेक्षां तार्कीक मतारूढच होऊं लागले, त्यापेक्षां तन्यायेंकरूनच त्यांचें समाधान करणें अवश्य आहे. कारण शंकित म्हणतात कीं, ब्राम्हण असा व्यवहार स्वर्णकारादिकांत कां नाहीं

असें जें म्हटलें आहे ; त्याचें समाधान येणेंकरून होतें कीं, ब्राम्हण व्यवहार हा कांहीं विप्रत्व-येण्याविषयीं समर्थ होत नाहीं तर यजन याजनादिक हेंच मुख्य कारण होय; असें असून शं-कराच्यार्यादिक शिष्टांच्या संमतींवरून तें या स्वर्णकारेत्यादि-कांत प्रत्यक्षानें व अनुमानानें देखील सिद्ध होतें. आतां हें षट्कर्माधिकारत्व आम्हांत नाम शंकितांत आहे, असें म्हणाल; तर तुम्हांस ब्राम्हण असा व्यवहार असल्यामुळें तुम्हीं अश्व, श्वान, उदकेत्यादिक ब्राम्हणांपैकीं असावेत. कारण शास्त्रांत घो-ड्यांला, पृथ्वीला, श्वानाला, आणि रत्नादिकांलाही ब्राम्हण असा व्यवहार आहे. यावरून ब्राम्हण व्यवहारावर व्यभिचारत्व प्राप्त होतें. तस्मात् व्यवहारावरून शंका घेऊन लोकांस निंद्य मानून द्वेष करणें हें केवळ निर्मूल असून अप्रमाण समजलें पाहिजे. अस्तु आतां मनुष्य देहधाऱ्यांस ब्राम्हणत्व व्यवहार हाच प्रयोजक असून तो स्वर्णकारादिकांत कीं नाहीं; असें जें म्हटलें, तेंही पूर्वोक्त शंकेप्रमाणें जाणावें. कारण सर्वां-ला ब्रम्हणत्व हें प्रयोजकच असून या मनुष्यामध्येंच ब्राम्हण

पदाचा व्यवहार तर आहे. तो जो शंकित नाहीं म्हणून आपला तर्क चालवितात, तें त्यांस नाम शंकितांस अयोग्य असून दुर्वाच्य असें समजलें पाहिजे. कारण आम्हीं ब्राम्हण आहों, असा सर्वत्र व्यवहार आहे व करितात, परंतु विप्र आहों असें कोणीं म्हणत नाहीं. आणि अन्य जे आहेत, ते आम्हीं अमुकच देशांतील आहों. असें सर्वत्र अल्पांत समजण्याकारितां. त्या त्या देशाचेंच नाम घेतात. जसे देशस्थ, तैलंग, कोंकणस्थ, कुळकर्णी, आंध्रे, इत्यादिक नामाचाच उच्चार प्रथमता करितात. व कोणीं आग्रहच करतील कीं, तुम्हीं जातीचे कोण आहा? तेंव्हांमात्र ते लोकांस सांगतात कीं, आम्हीं देशस्थ ब्राम्हण आम्हीं कोंकणस्थ नाम चित्पापन ब्राम्हण; परंतु प्रथमतः आम्हीं अमुकच ब्रम्हण आहों, असें कोणीं म्हणत नाहीं. आतां जसे अन्यलोक आंध्यादिक नामें प्रथमतः दर्शवून अंतीं ब्राम्हणत्व सूचवितात कीं, तद्वत् आमच्या पांचालांस कोणीं विचारिलें असतां हे मुख्य जो धंदा करितात त्या धंद्याचेंच नामाभिधान घेऊन आह्मीं सोनार, कांसार, दैवज्ञ इत्यादिक सांगतात. जर कोणीं सोनारादिकांत कोण तुम्हीं; असा आग्रहच करतील, तरमात्र हे

सांगतात कीं, आम्हीं पांचाल ब्राम्हण आहों. तस्मात् ज्याप्रमाणें ब्राम्हण व्यवहार अन्यांत आहे कीं, त्याच प्रमाणें आम्हां पांचाळांत हि आहे, असें समजा. अस्तु.

आतां ब्राम्हण शब्द योगरूढ्यात्मक असून ब्राह्मणांचेच ठिकाणीं वर्ततो; असें जे म्हटलें, तर तें असंबद्ध आहे. कारण, तो यौगिक असें सिद्ध करितां येत नाहीं. कांकीं यौगिकाला अवयवाकृती लागत असती. उदा० जसे राजपुरुष, कुंभकार, इत्यादि जाणावें. तस्मात् हा ब्राम्हणशब्द कांहीं तसा नव्हे. तर याची रूढी विप्र जातिविषयींच अनुकूल असल्या कारणानें ब्राम्हण शब्दास यौगीक असें म्हणवत नाहीं.

आतां कुंभकारादिक शब्दाचे ठिकाणींही स्वार्थे करून अवयवाला रूढी दिसती. असें म्हणाल, तर तें खरेंच आहे; परंतु समुदायत्वें करून कुंभकारादिकांचे ठिकाणीं, विशिष्ट अवयवार्थ शक्तिसापेक्षता आहे. अश्वकर्णादि शब्दांचे ठिकाणीं, शक्तिसापेक्षता ज्याप्रमाणें वर्ज्य सांगितली, त्याप्रमाणें कुंभकारादिक पदांचेठायीं वर्ज सांगितली. नाहीं. म्हणून ज्ञानीं जे आहेत, त्यांनीं कुंभकारादि शब्दा-

लाच यौगिकत्व सांगितलें. म्हणून ब्राम्हण समुदायाचे ठायींच रुढी दाखविल्या कारणानें ब्राम्हणशब्दास यौगिकत्व सिद्ध होत नाहीं. तर केवळ रूढीच कारण होय. येथें रुढीच आहे, असें म्हणाल तर त्याचें समाधान असें होतें, कीं, रूढी म्हणजे अखंड शक्तीच्यायोगानें जी उदित नाम प्रतिपादित अशी जी रुढी तिलाच रूढी असें म्हणतात, आणि ती रूढी केवळ घटाश्वकर्णादिक शब्दांच्याच ठिकाणीं राहती; तसी ब्रम्हण शब्दाच्याठिकाणीं राहत नाहीं. कारण ब्रम्हापत्यत्व याचा अर्थ जो संभव तो केवळ ब्राम्हण शब्दाच्याच ठिकाणीं राहतो, म्हणून केवळ रुढीचेंच दर्शन नाहीं. आतां घटाश्वकर्णादिक शब्द जे आहेत, ते केवळ औणादिक प्रत्ययात असल्यानें त्यांस यौगीक म्हणावें, असें कोणी म्हणतील, तर असें आहे कीं, घटाश्वकर्णादिक शब्द जे आहेत, ते सर्वथा यौगीक असे सिद्ध होत नाहींत. कारण त्या शब्दांचे ठिकाणीं अर्थाचें अनुगमन असून व्याकरणें करून मात्र साधुत्व येतें म्हणून त्यांस यौगीकत्व प्राप्त होत नाहीं. आतां पंकजादिक शब्दां प्रमाणें योगरुढात्मक म्हणावे, असें कोणीं म्हणतील, तरी

तें पंकजादिकांप्रमाणें देखील म्हणतां येत नाहीं. कारण, अवयवशक्त्यर्थ जी शक्तिसापेक्षता ती या घटाश्वकर्णादिक शब्दांवर नाहीं; सबब ते योगरूढात्मक नव्हेत, तर केवळ रूढात्मकच म्हणावें. आतां प्राभाकर मतेंकरून ब्राम्हणादिक व पंकजादिक सर्व शब्दांलाही यौगिकत्व आहे, म्हणून पूर्वीं जें सांगितलें, तर तें तसें नव्हे. कारण, चिंतामण्यादिक ग्रंथांत तार्किकमतवाद्यांनीं पंकजादिक शब्दांलाच योगरूढित्व प्रतिपादन केलें आहे.

आतां पंकज शब्दास जी शक्ती आहे, ती समुदायाचे ठायीं नाहीं, असें कोणी म्हणतील, तर कोशकारांनीं पंकज शब्दाला पद्म इत्यादिक पर्याय जो सांगितला, तो नाहींसा होईल. कदाचित शक्तीच नाहीं असें म्हणाल, तर पंकजादिक शब्दांचा आणि पद्मेत्यादिकांचा सारखाच प्रयोग होतो. आतां या ब्राम्हण शब्दास पावकघटेत्यादिक शब्दांसारखी रूढी नाहीं, असें जर म्हणाल, तर पद्मत्वाचे ठायीं समुदायत्वेंकरून जी व्युत्पत्ती, ती पंकजादिक शब्दांस होणार नाहीं.

एवंच तात्पर्य काय कीं, कोश व्याकरणादिकांवरून पाहिलें असतां त्रिवर्णस्थांलाही अपत्य असें पद प्राप्त होतें खरें; परंतु, रूढी नाहीं. कदाचित योगरूढात्मक म्हणाल तर जेथें रूढी नाहीं तेथें योगरूढीची कल्पना करणेच नको;

आतां कोशकारांचें प्रमाण जें दाखविलें तें तरी खरें कशावरून, असें म्हणाल, तर त्यास शब्द साधुत्व हेंच प्रमाण. आतां गवादिक शब्दास ‘ गम धातु लागून ’ उपपद जें उत्पन्न झालें किंवा जगती शब्द जसा उत्पन्न झाला, तसा हा ब्राम्हण शब्द स्वर्णकारादिक पांचालांचे ठिकाणीं प्राप्त झाला असेल, म्हणून जें पूर्वी म्हटलें आहे, त्याचें समाधान ऐका. कारण असें आहे कीं, ब्राम्हण शब्द, जसे पंकजादिक शब्द आहेत तसे कुंभकारादिक व औपगवादिक शब्द आहेत खरे; परंतु त्यांतील अन्य अर्थ (म्ह०) गती आणि कर्तृत्व हें कांहीं गो शब्दाहून भिन्न दिसत नाहीं. आतां कोशामध्यें गवादि शब्दांस यौगिकत्व सांगितलें खरे; परंतु शची पत्यादि शब्दांस जसी इंद्र पर्यायता आहे, त्या

प्रमाणें गो शब्दासही आहे, असें म्हणाना ! ! त्यांत आमचें काय गेलें.

आतां स्वर्णकारेत्यादिक पांचालांचे ठिकाणीं ब्राम्हणशब्द यौगिकत्वानें आहे असें जें म्हटलें; तर ते तसें सिद्ध होत नाहीं. कारण योगाला सबलत्व असून रूढीस प्रबलत्व असल्या कारणानें ब्राम्हण शब्दास रूढीच संभवती. आणि जेथें रूढीचें दर्शन नाहीं तेथें मात्र योग घ्यावा. तर तो कोठें; असें म्हणाल, तर तो प्रोक्षणी आणि निर्मंथ्य या दोन शब्दांचे ठिकाणी घ्यावा. कारण, प्रोक्षणी शब्दाचे ठिकाणीं रूढयात्मक शक्तीचें अदर्शन आहे. त्याच प्रमाणें निर्मंथ्य पदांलाही रूढी नाहीं. याप्रमाणें शास्त्रदीपिकेंत सांगितलें आहे. तस्मात् या सर्व युक्तींनीं पाहिलें असतां ब्राम्हण शब्दास केवळ रूढीच दिसती.

आतां अमरसिंहादि कोशामध्यें द्विज, वाडव, अग्रजन्मा विप्र, इत्यादिक शब्द जसे यौगिक सांगितले तसे ब्राम्हण शब्दासही यौगिकत्व आहे, आणि ब्राम्हणशब्द हा प्रत्यक्ष यौगीक असून तो रूढात्मकच आहे, असें जर स्वर्णकारादिक म्हणतील

तर तें विरुद्ध असून असंभवीत आहे, असें म्हणाल. तर असें आहे कीं, योग आणि रूढी या दोन्हीं ज्या शब्दांस आहेत त्याठिकाणीं योगाचा त्याग करून रूढीच ग्रहण करावि. कारण योगापेक्षां रूढी वरिष्ट असून मुख्य आहे. जसे " मंटपं मानय" याठिकाणीं मंटप शब्दाचा रूढार्थ होत आहे. तसा ब्राम्हण शब्दाचा रूढार्थ करण्याविषयीं अनुचित् नसून उचित् आहे. याविषयीं कांहींच बाधक नाहीं. म्हणून योगार्थ घेऊं नये. वास्तविक ह्मटलें असतां प्रयोग बाहुल्यार्थ (ज्या ठिकाणी पुष्कळ लोकांचे प्रयोग होतात ) रूढी असें ह्मणतात्. परंतु वस्तुतः ब्राह्मण शब्दकाहीं यौगिक नव्हे. कारण यौगिक ह्मणाल तर ब्राह्मण असें रूपच सिद्ध होणार नाहीं. फक्त 'ब्रह्मन्' शब्दास अपत्य प्रत्यय होऊन ब्राह्मण, असें कदाचित् रूप सिद्ध होईल. परंतु प्रकृतोपयोगि जात अशा अर्थाचे ठिकाणीं " राजन्य" असा शब्द सिद्ध झाला आहे. आणि " राज्ञोजातौ " या वार्तिका वरून क्षत्रियजात्यर्थी जसा "राजन्य" शब्द सिद्ध झाला, व क्षत्रिया पासून शूद्रीचे ठायीं उत्पन्न झालेल्या पुरुषांस जसे " राजन "

ह्मणतात तसे "ब्राह्मोजातौ" या सूत्राच्या योगानें 'ब्राह्मण' असें रूप सिद्ध होतें, आणि अपत्य प्रत्ययांत देखील 'ब्राह्मण' असे शब्द आढळतात. आणि चतुर्मुखादि वाचकही आढळतात. परंतु तेथें ते केवळ योगानेंच होणार. आणि जेथें क्षत्रिय असे अर्थ करितात तेथें 'ब्राह्म' असा प्रयोग होणार. शिवाय 'ब्राह्मण' असा प्रयोग होणार नाहीं. याविषयीं व्याकरण शास्त्राचा प्रकार सांगतों. "ब्राम्होजातौ" म्हणजे ब्रम्हा आणि अजातौ असा या पाणिनीय सूत्राचा विभाग केला आहे. आणि वास्तविक त्याचा अभिप्राय असा आहे कीं, "ब्राम्हीगर्भा" असा अर्थ घेतला असतां "ब्राम्हः" असा निपात होत असतो. आणि अपत्यार्थ नसून केवळ जातीच याअर्थीं टिलोप होत नाहीं. म्हणजे "ब्राम्हण" असें रूप सिद्ध होतें.

आतां गंगायां घोषः याठिकाणी गंगा शब्द जसा लाक्षणीक आहे, तसा ब्राह्मण शब्द देखील तुम्हांस नाम स्वर्णकारादिकपांचालांस, लाक्षणीक असेल, म्हणून जें पूर्वी सांगितलें. आणि "सिंहो देवदत्तः" याठिकाणीं सिंह

शब्द जसा गौण आहे तसा हा ब्राम्हण शब्द स्वर्णकारादिक पांचालांचे ठिकाणीं गौण असेल, असें जें म्हटलें आहे, तर तें तसें म्हणतां येत नाहीं व येणारही नाहीं. कारण जेथें अन्वयाची अनुपपत्ती आहे (म्ह०) शब्दाचा अन्वय जुळत नाहीं. आणि मुख्यार्थाचा त्याग होत आहे, तेथेंच लक्षणा वगैरेचा अंगिकार केला पाहिजे; परंतु येथें नाम स्वर्णकारेंत्यादिकलोकांचे ठिकाणी अन्वयाची वगैरे अनुपपत्तिनसून मुख्यार्थाचा त्याग करण्याचें कांहींच एक कारण दिसत नाहीं. *असें असून जसें अन्य ब्राम्हणांचें ठिकाणीं नाम गौड द्राविडादिकांचे ठिकाणीं ब्राम्हण शब्दाची शक्ती आहे कीं, तद्वत् आमच्या नाम स्वर्णकारादिक पांचालांच्याठिकाणीं ही शक्ती आहे. तस्मात् या वरील व मागें प्रदर्शित केलेल्या सर्व वचनाधारांवरून व शिष्ट लोकांच्या संमतींवरून व सरकार दरबार संबंधीक कागद पत्रांवरून एक सारखा अन्वय जुळत असल्यामुळें लक्षणा आणि गौणी लक्षणा इत्यादिकांचा त्याग करून आमच्या नाम स्वर्णकारादिक पांचालांच्या ठिकाणीं व्यवहार रुप ब्राम्हण शक्तिसा-

पेक्षता आहे असें अश्वानंदानें अंगिकार करा. कारण,

"वचस्तथाविधंब्रूयाद्यथातननरकंव्रजेत्" ॥

असें आहे कीं, ज्या वचनाच्या योगानें नरक न प्राप्त होईल तें वचन बोलावें, असें शास्त्र संमत आहे; तर तें अवलोकून ज्या भाषणांत धर्म अर्थादिक विशेषणें असतील तींच भाषणें करावीं. कारण,

"स्वयंकरोतिकर्माणि स्वयंतत्फलमश्नुते ॥
स्वयंभ्रमतिसंसारे स्वयंतस्माद्विमुच्यते" ॥

असें आहे कीं, या नरतनूंत आपणच कर्म करितों व त्याचें फल आपणच भोगीत असतों. तसेंच संसारांत आपणच भ्रमण करितों आणि आपणच त्या संसारापासून मुक्तही होतों; असें जाणून जरी तुम्हांस नाम शंकितांस दुसऱ्यांकडून बोलण्याविषयीं प्रेरणा झाली असेल, तरी सर्वथा खोटें बोलून आपल्या सुशोभित नरतनूवर मिथ्या भाषणाचा आरोप आणूं नका.

"क्षत्रियंचैवसर्पंच ब्राह्मणंचबहुश्रुतं ॥
नावमन्येतवैभूष्णुः कृशानपिकदाचन ॥
एतत्त्रयंहिपुरुषं निर्दहेदवमानितं ॥
तस्मादेतत्त्रयंनित्यं नावमन्येतबुद्धिमान् ॥
भद्रंभद्रमितिब्रूयात् भद्रमित्येवबावदेत् ॥
शुष्कवैरंविवादंच नकूर्यात्केनचित्सह ॥
मनु० अ० ४ प० ७० श्लो० १३५, १३६, १३७.

कारण धर्म शास्त्रांत असें आहे कीं, श्रीमंतानें ( बुद्धिमानानें ) ब्राम्हण, सर्प, आणि क्षत्रिय, हे यद्यपि कृश झाले आहेत, तथापि त्यांची निंदा करूं नये. आणि या तिघांची निंदा जो करितो. तो लवकरच नाश पावतो. तस्मात् बुद्धिमान पुरुषानीं सर्वथा या तिघांची निंदा वर्ज करावी. आणि वाद किंवा वैरभावादिक संपादन करणें झाल्यास ज्या वादापासून स्वपक्ष सिद्ध होईल, तोच वाद करावा त्यावांचून केवळ द्वेष बुद्धिनेच वैरभाव संपादूं नयें अशी मन्वादिकांची-

आज्ञाअसून आम्हां अत्यल्पमतींस ती मान्यही आहे. त्याचें वारंवार स्मरण करून लोक निंदेस पुढें व्हावें. कारण लोक आपलें वर्चस्व वाढविण्यार्थ आपणास पाहिजे तें सांगूं शकतील, आणि सांगतही आहेत, परंतु बोलणारांनीं त्या सांगणाराची यथास्तीत चौकसकिरून अनंतर बोलावें त्यालाच बोलणारा असें म्हणतात. आणि ज्या लोकांच्या सांगणीनें आपण बोलतों ते लोक आम्हां बोलणारांस कसे मानतात त्याचा विचार करावा. कारण जे जात्या भ्रष्ट व पतित आहेत, ते आपलें बुद्धी चातुर्य पाहिजे तसें लढवितात, म्हणून त्यांचे कायद्यांत लेस मात्रही आपण मिळूं नये. कारण थोडके दिवसांवर या मुंबापुरात जो असत्य भाषणाचा समारंभ झाला, आणि त्यांच्या खंडणार्थ जे निबंध रचले गेले ते सर्वत्रांचे नजरेस आलेच असतील, कदाचीत न आल्यास या पुढील अध्याया वरून पहा. असो,

सारांश या अध्यायांत कांहीं शास्त्रीयांकडून स्वर्गकारादिकांविषयीं ज्या शंका घेण्यांत आल्या होत्या, त्या सर्व यथा योग्य रीतीनें शिष्टादिकांच्या वचनाधारें करून निराकरण

केल्या, आहेत. यावरून "स्वर्णकारेत्यादिक पांचाल हे" ब्राम्हणत्वाधिकारी आहेत किंवा नाहीं हें सर्व वाचकांनीं आपापल्या अंतःकरणरूप मनें करून विचार करावा, हीच सर्वत्र प्रार्थना आहे.

इति द्वितीयाध्यायः समाप्तः ॥

# उत्तरार्ध.

---000---

## अध्याय ३.

---000---

आह्मांस हा तीसरा अध्याय लिहिण्यास फार आनंद वाटतो. कारण, कांहीं दिवसांवर "महाड" मुक्कामीं, सरकारांत एका नामांकित मोरबेकर गृहस्थाचा तंटा चालूं असतां, तेथें सत्यप्रतिज्ञेवर लिहून देणारा न्यायादिधर्मशास्त्रांताधीत असा येक नामांकित तळेकर शास्त्री वादी तर्फे शायदी पुरविण्यास आला होता. ते वेळीं रीती प्रमाणें सव्वाल जबाव-वगैरे होत असतां तेथें "ब्राह्मणोऽस्यमुखमासीत्" ही-ऋक्श्रुति निघाली. तेव्हां या वर शास्त्री ह्मणतात कीं "मुखमासीत्, ब्राम्हण, असा समावेश होणें नाहीं. कारण "आसीत्" हें क्रियापद आहे, म्हणून त्याच रूपानें

विशेषण जोडळें जाणार नाहीं." इत्यादि ता० १८ माहे न० स० १८७४ चे जबानींत सांगून पुढें ता० २१ मा० म० स० १८७४ चे जबानींत "ब्राम्हणोऽस्यमुखमासीत्" हें ऋग्वाक्य आहे. यांत मुख्य आसीत् असा शब्द आहे. त्याचा अर्थ मुखापासून उत्पन्न झाला. असा अर्थ लक्षणार्थ करावा लागतो" इत्यादिक सांगून पुढें "हे जे मुखापासून झाले ते ब्राम्हण असे आहेत कीं, देशस्थ, खरहाडे, कोंकणस्थ, (चित्पावन) द्राविड, तैलंग आणि देवरुखे, आदिकरून आहेत. असें म्हणून पुढें पुनः ते "खाली लिहिलेले श्लोक खरहाड्यांच्या उत्पत्ति विषयीं असतील, असें वाटतें. स्कंदपुराण नजरेस पडलें नाहीं. बाकी हें अठरा पुराणांपैकीं मान्य ग्रंथ आहे." इत्यादिक म्हणतात. तर शास्त्री बुवांस या सर्व बोलण्यावरून सरकारासमोर किती लबाडी करावी लागली असेल, ती सर्व वाचकांनीं सूक्ष्मरीत्या विचार करून पहावी. कारण ता० १८ मा० न० जबानींत शास्त्री 'आसीत्' हें क्रियापद असल्यामुळें त्याचरूपानें विशेषण जोडळें जाणार नाहीं" असें सांगून ता० २१ मा० न० चे जबानींत मुखापासून

कोंकणस्थादिक ब्राम्हण झाले, असें सिद्ध करून दाखवितात. तेव्हां शास्त्री बुवांच्या बोलण्यांत स्वव्याघात प्राप्त झाल्याची आठवण त्यांस कशी राहिली नसेल, ती नसो. कारण ज्यारूपानें विशेषण जोडळें जाणार नव्हतें. तेंच रूप दिनत्रयांत कसें जोडळें गेलें? बरें वाक्यांत कांहीं फेरफार झाला असावा असें जर म्हणावें; तर वाक्यांत कांहींच फेरफार झाल्याचा दिसण्यांत येत नाहीं. असें असतां रूप जोडळें तरी कसें ? हें हें समजलों. कीं "चित्पावनादित्रिवर्ग" नामांकित धर्मशास्त्रादिकवेत्ते तळेकर शास्त्री पंचद्राविडांत मेळतात म्हणून त्याच रूपानें विशेषण जोडळें असेल, असेंचना ! वाहवा कायपण शास्त्रीबुवांची सत्यप्रतिज्ञा आहे. असो चित्पावनादिक परमेश्वराच्या मुखापासून उत्पन्न झाले, असें जर शास्त्रीबुवांस सिद्ध करून दाखविणें होतें तर, ता० २१ न० स० १८७४चे जबानींत, "चित्पावन म्हणजे कोंकणस्थ यांची उत्पत्ति अशी आहे कीं, परशुरामानें आपल्या पित्याचें श्राद्ध

केल्या, आहेत. यावरून "स्वर्णकारेत्यादिक पांचाल हे" ब्राम्हणत्वाधिकारी आहेत किंवा नाहीं हें सर्व वाचकांनीं आपापल्या शुद्धांतःकरण रूप मनें करून विचार करावा, हीच सर्वत्र प्रार्थना आहे.

इति द्वितीयाध्यायः समाप्तः ॥

# उत्तरार्ध.

——000——

## अध्याय ३.

——000——

आह्मांस हा तीसरा अध्याय लिहिण्यास फार आनंद वाटतो. कारण, कांहीं दिवसांवर "महाड" मुक्कामीं, सरकारांत एका नामांकित मोरबेकर गृहस्थाचा तंटा चालूं असतां, तेथें सत्यप्रतिज्ञेवर लिहून देणारा न्यायादिधर्मशास्त्रांताधीत असा येक नामांकित तळेक शास्त्री वादी तर्फे शायदी पुरविण्यास आला होता. ते वेळीं रीती प्रमाणें सव्वाल जबाव वगैरे होत असतां तेथें "ब्राह्मणोऽस्यमुखमासीत्" ही ऋक्श्रुति निघाली. तेंव्हां या वर शास्त्री ह्मणतात कीं "मुखमासीत्, ब्राम्हण, असा समावेश होणें नाहीं. कारण "आसीत्" हें क्रियापद आहे, म्हणून त्याच रूपानें

करावें म्हणून चितेवरील, प्रेतें उठवून जीवंत करून त्यास

१ This word is revillingly or jocosely derived from *Chitá* (चिता,) the pyre, and *Pávana* (पावन) or pure. The two together signifying pure from the pyre. This rendering is based on *Puránic* legend which relates that *Purasuráma*, the sixth incarnation of *Vishnu*, recovered miraculously from the sea, the strip of land now forming the *Konkan*, the *Sawantwady Territory*, *Goa*, *Kanara*, and *Malabar*, and made it over to *Bráhmanas* converted into that state from corpses placed on the pyre. Others would resolve the word into चित्त and पावन, the pure of heart. Both of these may be true, but the first has a historcal value, as it seems to me, and indicate that the first ancestors of this tribe have probably come by ships either from some other part in India, or from the opposite coast of Africa. This is a section of the *Kaunkana* sub-division of the DRAVIDIC class. The Journal of the Bombay Branch of the Royal Asiatic Society, January, 1865.

भाषांतर.— रा॰ रा॰ " रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलीक

ब्राम्हणत्व दिलें. आणि त्या ब्राम्हणांस आपल्या पित्याचे श्राद्धास

---

असें म्हणतो कीं, चित्पावन ह्या शब्दाचा अर्थ निंदेनें अथवा थट्टेनें चिता[1] म्ह० सरण, पावन म्ह० पवित्र, ह्यांपासून निघाला, म्ह० ह्या दोन शब्दांचा अर्थ, चितेपासून पावन असा होतो. हा अर्थ पुराणांतील कथेस अनुसरून आहे. त्यांत ( पुराणांत असें सांगितलें आहे कीं, परशूराम म्हणून जो विष्णुचा सहावा आवतार; ह्यानें समुद्रापासून अद्भुत रीतीनें जमीन मिळविली. तींत सांप्रत कोंकण, सावंतवाडी, गोमांतक, कानडा, आणि मलबार, ह्यांचा समावेश होतो. आणि जीं प्रेतें चितेवर ठेविलीं होतीं, त्यांस ब्राम्हण करून[2] ती जमीन त्यांस दिली. कित्येक लोक ह्या शब्दाचा अर्थ " चित्त आणि

---

१ चिता—प्रेतदाहाधारचुल्लि.

२ ब्राम्हण्यंचततोदत्वासर्वविद्यासुलक्षणमिति सं० अ० ८१ श्लो० ३७.

बसावेलें. म्हणून त्यांस चित्पावन ( असे ) म्हणतात. तीं प्रेतें पूर्वीं

पावन " अंतःकरणाचे मोकळे असा धारतात, हे दोनही अर्थ बरोबर असावेत; परंतु प्रथम अर्थास इतिहासिक किम्मत [ ग्रंथाचा आधार ] आहे. मला असें वाटतें कीं, ह्या जातीचे ( चित्पावनांचे ) प्रथम वंशज एकाद्या हिंदुस्थानांतिल बंदरांतून अथवा अफ्रिकेच्या समोरील किनाऱ्यापासून बहुधां तारवानें आले असावे. कोंकणस्थ हा द्राविडांतिल पोटभेद आहे."

१ इजिप्ट देशांतून.

२ वरील मजकुरावरून कोंकणस्थांस ( चित्पावनांस ) द्राविडांत गणणें हें अगदीं अप्रशस्थ आहे. कारण त्यांस द्राविडांत गणिले असतां द्राविड देखील चितेपासून पावन झाले असें सिद्ध होऊन, "ब्राह्मणादशधाः प्रोक्तापंगौडाचद्राविडाः" ह्या व्याक्योक्तीस बाधक येतें तर त्यानें; हें स्वज्ञाति भयार्थच लिहिलें असें ह्मणण्यास कांहींच बाधक दिसत नाहीं. कारण अज्ञानानें लिहिलें असें ह्मणवत नाहीं.

ब्राम्हण जातीचीं होतीं; परंतु आचार भ्रष्टतेमुळें, त्यांस अन्य संज्ञा प्राप्त झाली होती, ती रद्द करून त्यांस ब्राम्हण केलें. अन्य मनुष्यांचीं तीं प्रेतें होतीं. त्या मनुष्यांस कोळी[1] (अशी) संज्ञा प्राप्त झाली होती.. त्या प्रेतांसे ब्राम्हण केल्यावर परशुरामानें श्राप

---

१ रजकश्चर्मकारश्चनटोबुरूडएवच ॥ कैवर्तमेदभिल्लाश्चसप्तैते अंत्यजा: स्मृता:

२ At length, when sitting on the mountains of Concan (that is, the Sayhadree range, or Western Ghauts) he (*Purásrama*) espied on the shore below, the putrefied corpses of *fourteen Mleuchtas* (*any people not Hindoos*), which had floated there, borne by tides from distant lands to the Westward. *Rama* restored them to life, taught them religious knowledge, and after converting them into Brahmins, performed his sacrifice. He, afterwards, by means of his fiery darts compelled Samudra, the Indian Neptune, to retire several miles from the foot of the Ghauts, and allotted to

दिला होता कीं, तुम्हीं ब्राम्हण, धर्मभ्रष्ट, म्हाल, त्यांस उश्राप

---

his *protegés* the strip of land thus recovered from the sea. From these fourteen men sprang the Kukanastas or Concanes tribe of Maratha, and the pious Hindoo still discovers in their leneaments trace of a corpse-like expression of countenance inherited from their fore-fathers. Goa & the Blue Mountains-by Richard F. Burton P. 14—15

वरील मजकुराचें भाषांतर. "शेवटीं तो ( परशुराम ) कोंकणांतील पर्वतावर ( सह्याद्रि अथवा पश्चिमघाट ) बसलेला असतां दूरच्या प्रदेशाहून चौदा कुजलेलीं म्लेंच्छांचीं प्रेतें भरतीनें पश्चिमेकडे वाहून आलेलीं त्यानें खालीं किनाऱ्यावर लावून पाहिलीं. रामानें, त्यांस सजीवकरून व धर्म संबंधी ज्ञान सिकवून ब्राम्हण केल्यावर, आपला यज्ञसंपविला. नंतर त्यानें आपल्या तीक्ष्णबाणेंकरून समुद्रास किती एक मैल मागें

दिल्याचा आधार माझ्या पाहण्यांत नाहीं." ही कथा कां सांगितली. या वरून चित्पावनादिक पंचद्राविडांतलि असून

---

हटवून घेतलेली जमीन, आपल्या आश्रितांस वांटून दिली. ह्या चौदा म्लेंच्छां, पासून कोंकणस्थ[१] (मराठ्यांतील कोकणी जातीचे) उत्पन्न झाले. आणि धार्मिक हिंदु अजून पावेतों त्यांचीं रूपलक्षणं पाहून प्रेतवत् त्यांच्या स्वरूपाचें स्पष्टीकरण वाडवडीलां पासून आहे, असा पत्ता लावितात." रिचर्ड आफ् वर्थनकृत, गोवा आणी नीलगिरी. पृ० १४–१५.

१ .ह्यापंचप्राप्यतेतस्यकुत्सिताश्वदरिद्रिणः ॥ सेवासर्वत्रकारोइदं निश्चयभाषणमिति० स० अ० ८१

---

१ चित्पावन जात. कोंकणस्थ शब्द जातिवाचक नाहीं.

ईशमुखोत्पन्न आहेत असे सिद्ध होतात किंवा प्रेतांपासून ? प्रेतांपासून झाले, हा जर शास्त्रार्थ शास्त्रीबुवांच्या लक्ष्यांत होता तर ईश्वराच्या मुखापासून झाले हें सत्यसमरून म्हटळें किंवा मिथ्या ?

असो. आतां सदरहू शास्त्रिबुवांच्या बोलण्यांत आणखी एक गोष्ट खोटी व इतिहास विरुद्ध दिसती कीं, "मुखापासून जो ब्राम्हण झाला तो येक ब्रम्ह देवच झाला." असें सांगून, त्याच जबानींत पुन: ते असें ह्मणतात कीं, "ब्रह्म देव परमेश्वराच्या नाभिपासून झाल, " यावरून अल्प मतीस्थ लोकांनीं या जबानींत कोणतें खरें मानावें ? सारांश, या सर्व जबानींची एक वाक्यता केली असतां शास्त्री बुवांच्या बोलण्यांत पर्वताएवढे दोष असून शास्त्री असत्य विषय बोलत असतात, असें ह्मणण्यास बाधक काय आहे.

असो आतां यांचें हें बोलणें खरोखर मिथ्या आहे किंवा नाहीं तें सर्व सुज्ञ वाचकांस समजण्याकरितां, ता० २१ मा० न० १८७४ चे जबानींतील आणखी एक इतिहासविरुद्ध दाखला दाख-

वितां " शंकराचार्य आमचे गुरु आहेत. शंकराचार्य हे द्राविड ब्राम्हण होते. पुन्हा सांगतों कीं, शंकराचार्यांचे गादिवर जे बसत असतात ते द्राविड ब्राम्हणच बसत असतात. जे मुळचे शंकराचार्य होते, ते अयोनि संभव होते. " इत्यादिक ह्मटलें आहे. तर यावरून शास्त्रि बुवानीं इतकेंच सिद्ध केलें कीं, शंकराचार्यांचे गादीवर द्राविडांवांचून अन्य जातींचे ब्राम्हण बसूं शकत नाहींत. तर शास्त्री बुवांस मीं असें विचारतों कीं, चित्पावनादिक जर देवाच्या मुखापासून झाले आणि ते द्राविडांत आहेत; तर ते शंकराचार्यांचे गादीवर सन्यासी होतील कींवा नाहीं ? होतील असें मत असल्यास कांहीं वर्षां मागें शंकेश्वर येथील शंकराचार्यांचे गादीवर बसविण्यांस तयार केलेल्या चित्पावनाविषयीं कोल्हापूरकर वगैरे यांनीं वाद घेऊन चित्पावनादिकांस न बसवितां कऱ्हाड क्षेत्रांतील देशस्थ ब्राम्हण आणून बसविण्याचें कारण काय झालें ? आणि या वादावरून चित्पावनादिक पंच द्राविडांत आहेत असे सिद्ध होतात काय

आतां मुळचे शंकराचार्य हे अयोनि संभव होते, असें जें शास्त्री बुवांनीं म्हटलें त्यावरून सत्यप्रतिज्ञेवर लिहून देणाऱ्या

तळेकर शास्त्रीबुवांस प्राचीन इतिहासांचें कितपत अवलोकन झालें आहे, तें या खालील शंकर दिग्विजयावरून पहा.

" ततोमहेशःकिलकेरलेषु श्रीमद्वृषाद्रौकरुणा
समुद्रः ॥ पूर्णानदीपुण्यतटेस्वयंभू लिंगा
त्मनानंगधगाविरासीत् ॥ १ ॥ तन्नो
दितःकश्चनराजशेखरः स्वप्नेमुहुर्दृष्टतदीयवै-
भवः ॥ प्रासादमेकंपरिकल्प्यसुप्रभं प्रावर्त
यत्तस्यसमर्हणंविभोः ॥ २ ॥ तस्येश्वरस्य
प्रणतार्तिहर्तुः प्रसादतःप्राप्तनिरीतिभावः ॥
कश्चित्तदभ्यासगतोग्रहारः कालटयभिख्योऽ
स्तिमहान्मनोज्ञः ॥ ३ ॥ कश्चिद्द्विपश्चि
दिहनिश्चलधीर्विरेजे विद्याधिराजइतिविश्रुत
नामधेयः ॥ रुद्रोवृषाद्रिनिलयोऽवरीतुकामो
यत्पुत्रमात्मपितरंसमरोचयत्सः ॥ ४ ॥

पुत्रोभवत्तस्यपुरात्तपुण्यैः सुब्रह्मतेजाःशिवगुर्व भिख्यः ॥ ज्ञानेशिवोयोवचनेगुरुस्त स्या- न्वर्थनामाकृतलब्धवर्णः ॥५॥ इत्याद्यारभ्य । उद्वाह्यशास्त्रविधिनाविहितेमुहूर्त्ते तौसंमुदंबहु मवापतुराप्तकामौ ॥ तत्रागतोभृशममोदत बंधुवर्गः किंभाषितेनबहुनामुदमापवर्गः ॥ ॥ ३ ४ ॥ तौदंपतीसुवसनौशुभदंतपंक्ती संभू- षितौविकसितांबुजरम्यवक्त्रौ ॥ ३ ५ ॥ लग्नेशुभे शुभयुतेसुषुवेकुमारं श्रीपार्वतीवसुखिनीशुभ वीक्षतेच ॥ जायासतीशिवगुरोर्निजतुंगसंस्थे सूर्येकुजेरविसुतेचगुरौचकेंद्रे इत्यंतं" शं० दि० स० २.

याप्रमाणें शंकर दिग्विजयांतील प्रमाणें असून यांतील भावार्थ पहातां, केरल देशांमध्यें वृषपर्वताजवळ पूर्णानदीनें

कांठीं स्वयंभू शिव लिंगरूपें प्रकट झाले, त्यावेळीं राजशेखर हा त्या देशाचा राजा होता. त्याला दृष्टांत झाला त्यावरून त्यानें त्या ठिकाणीं देऊळ बांधिलें. ह्याच नदीच्या कांठीं कालटिका या नांवाचा एक फार चांगला इनामी गांव होता. त्यांत विद्याधिराज नामक कोणी एक महान विद्वान राहत असे. त्याला पूर्व पुण्यकरून एक पुत्र झाला; त्याचें नांव, त्यानें शिवगुरू असें ठेविलें. तो शिवाप्रमाणें ज्ञानवान् आणि बृहस्पती प्रमाणें वक्ता, असा समर्थ होता. विद्याधिराजानें बाळपणांतच त्याची परीक्षा घेतली, तेव्हां तो कोणत्याही शास्त्रांत व विषयांत बोलण्या विषयीं कुंठित झाला नाहीं, त्याचे मनांत लग्न करावयाचें नव्हतें; परंतु विद्याधिराजाच्या अति आग्रहास्तव, त्यानें पत्करिलें. पुढें, मघमंडिल यानें आपली कन्या जी सती, ती त्या शिवगुरूला दिल्ही. दोघें, आपल्या म्हातारपणापर्यंत अती तपस्वी असून त्यांना संतती झाली नव्हती. कांहीं दिवसपर्यंत उभयतांनीं पुत्रप्राप्तिसाठीं नित्यनेमानें पूर्णानदीचें स्नान करून त्या स्वयंभू देवाचें पूजाव्रत चालविलें. तेथें उभयतांलाही दृष्टांत होऊन, नंतर पुत्र झाला, तो शंकराचार्य

जाणावा " इत्यादिक असून पुढें शंकराचार्याचें मौंजीबंधन त्याचे आईनें केलें, अशी कथा असून, नंतर शंकराचार्य मातोश्रीची आज्ञा घेऊन नर्मदेच्या कांठीं व्याघ्रपुरामध्यें येऊन गौडाचार्यांचे शिष्य जे गोविंदयती, त्यांपासून संन्यास दिक्षे तें अंगिकारते झाले. असें वर्णन शंकरविजयाच्या ५ व्या सर्गांत व गुरुचरित्रांत व हस्तामलकानें केलेल्या ग्रंथांत व हंसकोशांत ही आहे; यावरून शंकराचार्य हा योनिसंभव आहे किंवा अयोनिसंभव आहे, याचा सर्व वाचकानींच विचार करून आपमतलबी अशा तळेकर शास्त्रीबुवांच्या बोलण्यांत तथ्यांश कितपत आहे तो पहावा.

सारांश याप्रमाणें पूर्वापर विरोध बोलणाऱ्या शायदीदाराचा विचार सरकारकडून कसा झाला नसेल तो असो. एवंच शास्त्रीय नामकं पुरुष जे आहेत ते पाहिजे तसें बोलून लागलेच खऱ्याचें खोटें खोट्याचें खरें करून दाखवितात. हें तरी त्याचें मोठें बुद्धीचातुर्य म्हटलें पाहिजे. असो याचप्रमाणें थोडक्याच दिवसांवर या मुंबई मुक्कामीं "देवरूख्यांविषयीं शास्त्रसंमत" या नांवाचें एक पुस्तक प्रसिद्ध झालें असून त्यांत त्या पुस्तककर्त्यानें

तळेकर शास्त्रीबुवांस प्राचीन इतिहासांचें कितपत अवलोकन झालें आहे, तें या खालील शंकर दिग्विजयावरून पहा.

"ततोमहेशःकिलकेरलेषु श्रीमद्वृषाद्रौकरुणा समुद्रः ॥ पूर्णानदीपुण्यतटेस्वयंभू लिंगा त्मनानंगधगाविरासीत् ॥ १ ॥ तन्नो दितःकश्चनराजशेखरः स्वप्नेमुहुर्दृष्टतदीयवै- भवः ॥ प्रासादमेकंपरिकल्प्यसुप्रभं प्रावर्त यत्तस्यसमर्हणंविभोः ॥ २ ॥ तस्येश्वरस्य प्रणतार्तिहर्तुः प्रसादतःप्राप्तनिरीतिभावः ॥ कश्चित्तदभ्यासगतोग्रहारः कालट्यभिख्योऽ स्तिमहान्मनोज्ञः ॥ ३ ॥ कश्चिद्द्विपश्चि दिहनिश्चलधीर्विरेजे विद्याधिराजइतिविश्रुत नामधेयः ॥ रुद्रोवृषाद्रिनिलयोऽवरीतुकामो यत्पुत्रमात्मपितरंसमरोचयत्सः ॥ ४ ॥

पुत्रोभवत्तस्यपुरात्तपुण्यैः सुब्रह्मतेजाःशिवगुर्वभिख्यः ॥ ज्ञानेशिवोयोवचनेगुरुस्त स्यान्वर्थनामाकृतलब्धवर्णः ॥५॥ इत्याद्यारभ्य । उद्वाह्यशास्त्रविधिनाविहितेमुहूर्ते तौसंमुदंवहु मवापतुराप्तकामौ ॥ तत्रागतोभृशममोदत बंधुवर्गः किंभाषितेनबहुनामुदमापवर्गः ॥ ॥ ३ ४ ॥ तौदंपतीसुवसनौशुभदंतपंक्ती संभूषितौविकसितांबुजरम्यवक्त्रौ ॥ ३ ५ ॥ लग्नेशुभे शुभयुतेसुषुवेकुमारं श्रीपार्वतीवसुखिनीशुभ वीक्षतेच ॥ जायासतीशिवगुरोर्निजतुंगसंस्थे सूर्येकुजेरविसुतेचगुरौचकेंद्रे इत्यंतं" शं० दि० स० २.

याप्रमाणें शंकर दिग्विजयांतील प्रमाणें असून यांतील भावार्थ पहातां, केरल देशांमध्यें वृषपर्वताजवळ पूर्णानदीचे

काठीं स्वयंभू शिव लिंगरूपें प्रकट झाले, त्यावेळीं राजशेखर हा त्या देशाचा राजा होता. त्याला दृष्टांत झाला त्यावरून त्यानें त्या ठिकाणीं देऊळ बांधिलें. ह्याच नदीच्या काठीं कालटिका या नांवाचा एक फार चांगला इनामी गांव होता. त्यांत विद्याधिराज नामक कोणी एक महान विद्वान राहत असे. त्याला पूर्व पुण्यकरून एक पुत्र झाला; त्याचें नांव, त्यानें शिवगुरू असें ठेविलें. तो शिवाप्रमाणें ज्ञानवान् आणि बृहस्पती प्रमाणें वक्ता, असा समर्थ होता. विद्याधिराजानें बाळपणांतच त्याची परीक्षा घेतली, तेव्हां तो कोणत्याही शास्त्रांत व विषयांत बोलण्याविषयीं कुंठित झाला नाहीं, त्याचे मनांत लग्न करावयाचें नव्हतें; परंतु विद्याधिराजाच्या अति आग्रहास्तव, त्यानें पत्करिलें. पुढें, मखमंडित यानें आपली कन्या जी सती, ती त्या शिवगुरूला दिल्ही. दोघें, आपल्या म्हातारपणापर्यंत अती तपस्वी असून त्यांना संतती झाली नव्हती. कांहीं दिवसपर्यंत उभयतांनीं पुत्रप्राप्तिसाठीं नियमनेमानें पूर्णानदीचें स्नान करून त्या स्वयंभू देवाचें पूजाव्रत चालविलें. तेथें उभयतांलाही दृष्टांत होऊन, नंतर पुत्र झाला, तो शंकराचार्य

जाणावा " इत्यादिक असून पुढें शंकराचार्याचें मौंजीबंधन त्याचे आईनें केलें, अशी कथा असून, नंतर शंकराचार्य मातोश्रीची आज्ञा घेऊन नर्मदेच्या काठीं व्याघ्रपुरामध्यें येऊन गौडाचार्यांचे शिष्य जे गोविंदयती; त्यांपासून संन्यास दिक्षे तें अंगिकारते झाले. असें वर्णन शंकरविजयाच्या ५ व्या सर्गांत व गुरुचरित्रांत व हस्तामलकानें केलेल्या ग्रंथांत व हंसकोशांत ही आहे; यावरून शंकराचार्य हा योनिसंभव आहे किंवा अयोनिसंभव आहे, याचा सर्व वाचकानींच विचार करून आपमतलबी अशा तळेकर शास्त्रीबुवांच्या बोलण्यांत तथ्यांश कितपत आहे तो पहावा.

सारांश याप्रमाणें पूर्वापर विरोध बोलणाऱ्या शायदीदाराचा विचार सरकारकडून कसा झाला नसेल तो मसो. एवंच शास्त्रीय नामक पुरुष जे आहेत ते पाहिजे तसें बोलून लागलेच खऱ्याचें खोटें खोट्याचें खरें करून दाखवितात. हें तरी त्याचें मोठें बुद्धीचातुर्य म्हटलें पाहिजे. असो याचप्रमाणें थोडक्याच दिवसांवर या मुंबई मुक्कामीं " देवरूख्यांविषयीं शास्त्रसंमत " या नांवाचें एक पुस्तक प्रसिद्ध झालें असून त्यांत त्या पुस्तकर्त्यानें

आपल्या बुद्धिचातुर्याची पराकाष्टा केली आहे. वास्तविक त्या पुस्तकाचा अभिप्राय देवरुख्यादिक हा पंचद्राविडांतील पोटभेद आहे. याविषयीं लिहिले असतां पुष्कळ विचार आहेत. परंतु कसेंका असेनात, त्याविषयीं आम्हांस विशेष लिहिण्याची जरूरीच नाहीं. फक्त या पुस्तकाच्या ४२ व्या पृष्ठांतील ६ ओळींत पुस्तककर्त्यानें असें लिहिल्याचें दिसतें कीं, "प्रसंगानुसार हेंही आम्ही येथें कळवितों कीं, कोंकणस्थ व कऱ्हाडे वगैरे ब्राम्हणही देशस्थ ब्राम्हणांतलेच मुळचे असून फक्त स्थलभेदामुळें भेद पावलेले आहेत. असें आमचे मत आहे. त्यांच्या उत्पत्तिविषयीं सह्याद्रिखंडांत वगैरे ज्यागोष्टी लिहिल्या आहेत, त्या सर्वथा अयुक्तिक सृष्टिक्रमविरुद्ध अतएव असंभाव्य, अप्रयोजक व पोरकट अशा आहेत." इ० यांस आमचें असें विचारणें आहे कीं, यासर्व गोष्टी पोरकट असून खोट्या.हेत हें आम्हीं कबूल करितों; परंतु आपल्या बोलण्यास तरी कोणत्या शास्त्राचा आधार आहे. शास्त्र संमत यांत कोणकोणत्या शास्त्रांचें पुरावे आहेत.? जर [illegible]द्रि खंडादिक ग्रंथांत ह्या गोष्टया निर्मूल आहेत,

तर पेशवाईंत सह्याद्रिखंड बुडविण्याचें कारण काय होतें ? अरे

---

१ The *Cocanist Bramanis*, before the elevation of *Ballajee Vishwanath* Commonly called the first, though in fact the fifth *Peishwa*, were not employed as clerks and men of business, but as *Hurkarus* and spies. They carefully suppress or destroy all copies of the *Syhadree Khund*, where their origin is mentioned, and a respectable *Brahmin* of *Waee* was, a few years ago, disgraced by *Bajeerâo* for having a copy of it.

भा० बाळाजी विश्वनाथ जरी पांचवा पेशवा होता; तथापि त्यास साधारणपणें पहिला पेशवा ह्मणत. तो मोठ्या पदवीस चढण्याचे पूर्वीं कोकणस्थांस (चित्पावनांस) कोणी कारकुन किंवा कारभारी, ठेवीत नसत; परंतु त्यांस हरकारू (गुप्तबातमीदार दूत) किंवा हेर, (जासूद) ह्यांच्या कामावर ठेवित असत. त्यांची उत्पत्ति सह्याद्रिखंडांत सांगितली आहे ह्मणून, ते सर्व सह्याद्रिखंडाच्या प्रती, सावध गिरीनें नष्ट (नाहींशा) करितात. कांहीं वर्षां मागें

कोंकणस्थादिक जर मुळचे पंचद्रविडांतर्गत आहेत; तर

---

वाई येथील एका नामांकित ब्राम्हणानें सह्याद्रिखंडाची प्रत ठेविली म्हणून बाजीरावानें त्याचा अनादर (अपमान) केला."
ग्रांटडफकृत मराठ्यांचा इतिहास पु० १ पृ० ८

## यास दुसरें प्रमाण.

His new dominions being provided with no separate order or of priesthood, *Parshram* founded the cast of the *Concan Brahmins* who are to this day disclaimed as such by those of the rest of India. They compose a large portion of the ruling characters in the *Maratha* state, and in their various predatory incursions into other countries stated to seek with avidity for the copies of a work containing the history of their origin, for the purpose of destroying it, and the eastern *Brahnins* affirm that the orders for this purpose given to their illiterate troops have produced a large and indiscriminate destructon of manuscript.

" कौंकणाश्चित्तपूर्णास्ते चित्तपावनसंज्ञकाः ॥

---

According to the fable, he created them by restoring to life the putrid bodies of some men drowned in a river, or according to more general tradition of ship-wreck mariners; indicating apparantly the act of foreign origin, which appearance at this day does not much discred it. Historical Sketch of India by Lient. Colonel Mark Wilks Vol. 1 Page 157—8

वरील मजकूराचें भाषांतर. यांत तो असें ह्मणतो कीं, " परशुरामाच्या नवीन देशांत निरनिराळे जातीचे उपाध्ये नसल्यामुळें, परशुरामानें कोंकणस्थ ( चित्पावन ) ब्राम्हणाची ( नवीन ) जात स्थापन ( उत्पन्न ) केली; ह्मणून, हिंदुस्थानांतील

ब्राह्मणेषुचसर्वेषु यतस्तेउत्तमामताः ॥

इतर ब्राम्हण त्यांस ( चित्पावनांस ) निराळे टाकितात. त्यांनीं महाराष्ट्र देशांत राज्याधिकार मिळविला. असें सांगतात कीं, ते परदेशां वर स्वाऱ्याकरून लुटूं लागले म्हणजे, ज्या ग्रंथांत त्यांची उत्पत्ति सांगितली आहे; त्या ग्रंथांचा नाश करण्याकरितां अधाशी पणानें ते ग्रंथ शोधून काढीत. आणि पूर्वेकडील ब्राम्हण असें ह्मणतात कीं, त्यांनीं आपल्या मूढ सैन्यासही हाच हुकूम दिला होता, तेणेंकरून पुष्कळ हस्त लेखांचा ( ग्रंथांचा नाश झाला.

कथाकार ( ग्रंथकार ) असें वर्णन करितात कीं, त्यांचीं कांहीं कुजलेलीं प्रेतें, समुद्रांत बुडालीं होतीं; त्यांस परशुरामानें जीवंत केलें. वास्तविक ह्मटलें असतां, ते फुटलेल्या

१ पंक्तिवेगळे.

एतेषांवंशजाःसर्वे विज्ञेयाब्राह्मणाःखलु ॥
माध्यंदिनाश्चदेशस्था गौडद्राविडगुर्जरा ॥
कर्नाटतैलंगाद्यापि चित्तपूर्णस्यवंशजाः ॥
अतश्चित्तस्यपूर्णयो नियातस्यक्षयोभवेत ॥

---

तारवावरचे खलाशी असावेत. त्यांची उत्पत्ति परकीय लोका लोकांपासून आहे, असें त्यांच्या सांप्रतच्या स्वरूपावरून उघड दिसतें इ० कर्नल मार्क उयल्ककृत दक्षिण हिंदुस्थानाचा संक्षिप्त इतिहास. पु० १. पृ० १९७–१९८ पर्यंत. याचप्रमाणें रायल एशीटिक रिसर्चिस पुस्तकाच्या ९ व्या भागांत वुयल् फोर्ट साहेबाचें ही हेंच मत आहे असें जाणावें.

---

१ बहुतकरून कोळीच असतात. कारण जलयानांत असें त्यांचें शूरत्व आहे तसें अन्याचें नाहीं.

इत्यादिक श्लोक प्राचीन स्मृतींत घुसडण्याचें कारण काय! खऱ्या ब्राह्मणांस एतादृश यत्न करावे लागत असतात काय? सारांश हे सर्व भगिरथ प्रयत्न चालविल्याचे पाहून विचार करितां व या पुढील सर्व ग्रंथाकारांनीं घेतलेल्या आधारांवरून पहातां सह्याद्रिखंड सप्रमाण असून लोक मान्य आहे, असें ह्मणण्यास किंचित् मात्रही संशय दिसत नाहीं. कारण जर तो ग्रंथ खोटा असता; तर आज पर्यंत एतद्देशीय, लोकांनीं व परद्वीपस्थांनीही मोठाले इतिहासात्मक जे सर्वमान्य, प्रोक्त, विचारशील, ज्यांत अभिमान्याचा व स्वार्थी लोकांचा मुळींच आश्रय नाहीं असे जे ग्रंथ केले, त्या सर्वांत या कोंकणस्थादिकांविषयीं असंभाव्य असून पोरकट असी सह्याद्रिखंडांतील कथा घेतली नसती. ज्या पेक्ष्यां चित्पावनादिकांविषयीं सर्व इतिहासकर्त्यांच्या लिहिण्यावरून व सह्याद्रिखंडस्थ कथेवरून एक वाक्यता होती; त्यापेक्षां तें सत्य आहे किंवा नाहीं याचा विचार सर्व वाचकांनीं व विशेषेंकरून शास्त्र संमताभिज्ञ पुस्तक कर्त्यांनीं करावा, असें आमचें मत आहे.

# अधानंदकृत चित्पावनभाग्योदय दीपिका.

---

श्रीगणेशायनमः ॥ प्रथम् गणपति स्फूर्तिप्रदा । वंदोनि नमिली म्यां शारदा ॥ सद्गुरूच्या चरणारविंदां । साष्टांग केला प्रणिपात ॥ १ ॥ कृत्तिका नंदन स्कंदपुराणीं । अनुवादला ते व्यास वाणी ॥ एक्यायशीं सहस्र ग्रंथीं । स्कंदपुराणीं विरचिलें ॥ २ ॥ साहा संहिता

---

१ श्रोतृकर्णामृतकरं पंचाशत्खंडमंडितं ॥ षट्संहितायुतंशुद्धं शिवतत्वप्रबोधकं ॥ आद्यासनत्कुमारीयाद्वितीयासूतसंहिता ॥ परा ब्राह्मीचसंप्रोक्तातुरीयावैष्णवीशुभा ॥ पंचामीशांकरीवत्सषष्ठीसौरीसमीरितेति भैरवखंड० अ० ४१.

पन्नास खंडें[1] । शंकर चरित्रें अति प्रचंडें ॥ ऐकतां अन्यत्र पाषंड बंडें । खंड विखंडें तैं होती ॥ १ ॥* सह्याद्रि पासोनि पश्चिमे कडे । साहा योजनें बाण पडे ॥ जलार्णवाचें शोषण घडे । जीवना उघडें स्थल झालें ॥ १४ ॥ तीन योजनें रुंद क्षिति । शत योजनें लांबी

---

१ सह्याद्रिखंड : प्रथमोद्वितीयोवीरसंज्ञिकः ॥ तृतीयोभैरवाख्य स्ततोगौरमुखाह्वयेति भै० ख० अ० ४१

* यावर १० ओंव्या खंडित झाल्या आहेत.

२ यत्रबाणपतस्तत्रबाणवलीतिविश्रुतः ॥ पुरीजातापुण्यतमा रामबाणसुनिर्मिता: ॥ सं० ख० उ०अ० ८६ श्लो० ४८ सांप्रत या गांव्यास लोक बाणावली असें म्हणतात.

गंगती ॥ इतुकें कोंकण क्षेत्र ह्मणती । परशु
राम नामांकित ॥ १५ ॥ दशावतारीं जो
षष्टम । जमदग्नि पुत्र परशुराम ॥ पूर्ण करोनि
अवतार काम । तेणें विराम पावला ॥ १६ ॥
परशुराम ग्रामा निकटीं । पयोष्णि नामें नदी
तटीं ॥ पूजा आराधन करोनि धूर्जटि । राम
बैसला ध्यानस्थ ॥ १७ ॥ तेव्हां कोलाहल
ध्वनि । अवचित उठली त्या काननीं ॥ अद्भुत
वायु त्या मधुनि । वृक्ष उन्मळोनि पाडितो ॥

---

१ शतयोजनदीर्घं चविस्तृतंत्रीणियोजनामिति सं० स० उ० अ० ८१ श्लो० २५.

२ महादेव.

॥१८॥ नदी जीवन कैवर्त[1] जात । नौके माजी बसोनि जात ॥ पवन वेगें जळ चक्रांत । पडोनि नौका बुडाली ॥१९॥ कांहीं कैवर्त निघाले तडीं । कांहीं मरोनि वाहती भडीं ॥ त्यांत चौदा प्रेतांची परवडी । झाली कैशी श्रवण कीजे ॥ २० ॥ ध्यान धारण ऋषि

---

१ निषादोमार्गवंसूतेदासंनौकर्मजीवनं । कैवर्तमितियंप्राहुरार्यावर्तनिवासिनः मनु अ० १० श्लो० ३४— कैवर्तक हा निषादापासून उत्पन्न असून अंत्यजांत गणलेला आहे. यास प्रमाण. रजकश्चर्मकारश्चनटोबुरडएवच ॥ कैवर्तमेदभिल्लाश्च सप्तैतेचांत्यजाः स्मृताः ॥ अंत्यजानांगृहेतोयंभांडेपर्युषितंचयत् ॥ तत्द्विजेनयदापीतं तदेवहिसमाचरेत् ॥ अंगिरास्मृ० अ० १ श्लो० ३—४.

भार्गवा । चौदा प्रेतांचा ते थवा ॥ वाहत येतां विप्रोद्भवा । दृष्टि गोचर तो झाला ॥ २१ ॥ नेत्र उन्मीलिनें पाहीं । मन संकेतें मग त्या बहीं । प्रेतें धरोनि चौदाही । तडीस लागलीं रामाज्ञें ॥ २२ ॥ संजीव केलीं कृपा दृष्टि । प्रेतजा झाली परम पुष्टी ॥ ह्मणती देवा अमृत वृष्टी । समान सृष्टी वर वर्तले ॥ २३ ॥ भार्गवराम ——————
न साष्टांग नमन । ह्मणती देवा तुमचें स्व मन ॥ प्राण जीवन आमुतें ॥ २४ ॥ वारंवार विनवीत प्रभावें । ह्मणती रामा वर दान द्यावें ॥ सत्कर्म धर्मातें योजावें । स्वहितार्थ भावें बोलती ॥ २५ ॥ दया ठेवोनि मग भार्गवा । ऋण्याश्रमीं शव संभवां ॥ मौंजी बंधनें संस्कार नवा । करोनि तेधवां द्विज केले ॥ २६ ॥

चौदा ऋषींचे आश्रमाशीं । एकेक ओपिला विद्याभ्यासी ॥ चौदा गोत्रें तींची तयांशीं । आचार्य नामाभिधानें ॥ २७ ॥ दशविधें ब्राह्मण ऋषि वंशीं । सवर्ण गोत्राऽभिधानें त्यांशीं ॥ द्राविड गौड द्विपंचकांशीं । आधार पाराशरस्मृति[२] ॥ २८ ॥

---

१ गौड, १ कानकुब्ज, २ मैथिल, ३ सारस्वत, ४ उत्कल ५ द्राविड ६ माहाराष्ट्र, (देशस्थ) ७ तैलंग ८ कर्नाटकी ९ आणि गुर्जर, मिळून १० पांस प्रमाण स० खं० उ० अ० ८१ पाहा.

२ यावरून स्मृतींत गाळमाळ पुष्कळ झाली असावी. असें साफ दिसून येतें."

दश विध ब्राह्मण अती उत्तम। इतरानुलोम प्रति
लोम ॥ त्यांचा उद्भवाचा क्रम । वर्णितां श्रम
वाउगा ॥ २९ ॥ प्रेत संजीवनांची कथा ।
वर्णितां इतर बोलणें वृथा ॥ चालते आख्यानाचे
पंथा । सोडोनि सर्वथा न व जावें ॥ ३० ॥
श्रवणी लावोनियां ध्यान । कथा ऐका
सावधान ॥ विचित्र कथेचें अनुसंधान ।
अभिनवापन्न श्रवण कीजे ॥ ३१ ॥ वेद विद्या
सामान्य त्यांस । कापटय विद्येचा अभ्यास ॥
करूनि श्रेष्ठां सत् श्रेष्ठांस । शाप विभूत ते
झाले ॥ ३२ ॥ परशुराम होवोनि प्रसन्न ।
वरद वाणी बोले वचन ॥ कलयुगीं शत वर्षं

प्रमाणं । राज्याधिकार तव वाधिका ॥ ३३ ॥ प्राप्त होईल निश्चय । तेणे प्रकटेल भाग्योदय ॥ प्रस्तुत काळीं संकट काय । होतां आठवा मजलागीं ॥ ३४ ॥ प्रगट होवोनि मीं सत्वर । हरीन संकट अती दुस्तर ॥ ऐसें वदोनि परशुधर । तपस्थाना तो गेला ॥ ३५ ॥ इकडे चतुर्दश ऋषींपाशीं ॥ झाले द्विज ते विद्याभ्यासी ॥ परि कवण वर्णाच्या वनिता त्यांशीं । वंशोद्भवाशीं दिधल्या ॥ ३६ ॥ तो

---

१ यावरून सह्याद्रि खंडाची पुष्कळच धूळधाणी पेशव्याकडून झाली असावीसी वाटते.

२ यदाकदाचयुष्माकं विपत्तिर्जायतेभुवि ॥ तदाऽह्वयंतुमां सर्वे समवेताःसुखातये आगत्य.हं तदाविभावःकार्यं साधयेक्षणात् ॥ इतिदत्वावरंतेभ्यो जामदग्न्यः कृपानिधिः ॥ गोकर्णंप्रययौरामो महानलदिदृक्षया स० खं० अ० ८७ श्लो० ३४ पासून ३७ पर्यंत.

विवाहाचा संबंध कांहीं । सह्याद्रिखंडीं कथिला नाहीं ॥ यास्तव अनुमानें भासतें त्यांहीं । पहिल्याच भार्या स्त्री कारिल्या ॥ ३७ ॥ जी म्लेंच्छ कैवर्तकांची जात । गाविदे नामें जन विख्यात ॥ प्रसिद्ध भार्गव क्षेत्रा आंत । अद्यापि नांदत कोंकणीं ॥ ३८ ॥ यांतील पुर्वी चौदा शवें । संजीव केलीं ऋषि भार्गवें ॥ सह्याद्रि पश्चिमें संस्थान नवें । क्षेत्र स्व नामें निर्मियलें ॥ ३९ ॥ तेथें स्थापिले नूतन द्विज । विप्र

---

१ "शूद्रांच्या नायकांशीं संबंध होऊन चित्पावनांची नीच जात झाली." असें टेलर्स ओरियंटिल् हस्त लेखा-च्या २ पुस्तकांतील ७०५ पृष्ठा वरील मजकूरावरून कळतें.

२ कोळी.

नोहे जे प्रेतज ॥ भार्गव निर्माण करी निज । त्याशीं वर्तले कापट्यें ॥ ४० ॥ सद्वेद विद्या सामान्य त्यांस । कौटिल्य विद्येचा अभ्यास ॥ करोनि चेष्टा सत् श्रेष्ठांस । शाप दग्ध ते झाले ॥ ४१ ॥ तेचि कथा सविस्तर । सूतासि प्रश्निती ऋषेश्वर ॥ म्हणती वक्तया तूं चतुर । आम्हीं आतुर श्रवणार्थीं ॥ ४२ ॥ ऐकोनि श्रोतयांचे बोल । वक्तया आला अल्हाद डोल ॥ पुढें कथा परम सखोल । अमोल शब्दें अनुवादें ॥ ४३ ॥ निर्माण केले ज्या भार्गवें । त्यासी छळिलें कापट्य भावें ॥ ऐकावयातें अवदानें द्यावें । सूत सांगे शौनका ॥ ४४ ॥

---

१ फार गूढ. २ मन, चित्त.

भार्गव बोलिला संकट काळीं । स्मरतां पावेन मीं तात्काळीं ॥ ऐसें वरदान त्या कपाळीं । दिधलें होतें शव संजीवा ॥ ४५ ॥ तें सत्य कीं मिथ्या शोधूं ठाव । द्विजें मांडिला कापट भाव ॥ एक तरुण मृत्यु मीव । करोनि धरणीं निजविला ॥४६॥ बैसोनि भोंवतीं सारे रडती । एक शोकें धरणीस पडती ॥ भार्गव नामें ते ओरडती । धांव धांव या संकटीं ॥ ४७ ॥ तपीं

---

१ मीलितानांचयुष्माक माहूतिर्मेयदाभवेत् ॥ तदागच्छामीतिपुराभार्गवेणोक्तमन्खलु ॥ तत्सत्यमनृतंवेतिपरिक्षांकुर्महेवयं ॥ इतिसर्वेसमालोच्य गमैत्युच्चैःप्रचुक्रशुः ॥ आक्रंदितंतदातेषां श्रुत्वारामः कृपानिधिः ॥ प्रादुरासीत्पुरोभागेदेवर्षिर्भार्गवः स्वयमितिस० ख० उ० २ रा०

बैसला ऋषि भार्गव । तेथें आले शब्द[1] संभव । विप्र रूदनाचा अद्भुत रव ॥ ऐकोनि अभिनव वाटलें ॥ ४८ ॥ ध्यान धारण विसर्जन । करोनि जमदग्नि नंदनें[2] ॥ जेथें कृत्रिम द्विज रूदन करित ते सदनां[3] पातला ॥ ४९ ॥ ह्मणे कां आंठविलें मज । किमर्थ रूदनाची गजबज । मांडिली तुह्मीं याचें गुज ॥ समजलें सहज मज पाहिजे ॥ ५० ॥ ते ह्मणती तरूणाशीं अकाल मृत्यु । पावोनि निमाला ऐसें असत्यु ॥ भाषण करितां कौटिल्य कृत्यु । भार्गवें अनित्य ओळखिलें ॥ ५१ ॥ भार्गव

---

१ शब्द. २ पुत्र. ३ जागीं.

४ किमर्थंक्रंदितंविप्रा भवद्भिर्मीलितैरिह ॥ किंदुःखंभवतामद्य नाचयाथ्याचिरादहमिति स० ख० श्लोक ४४.

बोलिला मृषा[1] मरणी । ऐसा निजविला कास या धरणी ॥ तुमची कापट्याची[2] करणी । असत्याचरणी मीं जाणे ॥ ५२ ॥ शिव ध्यान समाधि करोनि ठाव । संकट जाणोनि घेतली धांव ॥ तव असत्य मरणाची हे मावे । प्रेतत्व भाव कपटाचा ॥ ५३ ॥ माझा छळणार्थ केला स्पष्ट । अनोपकारी तुह्मीं नष्ट ॥ अधर्माचारि कर्म भ्रष्ट । मजसी वितुष्ट आचरला ॥ ५४ ॥ सत्व गुणाचा संभव कांहीं । तुमचे देहीं लवलेश नाहीं ॥ कैवर्त प्रेतें जळ प्रवाहीं । जीवंत देहीं म्यां केली

१ मिथ्या. २ कपट, माया.

॥ ५५ ॥ ते सांडोनि तुह्मीं उपकार । केला मजसीं छळ प्रकार ॥ उत्तम कर्मीं अनाधिकार । चित्तीं विकार कपटाचा ॥ ५६ ॥ भ्रष्टवोनि तप क्रम । दिधला मजला वृथा श्रम ॥ ऐसे तुह्मीं द्विजाधम । नाहीं उत्तम सत्कर्मीं ॥ ५७ ॥ परशुराम परम सक्रोध । होवोनि दिधले अनेक

---

१ इतितेषांवचःश्रुत्वा क्रोधसंरक्तलोचनः निर्दहन्निवनेत्राभ्यामालोकयतभूसुरान् ॥ शशापतान्तदाविप्रान् जमदग्निकुमारकः ॥ शापंचप्राप्यतेतस्य कुत्सिताश्चदरिद्रिणः ॥ सेवासर्वेचकर्तारइदंनिश्चयभाषणं॥कन्याविक्रयकाराश्च पुण्यविक्रयकारिणेतिस० खं० अ० ८७.

"The destruction of the *Kshetriyas* by *Purásuráma*, his disgust with the Brahmans, and retiring to a hermitage: several rishis followed, and looking on the western sea, advised him to reclaim land from it. The sea-king promised to

शाप ॥ ब्राह्मणें करोनि विनय विलाप । राम

---

render to him land, as far as he could cast an arrow. He thus reclaimed a tract of land of three *yojanas* ( 30 miles ) in breadth westward, and in length from *Nisica* to *Canyacumari* 300 yójanas southward, or more than 3,000 miles. He located Brahmans therein, turning the *Boyijuti* into Brahmans, settling one thousand of them there, and appointing to them lands for their support, He told them that if they had any cause of sorrow, or iegret, they migth think on him, and he would appear. He then retired to the fane at Gokernam. The said Brahmans, to test his veracity, recalled him, without cause, whereupon, being angry, he condemned them to lose the power of assembling together in council, and to become servile. They accordingly mingled with *Sudra* females, and became a degraded race. „ Taylor's Oriental Manuscripts, Vol. III. P. 105.

भाषांतर. यांत तो असें म्हणतो कीं, " परशुरामानें

क्षत्रिय संहारिल्यावर, ता ब्राम्हणांवर नाखुष होऊन एका पर्णकुटींत जावून राहिला असतां, त्या मार्गें, कितीएक ऋषी गेले. त्याणें पश्चिम समुद्राकडे पाहून त्याप्रत कांहीं जमीन मागितली. समुद्रानें ३ योजनें रुंद व ३००[1] योजनें लांब, नाशिकापासून कन्याकुमारी पर्यंत प्रदेश त्यास दिला. त्यांत त्याणें भोयी जातीचे चित्पावन ) लोकांस ब्राम्हण करून स्थापिलें, व त्यांस असें सांगितलें कीं, जर तुम्हांस संकट पडेले[2] तर मला हाक मारा;

---

१.– १०० योजनें असावीं–कारण शतयोजनदीर्घंचविस्तृतं त्रिणियोजनं ॥ भार्गवंमीलितापृथ्वीसमुद्रात्सुखहेना. इति० सं० अ० ८१.

२ संकट–यदाकदावायुष्माकंविपत्तिर्जायतेभुवि ॥ तदाव्ह येनुरांसर्वेब्रमवेता:मत्पाश्ये स० ख० उ० अ० ८७.

वृत्ति । भार्गव भजनीं ज्यांची प्रीती ॥ त्यांशी शाप न बाधती । ऐसा भृगुपति बोलिला ॥ ५९ ॥ जो कां निंदक खळ दुर्जन । जार कर्मीं ज्याचें

...

म्हणजे मी येईन, असें सांगून तो गोकर्णाच्या गुहेंत जाऊन राहिला. नंतर त्या नूतन ब्राम्हणांनीं ह्याची (रामाची) प्रचीत पाहूं म्हणून निष्काम त्याचें स्मरण केलें. त्यावेळीं (त्यांचा तो कापट्यभाव पाहून) तो कोपानें संतप्त होत्साता, त्यांस तुम्हीं सदोदीत विभक्त (वेगळे) म्हणजे तुमची एकत्र होण्याची शक्ती नाहींशी होऊं. आणि तुम्हीं सर्वांची सेवा कराल, असा शाप देता झाला. त्याप्रमाणें त्यांचा शूद्रांचा बायकोशीं संबंध होवून त्यांची (चित्पावनांची नीच जात झाली."—टेलर्स ओरियंटल् हस्तलेख. पु० ३ पृ० ७०९.

---

१ शापंचप्राप्यतेतस्यकुत्सिताश्चदरिद्रिणः ॥ सेवासर्वत्रकर्ता रइदंनिश्चयभाषणं स० ख० उ० भ० ८९.

मन ॥ त्य.शीं माझें शाप वचन । असत्य नोहे सर्वथा ॥ ६० ॥ ऐसें बोलोनि भृगुपति । जाता झाला तपा प्रति ॥ त्या नंतर ते कारुण्य वृत्ति । छळिते झाले गौतमा ॥ ६१ ॥ गौतम ऋषि महा समर्थ । ब्राह्मणां अन्न द्यावया अर्थ ॥ जीवनावीण तप सामर्थ्यें । धान्यें उत्पन्न तो करी ॥ ६२ ॥ प्रातःकाळीं पेरोनि साळी । निर्माण धान्यें माध्यान्ह काळीं ॥ करोनि पाळी द्विज दुष्काळीं । कृपानुकूळि निरंतर ॥ ६३ ॥ सह परिवारें प्रेत पावन । दुष्काळीं

---

१ श्रुत्वेत्थंभार्गवोरामो महेंद्रंतपसेययौ ॥ गतेतुभार्गवेरामे तत्क्षेत्रस्थाद्विजातयः शापग्रास्थासुदुःखार्ताः शूद्रप्रायस्तदाभवन्निति स० खं० ८७ ध्याय० श्लो० ४९ ५०.

पाळिले देवोनि अन्न ॥ परि ते अनुपकारी कृतघ्न । केलें विघ्न गौतमासी ॥ ६४ ॥ गौतमाचें सामर्थ्य गहन[1] । तें प्रेतोद्भवां नव्हे सहन ॥ परोत्कर्षें शरीर दहन । दुर्जनाचे जया परी ॥ ६५ ॥ गौतम ऋषि अति श्रेष्ठ । प्रेतोद्भव ते परम दुष्ट । कांहीं कापट्याचें कुष्ट । मुनिवरा वितुष्ट आरंभिलें ॥ ६६ ॥ एक कपटें झाला गाई । ऋषि क्षेत्र जया ठायीं ॥ तेथें जावोनियां खाई । धान्य लवलाही तेधवां ॥ ६७ ॥ गौतम देखोनियां तें दिठी । एकसगे

---

१ कठीण. २ सत्वर.

निर्टली पिटी ॥ माईक गाई भू तळवटीं । कृषि नेहटी पाडयेली ॥ ६८ ॥ ते ह्मणती गौतम गो हत्यार । व्यर्थ तयाचा किं बाडिवार ॥ वाढवोनी सदाचार । धिग् धिग् विचार हा काय त्याचा ॥ ६९ ॥ वाग जल्पना दुरोत्तरीं

---

१ येकत्रमीलिताश्चैव याज्यमान्योन्यमादृता: मंत्रयित्वामायया चनिर्मिता गौजरान्विता: सागत्वासर्वसस्यानितप:संवर्द्धतायैवै ॥ अशेष-भक्षयित्वाश्चपुनरंतुमुनेवृषं । समागतासौरभेयीं समाधिस्तमुनेस्तदा ॥ लीलेवजिव्हयांगानिवज्रसंमितयाततः विसृष्टासमुनि:श्रीमान्समाधिंकृणाकर:॥वारयामासतांविक्ष्यहुंकारेणात्मविद्यया ॥ तावन्मात्रेणसाप्राणान् विजहावाविलंबितं । अथतोमीलिता:सर्वे द्विजामायाविमोहित: । अन्योन्यमुचिरेतेन गौतमस्यदुरात्मन: गौर्हतंगौर्हतंचेतिनिर्घृणाब्राम्हणा भमहाते चि० भाग्यो० दो० अ० २ श्लो० ७२, ७३, ७४, ७५, ७६, ७७.

गीतमा गोविति नाना परी ॥ तरी तो तपस्वी ज्ञानांतरीं । पाहतां कापट्य जागवलें ॥ ७० ॥ स क्रोध बोले प्रेतोद्भवां । तुम्हींच मायिक होवोनि गवा ॥ ते मीं हाकितां पतन भुवा । झाल्या अभिन्न मीं-जामें ॥ ७१ ॥ कौळिक काया कपट वेष । दुष्ट नष्ट न सत्य लेश ॥ काय प्राचीन संबंध लेश । म्हणोनि भार्गवें द्विज केले ॥ ७२ ॥ जैसा मंत्रें बाजीगे र । निर्जीव वादिचा विषधर ॥ सजीव करोनि मावकर । करंड्यांत सत्वर तो लपवी ॥ ७३ ॥ तैसें शवांशीं जीवंत केलें । द्विजाधामी हे होवोनि ठेले । कैवर्तकांचे

---

१ गारोडी.

अवगुण गेले ॥ ऐसें न केलें भार्गवें ॥ ७४ ॥ कौळीक कौटिल्य विद्या सारी । बाहेर नटले द्विज वेष धारी ॥ परंतु परम अनाचारी। श्रौतस्मार्त अधिकार हीन ॥ ७५ ॥ द्विज धर्म कर्माचा आरोप ॥ जैसे कंदर्पाचे रोप । त्यासी कस्तूरि केशर लेप ॥ करितां स्वरूप न पालटे ॥ ७६ ॥ तैसे तुह्मीं महा नष्ट। परोत्कर्षें असंतुष्ट कल्युगीं व्हाल आचार भ्रष्ट ॥ गौतमें स्पष्ट शापियलें ॥ ७७ ॥

---

१ कांद्याचे माडे.

२ गौतम उवाच—अश्रौत धर्म निरताःकृतघ्नाःपापिनःशठः ॥ परदार भिलाषंचपरपाकोपजीविनः ॥ याजकापूजकाःक्षेत्रवाणिज्या रामजीविनः भृतकाध्यायिनःसर्वेभवंतुब्राह्मणाधमाः ॥ कामलोभपरा दुष्टा सर्वदान्योन्यनिंदकाः ॥ आततायितयासक्ताछद्यःपैशून्यवर्जिताः ॥

कापट्य कार्माची ही परी । गौतमें शापिलें स्पष्टोत्तरीं ॥ सूतास शौनक प्रश्न करी । काय पुढारीं प्रवर्तलें ॥ ७८ ॥ जो क्षत्रिय वंश वनांगार । उतरला सर्व पृथ्वी भार ॥ प्रेत पावनोदकाचा धार । तो विस्तार निरोपिला ॥ ॥ ७९ ॥ कलींत राज्य शंभर वर्षें । प्राप्त होवोनि भाग्योत्कर्षें । वाढेल ऐसा वर प्रहर्षें ॥ दिधला होता श्री भार्गवें ॥ ८० ॥ ग्राम

---

असन्मार्गप्रवर्तकाः भवंतु ब्राह्मणाधमाः । कन्यागोसुतसावित्रीगजाश्वानां च विक्रयः श्रौतस्मार्तक्रियाहीना पयाज्यनांचविक्रय इति चि० भा० टी० अ० श्लो० ८०, ८१, ८२, ८३, ८४, ८५. याचप्रमाणें भृगु, कण्व, दूर्वास, कपी, दधीचादिक ऋषींनीं दिलेले शाप आहेत; परंतु विस्तार भयास्तव सर्व येथें दाखविले नाहींत.

परशुरामाभिधानीं । भार्गव राहिला तये स्थानीं ॥ पयोष्णी नदी पश्चिम वाहिनी । दक्षिण भागीं ग्रामाच्या ॥ ८१ ॥ भार्गव क्षेत्रा कोंकण नाम । तेथें वसती द्विजाधम ॥ त्यांचा भाग्याचा विक्रम । भार्गव वरदें झाहला ॥ ८२ ॥ ऐशी कथा स्कंदपुराणीं । सह्याद्रिखंडीं व्यास वाणी ॥ अनुवादली ते नैमिषारण्णी । सूत सांगे शौनका ॥ ॥ ८३ ॥ तदनुसार संक्षेप कथा । महाराष्ट्र भाषा यथार्थ उलथा ॥ करोनि कथिली यांत वृथा । कथा अन्यथा न वर्णिली ॥ ८४ ॥ भार्गव राम भविष्य वाणी । व्यासें कथिली स्कंद पुराणीं ॥ सह्याद्रिखंडीं विचक्षणी । येकायशांध्यायीं

श्रवण कीजे ॥ ८५ ॥ प्रेत संजीवनं चित्तावन ।

---

१ "According to the *Pauranics*, *Pursurama*, having extirpated the *Cshettris*, and filled the earth with blood, wanted to perform a sacrifice, but could find no Brahman to assit, on account of his being defiled with the effusion of so much human blood. As he was standing on the summit of the mountains of Kuccan, he spied fourteen *Dead Bodies* stranded on the adjacent shores below: these were the *Corpses* of so many *Mlenchhas*, who had been flung into the sea by their enemies in distant countries in the west, they had been wafted by the winds, and were then in a high state of putrefaction. *Rama recalled* them to life, imparted knowledge to them, and conferred on them the Brahminical ordination, and bid them perform the sacrifice. From these fourteen dead men is descended the *Kucanastha* tribd of Marahtas: thus called, because, since that time, they have always staid and remained in the Kucan. The Hindu Pantheon by Edward Moor, F. R. S. page 351

भाषांतर— यांत ब्राह्मणांविषयीं साधारणपणें लिहीत असतां, चित्पावनांविषयीं तो असें ह्मणतो कीं, "पुराणोक्त वचनाप्रमाणें परशुरामानें निःक्षत्रिय करून पृथ्वी रक्तानें भरल्यावर, तद्दोष (क्षत्रियवधजन्यदोष) निवारणार्थ त्यास यज्ञ करावा लागला. परंतु त्यास मदत करण्याविषयीं कोणी ब्राह्मण मिळेनात. तेव्हां तो कोंकणांतील पर्वताच्या (सह्याद्रीच्या) शिखरावर उभा असतां त्यानें चौदा प्रेतें सन्निकृष्ट किनाऱ्यावर चढलेलीं पाहिलीं. हीं प्रेतें म्लेच्छांचीं असून तीं दुरच्या प्रदेशांतील शत्रूंनीं पश्चिमेकडे समुद्रांत फेकून दिलीं होतीं. तीं वाऱ्यानें तरंगत वाहून आलीं असून तीं त्यावेळीं अति दुर्गंधावस्थेंत (फार कुजलेलीं) होतीं. रामानें त्यास जीवंत करून ज्ञान दिलें व त्यांस ब्राम्हण जातीय दीक्षा देऊन यज्ञ करण्यास आज्ञा केली. ह्या चौदा प्रेतांपासून, मराठ्यांतील[1] कोंकणस्थ (चित्पावन) जात उत्पन्न झाली.

---

१ चेड (चेडा) आणि चेडी (चेडूं) हे शब्द

सह्याद्रिखंडीं उत्पन्न कथन ॥ केलें असें तें व्यासोक्त जाण । सह्याद्रिखंडीं अवलोका ॥ ८६ ॥ कथा भाग अठरा पुराणीं । भारता सहित व्यास वाणी ॥ त्यांतील आख्यानें अमृत खाणी । विश्वास त्यांणी सर्वत्रां ॥ ८७ ॥ पुराणांतरीचें कथन । यथा सांग झालें पूर्ण ॥ पुढें श्रोतीं होवोनि सावधान । कथानुसंधान परिसावें ॥ ८८ ॥

---

कोंकणस्थ म्हणण्याचें कारण असें आहे कीं, त्या वेळेपासून ( जीवंत केल्या दिवसापासून ) ते कोंकणांतच स्थाईक होऊन तेथेंच राहिले. एडवर्ड मूर यकृ. अ.र. एस कृत सर्वदेवसभा पृ० ३५१.

---

मराठ्यांतील असून ते पूर्वोक्त लोकांत एतावत्कालपर्यंत चालूं आहेत. ह्यावरून हे खरोखर मराठे असें म्हणण्यास कांहींच संशय वाटत नाहीं. ह्याचें प्रत्यंतर येशि० दि० पु० ९ पृ० २३२–२५१ पा०.

भार्गवराम वरद प्रमाण । कलयुगीं शंभर वर्षे जाण ॥ भाग्योदयाचें लक्षण । राज्याधिकार प्राप्तीचें ॥ ८९ ॥ तें भूत भविष्य समग्र जाण । ऐश्वर्य भोगोनि निवारण ॥ यावत्काल झाले पूर्ण । तेंचि प्रकरण सविस्तर ॥ ९० ॥ ऐश्वर्य भोक्ता झाला कवण । तें उत्तराध्यायीं श्रोतीं श्रवण ॥ आनंद मुखीं निरूपण । यथार्थ जाण परिसावें ॥ ९१ ॥ ही चित्पावन भाग्योदय दीपिका । महाराष्ट्र भाषा शुभ बोधिका ॥ गीर्वाण श्लोकान्वयनिका । तद्भाव सम्यक् कथियेला ॥ ९२ ॥

॥ इतिश्री सह्याद्रिखंडांतर्गत परशुराम क्षेत्रस्थ चित्पावन द्विज वंशोद्भव दीपिका प्रथम प्रकरणं संपूर्ण ॥

## प्रकरण २.

श्रीगणेशायनमः आदीं गजाननाचें स्मरण । करोनि वंदिलीं सद्गुरु चरणँ ॥ संत सज्जनां अनन्य शरण । हें मंगला चरण प्रारंभीं ॥ १ ॥ श्रोतीं होवोनि यां सावधान । विचित्र ऐका अनुसंधान ॥ चित्पावनांतें वर दान । भाग्यो दयार्थ कलयुगीं ॥ २ ॥ त्रेतार्ध अवघें युग द्वापार । कली न भरतां पांच हजार ॥ कमी दोन शत संवत्सर । या संधींत भाग्योदय झाहला ॥ ३ ॥ शालीवाहन सोळा शत ।

वत्सर क्रमिल्या सत्रा शकांकात । प्रेत पावन भाग्याऽद्भुत । उदया येत तें ऐकिजे ॥ ४ ॥ भार्गवराम वदला सत्य । तें कदा काळीं नव्हे असत्य ॥ भाग्य संभवाऽच्यार कृत्य । काय कैसें प्रवर्तलें ॥ ५ ॥ निर्मिल्या पासोनि कोंकणीं वास । किंचित्मात्र वेदाभ्यास ॥ वंश विस्तार बहुवस । परशुराम क्षेत्रांतरीं ॥ ६ ॥ चिते पासोनि उत्पन्न । ह्मणोनि नाम त्यां चित्पावन ॥ भार्गवाचें पोळिलें मन । चित्ते पोळण अभिधानीं ॥ ७ ॥ संक्षेप मात्रें द्विज

---

